# ’ब्रह्मदेव : एक सर्वांगीण अभ्यास’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

साहित्य आणि ललितकला विद्याशाखांतर्गत

भारतीयविद्या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीकरिता

सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

सुवर्णरेखा आदित्य देवधर

मार्गदर्शक

डॉ. मंजिरी भालेराव



ऑक्टोबर २०२१

श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केन्द्र

**प्रतिज्ञापत्र**

संशोधक सुवर्णरेखा आदित्य देवधर प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की डॉ. मंजिरी भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली 'ब्रह्मदेव: एक सर्वांगीण अभ्यास' ह्या शीर्षकाप्रमाणे विद्यावाचस्पती (पीएचडी) या पदवीसाठी काम केलेले आहे. हा संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठास विद्यावाचस्पती पदवी करिता सादर करण्यात येत आहे. प्रस्तुत संशोधन कार्य माझे स्वत:चे आहे. यात समाविष्ट करण्यात आलेले संशोधन हे स्वप्रयत्नाचे फलित असून माझ्या मार्गदर्शक डॉ. मंजिरी भालेराव, इतर तज्ञ मार्गदर्शक व निवडक संदर्भ साहित्य ह्यांच्या मदतीनेच संशोधन कार्य पूर्ण करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रबंध आजपर्यंत कोणत्याही पदवीसाठी, पदविकेसाठी वा परीक्षेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

दिनांक –

संशोधन केंद्र – श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व
भारतीयविद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**सुवर्णरेखा देवधर**
**संशोधक**

**प्रमाणपत्र**

सुवर्णरेखा देवधर यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथून ब्रह्मदेव: एक सर्वांगीण अभ्यास हा विषय घेऊन पी एच डी साठीचे संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यांनी केलेले हे काम त्यांचे स्वत:चे असून त्या कामासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्रोतांचा योग्य रीतीने निर्देश प्रबंधात करण्यात आलेला आहे. हा प्रबंध किंवा याचा कोणताही भाग त्यांनी कोठेही आणि कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक –

संशोधन केंद्र – श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व
भारतीयविद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**डॉ. मंजिरी भालेराव**

**प्रबंध मार्गदर्शक**

## ऋणनिर्देश

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे सहकार्य / मोलाची मदत झाली त्यांचे आभार मानल्याशिवाय पुढे जाणे योग्य नाही.

सर्वप्रथम पुरातत्त्व ह्या विषयातील माझे गुरुजन डॉ. गो.बं देगलूरकर, डॉ. प्रकाश जोशी यांना सादर वंदन. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृत व इंडॉलॉजी विभागाचे प्रमुख आमचे सर दिवंगत डॉ. श्रीपाद भट यांनी ह्या कामासाठी मला कायम प्रोत्साहन दिले आणि आत्मविश्वास निर्माण केला. माझ्या मार्गदर्शक डॉ. मंजिरी भालेराव ह्यांच्याशिवाय हे प्रबंधाचे काम पूर्णत्वास जाणे अशक्य होते. तसेच सध्याचे विभाग प्रमुख डॉ. अंबरीष खरे ह्यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. ह्याशिवाय सुनिला गोंधळेकर, अंजली भामरे, पंकज भांबुरकर, चंद्रशेखर जोगदेव, कै. उदयन इंदुरकर ह्यांचेही सहकार्य लाभले. पुरातन ब्रह्मक्षेत्र ह्या गुजराती पुस्तकातील मजकुराचे मराठी भाषांतर करण्यासाठी माझी मैत्रीण आरती चांदोरकर हिने मदत केली. सर्वेक्षणा दरम्यान अनेक लोकांनी आपुलकीने माहिती पुरविली त्या सर्वांची मी ऋणी आहे.

ह्या बरोबरच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पी एच डी विभागातील भागवत बाई व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सदाशिव पेठ येथील जोशी बाई तसेच ग्रंथालयातील कर्मचारी यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार, डेक्कन कॉलेजचे ग्रंथालय कर्मचारी व स्क्रिप्टोरीयम विभाग प्रमुख डॉ. प्रसाद जोशी व स्क्रिप्टोरीयम विभागातील संहिता जोशी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे अभार मानते. त्याच बरोबर भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर येथील ग्रंथालय व सर्व विभागातील कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानते.

प्रबंध बिनचूक होण्यासाठी सतीश भागवत ह्यांची मोलाची मदत झाली. ह्याशिवाय हा प्रबंध पूर्ण होण्यात माझे दिवंगत वडील विद्याकर भिडे ह्यांचा तर फार मोठा सहभाग आहे. माझे पती आदित्य देवधर ह्यांनी ह्या विषयातील माझ्या आवडीला कायम प्रोत्साहन दिले. तुषारिका लिमये, स्मिता भागवत, रोहिणी भिडे ह्यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचेही आभार मानते.

**सुवर्णरेखा देवधर**

# अनुक्रमणिका


प्रतिज्ञापत्र........................................................................................२

प्रमाणपत्र..........................................................................................३

ऋणनिर्देश.........................................................................................४

प्रकरण १........................................................................................१२

संशोधन विषयाची ओळख..................................................................१२

परिचय............................................................................................१२

१.१ प्रास्तविक.....................................................................................१२

१.२ संशोधनाची उद्दिष्टे...........................................................................१५

१.३ संशोधनाचे महत्त्व...........................................................................१६

१.४ संशोधनाची साधने...........................................................................१७

१.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा...............................................................१८

प्रकरण २........................................................................................२१

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा.............................................२१

२.१ ग्रंथ............................................................................................२३

२.२ शोध निबंध....................................................................................२५

२.३ आंतरजाल व संकेतस्थळे.....................................................................२७

प्रकरण ३........................................................................................२९

संशोधनाची कार्यपद्धती.........................................................................२९

३.१ ब्रह्मा शब्दाचा अर्थ ..........................................................................३१

३.२ संकल्पना व महत्त्व ....................................................................................३३

३.३ ब्रह्मा व विश्वकर्मा.......................................................................................३४

३.४ ब्रह्मा आणि सूर्य........................................................................................३५

३.५ ब्रह्मा व यज्ञ..............................................................................................३६

३.६ प्रजापती एक सर्वोच्च देवता .........................................................................३९

३.७ वाणी किंवा वाचा आणि ब्रह्मा .......................................................................४४

३.८ प्रजापती व दक्ष .........................................................................................४५

३.९ प्रजापती व त्वष्टा.......................................................................................४७

३.१० मत्स्य, कूर्म व वराह ही ब्रह्मदेवाचीच रूपे.......................................................४८

३.११ पितामह ब्रह्मा..........................................................................................५४

३.१२ परब्रह्म आणि ब्रह्मा....................................................................................५८

३.१३ ब्रह्मदेवाची सृष्टीरचना.................................................................................६३

३.१४ ब्रह्मदेव आणि वेद वाङ्मय............................................................................७०

३.१५ ब्रह्मदेवाची कालगणना.................................................................................७३

३.१६ ब्रह्मदेवाचे मूर्त स्वरूप.................................................................................७४

३.१७ ब्रह्मदेवाची उपासना....................................................................................८०

३.१८ त्रिमूर्ती...................................................................................................११८

३.१९ काही त्रिमूर्ती मंदिरे.....................................................................................१२१

३.२० ब्रह्मावर्त घाट – बिठूर ...............................................................................१२८

३.२१ ब्रह्मकपाल – एक तीर्थस्थान........................................................................१२८

३.२२ दत्त संप्रदाय ........................................................................१२९

३.२३ भारताबाहेरील ब्रह्मदेव....................................................................१३२

३.२४ बर्मर : एक क्षेत्रपाल देवता ...........................................................१३५

३.२५ ब्रह्मदेवाची स्तोत्रे .........................................................................१३६

ब्रह्मार्पण मंत्र........................................................................................१३९

३.२६ ब्रह्मदेवाशी संबंधित काही व्रते .......................................................१४०

३.२७ ब्रह्मदेवाशी साधर्म्य असलेल्या इतर देवता .........................................१४२

प्रकरण ४ ...........................................................................................१४४

माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिवर्चन.............................................१४४

४.१ ब्रह्मदेवाची आपल्याच मुली प्रति आसक्ती ............................................१४५

४.२ सावित्रीकडून ब्रह्मदेवाला अपूज्य होण्याचा शाप .....................................१५३

४.३ ब्रह्मदेवाचे पाचवे मस्तक शिवाकडून तोडले जाणे ...................................१५५

४.४ लिङ्गोद्भवाची कथा .........................................................................१५७

४.५ सती आणि शिव ह्यांच्या विवाहप्रसंगी ब्रह्मदेवाचे गैरवर्तन...........................१५८

४.६ ब्रह्मदेवाचा जन्म विष्णूच्या नाभीकमळातून ............................................१५९

४.७ शिव हा विष्णू आणि ब्रह्मदेवापेक्षा श्रेष्ठ ................................................१६०

४.८ मोहिनी अप्सरेचा ब्रह्मदेवाला शाप.......................................................१६०

४.९ गणपतीकडून ब्रह्मदेवाचा अपमान.......................................................१६०

४.१० निरनिराळ्या असुरांना वर देणे.........................................................१६१

प्रकरण ५ ........................................................................................ १६५

संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी ........................................................ १६५

५.१ संशोधनातील महत्त्वाचे मुद्दे ........................................................................ १६८

५.२ निष्कर्ष ..................................................................................................... १६९

परिशिष्ट १ ..................................................................................................... १७२

संदर्भ सूची ...................................................................................................... १७२

भेट दिलेली ठिकाणे ......................................................................................... १७२

परिशिष्ट २ ..................................................................................................... १७३

संदर्भ ग्रंथ सूची .............................................................................................. १७३

English books ................................................................................................. १७३

Annual Reports ASI ........................................................................................ १७९

Gazetteer ....................................................................................................... १७९

मराठी पुस्तके ................................................................................................. १८१

संस्कृत पुस्तके ................................................................................................ १८३

हिंदी पुस्तके .................................................................................................... १८४

गुजराती पुस्तक ............................................................................................... १८६

तक्ता क्र. १ प्रतिहारांच्या हातातील आयुधांचा क्रम ..........................................७७

तक्ता क्र. २ ब्रह्मदेवाचे आयतन व प्रतिहारांचे देवतांबरोबरचे स्थान ........................७८

आकृती क्र. १ मृग नक्षत्र ........................................................................१५०

## संदर्भ चित्र सूची


| | |
|---|---|
| चित्र क्र, १ | ब्रह्मदेव मंदिर, पुष्कर : स्वत: संशोधक .......................पान क्र. ८५ |
| चित्र क्र. २ | ब्रह्मदेव प्रतिमा, पुष्कर : स्वत: संशोधक.......................पान क्र. ८६ |
| चित्र क्र. ३ | पुष्कर तीर्थ : विकिपिडियावरून................................पान क्र. ८८ |
| चित्र क्र. ४ | छिंच, The Sampradaya Sun Independent Vaisnava News Feature Stories ह्या संकेत स्थळावरून.......................पान क्र. ९१ |
| चित्र क्र. ५ | ब्रह्मदेव प्रतिमा, खेडब्रह्म : विकिपीडिया ह्या संकेतस्थळावरून..............................पान क्र. ९२ |
| चित्र क्र ६ | ब्रह्मदेव मंदिर, खेडब्रह्म : विकिपीडिया ह्या संकेतस्थळावरून..............................पान क्र. ९३ |
| चित्र क्र. ७ | ब्रह्मदेव मंदिर, ब्रह्माकरमाळी, गोवा : स्वत: संशोधक .......पान क्र. ९५ |
| चित्र क्र. ८ व ९ | ब्रह्मा प्रतिमा, ब्रह्माकरमाळी, गोवा : स्वत: संशोधक.........पान क्र. ९६ |
| चित्र क्र. १० | परमेश्वर मंदिर, शिराढोण : स्वत: संशोधक...................पान क्र. ९७ |
| चित्र क्र. ११ | ब्रह्मा मूर्ती, शिराढोण : चंद्रशेखर जोगदेव......................पान क्र. ९८ |
| चित्र क्र. १२ | ब्रह्मा मंदिर, खजुराहो : विकिपीडिया ह्या संकेतस्थळावरून............................पान क्र. १०० |
| चित्र क्र. १३ | ब्रह्मा मूर्ती, नालासोपारा : डेक्कन ओडिसी ह्या संकेतस्थळावरून.........................पान क्र. १०२ |
| चित्र क्र. १४ | ब्रह्मा, नालासोपारा : स्वत: संशोधक.........................पान क्र. १०२ |
| चित्र क्र.१५ व १६ | ब्रह्मा मूर्ती, रामेश्वर मंदिर, ठाणे : स्वत: संशोधक.........पान क्र. १०३ |

चित्र क्र. १७ ब्रह्मा मूर्ती, मंगळवेढा : डॉ. अरविंद सोनटक्के................पान क्र. १०४

चित्र क्र. १८ ब्रह्मा मूर्ती, बेलुर : विकिपिडिया ह्या संकेतस्थळावरून.....पान क्र. १०६

चित्र क्र. १९ ब्रह्मा प्रतिमा, सोमनाथपुरा :

विकिपिडिया ह्या संकेतस्थळावरून ..........................पान क्र. १०७

चित्र क्र. २० ब्रह्मा प्रतिमा, वेरूळ गुंफा १६: संशोधक ...................पान क्र. १०८

चित्र क्र. २१ लिङ्गोद्भव ब्रह्मा, वेरूळ : संशोधक ...........................पान क्र. १०८

चित्र क्र. २२ एकमुखी ब्रह्मदेव, बीड : डॉ. अरविंद सोनटक्के ............पान क्र. १०९

चित्र क्र. २३ ब्रह्मा मूर्ती, धर्मापुरी :

देशमुख भगवान यांच्या पुस्तकातून...........................पान क्र. ११०

चित्र क्र. २४ ब्रह्मा मूर्ती, जामसोट, अलाहाबाद : अलाहाबाद वस्तुसंग्रहालयाच्या

अधिकृत संकेत स्थळावरून .................................पान क्र. १११

चित्र क्र. २५ ब्रह्मा मूर्ती, थिबा पॅलेस, रत्नागिरी : स्वत: संशोधक .....पान क्र. ११२

चित्र क्र. २६ ब्रह्मा मूर्ती, संगम माहुली, सातारा : स्वत: संशोधक......पान क्र. ११३

चित्र क्र. २७ ब्रह्मा प्रतिमा, पाटेश्वर, सातारा : स्वत: संशोधक ..........पान क्र. ११४

चित्र क्र. २८ गजारूढ ब्रह्मा, खिद्रापूर, स्वत: संशोधक ..................पान क्र. ११५

चित्र क्र. २९ आलिंगन मूर्ती,

राजा केळकर संग्रहालय : स्वत: संशोधक .................पान क्र. ११६

चित्र क्र. ३० शोधकर्ता ब्रह्मा, त्रिशुंड गणपती मंदिर, पुणे : संशोधक...पान क्र. ११७

चित्र क्र. ३१ ब्रह्मदेव मंदिराची ललाटपट्टी: Saxena Sourabh, Dudahi -

An Obscure Chandela Site, 2016..........................पान क्र. १२१

चित्र क्र. ३२ ललाटपट्टी वरील ब्रह्मदेव: Saxena Sourabh, Dudahi - An Obscure Chandela Site, 2016……………………….पान क्र. १२२

चित्र क्र. ३३ हरीहरपितामह, गोळप, रत्नागिरी : आशुतोष बापट……….पान क्र. १२३

चित्र क्र. ३४ त्रिमूर्ती, वेरुळ, www.elloracaves.org या संकेतस्थळावरुन……. …….पान क्र. १२४

चित्र क्र. ३५ ब्रह्मदेव, तारापूर, डॉ. मंजिरी भालेराव……………………पान क्र. १२५

चित्र क्र. ३६ ब्रह्मा मूर्ती, महाबलीपुरम, Kevin Standage ……………पान क्र. १२६

चित्र क्र. ३७ दत्त, allhindugodgoddess.blogspot.com ह्या संकेत स्थळावरून …………………………………पान क्र. १२९

चित्र क्र. ३८ व ३९ प्रंबनन मंदिर, इंडोनेशिया : स्वत: संशोधक……………पान क्र. १३२

चित्र क्र. ४० मृगस्थळी, नेपाळ : विकिपीडिया ह्या संकेतस्थळावरून ……………………..पान क्र. १३३

चित्र क्र. ४१ मिरपूर खास, पाकिस्तान : पिंटरेस्ट ह्या संकेतस्थळावरून ………………………..पान क्र. १३४

तसेच प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी घेतलेल्या ब्रह्मदेवाच्या प्रतिमा गुगलवरुन घेतल्या आहेत.



# प्रकरण १

# संशोधन विषयाची ओळख

## १.१ प्रास्तविक

भारत देशाला प्रचंड मोठा अनेक वर्षांचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. ह्या इतिहासात देखील पुढे आणखी भाग आहेत. त्या मध्ये प्रादेशिक, भौगोलिक, प्रांतीय भाषिक, वेश तसेच आचार–विचार, आहार व जीवनपद्धती या सर्वच बाबतीत भारतात विविधता आहे आणि तरी सुद्धा भारतभूमी हजारो वर्षांपासूनचा स्वतःचा हा वारसा जपत आहे. या भूमीने अनेक धर्मांना आपलेसे केले. हे धर्म या भूमीवर रुजले, वाढले परंतु खऱ्या अर्थाने एका धर्माला भारताने आणि भारतवासीयांनी आपलेसे केले आणि तो म्हणजे हिंदू धर्म. ही विचारसरणी या भूमीतच निर्माण झाली, रूजली, वाढली आणि जोपासली गेली. हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही एका व्यक्तीने हा निर्माण केलेला नसून; कोणी एक व्यक्ती इथे पूजनीय नाही. कोणीही प्रेषित नाही, हिंदू धर्मानुसार कोणतीही व्यक्ती आपल्या आवडीच्या देवतेची भक्ती, पूजा करू शकतो, कुठल्याही प्रकारची सक्ती नाही. ''हिंदू धर्म हा जगातील सर्वात प्राचीन धर्म आहे असे मानले जाते.'' (Fowler, 1997 : 1) हिंदू धर्मात अनेकविध प्रकारचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. काही विशिष्ट संकल्पना आहेत; अनेक प्रकारची विविधता असून सुद्धा जगण्याच्या पद्धतीत खूपच एकता, एकसारखेपणा आहे. सर्व भारतात थोड्याफार फरकाने एकाच प्रकारची जीवनशैली आहे. ह्यात प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, हवामान आणि ऋतुमानानुसार जो काही फरक आहे तो तेवढाच; पण संपूर्ण देशात समान सण, उत्सव आणि परंपरा पाळल्या जातात असे दिसून येते. त्याभोवती असणाऱ्या कथा सुद्धा सर्वसाधारणपणे सगळीकडे सारख्याच असलेल्या आढळून येतात.

जीवनशैलीमध्ये असणाऱ्या फरकाबरोबरच काही प्रमाणात वैचारिक धारणांमध्ये सुद्धा फरक दिसून येतो. जसे की एकेश्वरवाद, अनेकेश्वरवाद, ईश्वरवाद, अनीश्वरवाद किंवा नास्तिक अशा अनेक निरनिराळ्या विचारधारा आहेत. परंतु जवळ जवळ सर्वच महत्त्वाच्या धार्मिक ग्रंथांमधून, तत्त्वज्ञानामधून आणि लोकांच्या जीवन पद्धतीवरून अनेकेश्वरवाद ही संकल्पना बऱ्याच प्रमाणात मान्यता पावलेली दिसून येते. यामध्येही सर्व सजीव–निर्जीव सृष्टी हिचा कोणीतरी कर्ता करविता नक्कीच आहे असा विचार प्रामुख्याने केलेला आढळून येतो. मग याच गूढ, अनाकलनीय शक्तीला प्रत्येकाने आपापल्या परीने समजून घेण्याचा आणि समजावून देण्याचा प्रयत्न केला. यातूनच पुढे काही आकाशस्थ देवीदेवतांच्या रूपात त्यांची कल्पना करण्यात आली आणि

वेगवेगळ्या रूपांत हे देव दिसायला लागले. यातील काही देव हे इष्टदेवतांच्या स्वरूपात आवडीचे, जवळचे झाले. मग पुढे ठराविक देवतांची काही ठराविक कामे सुद्धा योजली गेली. पुढे हळूहळू याच विचारांचा परिणाम म्हणून ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन प्रमुख देव निर्माण झाले. त्रिमूर्ती म्हणून हे तिघे प्रसिद्ध झाले आणि त्यांनाही काही ठराविक कामे नेमून दिली. ही जी काही निर्माण झालेली सजीव–निर्जीव सृष्टी आहे हिचा कर्ता करविता ब्रह्मा म्हणजेच ब्रह्मदेव तसेच ह्या सृष्टीचा पालक म्हणजेच प्रतिपाळ करणारा श्री विष्णू, तर ही सृष्टी नष्ट करणारा असा संहारकर्ता महेश किंवा शंकर अशी त्या तिघांची विभागणी करण्यात आली. जवळ जवळ सर्व धार्मिक ग्रंथांमध्ये अशाच प्रकारचे वर्णन आढळते. ब्रह्मदेव हा दैवी स्रोत मानला गेला आहे. म्हणजे त्याच्या माध्यमातून पुढे अखिल विश्वाची निर्मिती झाली असे मानले आहे. सृष्टीच्या उत्पत्तीसाठी, निर्मितीसाठी ब्रह्मदेवाने नक्की काय केले. अगदी सुरुवातीच्या काळात काय आणि कसे निर्माण होत गेले, मग सृष्टीच्या निर्मितीपासून ते ह्या सृष्टीरचनेपर्यंतचा हा प्रवास कसा झाला. ह्या प्रवासात ब्रह्मदेवाचा देवता म्हणून झालेला उत्कर्ष, त्याची होत असलेली उपासना नंतर पुन्हा देवता म्हणून झालेला अपकर्ष आणि शेवटी नुसते नावापुरतेच उरलेले ब्रह्मदेवाचे महत्त्व या सर्वांचा घेतलेला हा परामर्श आहे. एक अभ्यास आहे.

अगदी लहान असल्यापासून आपल्याला असेच सांगितले गेलेले असते की ब्रह्मदेव हा या सृष्टीचा कर्ता आहे, रचनाकार आहे. तोच विधाता आहे; आपल्या आयुष्यात जे काही होणार आहे ते त्याच्याच इच्छेने. ब्रह्मदेव हाच जगनियंता, सृष्टीचा नियामक आहे. त्याने घालून दिलेल्या नियमांप्रमाणेच ह्या सृष्टीचे कार्य सुरू आहे. प्रत्येक सजीव अथवा निर्जीव वस्तूच्या उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीन अवस्था असतात. यातील उत्पत्ती हे कार्य ब्रह्मदेवाने सांभाळले आहे. म्हणूनच त्याने निर्माण केलेल्या ह्या सृष्टीचा उल्लेख ब्रह्मांड असा करत असावेत. सृष्टीनिर्मितीची ही प्रक्रिया वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, पुराणे, महाकाव्य अशा जवळ जवळ सर्वच प्राचीन साहित्यांतून विस्तृतपणे वर्णन करण्यात आलेली आहे. ब्रह्मदेवाचे महत्त्व, तीन देवांमध्ये त्याचे प्रमुख देव असणे जागोजागी वर्णन केलेले आहे. पितामह म्हणून त्याचा गौरवसुद्धा केला आहे. देवांचा देव अशा शब्दात वर्णन केलेले आहे. त्यानंतर मग अनेक देव कल्पनास्वरूपात, निरनिराळ्या रूपात माणसाने निर्माण केले. प्रत्येकाची स्वतःची अशी एक श्रद्धेची दिशा ठरली आणि त्यातूनच मग शैव, शाक्त, गाणपत्य, वैष्णव आणि सौर असे पाच वेगवेगळे उपासना पंथ

निर्माण झाले. असे असले तरीसुद्धा ब्रह्मदेव, विष्णू आणि महेश ही त्रिमूर्तीची कल्पना मात्र तशीच कायम राहिलेली दिसते. परंतु ह्या त्रिदेवांमधील ब्रह्मदेवाचा मात्र कुठलाही उपासनेचा पंथ आढळत नाही. देवदेवतांच्या ह्या गर्दीत ब्रह्मदेव मात्र मागे पडला आणि हरवून गेला. ब्रह्मदेवाची एक प्रकारे उपेक्षाच झाली असे म्हणावे लागेल आणि या सर्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात संशोधकाने केलेला आहे.

## १.२ संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनात मुळात देवदेवता ही कल्पना कशी निर्माण झाली? तसेच त्याचे महत्त्व इतके कसे वाढले, त्यातूनच मग पुढे त्रिदेव किंवा त्रिमूर्ती संकल्पनेचा उगम कसा झाला? तर ब्रह्मा, विष्णू आणि शंकर हे महत्त्वाचे तीन देव असताना; विष्णू आणि शंकराच्या तुलनेत ब्रह्मदेवाची उपस्थिती अगदीच नसल्यासारखी का आहे, अशा प्रकारच्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याचा संशोधकाने त्याच्या परीने प्रयत्न केलेला आहे. या विषयावर अशा पद्धतीने संशोधन झालेले नसल्याने असा प्रयत्न करावा असा विचार या मागे करण्यात आलेला आहे. ब्रह्मा किंवा ब्रह्मदेवाची गणना अजूनही महत्त्वाच्या अशा प्रमुख देवांमध्ये केली जाते. परंतु जेवढ्या प्रचंड संख्येने विष्णू आणि शंकराची तसेच इतरही अनेक देवीदेवतांची उपासना होताना दिसते त्याचे प्रमाण बघता ब्रह्मदेवाच्या उपासनेचे सध्याचे स्वरूप नगण्यच म्हणायला हवे. विष्णू आणि शंकर यांचे अनुक्रमे वैष्णव आणि शैव असे पंथही अस्तित्त्वात आहेत. या पंथांचे अनुयायी लोक आपापल्या पद्धतीप्रमाणे विष्णू व शंकराची उपासना, त्या योगे सर्व सण, सार्वजनिक उत्सव, यात्रा, वाऱ्या असे साजरे करताना दिसतात. विष्णूची तसेच शंकराची देवळे, मोठाली मंदिर प्रांगणे हे सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात आढळून येते. अगदी व्यक्तिगत स्वरूपात देखील विष्णू, शंकर, गणपती, देवी यांची घरोघरी पूजा होताना दिसते. अनेक प्रकारची व्रतवैकल्ये, उपवास इत्यादी होताना ही दिसतात. विष्णूची तर विष्णुरूपाबरोबरच वामन, नरसिंह, परशुराम, राम, कृष्ण, बाळकृष्ण, विठोबा तसेच बालाजी इत्यादी अनेक रूपांत पूजा होताना दिसते. तसेच शंकराची सुद्धा ज्योतिर्लिंग, मूर्त स्वरुपात त्याचप्रमाणे नटराज, खंडोबा, भैरव इत्यादी अनेक रूपांत घरोघरी पूजा होताना आपण पाहतो. शंकर आणि विष्णू यांच्याशी संबंधित अनेक कथा सांगितल्या जातात. अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे देखील आहेत. बारा ज्योतिर्लिंगे, नटराज मंदिर याखेरीज भारतात जवळ जवळ प्रत्येक नदीच्या उगमस्थानाशी तसेच नद्यांच्या संगमावर शंकराची

मंदिरे असल्याचे दिसते. बारा ज्योतिर्लिंग यांना तर तीर्थयात्रेच्या दृष्टीने फारच महत्त्व असल्याचे दिसते. विष्णूची देखील राम आणि कृष्णाच्या रूपात मथुरा, द्वारका, पंढरपूर, तिरूपती इत्यादी ठिकाणची मंदिरे आणि त्याचे महत्त्व आपणास माहिती आहेच. या शिवायही अनेक तीर्थक्षेत्रे प्रसिद्ध आहेत. मग प्रमुख अशा म्हणल्या जाणाऱ्या या तीन देवांमधल्या एकट्या ब्रह्मदेवाच्याच वाट्याला अशी उपेक्षा का यावी याची कारणे शोधून काढणे हा एक मुख्य हेतू या संशोधनामागे आहे. या बरोबरच उपलब्ध असलेल्या ब्रह्मदेवाच्या मंदिरांची संपूर्ण माहिती म्हणजेच, त्यांची रचना, काळ, शैली तसेच त्यासंबंधी जोडल्या गेलेल्या काही आख्यायिका, माहात्म्य त्याचबरोबर त्या ठिकाणी असणाऱ्या ब्रह्मदेवाच्या प्रतिमा तसेच इतरही अनेक मंदिरांवर केलेले ब्रह्मदेवाच्या प्रतिमांचे अंकन यांचा एकत्रित अभ्यास करणे आणि माहिती संकलित करणे हा देखील या संशोधनामागचा एक प्रमुख उद्देश आहे.

### १.३ संशोधनाचे महत्त्व

ब्रह्मदेव हा जरी त्रिदेवांमधील महत्त्वाचा देव असला तरी त्यावर अशा प्रकारे एकत्रितपणे संशोधन उपलब्ध नाही. जे आहे त्यामधून ब्रह्मसंप्रदाय तसेच मंदिरे अशी तुटक माहिती आहे. परंतु ब्रह्मदेवाचा सर्वांगीण अभ्यास होईल असे एकत्र संशोधन मात्र आढळत नाही. प्रस्तुत संशोधनात ब्रह्मदेव या देवतेचा उगम, विकास आणि ऱ्हास कसा झाला, तसेच हा ऱ्हास होण्यामागील कारणे याबद्दल विवेचन तर असणारच आहे पण त्याच बरोबर ब्रह्मा किंवा ब्रह्मदेवाचा परिचय करून देत असताना; ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती कशी केली, ब्रह्माचे मूर्त स्वरूप तसेच मूर्तिविज्ञानाचा अभ्यास, ब्रह्मदेवाची मंदिरे आणि त्याचा अभ्यास व माहिती, प्राचीन साहित्यातील ब्रह्मदेवाचे महत्त्व, ब्रह्मदेवाची उपासना आणि देवता म्हणून झालेला ब्रह्मदेवाचा ऱ्हास आणि त्या मागची कारणे अशा प्रकारे हे संशोधन करण्यात आलेले आहे. ह्या दृष्टीने संशोधन करत असताना ज्या ठिकाणी अशा प्रकारची ब्रह्मदेवाची मंदिरे आहेत त्याचाही अभ्यास केलेला आहे. त्यातील महत्त्वाच्या मंदिरांना संशोधकाने स्वत: भेट देऊन, स्थानिक लोकांच्या मुलाखती घेऊन माहितीचे संकलन केले आहे. विष्णू आणि शंकराच्या तुलनेत अशा मंदिरांची संख्या तुलनेने खूपच कमी असली तरी देखील ह्या विषयासाठी ह्या मंदिरांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याने ह्या मंदिरांचा अंतर्भाव अभ्यासात केलेला आहे. असा अभ्यास करताना ह्या मंदिरांचे स्थापत्य, शैली, काळ, ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादी सर्व बाबी विचारात घेतलेल्या आहेत. तसेच त्या त्या

मंदिराचे  स्थान माहात्म्य, त्याच्याशी निगडीत लोककथा किंवा लोकगीते, सण किंवा उत्सव, यात्रा उरूस त्याच बरोबर उपासनेची पद्धत या बाबी देखील विचारात घेतलेल्या आहेत. नुसती ब्रह्मदेवाची मंदिरेच नाही तर इतर मंदिरांमधून आढळणाऱ्या ब्रह्मदेवाच्या मूर्ती, संयुक्त मूर्ती यांचाही या संशोधनात समावेश केलेला आहे. अशा मूर्ती उपलब्ध असलेली ठिकाणे; तिथे जाण्याचा जवळचा मार्ग, त्यासाठी लागणारा वेळ इत्यादी गोष्टी देखील अंतर्भूत केलेल्या आहेत. यासाठी अधिकृत माहिती मिळावी ह्या हेतूने त्या त्या जिल्ह्याच्या गॅझेटियरचा तसेच राज्याच्या पर्यटन विभागाच्या मार्गदर्शक नकाशांचा व टिपणांचा वापर करण्यात आलेला आहे. अधिक माहितीसाठी जरूर तेथे फोटोग्राफ्स देखील दिलेले आहेत. प्रबंध वाचून जर कोणास तिथे जाण्याची जिज्ञासा निर्माण झाली तर त्यासाठी या सगळ्याचा निश्चित उपयोग होईल. अशा प्रकारे ब्रह्मदेवाचा सर्वांगीण अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकटा ब्रह्मदेव जरी जास्त प्रमाणात पूजला जात नसला तरी त्रिमूर्तीच्या स्वरूपात तसेच दत्ताच्या स्वरूपात तो असतोच; तेव्हा ह्या अभ्यासात हा पैलू देखील विचारात घेतलेला आहे. यासाठी दत्त संप्रदायाचा समावेश प्रस्तुत अभ्यासात केलेला आहे. त्यासाठी भारतातील प्रमुख दत्तस्थानेही विचारात घेतलेली आहेत. याच बरोबर भारताबाहेरही काही देशांमध्ये  ब्रह्मदेव आणि त्याची मंदिरे आढळतात; यावर देखील प्रस्तुत संशोधनात प्रकाश टाकण्यात आलेला आहे. एकत्रितपणे करण्यात आलेले अशा प्रकारचे हे असे पहिलेच संशोधन असेल. यामुळे एकाच ठिकाणी ब्रह्मदेवाबद्दल सर्व प्रकारची माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल. त्यामुळेच हे संशोधन जिज्ञासू लोकांबरोबरच सर्वसामान्य लोकांनाही उपयुक्त ठरेल.

### १.४ संशोधनाची साधने

**प्राथमिक साधने :** या संशोधनासाठी प्रमुख उपलब्ध साधन म्हणजे ब्रह्मदेवाची मंदिरे असल्याने भारतभर अशी मंदिरे कुठे कुठे आढळतात ह्याची जिल्हा दर्शनिकेच्या (गॅझेटियर) माध्यमातून माहिती घेऊन त्या बऱ्याचशा ठिकाणी संशोधकाने स्वत: भेट देऊन माहिती संकलित केलेली आहे. अशी माहिती संकलित करण्यासाठी त्या ठिकाणचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. तेथील स्थान माहात्म्याची माहिती घेताना त्या परिसरातील लोकांची मदत घेतलेली आहे. स्थानिक लोकांकडून मंदिराविषयीच्या आख्यायिका, लोककथा व लोकगीते याबद्दल सविस्तर माहिती घेतलेली आहे. मंदिराचे पुजारी किंवा पुरोहित यांचीही मुलाखत घेऊन मंदिरामध्ये

होणाऱ्या निरनिराळ्या पूजा, उत्सव, व्रते, धार्मिक कार्ये यांची माहिती मिळवलेली आहे. त्याचबरोबर मंदिरात पाळायचे नियम इत्यादी विषयी व्यवस्थित माहिती घेतली आहे. मंदिराचे स्थापत्य व शिल्परचना यांचाही बारकाईने अभ्यास आलेला आहे आणि उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे. ब्रह्मदेवाच्या स्वतंत्र मंदिरांशिवाय ज्या मंदिरांमध्ये ब्रह्मदेवाच्या मूर्ती आहेत त्यांचाही इथे समावेश केलेला आहे. ह्याशिवाय निरनिराळ्या संग्रहालयात असणाऱ्या मूर्तीचाही अंतर्भाव करण्यात आलेला आहे. ह्या मूर्तींचा काळ, शैली, स्वरूप इत्यादी बारकावे समाविष्ट केलेले आहेत.

**दुय्यम साधने :** यामध्ये ब्रह्मदेव या देवतेवर भाष्य असणारे प्रमुख प्राचीन साहित्य; यात चारही वेद, ब्राह्मणे, आरण्यके, मनुस्मृती, पुराणे आणि उपनिषदे इत्यादींचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यासाठी संस्कृत, इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेत उपलब्ध असलेल्या ग्रंथांचा यात अभ्यास केलेला आहे. या सर्व ग्रंथांमधून ज्या ठिकाणी ब्रह्मदेवासंबंधी उल्लेख आढळतात ते सर्व टिपून घेऊन संदर्भांप्रमाणे योग्य त्याठिकाणी त्याचे विस्तृत विवरण दिलेले आहे. छोट्या मोठ्या कथांचाही विचार करून त्याचाही समावेश केलेला आहे. कोणत्याही प्रकारे थोडी सुद्धा माहिती निसटू नये याची काळजी घेतलेली आहे. ऐतिहासिक पुरावे, कालखंड, नोंदी यांचा उल्लेख करताना जिल्हा दर्शनिका, राज्याच्या पर्यटन विभागाची माहिती पुस्तिका इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच आधीच्या विद्वानांनी केलेले काम, उपलब्ध पुस्तके यांचाही विचार केलेला आहे.

### १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

या विषयाची व्याप्ती अति प्रचंड आहे. दुय्यम साधने म्हणून विचारात घेतलेले जे धार्मिक ग्रंथ आहेत; त्यांची संख्या आणि विस्तार पाहता असेच म्हणावे लागेल. ब्रह्मदेव हे नाव अस्तित्वात येण्या अगोदर देखील निरनिराळ्या नावांनी ह्या देवतेचे अस्तित्व होतेच; त्याचे स्वरूप वेगळे असले तरी कार्य एकच आहे. अगदी ऋग्वेद काळापासून हिरण्यगर्भ, प्रजापती अशा नावांनी ब्रह्मदेवाची उपस्थिती आहेच. प्राचीन साहित्य खूप महत्त्वाचे असल्याने या सर्वांचे संदर्भ घेणे संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऋग्वेद काळापासून सुरू होऊन हळूहळू विकसित होत जाणारे ब्रह्मदेवाचे स्वरूप सुद्धा लक्षात घ्यावे लागेल. मुळात ब्रह्मा आणि ब्रह्म या

दोन संकल्पनांमध्ये खूप साम्य असल्यामुळे या मध्ये गल्लत होण्याची शक्यता आहे. निर्गुण, निराकार ब्रह्म आणि सगुण, साकार ब्रह्मा ह्या संकल्पना निराळ्या आहेत; यामध्ये एक बारीक रेष आहे परंतु दोन्ही बाजूंनी याचा विचार केला जाणे आवश्यक आहे. ब्रह्मा वा ब्रह्मदेव ही संकल्पना स्पष्ट करणे, त्या मागची विचारधारा समजून घेणे हे काम अतिशय महत्त्वाचे आहे. ब्रह्मदेवाचा उगम, विकास आणि ऱ्हास अशा टप्प्यांमधून ह्या संशोधनाचा प्रवास होणार असल्याने हिंदू धर्माच्या व्यतिरिक्त बौद्ध आणि जैन धर्माच्या माध्यमातून सुद्धा अभ्यास करता येऊ शकतो. तसेच ब्रह्मदेवाचा नुसता साहित्यातील उल्लेख न करता त्या अनुसार येणारी ब्रह्मदेवाची मंदिरे, शिल्पाकृती, शिलालेख इत्यादी गोष्टी देखील अंतर्भूत असल्या कारणाने त्या सर्व बाजूंनी विचार करणे देखील आवश्यक आहे.  ब्रह्मदेवाच्या आज उपलब्ध असलेल्या मंदिरांमधील काही मंदिरे अगदी अलीकडच्या काळात निर्माण आलेली आहेत. बौद्ध धर्माचा सर्वदूर झालेला प्रसार पाहता आग्नेय आशियातील काही देश तसेच नेपाळ व श्रीलंका ह्या देशांचाही यामध्ये समावेश करता येऊ शकेल. ब्रह्मदेवाची चित्रे देखील उपलब्ध आहेत. त्यांचाही समावेश येथे होऊ शकतो.

परंतु संशोधनाला काही मर्यादा असतात; त्यासाठी प्राचीन साहित्याचा अभ्यास करताना महत्त्वाचे धार्मिक ग्रंथ विचारात घेतलेले आहेत. गेल्या काही शतकात काही पोथ्या, गाथा नव्याने लिहिल्या गेल्या आहेत त्यांचा ह्या संशोधनात विचार केलेला नाही. ब्रह्म आणि ब्रह्मा यातील भेद लक्षात यावा यासाठी ब्रह्म हा विचार नक्की काय आहे एवढ्या पुरताच त्याचा परिचय देऊन त्यातील तत्त्वज्ञान पूर्णपणे बाजूला ठेवून केवळ ब्रह्मदेवाचाच विचार येथे केलेला आहे. तसेच मंदिर स्थापत्य व मूर्तिविज्ञान या दृष्टीने विचार करताना सुद्धा फक्त ब्रह्मदेवाचीच मंदिरे विचारात घेतली आहेत. नामसाधर्म्यामुळे बरेचदा गोंधळ होतो; जसे की ब्रह्मलिंगेश्वर मंदिर अशा नावाचे मंदिर हे बरेचदा ब्रह्मदेवाचे म्हणून प्रसिद्ध असते परंतु ते ब्रह्मदेवाचे नसून शंकराचे असते. तिथे शंकराच्या पिंडीवर चार बाजूंना चार मुखे कोरलेली असतात म्हणून ते ब्रह्मदेवाचे मंदिर असल्याचे समजले जाते. त्यामुळे अशा प्रकारची मंदिरे विचारात घेतलेली नाहीत. तसेच ब्रह्मदेवाची जी मंदिरे आढळतात त्यात इ.स. पाचव्या शतकापासून ते अगदी २०व्या शतकापर्यंत बांधलेली मंदिरे आढळतात. परंतु संशोधनाच्या विषयाचा आशय आणि महत्त्व लक्षात घेता या ठिकाणी फक्त १५व्या शतकापर्यंत बांधल्या गेलेल्या मंदिरांचा अभ्यास केलेला आहे. वर उल्लेखल्याप्रमाणे ब्रह्मदेवाची मंदिरे आणि मूर्ती यांचा अभ्यास करताना भारताचा शेजारी देश नेपाळ व आग्नेय

आशियातील काही देशांमधील ठराविक आणि महत्त्वाच्या मंदिरांच्या अभ्यासाचा संशोधनात अंतर्भाव करण्यात आलेला आहे. हा अभ्यास करत असताना फक्त हिंदू धर्माशी संबंधित मंदिरांचाच विचार केलेला आहे. बौद्ध आणि जैन धर्माच्या तत्त्वज्ञानातून हा अभ्यास केलेला नाही. तसेच हे संशोधन केवळ ब्रह्मदेवाशी संबंधित असल्याने ब्रह्मदेव हाच विषय केंद्रस्थानी ठेऊन त्या अनुषंगाने येणाऱ्या बाकीच्या देवदेवतांचा विचार करण्यात आलेला आहे. सदर विषयाचा अभ्यास करताना इंग्रजी, मराठी, हिंदी आणि संस्कृत भाषेतील ग्रंथांचा संदर्भ ग्रंथ म्हणून अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुढील संशोधकांसाठी इतर प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या साहित्यातून आणखीही नवी माहिती प्रकाशात येऊ शकते असा विचार करून हेच संशोधन नव्याने करता येऊ शकते. तसेच हा प्रबंध संस्कृत विषयाचा नसून भारतीय विद्या ह्या विषया अंतर्गत आहे. ब्रह्मदेवाची प्राचीनता लक्षात घेता संस्कृत वाङ्मयातील त्याचे उल्लेख अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे वाटल्याने त्याचे संदर्भ घेतले आहेत. हे संदर्भ देत असताना मूळ संस्कृत उद्धरणांप्रमाणे स्वरांकन चिन्हे दिलेली नाहीत. त्याच प्रमाणे निर्गुण, निराकार ब्रह्म हा ब्रह्मदेवाशी साम्य असणारा जवळचा विषय प्रस्तुत संशोधनात पूर्णपणे बाजूला ठेवलेला असल्याने त्याचा अंतर्भाव करून नव्याने संशोधन करता येऊ शकते. तसेच भारताच्या बाहेरील ब्रह्मदेव असा विषय हाताळताना ठराविक आणि महत्त्वाच्या मंदिरांचा अभ्यास केलेला असून पुढे यावर अधिक विस्तृत संशोधन होऊ शकते. ब्रह्मा ह्या देवतेचा फक्त हिंदू धर्माच्या दृष्टीकोनातून अभ्यास केलेला असल्याने बौद्ध व जैन तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने देखील यावर पुढे अजून संशोधन करता येऊ शकते.



# प्रकरण २

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

साहित्याचे पुनरवलोकन हे कोणत्याही संशोधनाचे एक केंद्रस्थान असते. संशोधनाच्या विषयातील नवीन अभ्यास आणि साहित्याचे स्पष्टीकरण करण्यास त्यामुळे मदत होते. तसेच उपलब्ध माहिती किंवा संशोधन करून मिळविलेली माहिती आणि जुने स्रोत व साहित्य ह्यांच्या मध्ये एकसंधता आणण्याचे काम हे साहित्यिक पुनरवलोकन करते. वेगवेगळ्या वैचारिक मतांमुळे तथ्य स्थापित होण्यास मोठी मदत मिळते आणि त्यामुळे येणारे निष्कर्ष अधिक परिणामकारक व खरे असतात. ह्या साहित्यिक छाननीच्या आधारे आधीच्या कामातील त्रुटी शोधून त्यातून नवे निष्कर्ष निश्चित करता येतात आणि त्यामुळे संशोधनाचे महत्त्व वाढते. वैज्ञानिक आणि पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी उपलब्ध साहित्याची छाननी करणे आवश्यकच असते. साहित्याचे पुनरवलोकन प्रचलित असलेली माहिती आणि विश्लेषणाच्या मार्गांना प्रासंगिक आणि सुसंगत अशा नव्या माहितीची जोड देऊन अभ्यासाचे संयोजन करते. साहित्याचा आढावा घेणे, त्याचे पुनरवलोकन करणे म्हणजे एक प्रकारे आपले ज्ञान वृद्धिंगत करणे आणि त्यायोगे आधी झालेले संशोधन समजावून घेणे व आपल्या कामाची त्याबरोबर तुलना करुन तपासून घेणे होय. हा आढावा वाचकाला आधी झालेले उपयुक्त संशोधन, त्यातील वाद, निसटून गेलेले काही काम किंवा पुढील संशोधनासाठी उपयुक्त ठरेल अशा बाजू समजून घ्यायला मदत करतो. आधीच्या संशोधनात राहून गेलेल्या काही गोष्टी पुढील संशोधनात अभ्यासाने पूर्ण करता येतात. ह्यामुळे संशोधनाचा आणि संशोधकाचा तो विषय आणि त्यायोगे येणारे इतर महत्त्वाचे विषय ह्या बद्दल जिज्ञासा जागृत होते. आपल्याला आपल्या विषयाची पद्धतशीर मांडणी करताना, आकृती तयार करताना आधी झालेले काम अभ्यासणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याशिवाय आपण आपल्या अभ्यासाचा आकृतिबंध काढूच शकणार नाही. आपल्या विषयाचा अभ्यास आधी कशा प्रकारे झाला आहे ह्याची संशोधकाला कल्पना येते म्हणूनच साहित्याचा आढावा हा प्रबंधाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

ब्रह्मा ह्या विषयावर संशोधन करताना असे लक्षात आले की एकट्या ब्रह्मदेवावर म्हणावे तेवढे संशोधन झालेले नाही. काही मोजक्या संशोधकांनी, अभ्यासकांनी ह्यावर अभ्यास केलेला दिसला. पूर्वी झालेल्या संशोधनाचा विचार करता काही महत्त्वाचे ग्रंथ, शोध निबंध यांचा अभ्यास संशोधकाने ह्या करिता केलेला आहे; परंतु त्यातून सुद्धा काही महत्त्वाच्या ग्रंथांचा येथे उल्लेख केलेला आहे. जिज्ञासूंना ते ग्रंथ वाचून अधिक माहिती मिळविता येईल. यासाठी ह्या प्रकरणाचे

तीन भाग केले असून पहिल्या भागात अभ्यासलेले ग्रंथ, दुसऱ्या भागात शोध निबंध तर तिसऱ्या भागात उपयुक्त संकेतस्थळांवर उपलब्ध माहितीचा केलेला अभ्यास अशा प्रकारे वर्गीकरण केलेले आहे.

## २.१ ग्रंथ

ब्रह्मदेव ही संकल्पना समजावून घेताना अनेक ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. ब्रह्मदेवाच्या उपासनेविषयी माहिती संकलन करताना The Cult of Brahma (1969) हे Tarapada Bhattacharya ह्यांचे पुस्तक अतिशय उपयुक्त असून ते ब्रह्मदेवाच्या उपासनेवर प्रकाश टाकते. ब्रह्मदेवाच्या संप्रदायाविषयी माहिती देताना ते म्हणतात की ब्रह्मा ही एक वेदपूर्व काळातील देवता होती. ब्रह्मदेवाची उपासना वेदपूर्व काळात देखील अस्तित्वात होती परंतु वैदिक धर्माने त्या उपासनेला दडपून टाकले. तरी देखील पूर्व भारतात ती टिकून राहिली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वेदकाळातील असुर आणि ऐतिहासिक काळातील निम्न स्तरातील लोकांमध्ये हा संप्रदाय टिकून होता. सर्वच धर्म, पंथ यांनी ब्रह्मदेव ह्या देवतेचा त्याच्या गुणदोषांसकट स्वीकारलेले दिसते. वेदांची निर्मितीच ब्रह्मदेवाने केली असल्याचे तर म्हटलेलेच आहे. यापुढे भट्टाचार्य असेही म्हणतात की जैन आणि बौद्ध धर्म सुद्धा ह्या ब्रह्म संप्रदायातूनच निर्माण झालेले आहेत. बौद्ध धर्माला उतरती कळा लागल्यावर ब्रह्म संप्रदायाने परत थोडी प्रगती केलेली दिसते. वेदपूर्व काळातील ह्या ब्रह्म संप्रदायाबरोबरच पंचमहाभूतांच्या स्वरुपात म्हणजे जल, पृथ्वी, अग्नी, वायू आणि आकाश यांचीही देवता म्हणून उपस्थिती दिसते. पुढे सांख्य तत्त्वज्ञानामध्ये ह्याच पंचमहाभूतांपासून सृष्टीची उत्पत्ती झाल्याचे म्हटले आहे. ब्रह्म संप्रदायाने भारतात पुढे अनेक प्रकार धारण केले आणि त्यांच्या पवित्रते बद्दल लोकांच्या मनात दृढ विश्वास निर्माण झाला. ह्यातूनच पुढे रात्र पंथ उदयास आला; ज्याचे नवरात्र, सप्तरात्र, पंचरात्र असे प्रकार निर्माण झाले. ह्यातील सप्तरात्र पंथ हा प्रसिद्ध असून पंचरात्र पंथ हा वैष्णव पंथ म्हणून प्रसिद्ध झाला. परंतु भट्टाचार्य म्हणतात की हा मूळ पंथ ब्रह्मदेवाचाच होता आणि काळाच्या ओघात तो वैष्णव, शैव, सौर, सांकर्षण असा बदलत गेला. ब्रह्म संप्रदाय हा फक्त ब्राह्मण वर्गापुरताच मर्यादित होता आणि चातुर्वर्ण्य समाजरचनेचा हाच उगम होता; जो पुढे वैष्णव व जैन आणि बौद्ध धर्मामुळे दडपला गेला. तर पुढे ते असेही म्हणतात की मातृ संप्रदाय, यमाची उपासना तसेच श्राद्ध कर्म हे देखील ब्रह्म संप्रदायाचेच भाग आहेत.

The Mythology Of Brahma (1983) हे Bailey Greg यांचे पुस्तक आहे. ब्रह्मदेवावरील संशोधन असलेले हे एक महत्त्वाचे पुस्तक आहे. ह्यामध्ये लेखकाने ब्रह्मदेव हा हिंदू विचारधारेतील महत्त्वाचा देव  मध्यवर्ती ठेवून अनेक वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडणारा एक देव असा विचार केलेला आहे. हे सांगताना लेखकाने पुस्तकाचे चार भाग केले आहेत. पहिल्या भागात प्राचीन भारतातील ब्रह्मदेवाची उपासना व त्याचे महत्त्व वर्णन केलेले आहे. धार्मिक ग्रंथांचा आधार घेऊन प्राचीन भारतात शिव आणि विष्णूमुळे झाकोळला जाण्याआधी ब्रह्मदेव हा कसा महत्त्वाचा देव होता हे विशद केलेले आहे. यासाठी ब्रह्मदेवाचा उगम कसा झाला, त्या शब्दाचा अर्थ हे सगळे सांगितले आहे. चार आश्रम, चार पुरुषार्थ तसेच गीतेमध्ये सांगितलेला कर्मफलत्याग, भक्ती ह्या सगळ्यांची ओळख करून देतानाच ब्रह्मदेवाच्या सृष्टीनिर्माता, जगनियंता असण्याविषयी भाष्य केले आहे. तर दुसऱ्या भागात प्रवृत्ती आणि निवृत्ती ह्या संकल्पना समजावून सांगताना ब्रह्मा हा निर्माता असल्याचे सांगितले आहे. तिसरा भाग हिरण्यगर्भ आणि त्यातून निर्माण झालेली सृष्टी, प्रकृती ह्याविषयी भाष्य करतो. चौथा भाग अवतारवादाविषयी तसेच ब्रह्मा आणि असुर व ब्रह्मदेवाचा संप्रदाय ह्या विषयी सांगतो. परंतु हे पुस्तक प्रतिमा लक्षणे व त्यांची वैशिष्ट्ये या विषयाची मात्र अजिबातच माहिती देत नाही. एकंदरीत या पुस्तकात चांगला अभ्यास झालेला दिसतो.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी आणखीही काही पुस्तके संशोधकाने अभ्यासली आहेत; त्यात रजनी मिश्रा यांचे Brahma Worship, Tradition and Iconography (1989) हे ही एक पुस्तक आहे. ह्यामध्ये विश्वोत्पत्तीसाठी कारण ठरलेले हिरण्य अंडे तसेच विष्णूच्या नाभीकमळातून जन्मलेला ब्रह्मा व सर्वांत प्राचीन असा देव इथपासून सुरुवात करून वेदांचा निर्माता, सृष्टीनिर्माता असा प्रवास करत मग लेखिका पुढे काही महत्त्वाच्या ब्रह्मदेव मूर्तींची माहितीही देते. हे पुस्तक सात प्रकरणांत विभागलेले असून पहिल्या प्रकरणात विषय प्रवेश तर दुसऱ्या प्रकरणात ब्रह्मदेवाचे पुराणांमधील स्थान यावर माहिती आहे. पुढचे प्रकरण ब्रह्मदेवाचा उगम आणि विकास यावर प्रकाश टाकते. चौथ्या प्रकरणात ब्रह्मदेवाचे धर्मातील महत्त्व स्पष्ट केलेले आहे. ह्याच प्रकरणात ब्रह्मदेवाची उपासना आणि प्राचीन भारतातील ब्रह्मदेवाचे स्थान विशद करताना पुरातत्त्वीय, वाङ्मयीन पुरावे पण दिलेले आहेत. पाचव्या प्रकरणात ब्रह्मदेवाच्या मंदिरांवर भाष्य केलेले असून राजस्थानातील अजमेर जवळील पुष्कर येथील मंदिराविषयी

माहिती दिलेली आहे. तसेच खजुराहोच्या ब्रह्मा मंदिराबद्दलही माहिती आहे, तेथील मूर्तींचे वर्णनही केलेले आहे. ह्याशिवाय आणखीही काही मंदिरांची माहिती आहे. पुढच्या प्रकरणामध्ये प्रतिमा लक्षणे आणि त्याची वैशिष्ट्ये सांगताना भारतातील काही महत्त्वाच्या ब्रह्मदेवाच्या मूर्तींची माहिती दिलेली आहे. ह्याच लेखिकेचे Holy Pushkara : A Pilgrims Quest of Lord Brahma हे आणखी पुस्तक आहे. ह्यामध्ये फक्त पुष्कर येथील यात्रा व ब्रह्मदेव मंदिर यावर भाष्य केलेलं आहे. ही दोन्ही पुस्तके अभ्यासाला उपयोगी आहेत.

Brahma the Creator (2006) ह्या Shantilal Nagar ह्यांच्या पुस्तकातही त्यांनी सात प्रकरणांमधून ह्या विषयाचा अभ्यास केलेला आहे. पहिल्या प्रकरणात ते ब्रह्मदेवाचा जन्म, त्याची सृष्टीनिर्मिती, ब्रह्मदेवाचे आयुष्य ह्या बद्दल माहिती देतात. तर पुढील भागात प्राचीन वाङ्मयातील त्याचे महत्त्व विशद करतात. तिसरे प्रकरण ब्रह्मदेवाचे पुराणांमधील अस्तित्व दाखवून देते तर चौथे प्रकरण ब्रह्मा अपूज्य होण्यामागची कारणे, इतर देवांबरोबर स्पर्धा अशा कारणांचा शोध घेते. पुढील प्रकरणात प्रतिमा लक्षणे आणि वैशिष्ट्ये यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. सहाव्या प्रकरणात ब्रह्मदेवाच्या संयुक्त मूर्तींबद्दल माहिती दिलेली आहे तर शेवटचे प्रकरण ब्रह्मदेवाच्या वेगवेगळ्या महत्त्वाच्या अशा मूर्तींवर चर्चा करते.

## २.२ शोध निबंध

कुठल्याही विषयाचा सखोल अभ्यास करताना आधीच्या संशोधकांची पुस्तके जशी महत्त्वाची असतात तसेच संशोधकांचे शोध निबंध सुद्धा महत्त्वाचे असतात. शोध निबंधातून संशोधकाने थोडक्यात पण महत्त्वपूर्ण माहिती ह्यात संकलित केलेली असते. बरेचदा हे संशोधक स्थानिक पातळीवर काम करणारे असल्याने पुस्तकातून जी माहिती सुटते ती अशा शोध निबंधांमध्ये मिळते आणि ती तितकीच उपयोगाची व महत्त्वाची असते.

Rise of Prajapati (1983) ह्या Sukumariji Bhattacharji यांच्या शोध निबंधात सुकुमारीजी प्रजापतीचा उगम आणि विकास समजावून सांगताना प्रजापतीची निरनिराळी नावे, सृष्टी उत्पत्तीचा क्रम, प्रजापतीने कशा प्रकारे सृष्टी निर्माण केली हे ही कथन करतात. प्रजापतीसाठी केली जाणारी निरनिराळी कर्मकांडे, असुर, देव आणि दानव ह्यांची निर्मिती वर्णन केली आहे. त्याच बरोबर कन्यासक्तीच्या कथेविषयी देखील माहिती दिलेली आहे. असुरांकडून

ब्रह्मदेवाची उग्र तपश्चर्या करून वरप्राप्ती करून घेणे ह्या बद्दलही संशोधक सांगतो. प्रजापती एक महत्त्वाची देवता सुप्रतिष्ठित असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ह्या मध्ये मूर्तीपूजेचा विचार केलेला नसल्याने प्रतिमा लक्षणे इत्यादी विषयी माहिती नाही. History of Religion, The Popular Prajapati (1989) ह्या Jan Gonda ह्यांच्या शोध निबंधामध्ये प्रजापती देवतेसाठी करण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या यज्ञ, याग व इतर कर्मकांडांची विस्तृत माहिती दिलेली आहे. ऋग्वेदातील अन्य देवतांच्या तुलनेत प्रजापती ही नव्याने उगम पावलेली देवता असून ऋग्वेदाच्या उत्तर काळात परमेश्वर किंवा प्रमुख देवता म्हणून प्रतिष्ठित झाल्याचे ते म्हणतात. प्रजापतीला पशूंचा नाथ म्हणलेले आहे. त्याच बरोबर क्षेत्रस्यपती, वास्तोष्पती, बृहस्पती ही त्याचीच नावे असल्याचे ही सांगितले आहे. संपूर्ण विश्वाचा जनक असल्याने भूपती, वाणीवरही त्याचाच अधिकार असल्याने वाक्पती देखील आहे. अशा प्रकारे प्रजापतीच्या अनेक नावांविषयी माहिती देतात. ऋग्वेद काळात प्रजापतीची उपासना सर्वसामान्य लोकही करत असत ह्या विषयी बरेच पुरावे देतात. हा निबंध यज्ञ आणि प्रजापती ह्यांचे महत्त्व सांगतो.

Journal of Indian Society of Indian Arts New Series (2011) यामध्ये कुमुद कानिटकर यांचा एक शोध निबंध आहे. त्याचे शीर्षकच ब्रह्मा असे आहे. ह्या मध्ये माहिती नसलेल्या अशा काही ब्रह्मदेवाच्या मंदिरांबद्दल व प्रतिमांबद्दल विवेचन केलेले आहे. पुष्कर येथे असणाऱ्या मंदिराशिवाय आणखीही काही मंदिरांची माहिती दिलेली आहे. ब्रह्मदेवाची उपासना ही गुप्तोत्तर काळ ते उत्तर मध्ययुगापर्यंत तितकी अपरिचित नव्हती; हे विधान पटवून देण्याकरिता लेखिकेने काही काही शिलालेखांवर प्रकाश टाकलेला आहे. तसेच ह्या निबंधात ब्रह्मदेवाच्या प्रतिमांमध्ये काळानुसार होत जाणारे बदल, त्यांचा कालानुक्रम व ब्रह्मदेवाची उपासना कमी होत जाण्यामागची कारणे असा अभ्यास केलेला आहे. ब्रह्मदेवाची उपासना कमी होण्याची कारणे अभ्यासताना नेहमीच्या कारणांबरोबरच सामाजिक औदासिन्य आणि सांप्रदायिक निंदा असाही विचार केलेला आहे. ब्रह्मदेवाच्या अभ्यासात सर्वच छटा कानिटकर यांनी उलगडून दाखविल्या आहेत.

**२.३ आंतरजाल व संकेतस्थळे**

आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात माहिती संकलनाकरिता आंतरजाल हे एक प्रभावी माध्यम आहे. देशोदेशीची उपलब्ध माहिती आपण आंतरजालावरून मिळवू शकतो. यासाठी अनेक संकेतस्थळे उपलब्ध असतात. अर्थात आंतरजालावर किंवा संकेतस्थळांवर असलेली माहिती खरी असतेच असे नाही हे वाक्य अत्यंत महत्त्वाचे असले तरीही त्याचा उपयोग आपल्या संशोधनात असणे खूप गरजेचे आहे. आज अनेक उत्तम ग्रंथालये त्यांच्याकडील पुस्तके डिजिटाइज्ड स्वरूपात त्यांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देत आहेत. देशोदेशीची पुस्तके ह्यामुळे आपल्याला एका क्लिकवर मिळवता येतात. ह्याशिवाय इंडॉलॉजी विषयातील संशोधकाला अनेक स्थळे, देवळे, स्थानिक परंपरा यांचा समावेश आपल्या संशोधनात करावा लागतो. त्यासाठी निरनिराळी सरकारी वेब पोर्टल्स अनेक प्रकारची माहिती पुरवू शकतात. जिल्हा दर्शनिका, पर्यटन मंत्रालय यांचीही संकेतस्थळे असतात ह्यावरून आपल्याला बरीच उपयुक्त माहिती मिळू शकते. मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता पडताळून घेऊनच त्या माहितीचा उपयोग संशोधकाने प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. ह्यासाठी वापरलेले पहिले संकेतस्थळ म्हणजे विकिपीडिया. इथे ब्रह्मा असा शोध घेतला असता ब्रह्मदेवाचा उगम, अर्थ अशी सुरुवात करून मग इतिहास त्यात वैदिक साहित्य, वैदिक काळानंतरचे साहित्य ह्याचा परामर्श घेतलेला आहे. त्यानंतर प्रतिमा लक्षणे, ब्रह्मदेवाची मंदिरे ह्याचीही माहिती मिळते. अशी माहिती देत असताना जरूर तिथे संबंधित माहिती कुठून मिळविली आहे; तो स्रोत दिलेला आहे. संदर्भ सूची देखील आहे त्यामुळे माहिती कुठे शोधायची हे निश्चित करता येते. तसेच मिळविलेली माहिती खरी आहे अथवा नाही हे ही संदर्भसूचीच्या आधाराने पडताळून पाहता येते.

हया नंतर महत्त्वाचा स्रोत म्हणजे दर्शनिका. संशोधनाचा अभ्यासाचा विषय ब्रह्मदेव : एक सर्वांगीण अभ्यास  असा असल्यामुळे ब्रह्मदेवाच्या मूर्ती, मंदिरे यांचा अभ्यास समाविष्ट करणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी दर्शनिकांमधून माहिती मिळविणे हे मुख्य आणि महत्त्वाचे काम त्या संकेतस्थळामुळे अतिशय सोपे झाले. दर्शनिकांच्या संकेतस्थळांवर भारतातील प्रत्येक राज्याच्या दर्शनिका उपलब्ध असतात. त्यात इंग्रजांच्या काळात तयार झालेल्या आणि आधुनिक असे दोन भाग आहेत. एखाद्या विशिष्ट ठिकाणाची इत्थंभूत माहिती तिथे उपलब्ध असते. अत्यंत

महत्त्वाचे म्हणजे दर्शनिकेत असलेली माहिती ही अगदी अचूक आणि विश्वासार्ह असते. ही माहिती मिळविताना ह्या संकेतस्थळांचा खूपच उपयोग होतो.

प्रबंध लिहीत असताना संशोधकाला इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी पुस्तकांचा आधार घ्यावा लागलेला आहे. सगळीच पुस्तके वा ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध असतातच असे नाही. असे ग्रंथ मिळविण्यासाठी archive.org, e pustakalaya, National Digital Library of India, www.jstor.org अशा डिजिटल ग्रंथालयांचा उपयोग झाला. इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेतील अनेक दुर्मीळ ग्रंथ ह्या संकेतस्थळांवर पीडीएफ प्रकारात उपलब्ध आहेत. एखाद्या संशोधनासाठी पुस्तकांखेरीज शोध निबंधही तितकेच महत्त्वाचे असतात. पुस्तकात नसलेली माहिती अशा शोध निबंधातून आपल्याला मिळू शकते. वर दिलेल्या संकेतस्थळांवर तसेच भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्र, डेक्कन कॉलेज अशा नावाजलेल्या संस्थांची देखील संकेतस्थळे असून अशा प्रकारचे शोध निबंध त्याठिकाणी सुद्धा पीडीएफ प्रकारात उपलब्ध आहेत. ह्या सर्वांचा उपयोग प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.



# प्रकरण ३

# संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत प्रबंधाचा विषय ब्रह्मदेव एक सर्वांगीण अभ्यास असा आहे; परंतु एखाद्या देवतेचा अभ्यास करण्याआधी आपल्याला देवता ह्या संकल्पनेचा विचार करायला हवा. जिच्या जवळ दिव्य तेज किंवा सामर्थ्य आहे ती देवता अशी तिची व्याख्या भारतीय संस्कृति कोशात केलेली आहे. (जोशी, खंड ४ १९९४ : ४३१) ह्या भौतिक सृष्टीच्या पलीकडे अदृश्य, अव्यक्त व कल्पनारम्य अशा दुसऱ्या सृष्टीची कल्पना केलेली आहे. ही कल्पना समजावून घ्यायची झाली तर आदिमानवाच्या इतिहासाबद्दल जाणून घ्यावे लागेल. आदिमानवाला सुद्धा देवतांचा साक्षात्कार झाला पण जसाजसा विचारांनी मानव समृद्ध होत गेला तसतसे ह्या देवतांतूनच धर्माची निर्मिती झाली आणि त्यातूनच पुढे निरनिराळ्या तत्त्वज्ञानांची निर्मिती होत गेली. आदिम अवस्थेतील मानवाला त्याच्या भोवतालच्या निसर्गाची, पंचमहाभूतांची जी भीती वाटत होती त्यातूनच त्याने देवतांची निर्मिती केली. हीच कल्पना पुढे अधिक विकसित झाली आणि भीती बरोबरच आश्चर्य आणि उपयुक्तता ह्या भावनेतून अनेक नवनव्या देवता निर्माण होऊ लागल्या. निसर्गातील ह्या सगळ्या चांगल्या वाईट घटना घडवून आणणाऱ्याही काही देवता असू शकतात ही त्याच्या पुढची कल्पना आहे. ह्या देवता जोपर्यंत आकारहीन होत्या तोपर्यंत त्यांची आणि माणसाची जवळीक झालेली नव्हती. मग पुढे सांस्कृतिक प्रगतीच्या काळात मानवाने सर्व देवतांना मनुष्यरूपात कल्पून त्यांचा आकारही आपल्या सारखाच कल्पिला. इतकेच नव्हे तर त्यांच्यात सुद्धा स्त्री-पुरुष भेद सुद्धा निर्माण केला. माणसाच्या कल्पनेतला पहिला देव हा रागावणारा, भयंकर रूप असलेला होता. मग हळूहळू माणसाला वाटू लागले की देव जसा रागावतो तसाच तो दयाळू सुद्धा आहे. आपण त्याला शरण गेल्यास तो आपल्यावरील संकटेही दूर करतो. देवतांविषयीची ही कल्पना दृढ झाल्यावर ह्या देवता राहतात कुठे? असा प्रश्न माणसाला पडला. ह्या देवता दिसत नाहीत म्हणजे त्या जमिनीवर नक्कीच राहात नसणार म्हणूनच मग त्या आकाशात राहत असाव्यात अशी कल्पना केली गेली आणि आकाशातल्या ह्या देवतास्थानाला स्वर्ग असे नाव दिले गेले. देवांचे संबंधही माणसांसारखेच तयार झाले. त्यांच्यातही आई, वडील, मुलगी, भाऊ, बहीण अशी नाती निर्माण झाली. त्याच बरोबर परस्पर कलह, संघर्ष सुद्धा सुरू झाला. श्रेष्ठ, कनिष्ठ असे भेद सुद्धा निर्माण झाले. अशा रीतीने देव ही कल्पना मानवाने निर्माण केली. त्यात मग कालानुपरत्वे अनेक पंथ निर्माण झाले.

ब्रह्मदेव ह्या देवतेविषयी संकल्पना स्पष्ट करत असताना हीच भावना असलेली दिसते. मानवाला न समजणारा असा तो जो कोणी कर्ता करविता आहे त्याला ब्रह्मदेव हे नाव दिले गेले. पहिल्या प्रकरणामध्ये आपण पाहिलेच की हिंदू धर्मामध्ये अनेक निरनिराळ्या प्रकारच्या वैचारिक धारणा, कल्पना आपल्याला दिसतात परंतु त्यामधील अनेकेश्वरवाद म्हणजेच अनेक वेगवेगळे देव असणे ही संकल्पना बऱ्याच प्रमाणात मान्यता पावलेली दिसते. यामधूनच पुढे ही सर्व चराचर सृष्टी; हिचा कोणीतरी प्रमुख नक्कीच आहे असा विचार सगळीकडेच दिसतो. मग याच अनाकलनीय, गूढ शक्तीला परमेश्वर असे नाव दिले गेले. परमेश्वर म्हणजे परम + ईश्वर याचाच अर्थ ईश्वरांमध्ये जो परम म्हणजेच मुख्य आहे असा. ब्रह्मदेवालाच अनेक वेळा परमेश्वर, जगत्पिता, परमात्मा अशी नावे आढळतात. जवळ जवळ सर्वच धार्मिक ग्रंथांमधून ब्रह्मदेवाचे मुख्य देव असणे, त्याने निर्माण केलेली सृष्टी, त्या सृष्टीच्या सृजनाचा क्रम इत्यादी सर्व माहिती विस्ताराने वर्णन केलेली आढळते. धार्मिक साहित्याचा अभ्यास करताना, ब्रह्मदेव ही संकल्पना समजावून घेताना सर्वप्रथम आपण ब्रह्मा या शब्दाची निर्मिती कशी झाली आणि या शब्दाचा शब्दशः अर्थ काय ते पाहू.

### ३.१ ब्रह्मा शब्दाचा अर्थ :

हा अर्थ शोधण्यासाठी संशोधकाने संस्कृत, इंग्रजी, मराठी आणि हिंदी शब्दकोश विचारात घेतले आहेत. अमरकोश ह्या पुस्तकात 'ब्रह्मा' या शब्दासाठी आत्मभूः, सुरज्येष्ठ, पितामह, हिरण्यगर्भ, लोकेश, स्वयंभू, चतुरानन, धाता, विधाता, विरिन्चि, कमलासन, स्रष्टा, प्रजापति, नाभिज, अंडज, कमलोद्भव व हंसवाहन एवढे शब्द आढळतात. याशिवाय ब्रह्मा या शब्दाचे अर्थ पुढीलप्रमाणे दिसतात. ब्रह्मा म्हणजे स्वतःहून निर्माण झालेला असा आत्मा. (Williams, 2011 : 738) सर्वोच्च असा आत्मा, परमात्मा, स्वतःच स्वतःला निर्माण करणारा, (Williams, 2011 : 778) ब्रह्मा हा शब्द बृह म्हणजे वाढ होणे ह्या धातूपासून तयार झाला आहे. जे जे बृहत्तम आहे; ज्यात वाढणे ह्या क्रियेचे सर्व अर्थ समाविष्ट आहेत तो म्हणजेच ब्रह्मा. (जोशी, १९८५ : २९३) तसेच ब्रह्मा म्हणजे दैवी शक्ती किंवा दैवी आत्मा, सत्य, पवित्र, ज्ञानी. सर्वच ठिकाणी 'ब्रह्मा' या शब्दाचा अर्थ हा असाच सापडतो. 'परमात्मा' ह्या शब्दाचा अर्थ शोधला असता इंग्रजीमध्ये तो Supreme Soul, Supreme Spirit असा सापडतो. (Williams, 2011 : 588) "Spirit" ह्या शब्दाचा अर्थ शोधल्यास त्याचे आत्मा, ब्रह्मा असे अर्थ सापडतात (Bhide, 2002 : 566),

ब्रह्मदेवाला आपण 'कर्ता' असे म्हणतो. कर्ता म्हणजेच Creator असा शब्द शोधल्यास उत्पादक, धाता, विधाता, सृष्टीकर्ता, जगत्उत्पादक देव हे शब्द सापडतात (Bhide, 2002 : 141), परंतु ब्रह्मा हा शब्द कुठेही सापडत नाही. हिरण्यगर्भचा अर्थ बघितला असता सोन्याचे अंडे असा आहे (Williams, 2011 : 1299) सृष्टी निर्माण होण्याआधी सर्वत्र जल होते; त्यामध्ये एक सोन्याचे अंडे निर्माण झाले हेच 'हिरण्यगर्भ' किंवा 'हिरण्याण्ड' मग ह्या अंड्यामधून त्याने सर्व प्राणिमात्र, चल–अचल वस्तू तसेच तीनही लोकांचे, विश्वाचे निर्माण केले म्हणून तो 'विश्वकर्मा' आहे. (Williams, 2011 : 994) परंतु उत्पादक, धाता, विधाता, सृष्टीकर्ता, त्वष्टा ही ब्रह्मदेवाचीच नावे विशेषणे म्हणून वापरली जातात. वरील नावांवरून काय अर्थबोध होतो ते आपण पाहू.

हिंदू मान्यतेप्रमाणे 'ब्रह्मा' हा सृष्टीकर्ता, सृष्टीचा रचनाकार आहे. ब्रह्मदेवाने स्वतःच स्वतःला निर्माण केले, त्यामुळे तो 'स्वयंभू' आहे. तो 'परमात्मा' ही आहे, ब्रह्मा हा एक उर्जेचा स्रोत आहे. तो एक बीज आहे, तर 'क:' असेही एक ब्रह्मदेवाचे नाव आहे. (अनमोल, १९९८ : १३५) 'क:' याचा अर्थ पाणी असा आहे. ब्रह्मदेवाचा जन्म पाण्यामधून झाल्यामुळे तो 'कंज' आहे. कंज ह्या शब्दाचे आणखी अर्थ शोधले असता ब्रह्मदेव, म्हातारा, तपस्वी व सूर्य असे देखील आहेत. (अनमोल,१९९८ : १३७) विष्णूच्या नाभीकमळातून उत्पन्न झाल्यामुळे तो 'नाभीज' आहे. (अनमोल, १९९८ : २६३) कमळात बसलेला असतो म्हणून 'पद्मज' आणि 'कमलासन' आहे. तो प्रजेचे पालन करतो म्हणून 'प्रजापती' आहे. तोच एकाक्षर आहे त्यामुळे तोच 'ओम' आहे. (अनमोल, १९९८ : १३३)

समस्त सृष्टीची निर्मिती करतो त्यामुळे 'धातृ' व 'धाता' असेही त्याचे एक नाव आहे. सर्व देवदेवतांचा, चराचर सृष्टीचा पिता असल्याने तो 'पितामह' देखील आहे. चार मुखे असल्यामुळे 'चतुर्मुख' तसेच 'चतुरानन' असेही त्याचे नाव आहे. सरस्वती म्हणजेच 'वाक्' तिचा पती असल्याने तो 'वाक्पती' आहे. 'वागीश्वर' आहे. याच कारणासाठी 'वागीश' व 'वाचस्पती' ही देखील नावे आहेत. ह्या सर्व नावांवरून एक सर्जनशील शक्ती अशा अर्थानेच ब्रह्मदेवाचा विचार केला दिसून येतो.

### ३.२ संकल्पना व महत्त्व

ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्ती मधील ब्रह्मा हा पहिला देव हे आधी आपण पाहिलेच आहे. सृष्टीची उत्पत्ती हे ब्रह्मदेवाचे, स्थिती हे विष्णूचे आणि लय हे महेशाचे कार्य मानलेले आहे. ब्रह्मदेवाची दोन रूपे आहेत एक म्हणजे पूर्णब्रह्मरूप तर दुसरे रजोगुणाचा अधिष्ठाता असलेले देवरूप. ब्रह्म ही भारतीय तत्त्वज्ञानातील एक सर्वश्रेष्ठ कल्पना आहे. (जोशी, खंड ६, २९३) ब्रह्मदेव ह्या संकल्पनेचा अभ्यास करण्यासाठी प्राचीन साहित्यामध्ये काय माहिती दिली आहे ते देखील विचारात घेणे आवश्यक आहे. यासाठी वेद, ब्राह्मणे, उपनिषदे आणि पुराणे यांसारख्या ग्रंथांचा सविस्तर अभ्यास केला आहे. ब्रह्मदेवाची विविध नावे लक्षात घेऊन त्याच्या नावाशी बाकीच्या देवतांचा असलेला सबंध असा विचार प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात आलेला आहे.

वेदांमध्ये सूर्य, इंद्र, मित्र, वरूण, पूषण असे इतर देव वर्णिलेले आहेत. या सर्वांसाठी ऋचा, मंत्रही आहेत. ब्रह्मा या नावाचा उल्लेख मात्र अजिबातच दिसत नाही. असे असले तरी ब्रह्मदेवाची नावे असलेले विश्वकर्मा, हिरण्यगर्भ, बृहस्पती हे शब्द मात्र बरेच वेळा येतात. ऋग्वेदाच्या १०व्या मंडलातील ८१ व ८२व्या सूक्तात जो विश्वकर्मा आहे तो सर्वोच्च दैवी शक्तीचा प्रतिनिधी आहे. (Griffith, 1889 : 487) तो मनुष्याचा पिता आहे. त्याला सर्व बाजूंना नेत्र आहेत, मुखे आहेत तसेच हात व पाय देखील सर्व बाजूंना आहेत. त्याने एकट्यानेच कुठल्याही साहित्याशिवाय वा उपकरणांशिवाय पृथ्वी व आकाश निर्माण केले आहे.

ऋग्वेदातील नासदीय सूक्तात (१०/१२९) सृष्टी निर्माण होण्याआधी सर्वत्र जल असल्याची कल्पना केलेली आहे. त्यामुळेच ब्रह्मांडाचे बीजतत्त्व त्यात असणे स्वाभाविक आहे. (Griffith, 1889 : 490) १०व्या मंडळातील सूक्तात ह्यालाच हिरण्यगर्भ असे म्हटलेले आहे. ह्या सूक्ताला हिरण्यगर्भ सूक्त असेही म्हटले आहे. ह्या सूक्तात शेवटची ऋचा सोडून इतर सर्व ऋचांचा चौथा पाद 'कस्मै देवाय हविषा विधेम' असा आहे. (Kashyap, 1988: 59) या ऋचेतील 'कः' म्हणजे प्रजापती असे आपण वर पाहिलेच आहे.

### ३.३ ब्रह्मा व विश्वकर्मा

विश्वकर्मा हे ब्रह्मदेवाचे एक नाव असल्याचे आधी आपण पाहिलेच आहे. विश्वकर्मा ही एक वैदिक देवता असून ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळात याला पृथ्वी, जल आणि सर्व प्राण्यांचा जनक मानलेले आहे व सर्वश्रेष्ठ देव म्हटले आहे. सर्व देवांचे नामकरणसुद्धा यानेच केले असल्याचे ऋग्वेदात (१०.८२.३) येथे म्हटले आहे. (Griffith, 1889 : 462) हा सर्वद्रष्टा असून ह्याला असंख्य मुखे, नेत्र, भुजा, पाय इत्यादी अवयव आणि पंखही आहेत असे म्हटलेले आहे. वाजसनेयी संहितेमध्ये (१२.६१) सर्वद्रष्टा प्रजापती आहे असे म्हटले आहे. (महिधर, १९६९ : ५११) तर शतपथ ब्राह्मणात (८.२.१.३) याला विधाता प्रजापती म्हणले आहे. (Eggeling, 1897 : 23)

पुराणे व महाभारतात विश्वकर्म्याला देवांचा शिल्पशास्त्रज्ञ म्हटले आहे. तो स्वायंभुव मन्वंतरातील शिल्प प्रजापती होता. ब्रह्मदेवाच्या उजव्या वक्षभागापासून हा निर्माण झाला. महाभारताच्या आदि पर्वामध्ये (६०, २६–३२) विश्वकर्म्याने देवांसाठी शस्त्रास्त्रे, आभूषणे, विमाने अशा असंख्य वस्तू निर्माण केल्या असल्याचे म्हटले आहे. विष्णूचे सुदर्शन चक्र, शिवाचा त्रिशूळ, इंद्राचे वज्र आणि विजय नामक धनुष्य ही शस्त्रे त्यानेच निर्माण केली. त्रिपुर दहनाच्या वेळी शिवासाठी रथ सुद्धा विश्वकर्म्यानेच तयार केला असे म्हटले आहे. (सातवळेकर, १९६८ ३२७)

**विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात् ।**

**सं बाहुभ्यां धमति सं पतत्रैर्द्यावाभूमी जनयन्देव एक: ।।**

**(ऋग्वेद १०/८१/३)**

इथे विश्वकर्मा हा मनुष्याचा पिता आहे. त्याला सर्व बाजूस नेत्र, मुख, हात व पाय आहेत. कोणत्याही साधनाशिवाय त्याने एकट्यानेच पृथ्वी आणि आकाशाची निर्मिती केली आहे. (Griffith, 1889 : 490) विश्वकर्म्याविषयी अजून एक उल्लेख शुक्ल यजुर्वेद येथे आहे. त्यात प्रजापती व विश्वकर्मा हे वैदिक काळात एकच असलेले आढळतात. शुक्ल यजुर्वेदात दोन वेळा प्रजापतीसंबंधी त्याचे कर्तृत्व वर्णन करण्यासाठी विश्वकर्मा असा शब्द योजल्याचे दिसून येते.

**मातेव पुत्रं पृथिवी पुरीष्यमग्निं स्वे योनावंमारुखा ।**

**तां विश्वैर्देवैऋतुभिः संविदानः प्रजापतिर्विश्वकर्मा वि मुञ्चतु ।**

**(वाजसनेयी संहिता शुक्ल यजुर्वेद १२/६१)**

ज्याप्रमाणे माता आपल्या पोटात गर्भ धारण करते त्याचप्रमाणे पृथ्वीवर येणारी उखा; प्राणिमात्रांना कल्याणकारी असलेल्या अग्नीला आपल्यामध्ये धारण करते. (१२/६१) सर्व देवता व ऋतूंमुळे एकता पावलेली ती उखा म्हणते की सृष्टीनिर्माता प्रजापती त्या उखेला पाशांपासून मुक्त करोत. (सातवळेकर, १९६८ : २२७)

**प्रजापतिर्विश्वकर्मा स न इदं ब्रह्मक्षत्रं पातु ।**

**(वाजसनेयी संहिता शुक्ल यजुर्वेद १८/४३)**

प्रजेचा रक्षक, सर्व विश्वाचा कर्ता हा एक विचारशील गंधर्व आहे. तो ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णांची रक्षा करो, असा याचा अर्थ आहे. आधी आपण पाहिलेच आहे की विश्वकर्मा ह्या शब्दाचा अर्थ शब्दकोशात ब्रह्मा व प्रजापती असाच दिलेला आहे. म्हणजेच विश्वकर्मा हा शब्द ब्रह्मदेवासाठीच योजला असणे शक्य आहे. (सातवळेकर, १९६८ :३२५)

### ३.४ ब्रह्मा आणि सूर्य

महर्षि शौनक यांनी बृहद्देवता ह्या ग्रंथामध्ये सूर्यालाच प्रजापती, ब्रह्म (शाश्वत) म्हटले आहे. सूर्यालाच सत्त्व, असत्त्व वस्तूंचा उत्पादक असे म्हणताना प्रजापती हे विशेषण वापरले आहे. विश्वामध्ये ज्या काही वस्तू आहेत; होऊन गेल्या आहेत किंवा होणार आहेत या सर्वांची उत्पत्ती व लय सूर्यच आहे. सूर्यामुळेच त्यांचा जन्म होतो व अंतिमतः सर्व सूर्यातच विलीन होते. सूर्य म्हणजेच कधीही नष्ट न होणारे असे शाश्वत ब्रह्म आहे. (MacDonnell, 1904 : 6)

**भवद्भूतस्य भव्यस्य जङ्मस्थावरस्य च ।**

**अस्यैके सूर्यमेवैकं प्रभवं प्रलयं विदुः ।।**

**असतश्च सतश्चैव योनिरेष प्रजापतिः ।**

**यदक्षरं च वाच्यं च यथैतद्ब्रह्म शाश्वतम् ।।**

**(बृहद्देवता १/६१-६२)**

महर्षि शौनकांनी सूर्याचा प्रजापती असा उल्लेख केल्यामुळे आणि त्याला ब्रह्म शाश्वत म्हटल्याने ब्रह्म ह्या नपुसकलिंगी शब्दाचे इथे ब्रह्मा हे पुल्लिंगी रूप बघायला मिळत आहे. शुक्ल यजुर्वेद येथेही सूर्याला स्वयंभू म्हटले आहे आणि स्वयंभू हे ब्रह्मदेवाचे एक नाव आहे हे ही आपण आधी पाहिलेच आहे.

**स्वयम्भुरसि श्रेष्ठो रश्मिर्वर्चोदा अधिवर्चो मे देहि ।**

**सूर्यस्यावृत मन्वावर्ते ।।**

**(वाजसनेयी संहिता शुक्ल यजुर्वेद २/२६)**

तू स्वयंभू आहेस, तू अति श्रेष्ठ अशा तेजाचा किरण आहेस तेव्हा तूच मला तेज दे, असे ह्या ठिकाणी म्हटलेले आहे. (सातवळेकर, १९६८ : ६६)

प्राचीन वैदिक काळी सूर्याचे महत्त्व आणि सजीव सृष्टीसाठी असलेली त्याची आवश्यकता लक्षात घेऊन ऋषींनी प्रजेचा प्रतिपाळ करणारा या अर्थाने सूर्यालाच प्रजापती म्हटलेले दिसते. हिरण्यगर्भचा अर्थ बघताही असेच असावे असे वाटते. ब्राह्मणग्रंथांमध्ये सुद्धा सृष्टीच्या उत्पत्तीची क्रिया हिरण्यगर्भापासूनच सुरु झालेली दिसते. सृष्टीच्या आधी सर्वत्र जलच होते; त्यात एका हिरण्यअंड्याचा जन्म झाला, कालांतराने त्यातून प्रजापती निर्माण झाला. अंड्याच्या वरच्या भागापासून आकाश तर खालच्या भागापासून पृथ्वी तयार झाली. शतपथ ब्राह्मणात (११/१/६/१–२) ब्रह्मांड या शब्दाचा हाच अर्थ आहे. हिरण्यगर्भ हे प्रजापतीच्या जन्माचे कारण आहे तर ह्या अंड्यातून प्रजापतीची निर्मिती झाली आहे. पण ऋग्वेदात मात्र हिरण्यगर्भ व प्रजापती हे एकाच देव तत्त्वास उद्देशून संबोधले आहे. तेव्हा ह्यावरून प्रजापती म्हणजेच सूर्य असाही एक तर्क आपल्याला लावता येऊ शकतो.

### ३.५ ब्रह्मा व यज्ञ

वेदांमध्ये सर्वश्रेष्ठ तत्त्वाच्या रूपात असणारा प्रजापती ब्राह्मणग्रंथांमध्ये मात्र कर्मकांडांमध्ये अडकलेला दिसतो. ब्राह्मणग्रंथांमध्ये प्रजापतीचा यज्ञाशी संबंध जोडलेला दिसतो. प्रजापती म्हणजे यज्ञाची देवता असे जरी म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. प्रजापती हा जगत्पिता वगैरे आहे पण त्याचे सारे महत्त्व यज्ञापाशी येऊन थांबलेले दिसते. यज्ञ हीच सर्वोच्च

शक्ती आहे. तीच प्राण्यांच्या उत्पत्तीस आणि कल्याणास कारणीभूत आहे. येथे ब्रह्मदेवाला पालनकर्ता देखील म्हटलेले आहे. तर प्रजापती सुद्धा यज्ञ करूनच आपली शक्ती मिळवतो व सृष्टीचे पालन करण्याकरीता तो सतत यज्ञ करत असतो. ब्राह्मणग्रंथात यज्ञाशी निगडीत प्रत्येक गोष्टीचा संबंध प्रजापतीशी जोडलेला आहे. ह्यासाठी पुढील उल्लेख पाहू. वाजपेय यज्ञात सतरा स्तोत्रे आहेत. त्यात यजमानास सतरा दीक्षाही द्याव्या लागतात आणि हा यज्ञ सतरा दिवस चालतो म्हणून येथे प्रजापतीला 'सप्तदश' किंवा सतरा प्रकारचा म्हटले आहे. (Eggeling, Part 5, 1900 : 8) शतपथ ब्राह्मणात (९/२/२/६) प्रजापतीला सप्तदश तसेच प्रजापती हाच अग्नी असल्याचे सुद्धा म्हटले आहे. (Eggeling, Part 5, 1900 : 190) तर ऐतरेय ब्राह्मणात (१/१/१) प्रजापतीला सप्तदश म्हटले आहे कारण या यज्ञात सुद्धा सतरा ऋचांद्वारे अग्न्याधान केले जाते. (Martin, 1922 : 6) शतपथ ब्राह्मणामध्ये (५/२/१/१) प्रजापतीलाच अग्नी देखील म्हटलेले आहे. एवढेच नाही तर सोमरस, सूर्य, वायू व यज्ञीय पशू यांनाही प्रजापतीच म्हटले आहे. अश्वमेध यज्ञाची यज्ञवेदिका तयार करण्यास कर्मकांडाप्रमाणे एक वर्ष लागते. ही वेदी म्हणजे यज्ञाचे प्रतीक आहे. तर यज्ञ म्हणजेच साक्षात प्रजापती आहे.

**यज्ञौ वै प्रजापतिः** हे वाक्य शतपथ ब्राह्मणामध्ये (१/१/१/१३, ३/२/२/४, ५/१/२/१३, ११/१/१/१) आहे. यात असे म्हटले आहे की प्रजापतीने यज्ञास आपल्या स्वतःच्या स्वरूपाप्रमाणेच रचले. यज्ञ म्हणजेच प्रजापती आहे.

**अथैतमात्मनः प्रतिमामसृजत यद्यज्ञम् ।**

**तस्मादाहुः प्रजपतिर्यज्ञ इति ।**

**आत्मनो ह्येतं प्रतिमामसृजत ।**

**(शतपथ ब्राह्मण ११/१/८/३)**

शतपथ ब्राह्मणात यज्ञच प्रजापतीची शक्ती असून त्याच्या मदतीनेच ते सृष्टी करतात. पुढे शतपथ ब्राह्मणात (१२/३/४/१) 'प्रजापती यज्ञ करा' असा उपदेश करताना वर्णन केलेले दिसून येते.

शतपथ ब्राह्मणग्रंथात आणखी काही उल्लेख पुढीलप्रमाणे आहे. प्रजापती यज्ञरूपात मनुष्याला वरुणपाशांपासून म्हणजेच संकटांपासून वाचवतात. (५/२/४/२) (Eggeling, Part 3, 1894 : 47) अग्नीचे उत्पादक असल्यामुळे प्रजापतीच अग्नीचा पिता आहे. (६/१/२/२६) (Eggeling, Part 3, 1894 : 153). प्रजापती अमर आहे व सर्व देवदेवता त्याचीच मुले आहेत. (६/३/१/१७) (Eggeling, Part 3, 1894 : 194). प्रजापतीनेच पृथ्वीला उत्पन्न केले आहे. (७/३/१/२०) (Eggeling, Part 3, 1894 : 346). काळाचे रूप असल्या कारणाने प्रजापतीच पृथ्वीवरील सर्व वस्तूंचा जनक आहे. प्रजापतीला इथे काळाचे रूप म्हणले आहे ह्याचाच अर्थ काळ म्हणजेच संवत्सर असाही घेता येतो. (१०/४/२/२) (Eggeling, Part 4, 1897 : 34)

प्रजापतीच्या उत्पत्तीची कथा ऋग्वेदातील हिरण्यगर्भाशी जोडताना शतपथ ब्राह्मण त्याच्या जन्माविषयी सांगते की प्रथम सर्वत्र जलच होते. तपाच्या शक्तीमुळे त्यात एक अंडे निर्माण झाले. हे अंडे एक वर्ष त्या पाण्यामध्ये तरंगत होते; मग त्यातूनच प्रजापतीचा जन्म झाला. जन्म होताच त्याने भूः असा उच्चार केला त्यामुळे पृथ्वी निर्माण झाली. भुवः म्हणताच अंतरिक्ष निर्माण झाले तर स्वः म्हणताच आकाश निर्माण झाले. (Eggeling, Part 5, 1900 : 23)

**आपो ह वा इदमग्रे सलिलमेवास ।**
**तासु तपस्त्यप्यमानासु हिरण्मयाण्डं सम्बभूव ।**
**तदिदं हिरण्मयाण्डं यावत्सम्वत्सरस्य ।**
**बेला तावत्पर्यप्लवत्ततः संवत्सरे ।**
**पुरुषः समभवत्स प्रजापतिः ।**
**स संवत्सरे व्याजिहीर्षत् ।**
**स भूरिति व्याहरत्सेयं पृथिव्यभवत् ।**
**भुव इति तदिदमन्तरिक्षमभवत् ।**
**द्यौरिति सा असौ द्यौरभवत् ।**
**(शतपथ ब्राह्मण ११/१/६/१ ते ३)**

## ३.६ प्रजापती एक सर्वोच्च देवता

प्रजापती हा शब्द प्रजा आणि पती असे दोन शब्द मिळून तयार झाला आहे. वेदांमध्ये सृष्टीची निर्मिती करणारा, प्रजेचा स्वामी ह्या अर्थी प्रजापती असे म्हटले आहे. त्याच बरोबर सृष्टी निर्माता म्हणून विश्वकर्मा, अग्नी, इंद्र, दक्ष, ब्रह्मा अशी अनेक नावे विश्वनिर्मितीच्या संदर्भात प्रजापती बरोबर येतात. सुरूवातीला हा प्रजापती सृष्टी निर्माता असला तरी नंतरचा प्रजापती हे एक विशेषण म्हणून किंवा ब्रह्मा ह्या शब्दाचा समानार्थी शब्द म्हणून वापरलेला दिसतो. त्याचे कार्य सुद्धा बदललेले दिसून येते. वेदांमध्ये तो पृथ्वी, आकाश, जल, सर्व प्राणिमात्र ह्यांचा स्वामी आहे. त्याचप्रमाणे देवांचा तसेच असुरांचा पिता आहे. याचाच अर्थ प्रजापती आणि ब्रह्मा ह्या उपमा एकमेकांना दिलेल्या दिसतात. उपमेय आणि उपमान एकच असल्याचे सांगितले आहे. ब्राह्मणग्रंथांमध्येही प्रजापतीचे असेच वर्णन आढळते. फक्त त्याचा संबंध यज्ञाशी जोडलेला आहे. उपनिषदांमध्ये त्याचा संबंध परब्रह्माशी जोडलेला आहे तर त्यानंतरच्या साहित्यातून प्रजापती हा शब्द एखाद्या पदवीप्रमाणे वापरलेला आढळतो. हे सर्व प्रजापती सृष्टीनिर्मितीच्या कार्यात ब्रह्मदेवाला मदत करत आहेत असे सुद्धा म्हटले आहे. ही प्रजापतींची संख्या काही ठिकाणी सात तर काही ठिकाणी एकवीस आहे. रुद्र, मनू, दक्ष, भृगु, धर्म, तप, यम, मरीची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रतु, वसिष्ठ, परमेष्ठी, सूर्य, चंद्र, कर्दम, क्रोध आणि विकृत अशी त्यांची नावे आहेत. प्रजापती एक सर्वोच्च देवता असल्याचे शतपथ ब्राह्मणात म्हटलेले आहे. यज्ञाशी असलेल्या घनिष्ठ संबंधाशिवाय प्रजापतीची दुसरी बाजू ही सृष्टीचा जनक या रूपाने आहे. या ठिकाणी प्रजापती ब्रह्मा एक सर्वोच्च देवेतेच्या स्वरुपात प्रस्थापित झालेला दिसतो.

प्रजापती ही एक वैदिक देवता आहे. ऋग्वेदात हा शब्द सहा वेळा आला आहे. दहाव्या मंडळातील १२१ वे सूक्त 'क' ह्या देवतेचे असून त्या ठिकाणी 'क' आणि 'प्रजापती' एकच असल्याचे म्हटले आहे. या सूक्तात प्रजापती हा सृष्टी व स्थिती कर्ता तोच एक देव आहे अशी कल्पना मांडलेली आहे. (Griffith, 1896 : 487)

भूः, भुवः, स्वः या तीन व्याहृतींच्या योगाने पृथ्वी, अंतरीक्ष व द्यौ ह्या तीन स्थानांचा निर्देश होतो. ह्या तिन्हींची देवता प्रजापती आहे आणि त्याच बरोबर प्रजापतीच सर्वश्रेष्ठ देवता आहे हे १०व्या मंडळातील (१२१/१०) ह्या ऋचेतून समजते. त्याचा अर्थ पुढील प्रमाणे ''हे

प्रजापते, तुझ्यावाचून अन्य कोणी नाही. सर्व उत्पन्न होणाऱ्या पदार्थांना प्रजापती व्यापून उरला आहे. आम्ही ज्या कामना धरून तुला यज्ञात आहुती देतो, त्या आमच्या कामना पूर्ण होवोत. आम्ही सर्व प्रकारच्या संपत्तीचे स्वामी असावे.''

वाजसनेयी माध्यंदिन संहितेच्या ३२व्या अध्यायात प्रजापतीपूर्वी काहीही उत्पन्न झालेले नव्हते आणि प्रजापती हाच प्रथम निर्माण झाला व तोच परब्रह्म आहे असे म्हटले आहे. तैत्तिरीय संहितेत प्रजापतीनेच आपले आपले मुख, बाहू, हात व पाय यांच्यापासून अनुक्रमे ब्राह्मण व अग्नी, क्षत्रिय व इंद्र, वैश्य आणि विश्वदेव व शूद्र निर्माण केल्याचे सांगितले आहे. (भट्टाचार्य, १९०८ :११८१)

प्रजापती विश्वाचाच नव्हे तर विश्व व्यवस्थेचाही कर्ता असल्याचे वैदिक लोक मानत असावेत. वैदिक लोकांच्या समाजव्यवस्थेत महत्त्वाच्या घडामोडी प्रजापती अशी संज्ञा असणाऱ्या लोकपालांकडून केल्या जात असत. त्याच्या नेतृत्वानेच सर्व व्यवहार चालत असत. त्यावरून त्या लोकांनी अशी कल्पना केली की विश्वाचा गाडा सुद्धा असाच कोणी प्रजापती ओढत असेल म्हणून त्यांनी कल्पना केली की कमलपत्रावर बसून प्रजापतीनेही विश्वाची उत्पत्ती केली. (जोशी, खंड ५, १९९६: ६९५) पण विचार करण्याची पद्धत सुधारल्यानंतर ह्या कल्पनेला धक्का बसला. मग प्रजापतीचे सृष्टी करणे हे एक रूपक आहे असे समजून त्याचे अनेक अर्थ ब्राह्मणग्रंथात दिले आहेत. अग्नी, प्राण, सूर्य, चंद्र, संवत्सर, यज्ञ, वाणी, मन, मनू, अथर्व, आत्मा, सत्य असे शब्द प्रजापतीच्या संदर्भाने वेगवेगळ्या अर्थाने ब्राह्मणग्रंथांतून सांगितले गेले. शतपथ ब्राह्मणात (१/३/५/१०) मध्ये तर **सर्वं वै प्रजापतिः** असे म्हणून सर्व विश्व प्रजापति असल्याचे सांगितले आहे. अनेक प्रकारांनी वर्णन करूनही पूर्ण अर्थ समजल्याचे समाधान काही होईना तेव्हा **अनिरुक्तौ वै प्रजापतिः** असे म्हणून प्रजापती व्याख्या रहीत असल्याचेही तैत्तिरीय ब्राह्मणात (१/३/८/५) मध्ये सांगून टाकले आहे. (शर्मा, २००४:२१) प्रजापतीचे सगुण रूप बृहदारण्यक उपनिषदात (१/४/३) सांगितले आहे. इथे म्हटले आहे की स्त्री व पुरुष मिथुनीभूत असताना त्यांचे जे रूप असते तेच प्रजापतीचे रूप असते. (Madhavanand, 1950 : 102)

वैदिक वाङ्मयात प्रजापती विषयी अनेक कथा आढळतात. त्यापैकी काही पुढे देत आहे. तैत्तिरीय संहिता (२/१/१) मध्ये पुढील कथा आहे. प्रजापती प्रथम एकटाच होता. त्याने

प्रजोत्पत्तीची कामना करून स्वतःच्या मांसाचा काही भाग अग्नीला आहुती म्हणून अर्पण केला. तेव्हा त्या अग्नीतून एक बिन शिंगाचा बोकड निर्माण झाला. (Keith, 1914 : 79) विश्वाच्या कल्याणासाठी देवाने अवतार घेणे ह्या कल्पनेचा उगम सुद्धा वैदिक साहित्यातच झालेला आढळून येतो. सध्या जरी मत्स्य, कूर्म आणि वराह अवतार हे विष्णूचे अवतार म्हणून माहीत असले तरी ही तीनही रुपे प्रजापतीचीच असल्याचे वर्णन आहे. त्याबद्दल विस्तृत माहिती पुढे येणारच आहे. प्रजापती संबंधी आणखी एक कथा भारतीय संस्कृति कोशात दिली आहे. ती पुढील प्रमाणे– प्रजापतीने यज्ञ व छंद यांची वाटणी केली. त्या वाटणीमध्ये त्याने अनुष्टुप छंद अच्छावाकीय ऋचेला दिला. त्यामुळे अनुष्टुप प्रजापतीवर रागावला. मग प्रजापतीने सोमयाग करून अनुष्टुप छंदाला आद्यस्थान दिले. तेव्हापासून अनुष्टुप छंदाचा सर्व स्तवनात प्रथम उपयोग होऊ लागला. (जोशी, खंड ५, १९९६: ६९६)

ब्राह्मणग्रंथांमध्ये सुद्धा प्रजापतीचे महत्त्व वर्णन केलेलं आढळून येते. शतपथ ब्राह्मणात पुढील उल्लेख आढळतात. **प्रजयनिता स प्रजापतिः ।** (३/९/१/६) (Eggeling, Part 2, 1885 : 218) **प्रजननं प्रजापतिः ।** (५/१/३/९) (Eggeling, Part 3, 1894 : 15) **प्रजापतनि प्रजयित्रैता: प्रजा प्राजनयत ।** (८/४/३/२०) (Eggeling, Part 4, 1897 : 76) या वाक्यांवरून ऋग्वेदातील विश्वकर्माशी असलेली एकरूपता तशीच असलेली दिसते आहे. **प्रजापतिर्वै विश्वकर्मा। प्रजापतिसृष्टासीत्येतत् ।** (८/२/१/१०) (Eggeling, Part 4, 1897 : 27) त्याचबरोबर (९/४/१/१२) **प्रजापतिर्वै विश्वकर्मा । स हीदं सर्वमकरोत् ।** मध्येही प्रजापतीच विश्वकर्मा असून त्यांनीच संपूर्ण विश्वाची निर्मिती केली आहे असे म्हटलेले आहे. (Eggeling, Part 4, 1897 : 233) प्रजापती परमश्रेष्ठ आहेत व सर्व प्राणिमात्रांचे स्वामी आहेत.

सृष्टीची रचना करणे, नियमन करणे (वि+धा) तसेच प्रत्येक क्रियेचे संचलन करणे यामुळे तोच धाता किंवा विधाता आहे. येथे पुढील प्रमाणे वर्णन दिलेले आहे. (Eggeling, Part 4, 1897 : 263)

**स दिक्षु प्रतिष्ठायेदं सर्व दधद् विदधद अतिष्ठित् ।**

**यद् दधद् विदधत् अतिष्ठत् । तस्माद् धाता ।**

**(शतपथ ब्राह्मण ९/५/१/३५)**

त्याच बरोबर प्रजापती सर्व देवांमध्ये तेजस्वी आणि शक्तिशाली आहेत. त्यांचे स्वरूप स्पष्टही आहे आणि अस्पष्टही आहे; ते निस्सिमही आहेत आणि ससीमही आहेत, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे. (Eggeling, Part 4, 1897 : 72)

**प्रजापतिर्वै सर्व देवानां वीर्यवत्तम: ।**

**उभयं वा एतत् प्रजापतिः निरुक्तश्च अनिरुक्तश्च ।**

**परिमितश्च अपरिमितश्च ।**

**(शतपथ ब्राह्मण ७/२/४/३०)**

विश्वाची प्रत्येक वस्तू, चराचर, सजीव, निर्जीव तसेच सर्व लोकही प्रजापतीचीच रूपे आहेत. शतपथ ब्राह्मणात येथे म्हटले आहे. (Eggeling, Part 3, 1894 : 15)

**सर्वमु ह्येवेदंप्रजापतिः  सर्वं वा इदं प्रजापतिः ।**

**यदीमे लोकाः यदिदं किंच ।**

**(शतपथ ब्राह्मण ५/१/३/१०–११)**

वैदिक काळात सर्वोच्च देवता असल्यामुळे ब्राह्मणग्रंथातही प्रजापतीला सन्मान मिळाला आहे. त्याला विश्वाचा जनक तसेच सर्वोत्कृष्ट अमरत्व म्हटले आहे.  प्रजापतीच सर्व विश्व आहेत असे ऐतरेय ब्राह्मणात (७/४/८) येथे म्हटले आहे. (Martin, 1922 : 174)  कौषितकी ब्राह्मणात (२/८) मध्ये प्रजापतीच विश्वातील प्रत्येक वस्तूचा जनक असल्याचे म्हटले आहे. (Cowell, 1968 : 155) तर तैत्तिरीय संहितेत (१/७/३) मध्ये प्रजापती अपरिमेय असून त्यांच्या शक्तीची व स्वरूपाची सीमा नाही. प्रजापती अमर आहेत, अनिरुप्य व अपरिमित आहेत असे सांगितले आहे. (तैत्तिरीय संहिता, सातवळेकर,१९५७ : ४४) शतपथ ब्राह्मण मध्ये विश्वातील सर्व सजीव हे मर्त्य आहेत आणि ते सर्व प्रजापतीचे रूपच आहे परंतु केवळ प्रजापतीच अमर आहे. (Eggeling, Part 2, 1894 : 411)

**एतद् हि अमृतम् । यद् हि अमृतं तद् हि अस्ति । स एष ।**

**प्रजापतिः एतद् उ यन्मर्त्यम् । सर्वं वै प्रजापतिः ।**

**(शतपथ ब्राह्मण ४/५/७/२)**

पुढे शतपथब्राह्मणामध्ये तीन लोक आहेत परंतु या तीन लोकांपलिकडे चौथा एक लोक आहे त्यावर प्रजापतीची सत्ता आहे. (Eggeling, Part 2, 1894 : 424)

**त्रयो वा इमे लोकाः । प्रजापतिः अतिमाँल्लोकाँश्चतुर्थ ।**

**(शतपथ ब्राह्मण ४/६/१/४)**

पुराणांमध्ये प्रजापती अनेक मानलेले आहेत. सात, तेरा, चौदा, एकवीस अशा वेगवेगळ्या संख्या वेगवेगळ्या ठिकाणी सांगितल्या आहेत. कर्दम, भृगु, दक्ष, कश्यप, मरीची, अत्री, क्रतु अशा अनेक व्यक्तींना पुराणात प्रजापती म्हटले आहे. काही ठिकाणी मूळ ईश्वर म्हणजे प्रजापती मानले असून, सृष्टीकार्याचे काम करणाऱ्या ऋषींनाही प्रजापती मानले आहे. वैदिक वाङ्मयातला प्रजापती पुढे पुराण वाङ्मयात ब्रह्मा किंवा ब्रह्मदेव म्हणून आपल्या सृष्टीकर्त्याचे सामर्थ्य घेऊन प्रसिद्ध झाला.

### ३.७ वाणी किंवा वाचा आणि ब्रह्मा

ऋग्वेदात वाक् किंवा वाणीला सुद्धा अनंत सामर्थ्यशाली म्हटलेले आहे. जर ब्रह्म म्हणजे सूक्त याचे एवढे महत्त्व असेल तर ब्रह्म जिथून निर्माण होते त्याचे कारण असणाऱ्या वाणीचेही महत्त्व असणे स्वाभाविक आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळात १२५ व्या सूक्तात तिला सर्वशक्तिमती देवी असे म्हटले आहे. तीच सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ आहे. रुद्र, वसु, आदित्य यांच्या बरोबर ती विहार करते. मित्र, वरुण, इंद्र, अग्नी, अश्विनौ, सोम तसेच त्वष्टा यांना ती धारण करते. देवांना हवि देणारे यज्ञाचे फळ सुद्धा तीच आहे. संपूर्ण जगाची अधीश्वरी, चिन्मयी, देवांमध्ये श्रेष्ठ अशी प्रथमा आहे. अन्न खाणे, ऐकणे आणि वास घेणे हे तिच्याच शक्तीमुळे शक्य आहे. ब्रह्मद्वेषी असुरांना नष्ट करण्यासाठी हीच रुद्राला प्रेरित करते. त्याचे धनुष्य घेऊन मनुष्याच्या रक्षणासाठी युद्ध करते. संसारपिता ब्रह्मदेवालाही तीच निर्माण करते. तिचे जन्मस्थान समुद्राच्या पाण्यात आहे. आपल्या महिम्याने ती पृथ्वी व आकाशाच्यावर असलेल्या स्वर्गलोकाला स्पर्श करते. (Griffith, 1896 : 489) या वर्णनावरून हे स्पष्ट आहे की जगाची उत्पादिका व सर्वसामर्थ्यशाली शक्तीच्या रूपात वाक् ची प्रतिष्ठापना झालेली होती. वाजसनेयी संहिता मध्ये त्वष्टा वा विश्वकर्मास वाचस्पती असे म्हटले आढळते. (भट्टाचार्य, १९०८ : ३२५ )

**वाचस्पतिं विश्वकर्माणमूतये मनोजुवं वाजे अद्या हुवेम ।**

**स नो विश्वानि हवनानि जोपद्विश्वशशम्भूरवसे साधुकर्मा ।**

**उपयामगृहीततोऽसीन्द्राय त्वा विश्वकर्मण एष ते योनिरिन्द्राय त्वा विश्वकर्मणे ।।**

**(वाजसनेयी संहिता ८/४५)**

ऐतरेय ब्राह्मणमध्ये वाक् च त्वष्टा असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. तसेच त्वष्टाची पूजा केल्याने आपण वाक् चीसुद्धा पूजा करतो. (Martin,1863 : 28)

**त्वष्टारं यजति । वाग्वै त्वष्टा । वाग्हीदं सर्व ताष्टि इव ।**

**वाचमेव तत् प्रीणाति ।**

**(ऐतरेय ब्राह्मण २/१/४)**

याच प्रमाणे शतपथ ब्राह्मणात प्रजापतीला वाक्पती असे म्हटलेले आहे. (Eggeling, Part 2, 1885 : 17)

**प्रजापतिर्वै वाक्पतिः ।**

**(शतपथ ब्राह्मण ३/१/३/२२)**

अथर्ववेदामध्ये सुद्धा (९/२/५) येथे वाक् ला विराज म्हटले आहे. सर्वव्यापक असल्याने वाक् विराज वा विराट आहे. (शर्मा, २००५ : ५)

**येषां चतुर्थं वियुनक्ति वाचंब्रह्मैनद्विद्यात् तपसा विपश्चित्......।**

**(अथर्व वेद. ८/९/३)**

ब्रह्म आणि वाक् यांच्या परस्पर संबंधांमुळे त्यांना बऱ्याचदा एकमेकांचे जनक म्हटले आहे. परंतु सर्वसामान्यपणे प्रजापती ब्रह्मदेवाचे प्रतिनिधी आहेत आणि वाक् ही त्यांची मुलगी आहे. पण सरस्वतीच्या रूपात तिला ब्रह्मदेवाची पत्नी देखील मानलेले आहे. (शर्मा, २००५ : २९)

### ३.८ प्रजापती व दक्ष

दक्ष हा एक प्रजापती आहे. वैदिक वाङ्‌मयात काही ठिकाणी याचा देवता म्हणून उल्लेख आहे. दक्ष प्रजापतीने प्रजा समृद्ध व्हावी म्हणून यज्ञ केल्याचा उल्लेख कौषितकी ब्राह्मणात (४.४) मध्ये आहे. (Cowell, 1968 : 110) स्वायंभुव मन्वंतरात विधात्याच्या उजव्या अंगठ्यातून दक्ष निर्माण झाल्याचे म्हटले आहे. (विष्णू पुराण १.१५) शतपथ ब्राह्मणामध्ये प्रजापतीलाच दक्ष असे म्हटलेले दिसते. दाक्षायण यज्ञ सर्व प्रथम प्रजापतीने संपन्न केला म्हणूनच या यज्ञाचे नाव दाक्षायण आहे. (Eggeling, Part 1, 1882 : 323)

**स वै दक्षो नाम तद्यदनेन सः ।**

**अग्रे अयजत तस्माद् दाक्षायणो नाम ।।**

**(शतपथ ब्राह्मण २/४/४/२)**

तैत्तिरीय संहितेमध्ये असे म्हटले आहे की प्रजापतीला ३३ कन्या होत्या त्या त्याने सोम म्हणजे चंद्राला दिल्या; परंतु त्यात तो रोहिणीसाठी अधिक आसक्त झाला. मग बाकीच्या स्त्रिया

चिडून प्रजापतीकडे आल्या. सोम त्यांना आणायला गेला तेव्हा प्रजापती त्याला म्हणाला की, ''तू शपथ घे की तू सगळ्यांशी समान व्यवहार करशील, तरच मी मुलींना परत पाठवीन.'' त्याप्रमाणे चंद्राने शपथ घेतली व तो सर्व स्त्रियांना घेऊन घरी गेला. परंतु तरीही तो रोहिणीजवळच अधिक राहू लागला. शपथभंगाचे पाप लागल्यामुळे चंद्र क्षयाने ग्रस्त झाला. (सातवळेकर, १९४५ : ८९)

**प्रजापतेः त्रयस्त्रिंशद्दुहितर आसन् । ताः सोमाय राज्ञे अददात् ।**

**तासा रोहिणीमुपैत् । ताः ईर्ष्यन्तिः पुनरगच्छन् ।**

**ताः अन्वैत । ताः पुनरयाचत । ता अस्मै न पुनर्ददात् ।**

**सः अब्रवीत ऋतममिश्व यथा समावच्छ उपैष्याम्यथ ते पुनर्दास्यामि इति ।**

**स ऋतमामीत् । तासां रोहिणीमेवोपैत तं यक्ष्म आर्च्छद । राजानं यक्ष्म आरद् इति ।**

**(तैत्तिरीय संहिता २/३/५)**

पुराणांमध्ये प्रजापती हा शब्द विशेषणाचे काम करतो. हे विशेष करून ब्रह्मदेवासाठी वापरले जात असून, प्रजेच्या कल्याणासाठी योगदान देणाऱ्या काही ऋषींना सुद्धा योजलेले आढळते. पद्म पुराणात भृगु, पुलह, पुलस्त्य, क्रतु, अंगिरा, मरिची, अत्रि, वसिष्ठ व दक्ष असे नऊ प्रजापती मानलेले आहेत.

**पुलस्त्योत्रिर्वसिष्ठश्च क्रतुश्च पुलहस्तथा ।**

**भृगुर्मरीचिर्दक्षश्च अङ्गिराच तपोधनः ।**

**प्रजापतयः पुराण्वेष्वेतेनव विनिश्चिताः ।।**

**(पद्म पुराण ४/३२)**

या ठिकाणी प्रजापती हे विशेषण आहे. पुराणांमध्ये ज्या ज्या ठिकाणी दक्षाचा उल्लेख येतो त्या त्या ठिकाणी दक्ष प्रजापती असे म्हटलेले आहे. महाभारत शल्यपर्व (३५/४२–६२) मध्ये सुद्धा ही कथा अशीच दिलेली आहे. पण प्रजापतीचे स्थान दक्षाने घेतले आहे आणि कन्या ३३ नसून २७ आहेत. त्यांना नक्षत्रे म्हटले आहे. (Ganguli, 1883 : 3461) भागवत पुराणातही ही कथा जवळ जवळ अशीच आहे. प्रजापती व दक्ष एकच असल्याचा आणखी एक उल्लेख महाभारत

शांती पर्व येथे दिसतो, या प्रमाणे दक्ष हाच ‘क’ आहे. भागवत पुराणामध्ये सुद्धा दक्षालाच ‘क’ असे म्हटले आहे. (Prabhupada, 1972 : 170)

**न कस्याध्वरमीयतुः ।**

**(भागवत पुराण ४/६/३)**

तर ब्राह्मणग्रंथातही प्रजापतीला ‘क’ असेच संबोधले आहे. अशा प्रकारे दक्षाला प्रजापती हे विशेषण म्हणून वापरले गेले आहे किंवा दक्ष हे प्रजापतीचेच आणखी एक नाव आहे.

### ३.९ प्रजापती व त्वष्टा

प्रजापती व त्वष्टा– त्वष्टा ही एक वैदिक देवता आहे. ऋग्वेदात त्वष्ट्याचे स्वतंत्र असे एकही सूक्त नाही परंतु त्याचा उल्लेख पुष्कळदा झालेला आहे. त्यावरून जी माहिती समजते ती अशी– विश्वरचनेच्या कार्यात तो एक सर्वोत्तम, कुशल कारागीर असून देवांना लागणारी विविध पात्रे तयार करण्याची कामगिरीही त्याच्याकडेच असते. त्याने इंद्रासाठी एक लोखंडी वज्र बनविले होते. त्याला एक हजार प्रखर धारा व शंभर तीक्ष्ण अग्रे होती. या वज्राच्या साहाय्यानेच इंद्राने युद्धात शत्रूंचा नाश केला. त्यामुळे त्या वज्राला श्रेष्ठ आयुध अशी संज्ञा मिळाली. त्वष्टा हा कारागिरीत निष्णात होता. सामर्थ्यसंपन्न असूनही सत्यनिष्ठ होता. तो प्रजांचा निर्माता व पोषकही होता.

**देवस्त्वष्टा सविता विश्वरूपः पुपोष प्रजाः पुरुधा जजान।**

**(ऋग्वेद ३/५५/१९)**

अर्थ– त्वष्टा देव विश्वरूप आहे. त्याने विविध प्रजा निर्माण करून त्यांचे पोषण केले. यावरून प्रजा निर्मितीवरून त्याचे प्रजापतीशी साम्य आढळते आहे. महाभारतात व कौशिक सूत्रात यालाच अनुक्रमे सविता व प्रजापती तर मार्कंडेय पुराणात विश्वकर्मा व प्रजापती मानलेले आहे. भागवत पुराणात सूर्याचे रूप मानलेले आहे. (भा.सं.को.खंड ४,१९९४ : २४२)

### ३.१० मत्स्य, कूर्म व वराह ही ब्रह्मदेवाचीच रूपे

मत्स्य, कूर्म व वराह हे अवतार असे आहेत, जे प्राचीन साहित्यात ब्रह्मदेवाशी संबंधित असलेले दिसतात, परंतु नंतर त्यांचा विष्णूशी संबंध जोडला गेला. या संबंधी महाभारत (वन पर्व अध्याय १८७) मध्ये एक कथा दिसते ती पुढीलप्रमाणे: चीरिणी नदीच्या काठावर स्वायंभुव मनु स्नान करत असताना त्याच्या हातात एक छोटा मासा आला. अतिशय केविलवाण्या स्वरात तो म्हणाला रक्षण करा. मग मनने्ु त्याला कमंडलूमध्ये ठेवले. परंतु तो अतिशय वेगाने वाढत जातो. मग अनुक्रमे घट, तलाव व नदी सुद्धा त्याला अपुरे पडू लागले. शेवटी मनुने त्याला समुद्रात सोडून दिले. त्यावेळेस तो मासा त्याला म्हणाला की आता लवकरच प्रलय येणार आहे. त्यामुळे ठराविक दिवशी नावेसह औषधे, अन्न व सप्तर्षींसह तयार राहा आणि पुढे म्हणाला की, ''मी एकशिंगी माशाच्या रुपात येईन व तुम्हाला सुरक्षित ठिकाणी घेऊन जाईन.'' पुढे माशाने सांगितल्या प्रमाणेच घडले. समुद्र आपली मर्यादा सोडून पृथ्वीवर पसरला. मनुची नाव त्यात तरंगू लागली. मनुने मत्स्याचे स्मरण केले. मासा आला. मनुने आपली नाव दोरीने त्याच्या शिंगाला बांधली आणि मत्स्य त्या नावेला हिमालयात घेऊन गेला आणि नाव एका पर्वताला दोरीने बांधली. मग मत्स्य आपला परिचय देताना म्हणाला की, ''मी ब्रह्मा नावाचा प्रजापती आहे. माझ्याहून श्रेष्ठ कोणीच नाही. मत्स्य रूपात येऊन मी तुमचे रक्षण केले आहे कारण मनुच आता या प्रलयानंतर सृष्टीची रचना करेल. तपश्चर्येमुळे मनुची प्रतिभा विकसित होईल आणि प्रजेची सृष्टी करण्याच्या वेळी त्याची बुद्धी सदैव जागरूक राहील.'' (राशिवडेकर, १९०४ : २३०) याठिकाणी या कथेत विष्णूला अजिबात स्थान नाही. परंतु मत्स्य पुराणात (१/१४–१६) मध्ये हीच कथा हे मत्स्यरूप विष्णूचे असल्याचे सांगते. पण ब्रह्मदेवाचा संबंध पूर्णपणे तोडलेला नसून कथेच्या सुरुवातीला मनने्ु ब्रह्मदेवाला संतुष्ट करवून त्याच्या कडून वर मागीतला की, ''प्रलयकाळी मला विश्वाचे रक्षण करण्याचे सामर्थ्य द्या.'' मग ब्रह्मदेवाने त्याला वर दिला आणि कार्यसिद्धीसाठी विष्णूने मत्स्यरूपात अवतार घेतला. (शर्मा श्रीराम, २००० : ३५–३६)

**कूर्मावताराची कथा –** समुद्र मंथनाच्या वेळी मंथनाचा दंड म्हणून घेतलेला मंदार पर्वत समुद्राच्या तळाशी रुतून बसला तेव्हा विष्णूने कूर्मावतार घेऊन मंदार पर्वताला सांभाळून घेतले अशी आहे. या कथेचा प्रथम उल्लेख शतपथ ब्राह्मणामध्ये दिसतो. या ठिकाणी कासवाचे रूप घेऊन ब्रह्मदेवाने सृष्टीची रचना केली असे म्हटले आहे. कूर्माचे दुसरे नाव कश्यप असे आहे

म्हणूनच सर्व प्रजा ही कश्यपाची मुले या अर्थी काश्यप आहे असे म्हटले आहे. (Eggeling, Part 3, 1894 : 390)

**स यत् कूर्मो नाम । एतद्वै रूपं कृत्वा प्रजापतिः प्रजा असृजत् ।**

**यद करोत्, तस्मात् कूर्मः ।**

**कश्यपो वै कूर्मः । तस्मादाहुः सर्वाः प्रजा: काश्यप्य: ।**

**(शतपथ ब्राह्मण ७/५/१/५)**

आदिकाळात कूर्मच अस्तित्वात होता. कूर्माचे रूप घेऊन प्रजापतीने सृष्टीची निर्मिती केली होती. सृष्टीच्या आधी सर्वत्र जलच असल्याने प्रजापतीला पाण्यात विहार करण्या करिता कासवाचे रूप घेणे आवश्यकच होते. शतपथ ब्राह्मणामध्ये पुढील उल्लेख आढळतो.

**रसौ वै कूर्म: । यो वै एषांलोकानांअप्सु प्रविद्धानां ।**

**पाराङ्गरस: अत्यक्षरत्स एष कूर्म: । यावान्वै रस: तावानात्मा ।**

**स एष इम एव लोका: ।**

**(शतपथ ब्राह्मण ७/५/१/१)**

कूर्म हा त्रिलोकमय असल्याचे म्हटले आहे. कासवाचे शरीर टणक पृष्ठभागाने आवृत असते. कवचाचा वरील पृष्ठभाग आकाश सूचित करते कारण आकाशासारखे ते दोन्ही बाजूंनी खाली झुकलेले असते. तर खालील पृष्ठभाग पृथ्वीला सूचित करतो कारण तो समतल असतो. (Eggeling, Part 3, 1894 : 389)

वराह अवतारासंबंधी ऋग्वेदात १०व्या मंडळात (९९/६) मध्ये इंद्राने वराहाचा वध केला; त्याची छोटीशी कथा दिलेली आहे. यज्ञरूपी विष्णू देवांपासून लपून बसला. इंद्राला हे माहीत होते. इंद्र विष्णूकडे जाताच विष्णूने विचारले की. ''तू कोण आहेस?'' त्यावर इंद्राने परिचय दिला की, ''मी पर्वतांना व असुरांना नष्ट करणारा वीर आहे.'' मग विष्णू म्हणाला की, ''जर तू असुरहन्ता आहेस तर इथून एकवीस पर्वतांच्या मागे राहणाऱ्या त्या असुराला मारून टाक; ज्याने देवांचे धन चोरले आहे.'' मग इंद्राने त्याप्रमाणे केले व धन घेऊन विष्णूकडे परत आला आणि विष्णू देवांकडे गेला. (Griffith, 1896 : 476) ऋग्वेदातच आठव्या मंडळात (७/७/१/१)

मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख येतो. येथे इंद्राने दर्भाच्या सहाय्याने वराहाला मारून टाकले व विष्णूने त्या वराहाला यज्ञरूपात आणून देवांना भेट दिली असे म्हटलेले आहे. (Griffith, 1896 : 35) हीच कथा कृष्ण यजुर्वेद मैत्रायणी संहिता (३/८/१) मध्येही आहे. (सातवळेकर, १९४२ : २६८) शतपथ ब्राह्मण येथे मात्र थोडी बदललेली दिसते, इथे वराह असुर असला तरी लोककल्याणकारी, शक्तिमान आहे.त्याचा संबंध प्रजापतीशी जोडला आहे. त्याला पृथ्वीपती असे म्हटले आहे. शतपथ ब्राह्मणात असे म्हटले आहे की प्रथम पृथ्वीचे परिमाण प्रादेशमात्र होते. प्रादेशमात्र म्हणजे अंगठ्यापासून तर्जनीपर्यंतचे अंतर अंदाजे दहा बोटे. तिला एमुष नावाच्या वराहाने उचलले. हा वराह प्रजापतीचे रूप होता. प्रजापती म्हणजेच पृथ्वीपती असून यज्ञाचे अधिष्ठाता आहे. (Eggeling, Part 5, 1900 : 451)

**इयती वा इयमग्रे पृथ्वी आसीत्प्रादेशमात्री ।**

**ताम् एमुष इति नाम वराह उज्जघान ।**

**स अस्याः पतिः प्रजापतिः ।**

**(शतपथ ब्राह्मण १४/१/२/११)**

तसेच तैत्तिरीय संहितेत वराहरूपी प्रजापतीद्वारा पृथ्वीचा उद्धार झाल्याचे म्हटले आहे. सृष्टीच्या आधी सर्वत्र जलच होते. त्यावरून प्रजापती वायुरूपाने फिरत होते. त्यांनी जलामध्ये बुडलेली पृथ्वी पाहिली मग वराहाचे रूप घेऊन बुडणाऱ्या पृथ्वीला बाहेर काढले. मग विश्वकर्मा होऊन तिला पुसले आणि चपटी बनविले. चपटी करणे किंवा पसरट करणे यावरून तिचे नाव पृथ्वी पडले.(सातवळेकर, १९४५ : ३३९)

**आपो वा इदमग्रे सलिलमासित् । तस्मिन् प्रजापतिः वायुर्भूत्वा अचरत् ।**

**स इमामपश्यत् । तां वराहो भूत्वा अहरत् ।**

**तां विश्वकर्मा भूत्वा व्यमाट ।**

**सा अप्रथत । सा पृथ्वीव्यभवत ।**

**तत पृथिव्यै पृथिवीत्वम ।**

**(तैत्तिरीय संहिता ७/१/५)**

रामायणात देखील अयोध्याकांडात एक उल्लेख आढळतो.

**सर्वं सलिलमेवासित्पृथिवी यत्र निर्मिता ।**

**ततः समभवद्ब्रह्मा स्वयंभूर्दैवतैः सह ।**

**स वराहोस्ततो भूत्वा प्रोज्ज्हार । वसुन्धराम् ।**

**असृजच्च जगत्सर्वं सह पुत्रैः कृतात्मभिः ।।**

**(अयोध्याकांड सर्ग ११०, श्लोक ३–४)**

सृष्टीच्या निर्मिती विषयी माहिती देताना इथे असे म्हणले आहे की आरंभी सर्वत्र पाणीच पाणी होते; ह्या पाण्यातच पृथ्वी निर्माण झाली. त्यानंतर ब्रह्मदेव व बाकीच्या सर्व देव देवता निर्माण झाल्या. मग ब्रह्मदेवाने वराहाचे रूप घेऊन पृथ्वीला पाण्यातून बाहेर काढले आणि आपल्या मुलांच्या मदतीने सर्व जगाची निर्मिती केली. (शर्मा, १९२७ : १०५५) याच कथेचा वायु पुराणातील उल्लेख पुढील प्रमाणे आहे– प्रलयकाळी पृथ्वीवर जलाचे साम्राज्य होते. त्यावेळी सहस्त्रशीर, नेत्र, हात व पाय असणारे नारायण आदि पुरुष स्वयम्भू जलात झोपलेले होते. नार म्हणजे जलात असणारे म्हणून नारायण. कालरात्रीच्या अंती त्यांनी ब्रह्मदेवाचे रूप घेतले आणि वायूप्रमाणे लघुकाय होऊन फिरू लागले. पृथ्वीला जलात असलेले पाहून वराह रूप धारण केले. त्याचे शरीर दहा योजने लांब व शंभर योजने उंच होते. रंग निळ्या मेघाप्रमाणे तर आवाज मेघगर्जनेसारखा होता.शरीर महाकाय होते व दात पांढरे शुभ्र व टोकदार होते तर डोळे अग्नीप्रमाणे चमकणारे होते. प्रजापती ब्रह्माच सृष्टीरचनेसाठी पाण्यात बुडलेल्या पृथ्वीला स्वतः वराह रूप घेऊन उद्धार करताना सांगितले आहे; परंतु हे नारायण म्हणजे विष्णू नव्हे. (Tagare, 1927 : 42-44)

**आपो ह्यग्रे समभवन्नष्टेऽग्नौपृथिवीतले ।**

**सान्तरालैकलीनेऽस्मिन्नष्टे स्थावर जङ्गमे ।।**

**एकार्णवे तदा तस्मिन्न प्राज्ञायत किंचन ।**

**तदा स भगवान ब्रह्मा सहस्त्राक्ष: सहस्त्रपात ।**

**सहस्त्रशीर्षा पुरुषो रुक्मवर्णोऽ ह्यतींद्रिय: ।**

ब्रह्मा नारायणाख्य: स सुष्वाप सलिले तदा ।

सत्वोद्रेकात्प्रबुद्धस्तु शून्यं लोकमुदीक्ष्य स: ।

इमे चोदाहरन्त्यत्र श्लोकं नारायणं प्रति ।।

आपो नारा वै तनव इत्यपां नाम शुश्रुम ।

अप्सु शेते च यत्तस्मात्तेन नारायण: स्मृत: ।

ब्रह्मा तु सलिले तस्मिन विद्यायान्तर्गतां महीम ।

अनुमानाद संमूढो भूमेरूद्धरणं प्रति ।

अकरोत्स त नुं हन्यां कल्पादिषु यथा पुरा ।

ततो महात्मा मनसा दिव्यं रूपमचिन्तयत् ।।

सलिलेनाऽलुप्तां भूमिं दृष्टवा स तु समन्तत: ।

किं नु रूपं महत्कृत्वा उद्धरेयमहं महीम ।।

जलक्रीडासु रुचिरं वाराहं रूपमस्मरत् ।

अघृष्यं सर्वभूतानां वाङ्मयं धर्मसंज्ञितम् ।।

दश योजन विस्तीर्णं शतयोजनमुच्छ्रितम् ।

नीलमेघ प्रतीकाशं मेघस्तनितनिस्वनम् ।

विद्युदग्निप्रकाशाक्षमादित्यसमतेजसम् ।

रुपमास्थायं विपुलं वाराहमभितं हरि: ।

पृथिव्ययुद्धरणार्थाय प्रविवेश रसातलं ।

**(वायु पुराण ६/१–१५)**

मनुस्मृतीमध्ये देखील (१/९–१०) नारायण म्हणजे ब्रह्मा असल्याचे म्हटले आहे. (प्रभू, २००३ : २८) तर विष्णु पुराणात सुद्धा (१/४/१) मध्ये असेच म्हणले आहे. येथे नारायण हे ब्रह्मदेवाचेच विशेषण असून वराहरुपी ब्रह्माच पृथ्वीला धारण करतो असे म्हटले आहे. (Wilson, 1895 : 6) लिंग पुराणात अत्यंत स्पष्टपणे प्रलय जलामध्ये निद्रिस्त असल्या कारणाने नारायण म्हटले आहे स्वयंभू ब्रह्मदेवाचे विशेषण सांगितले आहे. त्यांच्याच कडून वराहरूपात पृथ्वीचा

उद्धार झाल्याचे सांगितले आहे आणि वराहरूपाचा विष्णूशी काहीच संबंध दाखवलेला नाही. (Deshpande, 1988 : 18)

**रात्रौ चैकार्णवे ब्रह्मा नष्टे स्थावरजंगमे ।**

**सुष्वापाम्भसि यस्तस्मान्नारायण इति स्मृत: ।।**

**शर्वर्यते प्रबुद्धो वै दृष्ट्वा शून्य चराचरम् ।**

**स्त्रष्टुं तदा मतिं चक्रे ब्रह्मा ब्रह्मविदा वर ।।**

**उदकैराप्लुता क्ष्मा ता समादाय सनातन: ।**

**पूर्ववत्स्थापयामास वाराह रुपमास्थित: ।।**

**(लिंग पुराण १/४/५९-६१)**

पद्मपुराण सृष्टी खंड अध्याय ३, श्लोक २५ ते २९ मध्येही वराहरूपी ब्रह्माच असल्याचे म्हटले आहे. परंतु ह्या कथेची प्रवृत्ती थोडी थोडी विष्णूकडे जाणारी दिसते. येथे म्हटले आहे की महारात्रीतून निद्रेतून उठल्यानंतर सत्त्वगुणी उद्रेकाने युक्त (सत्त्वगुण हे विष्णूचे विशेषण तर रजोगुण हे ब्रह्मदेवाचे) ब्रह्मदेवाने संपूर्ण पृथ्वीला पाण्यात बुडलेली पाहून थोडा वेळ विचार करून यज्ञवराहाचे रूप घेऊन पाण्यात प्रविष्ट झाले. (Deshpande, 2014 : 6)

महाभारतात वराह अवताराचा दोन ठिकाणी उल्लेख आहे. (वनपर्व अ.१४२/४५-४७) (राशिवडेकर,१९०४ : ३४४-३४६) शांतिपर्व (२०९/१६-३०) (राशिवडेकर,१९०४ : ४४०) येथे नारायण हा शब्द सृष्टीच्या आधी स्वत: उत्पन्न होणाऱ्या ब्रह्मदेवाचे विशेषण म्हणून वापरलेला आहे. जगाचे मूळ पुरुष, आदि पुरुष याच अर्थाने आहे. परंतु विष्णूशी देखील जोडलेला आहे. नारायण हिरण्यांडामध्ये प्रवेशले आणि त्यातून विश्वाची निर्मिती झाली. प्रवेश करणे यावरून त्या परमपुरुष नारायणाला विष्णू असे म्हणतात. नारायण ह्या शब्दाचा आणखी एक अर्थ नरोत्तम असाही आहे. यामुळे तो विष्णूच्या पुरुषोत्तम ह्या शब्दाचा समानार्थी शब्द झालेला आहे. शतपथ ब्राह्मण वराहरूपी प्रजापतीला पृथ्वीपती म्हणते तर सकाळी उठल्यावर म्हटल्या जाणाऱ्या प्रचलित श्लोकात पृथ्वीला विष्णूपत्नी म्हटले आहे.

या सगळ्या श्लोकांवर नजर टाकल्यास असे लक्षात येते की विष्णु पुराणकर्त्यांनी वर उल्लेखिलेली ब्रह्मदेवाशी संबंधित कथा विष्णूशी जोडलेली आहे. सुरुवातीला नारायणाचा उल्लेख जगाचा स्रष्टा, प्रजापती, ब्रह्मा म्हटले आहे आणि नंतर ब्रह्मस्वरूप, सतत्वोद्रिक्त, स्थिरात्मा ही विष्णूची विशेषणे लावली आहेत. पृथ्वी तसेच योगीजनांद्वारे या महावराहाची विष्णूच्या रूपात स्तुती केली आहे आणि पुन्हा विष्णु पुराणात पृथ्वी कृष्णाला म्हणते की आपणच वराह रूपात माझा उद्धार केला होतात. (Dutt, 1896 : 392)

**यदाहमुद्धृता नाथ त्वया सूकरमूर्तिन्त ।**

**(विष्णु पुराण ५/२९/२३)**

पुष्करक्षेत्रात सांगितल्या जाणाऱ्या काही कथांमध्ये ही विष्णूचा वराह अवतार पुष्करमध्ये ब्रह्मदेवाच्या नाकपुडीतून झाला असल्याची एक कथा सांगितली जाते. अशा रीतीने हे तीनही अवतार प्रथमतः ब्रह्मदेवाशी संबंधित होते आणि नंतर त्यांना विष्णूशी जोडण्यात आले असे म्हणता येऊ शकते. यात वैष्णव संप्रदायाचा वाढत असलेला प्रभाव देखील काही अंशी कारणीभूत असावा. नारायण या नामसाधर्म्यामुळे व नंतर अधिक विकास पावलेल्या वैष्णव पंथीयांनी हे विष्णूला जोडल्याचे दिसते. ऋग्वेदातील कथेचा विष्णूशी असलेला संबंध व समुद्र मंथनाचाही विष्णूशी संबंध पाहता असे झाले असण्याचा संभव आहे.

### ३.११ पितामह ब्रह्मा

ब्रह्मा हा देव, दानव आणि मनुष्य यांचा पिता असल्यामुळे त्याला पितामह म्हणतात. देव आणि दानव यांच्यात कायमच एकमेकांच्या पुढे जाण्यासाठी चढाओढ चालू असते. जवळपास सर्वच ग्रंथांमध्ये असुर ब्रह्मदेवाचा सन्मान करतात आणि कामनापूर्तीसाठी त्याला प्रसन्न करून घेतात असा उल्लेख येतो. रामायणात बाल कांड (११८/३२) मध्ये देव व दानव हे दोन्ही ब्रह्मदेवाचीच मुले असून देवांमुळे ते अधिक प्रसन्न असतात असे म्हटलेले आहे. (शर्मा, १९२७ : १४६) रामायणात रावणाला देखील ब्रह्मदेवाने वर दिलेला होता. तसेच कुंभकर्ण आणि बिभीषणाला सुद्धा त्याने वर दिल्याचे उत्तरकांड सर्ग १० मध्ये म्हटले आहे. (शर्मा,१९२७ : ९१-१०१) तसेच या तीनही भावंडांना वर दिल्याचा महाभारत वनपर्व (२७५/१६-२५) येथे उल्लेख आढळतो. (राशिवडेकर,१९०४ : ५५३) हिरण्यकशिपू यानेही ब्रह्मदेवाला संतुष्ट

करण्यासाठी केलेल्या तपश्चर्येचे भागवतात (स्कन्ध ७, अ. ३) वर्णन आहे. इथे असे म्हटलेले आहे की त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न करण्यासाठी इतकी घोर, उग्र तपस्या केली की मुंग्यांनी त्याचे रक्त, मांस, त्वचा सर्व काही पोखरले होते आणि फक्त हाडेच शिल्लक राहिली. (Prabhupada, 1976 : 132-137) मग ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर प्रथम त्यांनी आपल्या कमंडलूमधील पाणी हिरण्यकशिपूवर शिंपडले त्यामुळे हिरण्यकशिपू बरा झला आणि मग ब्रह्मदेवाने त्याला वर दिला.

महाभारतातच आदि पर्व (२०९/१७–२५) मध्ये सुंद व उपसुंद या दैत्यांना वर दिल्याचे म्हटले आहे. (राशिवडेकर,१९०४ : ४१२) तर पद्म पुराण सृष्टी खंड अध्याय २५ मध्ये वाष्कली नावाचा दैत्य ब्रह्मदेवाच्या वरदानामुळे अत्यंत पराक्रमी होतो असे म्हटले आहे. (Deshpande, 1988 : 53)

पद्म पुराण सृष्टी खंड (१६/४१–४३) मध्ये उल्लेख आहे की ब्रह्मदेवाने एका विशाल यज्ञाचा आरंभ केला आणि देव व ऋषी यांबरोबरच राहू, वृत्र, शम्बर, वातापि, केशी, नमुची, आणि बली इत्यादी असुरांना सुद्धा निमंत्रण दिले. या यज्ञाच्या ठिकाणी येऊन दानव ब्रह्मदेवाचे अभिनंदन करताना म्हणतात, ''भगवान आपणच आमची सृष्टी आहात. तुम्हीच आम्हाला त्रिलोकाचे राज्य दिले आहे. तुमच्यामुळेच आम्ही देवांपेक्षा जास्त बलवान आहोत. आम्ही स्वतः आमचे निर्णय घेण्यास आणि कर्तव्य करण्यास समर्थ आहोत. अदितीच्या गर्भातून उत्पन्न झालेल्या या बिचाऱ्या देवांच्या हातून तुमच्यासाठी काय होणार? आपण आज्ञा करावी आम्ही आपल्यासाठी काय करू?'' (Deshpande, 1988 : 188-189)

ब्राह्मणग्रंथांमध्ये तर प्रजापतीला दोघांच्या वादामध्ये निर्णय करण्यासाठी अंतिम प्रमाण मानले आहे. शतपथ ब्राह्मणात (१/४/५/८–११) येथे मन आणि वाणी (वाक्) यांच्यातील भांडणाचा उल्लेख आहे. त्यांच्यात श्रेष्ठत्वावरून भांडण झाले. मग दोघेही प्रजापतीकडे गेले तेव्हा प्रजापतीने असे सांगितले की मन हेच श्रेष्ठ आहे कारण वाणीमधून तेच बाहेर येते; जे मनाने चिंतिलेले असते. (Eggeling, Part 1, 1882 : 130) याशिवाय जेव्हा जेव्हा काही संकट येते किंवा युद्धाची चाहूल लागते तेव्हा तेव्हा ब्रह्मदेव शांतता प्रस्थापित करण्यासाठी, लोककल्याणासाठी त्या ठिकाणी पोचतो. दक्ष यज्ञाचा विध्वंस आणि क्रोधित झालेले शिव पाहून सर्वांबरोबर ब्रह्मदेवही तिथे पोहोचला आणि त्याने शिवाला शांत केले. (Deshpande, 1988 : 45-46) मत्स्यपुराणातील

अध्याय २३ मधे आलेली कथा पुढील प्रमाणे, चंद्राद्वारे बृहस्पतीची पत्नी तारा पळविली जाते; युद्ध होणार अशी शंका येताच ब्रह्मदेव तिथे जाऊन दोन्ही पक्षात समेट घडवून आणला. (Basu, 1916 : 211) दोन पक्षात समेट घडवून आणणे किंवा क्रोधित व्यक्तीला शांत करणे यात ब्रह्मदेवाचे चातुर्य वर्णन केलेले आहे. जेव्हा जेव्हा मनुष्य किंवा देवांवर संकट येते त्यावेळी सर्वप्रथम ते ब्रह्मदेवाकडे मदत मागायला येतात. भागवतात स्कंध ४ अध्याय १९ मध्ये पृथु राजाच्या १००व्या अश्वमेध यज्ञाचा घोडा इंद्राने पळविला; त्यावेळी संतापलेला पृथु राजा इंद्राशी युद्ध करायला निघणार तोच तिथे ब्रह्मदेव आला आणि त्याने पृथुला समजाविले की, ''तू सुद्धा भगवान विष्णूचा अंश आहेस आणि इंद्रादी देव सुद्धा त्यांचाच अंश आहेत; त्यामुळे तू तुझ्यावरच रागावला आहेस किंवा तू तुझ्याशीच युद्ध करणार आहेस.'' अशा चतुराईने ब्रह्मदेव हे युद्ध टाळण्यात यशस्वी झाल्याचे म्हटले आहे. (Prabhupada, 1972 : 273) पद्म पुराणातही अध्याय २५ येथे वाष्कली दैत्यामुळे त्रासलेले देव ब्रह्माकडे येऊन यावर उपाय करा अशी विनंती करतात असे म्हटले आहे. (जोशी, १९८१ : ९१) रामायणात देखील बालकांड अध्याय १५ मध्ये रावणामुळे त्रस्त झालेले देव ब्रह्मदेवालाच उपाय विचारतात असा उल्लेख आहे. (शर्मा, १९२७ : १२०–१२१) महाभारतात सुद्धा आदि पर्व अध्याय २१० मध्ये सुंद व उपसुंद या दैत्यांमुळे त्रासलेले देव ब्रह्मदेवाला शरण येतात असे दिले आहे. (राशिवडेकर,१९०४ : ४१०) त्याच प्रमाणे ऐतरेय ब्राह्मणात चतुर्थ पंचिका श्लोक (४/६/८) प्रजापती आपल्या उपवर कन्येचा म्हणजे सूर्येचा विवाह सोमराजाशी करण्याचे योजतो, वास्तविक ती कन्या प्रजापतीची नसून सवित्याची असते आणि सवित्याने तिचा सांभाळ करण्यासाठी प्रजापतीकडे दिलेली असते. प्रजापतीने स्वतःच्या मुलीप्रमाणेच तिचे संगोपन केले. प्रजापती आपल्या कन्येचे लग्न सोमराजाशी लावून देणार असल्याचे समजताच सर्व देवांमध्ये ती आपल्याला मिळावी ह्यासाठी चढाओढ सुरू झाली. मग योग्य वराशी तिचा विवाह व्हावा यासाठी ब्रह्मदेव ''जो सहस्रऋचा असलेले अश्विन अस्त्र संपादन करेल त्याच्याशी सूर्येचा विवाह होईल'' असा पण ठेवला. (बापट, १९३० : १८८)

आपल्या पित्याप्रमाणे हितचिंतक म्हणून व्यक्तिगत समस्या घेऊन त्याच्यावर उपाय विचारण्यासाठी ब्रह्मदेवाकडे गेल्याचे दिसते. महाभारतात आदि पर्व अध्याय २२२ मध्ये खूप दिवस घृतपान केल्याने अजीर्ण झालेले अग्नी देव रोगमुक्तीसाठी ब्रह्मदेवाकडे गेला असा उल्लेख आहे. (राशिवडेकर, १९०४ : ४३९) या प्रमाणेच रामायणात बाल कांड (२/२३/३१–३२)

मध्ये वाल्मीकींच्या तोंडून मंत्र येताच ब्रह्मदेव तत्काळ तेथे प्रकट होऊन त्यांना रामायणाची रचना करण्याचा आग्रह करतात असे म्हटले आहे. (शर्मा, १९२७ : ३१)

पद्म पुराणामध्ये आणखी एक कथा आहे. (जोशी, १९८१ : २५३) मृकुंडू मुनी आणि त्यांची पत्नी वनात राहत असत. मुनी तपस्या आचरण करीत असत. वनात असताना त्यांना एक मुलगा झाला. एकदा हा पुत्र अंगणात खेळत असताना कोण्या एका सिद्ध पुरुषाने त्याच्याकडे बघितलं; ते पाहून मृकुंडू मुनींनी त्या सिद्ध पुरुषाला विचारले की माझ्या मुलाचे आयुष्य किती आहे?'' त्या मुनिश्वराने सांगितले की तुमच्या मुलास आणखी फक्त सहा महिनेच आयुष्य आहे. मी सत्य वचन करत आहे. हे ऐकून मृकुंडू ऋषींनी त्यांच्या मुलाची मुंज केली व त्याला सांगितले की, '' जे कोणी ऋषी, मुनी, महात्मे तुला येथून जाताना दिसतील त्या सर्वांना तू नमस्कार कर.'' त्या प्रमाणे तो मुलगा कोणी सिद्ध पुरुष, ऋषी, मुनी दिसल्यास त्यांना नमस्कार करत असे. एके दिवशी सप्तर्षी तेथून चालले असता त्या मुलाने त्यांनाही नमस्कार केला. सप्तर्षींनी त्याला आयुष्यमान भव असा आशीर्वाद दिला. नंतर त्यांना समजले की ह्या मुलाचे आयुष्य फक्त पाचच दिवस शिल्लक आहे. ते त्या मुलाला घेऊन ब्रह्मदेवाकडे आले. सप्तर्षी आणि तो मुलगा; दोघांनीही ब्रह्मदेवास नमस्कार केला. ब्रह्मदेवाने सप्तर्षींना येण्याचे प्रयोजन विचारले तेव्हा झाला वृत्तांत त्यांनी सांगितला आणि अनवधानाने आपल्याकडून असे घडल्याचे सांगितले. त्यावर ब्रह्मदेव म्हणाला की, ''आत्ताच मी त्याला दीर्घायुषी भव असा आशीर्वाद दिला आहे; तेव्हा हा मुलगा आता दीर्घायुषी झाला आहे. हा मृकुंडू ऋषींचा पुत्र आहे आणि माझ्याकडून मिळालेल्या आशीर्वादामुळे तो आता दीर्घायुषी होऊन मार्कंडेय ह्या नावाने प्रसिद्ध होईल. हा माझ्या प्रमाणेच होणार असून कल्पाच्या आदि आणि अंतापर्यंत जिवंत राहील.'' मार्कंडेय ऋषींनी घडलेली हकीकत मृकुंडू ऋषींना सांगितली व ब्रह्मदेवामुळे आपल्याला आयुष्य प्राप्त झाले असल्याने आपण पुष्करतीर्थास जाऊन तप करणार असल्याचे सांगितले व त्या प्रमाणे तो निघून गेला.

या सर्व कथा बघता ब्रह्मदेव हा एक अतिशय महत्त्वाचा देव असल्याचे दिसत आहे. निरनिराळ्या विद्या, अस्त्रे तसेच वर प्राप्त करून घेण्यासाठी त्याची उपासना होताना दिसते. वेद, ब्राह्मणे, पुराणे, रामायण, महाभारत अशा सर्व ग्रंथांमधून त्याचे स्थान किती महत्त्वाचे होते

हे आपण बघितले. अनेक संदर्भ याकरिता अभ्यासण्यात आलेले आहेत. त्यावरून पौराणिक कालखंडापर्यंत ब्रह्मा हा एक महत्त्वाचा देव होता असे निश्चितपणे म्हणता येईल.

### ३.१२ परब्रह्म आणि ब्रह्मा

वेदान्तामध्ये परब्रह्म म्हणजेच सच्चिदानंद स्वरूप असल्याचे म्हणले आहे. परब्रह्म हेच सच्चिदानंद  स्वरूप तर आत्मा म्हणजेच ब्रह्म आहे.

**चिदानंदमयब्रह्मप्रतिबिम्बसमन्विता ।**

**तमोरज:सत्त्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा ।।**

**(पंचदशी १/१५)**

पंचदशीमध्ये म्हटले आहे की चिदानंदस्वरूप ब्रह्माच्या प्रतिबिंबाने युक्त तम, रज, सत्त्व गुणाची एक वस्तु जिला प्रकृती म्हणतात; ती दोन प्रकारची आहे.(जोग,१९५१ : १२)

**गुहाहितं ब्रह्म यत्तत् पञ्चकोशविवेकत: ।**

**बोद्धुं शक्यं तत: कोशपञ्चकं प्रविविच्यते ।।**

**पंचदशी (३/१)**

येथे गुहा म्हणजे पंचकोश. गुहेमध्ये लपलेल्या ब्रह्मतत्त्वाचे ज्ञान पंचकोश विवेकाने देखील होऊ शकते. ह्या श्रुतिमध्ये गुहेमधील ब्रह्माबद्दल सांगितले आहे. देहाच्या आत प्राण असतो, प्राणाच्या आत मन, मनाच्या आत बुद्धी, बुद्धीच्या आत विज्ञान आणि विज्ञानाच्या आत आनंद. ही परंपरा म्हणजे एक गुहाच असून यातच दडलेल्या ब्रह्माचे ज्ञान पंचकोश विवेकानेच होऊ शकते. (बापट, १९०४ : १५०) उपनिषदांमधील चार वाक्य ज्यांना महावाक्य म्हणतात त्यामध्ये असाच अर्थ अभिप्रेत आहे.

**प्रज्ञानं ब्रह्म । ऐतरेय उपनिषद ३/१/३**

**अहं ब्रह्मास्मि । बृहदारण्यक उपनिषद १/४/१०**

**तत्त्वमसि । छांदोग्य उपनिषद ६/८/७**

**अयमात्मा ब्रह्म । बृहदारण्यक उपनिषद २/५/१९**

ही ती चार महावाक्ये आहेत. यातील 'प्रज्ञानं ब्रह्म' या वाक्याचा अर्थ डोळे, कान, नाक, त्वचा व जीभ या पंचेन्द्रियांना पदार्थाची वेगवेगळी वृत्ती ज्या सूचनांमुळे होते त्याला प्रज्ञान म्हटलेले आहे. (जालान, १९३९ : ९७)

'अहं ब्रह्मास्मि' याचा अर्थ ज्या शक्तीमुळे चराचरात सर्वत्र एक चैतन्य व्यापलेले असते; ज्यामुळेच विश्वाचा जन्म वा ऱ्हास होत असतो; त्यालाच ब्रह्म म्हणतात. सर्व चराचरात व्यापून असलेले ते तत्त्व परमात्म्याच्या रूपात माझ्याही देहात आहे म्हणूनच मी सुद्धा त्याचाच भाग असल्याने मी सुद्धा ब्रह्मच आहे. (Madhavananda, 1950 : 145) तर 'तत्त्वमसि' यामध्ये तत्, त्वम् आणि असि अशी त्याची फोड आहे. सृष्टीच्या आधी कुठलाही भेद नसलेले नाव व रूप नसलेले तसेच सृष्टीनिर्मिती नंतरही विकार न पावलेले असे जे ब्रह्म आहे ते म्हणजे तूच आहेस असे येथे म्हटलेले आहे. (सिंह, १९१७ : ६८६)

'अयमात्मा ब्रह्म' याचा अर्थ जे तत्त्व स्वयंप्रकाशी व प्रत्यक्ष आहे तेच आत्म्याच्या ठायी आहे आणि तेच ब्रह्म आहे. जो निर्मिती करतो त्याला धारण करतो, पोषण व संचालन करतो आणि प्रलयानंतर संपूर्ण विश्वाला आपल्यातच सामावून घेतो तो परमात्मा असे समजावे. (Madhavananda, 1950 : 402) ब्रह्मसूत्र (१/१/२) यामध्ये हाच भाव आहे की देव, दैत्य, मानव, पशुपक्षी इत्यादी जीव तसेच सूर्य, चंद्र, ग्रह, तारे यांनी संपन्न अशा ब्रह्मांडाचा नक्कीच कोणीतरी कर्ता करविता आहे, तेच ब्रह्म आहे. त्यालाच परमेश्वर, परमात्मा, भगवान अशी नावे आहेत आणि यालाच अभोक्ता, असंग, अव्यक्त, अचिंत्य, निर्गुण असे म्हटलेले आहे. ब्रह्माने स्वतःच स्वतःची निर्मिती केली म्हणूनच ब्रह्म हे स्वयंभू आहे. ते सत्य, ज्ञानस्वरूप व अनंत आहे, ते आकाशस्वरूप असूनसुद्धा सर्वांच्या हृदयात आहे त्यामुळे ब्रह्म म्हणजेच प्राण आहे. (गोयंदका, १९५२ : १–२) ब्रह्मसूत्र (१/२/१) मध्ये तर हे संपूर्ण चराचर विश्व म्हणजेच ब्रह्म आहे कारण त्यातूनच ते निर्माण झाले आहे व अंतकाली त्याच्यातच ते विलीन होणार आहे. हा उपास्य देव मनोमय, प्राणरूप शरीराचा, प्रकाशस्वरूप, आकाशाप्रमाणे सर्व व्यापक, जगद्कर्ता असा आहे. स्वर्ग व पृथ्वी यांच्यामधील लोक यांचा आधार म्हणजेच ब्रह्म होय. (गोयंदका, १९५२ : २२–२३) मुंडकोपनिषदात (२/२/४) येथे म्हटले आहे की प्राण हा धनुष्यासारखा असून जीवात्मा हा बाणासारखा आहे आणि त्याचे लक्ष्य म्हणजेच ब्रह्म. सावध मनुष्याने ते लक्ष्य

भेदावे आणि बाणाप्रमाणे त्यातच तन्मय होऊन जावे. (Sharvananda, 1920 : 42-43) उपनिषद साहित्यात परब्रह्म हेच जगद्निर्मितीचे कारण मानलेले आहे. अचिंत्य शक्तींनी संपन्न परमेश्वराने नुसता संकल्प केला आणि जड व चेतन सृष्टीची निर्मिती झाली. सृष्टीच्या प्रारंभी ब्रह्मापासून आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी या क्रमाने निर्मिती झाली आणि ह्या सर्वांचा लय होताना सुद्धा बरोबर ह्याच्या उलट क्रमाने होत असतो. पृथ्वी पाण्यात लय पावते, जल अग्नीमध्ये, अग्नी वायू मध्ये आणि वायू आकाशात तर आकाश परमात्म्यात विलीन होत असते.

छांदोग्य उपनिषद (५/१/६ ते १२) मध्ये एक कथा आहे; त्यातही प्राणाचे महत्त्व स्पष्ट केले दिसते. एकदा सर्व इंद्रियांमध्ये भांडणे सुरू झाली. कोण श्रेष्ठ असा वाद निर्माण झाला. शेवटी न्याय करण्यासाठी ते सर्व प्रजापतीकडे गेले. सर्वांनी मिळून प्रजापतीलाच विचारले की आमच्यात श्रेष्ठ कोण ते सांगा. त्यावर प्रजापतीने सांगितले की तुमच्यापैकी कोणाच्या नसण्याने शरीर प्रेतामध्ये बदलेल? हे ऐकताच वाणी बाहेर पडली. मग त्यानंतर डोळे, मग कान याप्रमाणे एक एक इंद्रिय बाहेर पडत गेले तरी शरीराचे काम चालूच होते. मग प्राण बाहेर पडू लागला आणि मनासह सर्व शरीराची हालचाल थांबली. मग सर्व इंद्रिये प्राणाला म्हणाली की तूच आमच्यात श्रेष्ठ आहेस. येथेही हेच दिसून येते की सर्व शरीर प्राणाच्या अंमलाखाली आहे. प्राण म्हणजेच ब्रह्म असल्याकारणाने तोच सर्व व्यापक आहे. इंद्रियांमुळे विषयांचे ज्ञान होत असले तरी प्राण हा इंद्रियांना धारण करतो आणि शरीरामध्ये पाच प्रकारात तो विहरत असतो. प्राण, अपान, व्यान, समान आणि उदान अशी त्याची रुपे आहेत. (झा, १९४२ : २२२–२२५)

ब्रह्मसूत्राचा तिसरा अध्याय साधनाध्याय किंवा उपासनाध्याय असे म्हणतात. या ठिकाणी (३/२/१५–१८) असे वर्णन आहे; परम दयाळू, सर्वशक्तिमान अशा परब्रह्माचे आश्रित होऊन त्याचे भजन व ध्यान करावे व जन्म आणि मृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्ती मिळवण्यासाठी त्याची प्रार्थना करा असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे अग्नी व विद्युत ही दोन्ही अग्नीचीच रुपे आहेत. एक प्रकट आहे तर दुसरे अप्रकट. त्याप्रमाणे ब्रह्म सुद्धा सगुण आणि निर्गुण आहे. परब्रह्माच्या ह्या सगुण रुपाचे वर्णन करताना सांगितले आहे की जो मला पुरुषोत्तम जाणतो तो सर्वकाही जाणतो. (गोयंदका,१९५२ : २३७–२४०)

ब्रह्मविद्या या संदर्भात छांदोग्य उपनिषद (८/१/१) येथे दहर विद्या व प्राजापत्य विद्या अशा दोन प्रकारच्या ब्रह्मविद्या सांगितल्या आहेत. या दोन्ही विद्या म्हणजेच परब्रह्म परमात्म्याच्या प्राप्तीचा मार्ग असल्याचे म्हटले आहे. दहर विद्येमध्ये आंतराकाशालाच परब्रह्म मानलेले असून ते सर्व पापे व विकारांपासून अलिप्त असल्याचे म्हटलेले आहे. तसेच प्राजापत्य विद्येमध्ये ह्या जाणून घेण्यायोग्य तत्त्वाला आत्मा असे म्हटले असून तेही सर्व पापे व विकारांपासून अलिप्त असून ते संकल्प, सत्यकामत्त्व ह्या द्विगुणांनी युक्त असे परब्रह्मच आहे. (सिंह, १९१७ : ८४८)

या दोन विद्यांमध्ये फक्त वर्णनात्मक फरक आहे परंतु दोन्हीचे उद्देश्य, विधेय व फळ सारखेच आहे. ब्रह्मविद्येचे फळ म्हणजेच ब्रह्मलोकाची प्राप्ती. देवयान मार्गानेच ती होऊ शकते. या विद्येप्रमाणे उपासना करणारे याच मार्गाने जातात. छांदोग्य उपनिषदात (८/७/३–४) एक कथा आहे. त्या कथेप्रमाणे इंद्र व विरोचन ब्रह्मदेवाकडे ब्रह्मविद्या शिकायला गेले. कारण ब्रह्मदेवानेच त्यांना सांगितलेले असते की जो परमात्म्याला समजू शकतो; तो सर्व लोक व भोग प्राप्त करू शकतो. त्याप्रमाणे विरोचन ती विद्या ग्रहण करू शकला नाही परंतु इंद्राने मात्र ही विद्या मिळविली. सद्विद्या, भूम विद्या, दहर विद्या, उपकोसल विद्या, शांडिल्य विद्या, वैश्वानर विद्या, आनंदमय विद्या, अक्षर विद्या अशा वेगवेगळ्या विद्या असल्या तरीही सगळ्यांचे ध्येय ब्रह्माची प्राप्ती हेच आहे. जो ब्रह्मविद्या ग्रहण करतो त्याची कर्मे इथेच नष्ट होतात. विद्येच्या बळावरच त्याला ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. ब्रह्मलोकी जाण्याचा मार्ग सुरू होण्याआधी पर्यंत विद्वान व अविद्वान दोन्ही सारख्याच गतीचे असतात; मग अविद्वान त्याच्या कर्मानुसार संसारात पुन्हा नवीन शरीर धारण करतो तर ज्ञानी मनुष्य ज्ञानाने प्रकाशित मोक्ष नाडीच्या द्वारे सूर्यलोकी जातो व तिथून ब्रह्मलोकी जातो. या मार्गालाच अर्चिमार्ग, उत्तरायणमार्ग किंवा देवयानमार्ग असे म्हटलेले आहे. (गोयंदका,१९५२ : ३६१) ह्या मार्गाचे वर्णन करताना छांदोग्य उपनिषदात (४/१५/५) मध्ये असे म्हटले आहे की ब्रह्मविद्येचे महत्त्व जाणणारा जो वनात राहून श्रद्धेने सत्याची उपासना करतो तो अर्चि म्हणजेच ज्योती, अग्नी किंवा सूर्यकिरण यांना प्राप्त करतो. अर्चिकडून दिवस, दिवसाकडून शुक्ल पक्ष, शुक्ल पक्षाकडून उत्तरायणाचे सहा महिने, सहा महिन्यांकडून संवत्सर, संवत्सराकडून सूर्य, सूर्याकडून चंद्र, चंद्राकडून विद्युत आणि तिथून पुढे एक अमानव पुरुष त्याला ब्रह्माकडे घेऊन जातो. हा ब्रह्मलोक शोकरहित असतो. तिथे तो अनंतकाळपर्यंत राहतो आणि ब्रह्मातच विलीन होतो. कौषितकी उपनिषद (१/३) मध्ये आधी अग्निलोक, वायुलोक,

वरुणलोक, इंद्रलोक, प्रजापतीलोक आणि मग ब्रह्मलोक असा प्रवास सांगितला आहे. ह्या सर्व लोकांचे स्वामी हे मानवाकृती पुरुष आहेत आणि ब्रह्मलोकी जाणाऱ्याला एका स्थानाकडून दुसऱ्या स्थानाकडे घेऊन जाणे हे त्यांचे काम आहे. (Cowell, 1968 : 147) ब्रह्मविद्येचे महत्त्व सांगताना श्रीकृष्णाने तिला राजविद्या आणि राजगुह्य असे म्हटले आहे. मुंडकोपनिषद (१/१/१) मध्ये ब्रह्मविद्या ही सर्व विद्यांची प्रतिष्ठा आहे असे सांगितले आहे. (Sharvananda, 1920 : 3) मुंडकोपनिषदातच (३/२/६) मध्ये जो वेदांचे ज्ञान दान करतो, परमेश्वराला शरण जातो त्याला ब्रह्म समजते. ज्यावेळी प्रलय होतो त्यावेळी ब्रह्मलोकाचा सुद्धा नाश होतो ब्रह्मलोकाचा स्वामी असलेले ब्रह्म व तिथे असलेले ब्रह्मविद्येचे उपासक सुद्धा अंत पावून परब्रह्मातच विलीन होतात असे म्हटलेले आहे. (Sharvananda, 1920 : 67) ब्रह्मविद्या अवगत करायला सूक्ष्म व प्रखर अशी बुद्धिमत्ता आवश्यक आहे. निर्गुण निराकार ब्रह्म जाणून घेणे ही सामान्य माणसाच्या आवाक्यातील गोष्ट नाही. मानव अनंत ब्रह्माचे ग्रहण करण्यास असमर्थ असतो. वैदिक ऋषी  व उपनिषदकारांना या सामान्य माणसाचेही भान होते व त्याच्या कल्याणाचा कळवळा सुद्धा होता. म्हणून त्यांनी सामान्य माणसाला ईश्वर नावाचा परम पुरुष मिळवून दिला. निर्गुण ब्रह्माची मानवी बुद्धीने कल्पिलेली मूर्ती म्हणजेच सगुण ब्रह्म किंवा ईश्वर होय. या ईश्वराचे वर्णनही उपनिषदांनी व गीतेनी ब्रह्मासारखेच केले आहे. हा विश्वाचा कर्ता, रक्षिता, पिता, मित्र  व नियंता आहे. (जोशी, खंड ५, १९९६ : २६५) यावरून असे दिसते की ब्रह्मदेव हे त्या निर्गुण निराकार ब्रह्माचेच सगुण साकार रूप असावे.  ह्या संदर्भात छांदोग्य उपनिषदात (२/२४/२) मध्ये आणखी काही उल्लेख आढळतात.  हे सर्व विश्व एकच असून त्याच्या आत आणि बाहेर कोठेही वेगळेपणा नाही. ब्रह्म हे एकात्म आहे त्याच्या कोणत्याही एका भागाचे ज्ञान झाले की अखिल ब्रह्माचे ज्ञान  होते. कारण ह्या सर्वांचे अंतिम तत्त्व ब्रह्म हेच असून , ते अनन्यसदृश, स्वयंप्रतिष्ठित आणि स्वयंप्रज्ञ आहे. सर्व सृष्टी हेच ब्रह्म आहे. हे सर्व चराचर जग ब्रह्ममयच आहे. ब्रह्मातच त्याची उत्पत्ती, स्थिती आणि लय होतो हे जाणून शांत मनाने या ब्रह्माची उपासना करावी.(सिंह, १९१७ : २३६)

छांदोग्य उपनिषद (८/१५/१) मध्ये असे सांगितले आहे की ब्रह्माने आत्मज्ञान प्रजापतीला दिले, प्रजापतीने पुढे ते मनुला दिले व मनुने ते प्रजेला सांगितले. जो कोणी आचार्य कुलाकडून वेदांचे अध्ययन करून ही अध्ययनाची गुरु–शिष्य परंपरा सांभाळतो, गुरुकुलातून

परत आल्यावर गृहस्थाश्रमाचे पालन करून पुत्र व शिष्यांना धार्मिक करतो, हृदयस्थ ब्रह्मात सर्व इंद्रियांना स्थापन करतो, यज्ञादी तीर्थे सोडून अहिंसा व्रताने राहतो व जन्मभर सर्व व्रतांचे पालन करतो तोच ब्रह्मलोकाला प्राप्त होतो. पुन्हा जन्म घेण्यापासून मुक्त होतो. (सिंह, १९१७ : ९६२)

ऐतरेय उपनिषदात तिसऱ्या अध्यायात पुढील उल्लेख आहे. ब्रह्म, इंद्र, प्रजापती, सर्व देव देवता, पृथ्वी, वायू, आकाश, जल,तेज, क्षुद्र भूते हे सर्व काही म्हणजे परब्रह्मच आहे. त्याच प्रमाणे अंडज, जारज, उद्भिज आणि स्वेदज प्राणी, घोडा, बैल, हत्ती,पुरुष हे सर्व प्राणी, पक्षी, स्थावर आणि जंगम हे सर्व म्हणजे परब्रह्मच आहे. हे ब्रह्म प्रज्ञानेत्री आहे. प्रज्ञानेत्रात ते प्रतिष्ठित आहे. प्रज्ञा ही जगाची प्रतिष्ठा आहे. प्रज्ञानरूप आत्मा म्हणजेच ब्रह्म. ह्यालाच हिरण्यगर्भ असे म्हणतात. हाच प्रजापती होऊन विश्वाची निर्मिती करतो. त्यानेच प्राण्यांच्या शरीरात विविध छिद्रे निर्माण केली आणि त्यांना नाक, तोंड, कान अशी सार्थ नावे दिली. हेच सर्व विश्वाचे नियंत्रण करते. प्रलयकाळी सर्व विश्व ह्याच ब्रह्मात विलीन होते आणि कालांतराने पुन्हा याची निर्मिती होते ह्याला विश्वाचे चक्र म्हणतात. (ऐतरेय उपनिषद, १९३९ : ९०–१०२)

वरील सर्व वर्णन हे ब्रह्मदेवाच्या कार्याशी खूपच मिळते जुळते आहे. ब्रह्मदेवाचे विश्वनिर्मितीचे कार्य, त्याचा क्रम, एकातून अनेकांचे निर्माण होणे तसेच प्रलय होऊन सगळ्यांचे नष्ट होणे हे वर्णन सारखेच आढळते; हे निर्गुण, निराकार ब्रह्म म्हणजेच सगुण साकार ब्रह्मदेव असून सामान्य मानवाच्या बुद्धीला समजेल अशा पद्धतीने त्यालाच देवता स्वरूप दिले असावे असे दिसून येते.

### ३.१३ ब्रह्मदेवाची सृष्टीरचना

आत्तापर्यंतच्या सर्व विवेचनावरून अनेक ग्रंथांमधून आपल्याला प्रजापती, ब्रह्मा, विश्वकर्मा या नावाने ब्रह्मदेवाचे उल्लेख सापडतात. ह्या सर्वांनी सृष्टीनिर्मितीचे कार्य केले असल्याचे म्हटले आहे. सृष्टीरचनेचे हे कार्य पुराणांमधून अगदी सविस्तर वर्णन केलेले आहे. निरनिराळ्या कथा आणि क्रम असला तरीही सृष्टीरचनेचे हे कार्य ब्रह्मदेवाने केले असल्याचे वर्णन सर्व ठिकाणी असल्याचे दिसते. सृष्टीरचनेसारखे अत्यंत महत्त्वाचे कार्य ब्रह्मदेवाने केलेलं आहे; त्या कार्याचा आता आढावा घेऊ.

ब्रह्मा हा सृष्टीकर्ता आहे, सृष्टीचा रचनाकार आहे. ही संपूर्ण चलाचल सृष्टी ही त्या जगद्पिता ब्रह्मदेवाचीच रचना आहे अशा प्रकारची विधाने आपण वरील विवेचनात पाहिलीच आहेत. आता ही सृष्टी कशी निर्माण झाली ह्याविषयी जी माहिती आढळते तिचा परामर्श इथे घेतलेला आहे.

सृष्टीचा विस्तार किंवा भुवनकोश म्हणजेच 'ब्रह्मांड' होय. १४ भुवनांनी युक्त असे हे विश्व अंडाकृती आहे. ब्रह्मदेवाच्या इच्छेने निर्माण झाल्यामुळे त्याला 'ब्रह्मांड' असे म्हणत असावेत. पृथ्वी, पर्वत, देव, दानव, मानव, तसेच स्वर्गात, आकाशात आणि अंतराळात आपापल्या कक्षेत फिरणारे ग्रह, तारे, लोक हे सर्वच ब्रह्मांडामध्ये सामावलेले आहे. प्राचीन काळापासून मानवाला सभोवतालच्या सृष्टीविषयी जिज्ञासा आहे. तीच जिज्ञासा त्याला आकाश, वायू मंडल, तारा मंडल या विषयी सुद्धा आहे. ब्रह्मांडाच्या उत्पत्तीविषयी देशविदेशात अनेक प्रथा रूढ आहेत. त्याच प्रथांना पुढे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. परंतु आजही ब्रह्मांड रचनेविषयी अंतिम सत्य मानवाला समजलेले नाही. एकमेवाद्वितीय असे परब्रह्म निरनिराळ्या रूपांमधून ब्रह्मांड स्वरूपात साकार झाले अशी भारतीयांची धारणा आहे. हे एकापासून अनेकांचे निर्माण होणे ही आकस्मिक घटना नसून नियंत्रित घटना आहे. सृष्टी कोणत्या तरी सनातन नियमांना धरून चालत आहे. ऋत व सत्य असे हे दोन नियम असल्याचे ऋग्वेदात म्हटले आहे. (ऋग्वेद १०/१९०). (Griffith, 1896 : 505)

वैदिक काळात ब्रह्मांडाचे पृथ्वी, वायू व आकाश हे तीन भाग मानलेले दिसतात. ब्राह्मणे व उपनिषदांच्या काळात त्यांनाच भूः, भुवः व स्वः अशी नावे आढळतात. कालांतराने महः, जनः, तपः व सत्यम अशा आणखी चार लोकांची कल्पना केलेली आहे. यातील भूः म्हणजे पृथ्वी व उरलेले सहा हे उर्ध्वलोक आहेत. पृथ्वीच्या खालीही सात अधोलोक कल्पिलेले आहेत. हे सर्व लोक मिळून १४ लोकांचे ब्रह्मांड तयार होते.

ह्या ब्रह्मांडाच्या उत्पत्तीविषयी छांदोग्य उपनिषदात (२/२४/२-३) मध्ये एक उल्लेख आढळतो तो असा. प्रजापतीने तीन लोकांना उद्देशून ध्यानयुक्त तपाचरण केले. त्याच्या प्रभावामुळे त्याला वेदत्रयी विद्या मिळाली. त्या विद्यांना उद्देशून त्याने पुन्हा ध्यानयुक्त तप केले. त्या तपाच्या प्रभावामुळे त्याला भूः, भुवः, स्वः ही मंत्ररूप अक्षरे मिळाली. ह्या अक्षरांना उद्देशून

प्रजापतीने पुन्हा ध्यानयुक्त तप केले त्याच्या प्रभावामुळे त्याला ओंकाराचे ज्ञान झाले. पानाच्या देठात ज्याप्रमाणे सर्व रेषा एकत्र होतात त्याप्रमाणेच समस्त वाणी ओंकारामध्ये एकत्रित होते. (झा, १९४२ : १७२–१७५) आणखी एक कथा आहे ती पुढीलप्रमाणे; आदित्य हाच ब्रह्मा आहे आणि हे त्याचेच आख्यान आहे. जगाच्या आरंभी केवळ असत् होते त्याचे सत् झाले, ते वाढून त्याचे अंडे तयार झाले. पुढे एक वर्षा नंतर ते फुटले, एक सोन्याचा आणि एक चांदीचा असे त्याचे दोन भाग झाले. सोन्याच्या भागापासून स्वर्ग तयार झाला तर चांदीच्या भागापासून पृथ्वी; अंड्याच्या कठीण त्वचेचे पर्वत व मृदू त्वचेपासून ढग निर्माण झाले. अंड्यावरील रक्तवाहिन्यांच्या नद्या झाल्या तर त्यातील रसापासून सागर निर्माण झाले.

जी नित्य, सद्स्वरूप अव्यक्त अशी प्रकृती आहे; तीच प्रमुख असून तिच्या साहाय्याने पुरुषाने ह्या विश्वाची निर्मिती केली. तेजस्वी ब्रह्मदेव हाच तो पुरुष होय. त्यानेच सर्व प्राण्यांची निर्मिती केली. त्याने प्रकृतीपासून महत् तत्त्व, महत् तत्त्वापासून अहंकार आणि अहंकारापासून सर्व सूक्ष्म भूत उत्पन्न केले. त्यानंतर जल निर्माण झाले. मग त्यात जलात एक सुवर्णमयी अंडे निर्माण झाले. त्यातून ब्रह्मदेवाने स्वतःच स्वतःला निर्माण केले. मग द्युलोक, आकाश, भूलोक, पृथ्वी, दिशा, काल, मन, वाणी, काम, क्रोध आदि भावना निर्माण केल्या. त्यानंतर ब्रह्मदेवाने मरीची, अंगिरा, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रतु, वसिष्ठ असे सात प्रजापती निर्माण केले. यानंतर ब्रह्मदेवाने आपल्या रोशातून रुद्र निर्माण केला. सनत् कुमारांचा जन्म झाला. या सात महर्षींनी पुढे सृष्टीचा विकास केला. परंतु इतके करूनही सृष्टीचा विकास होत नव्हता म्हणून त्याने स्वतःच्या शरीराचे दोन भाग करून अर्ध्या भागापासून पुरुष व उरलेल्या भागापासून स्त्री निर्माण केली. पुरुषाचे नाव मनू असून त्याची पत्नी शतरूपा होती. त्यांच्यापासून पुढे प्रजा निर्माण झाली. (जोशी,१९८१ : १७–१९)

मत्स्य पुराणमध्ये देवांचे पितामह असलेल्या ब्रह्मदेवाने सर्वप्रथम दहा मानसपुत्रांना निर्माण केले असे वर्णन आहे. हे मानसपुत्र ब्रह्मपुराणात सात आहेत. मरीची, अंगिरा, अत्री, पुलह, पुलस्त्य, क्रतु, प्रचेता, वसिष्ठ, भृगु आणि नारद अशी त्यांची नावे आहेत. मग ब्रह्मदेवाच्या उजव्या अंगठ्यापासून दक्ष प्रजापती निर्माण झाला. स्तनांपासून धर्म, हृदयापासून कुसुमायुध काम, भ्रूमध्यापासून क्रोध तर ओठांपासून लोभ ह्यांची निर्मिती झाली. बुद्धीपासून मोह,

अहंकारापासून मद, कंठापासून प्रमोद, नेत्रांपासून मृत्यू आणि तळहातापासून भरत निर्माण झाला. ब्रह्मदेवाचे दहावे अपत्य कन्या असून तिचे नाव अंगजा होते. यानंतर ब्रह्मदेवाने आपल्या ह्या मानसपुत्रांना देव, दानव, मानव, ही प्रजा निर्माण करण्याची आज्ञा केली. (जोशी, १९८१ : १६२–१६३)

पद्म पुराणाच्या मते प्रथम हिरण्मय अंड्यातून ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. ह्या अंड्याभोवती सर्वत्र जलाचे आवरण होते. जलाभोवती तेजाचे, तेजाभोवती वायूचे आवरण असून वायू हा आकाशाने घेरलेला आहे. ह्या अंड्यातूनच सर्व लोकांची निर्मिती झाली. सर्व नद्या, पर्वत, कल्प, मन्वंतरे इत्यादींचा उगम ह्याच स्थानापासून झाला आहे. दक्ष प्रजापतीच्या मैथुनातून प्रजा निर्मिती होत राहिली. त्याने देवता, ऋषी, नाग इत्यादींची निर्मिती केली परंतु प्रजा निर्माण झाली नाही. मग त्याने आपली पत्नी वारिणीच्या साहाय्याने सात कन्यांना जन्म दिला. धर्म, कश्यप, चंद्रमा, अरिष्टनेमी, भृगुपुत्र, कुशाश्व, अंगिरा ह्यांच्याशी त्यांची लग्ने लावून दिली. यांच्यापासून पुढे सर्व विस्तार झाला.

प्रलयानंतर रात्री झोपून उठल्यावर ब्रह्मदेवाने इतरत्र बघितले तेव्हा त्यांना सर्व लोक सुना दिसला. पृथ्वी एकार्णवाच्या जलात बुडलेली दिसली; मग त्यांनी यज्ञमय वराहाचे रूप घेऊन पृथ्वीला जलातून बाहेर काढले आणि महासागराच्या जलावर स्थापन केले. त्यानंतर त्याने सात द्वीप निर्मिले, १४ भुवनांचे विश्व निर्माण केले. यानंतर देव, प्राणी यांच्या रचनेस प्रारंभ केला. महत् तत्त्वापासून पहिली सृष्टी निर्माण केली. तन्मात्रांची दुसरी सृष्टी. सात्विक अहंकारापासून वैकारिक इंद्रियांची उत्पत्ती झाली हीच तिसरी सृष्टी म्हणजेच ऐंद्रिय स्वर्ग, चौथ्या सृष्टीचे नाव मुख्य सर्ग. पर्वत, वृक्ष आदी स्थावर वस्तू यामध्ये येतात. पशु, पक्षी, कीटक यांची तिर्यक स्रोतांची सृष्टी असून ही पाचवी सृष्टी होय. ऊर्ध्वरेता देवांची सहावी सृष्टी, अर्वाक स्रोतांची म्हणजेच मानव सर्गाची सातवी सृष्टी. अनुग्रह सर्ग ही आठवी सृष्टी; हीच सात्विक आणि तामस दोन्हीही आहे. कौमार सर्गाची नववी सृष्टी ही प्राकृत आणि वैकृत देखील आहे.

अशा रितीने ब्रह्मदेवाची सृष्टी निर्माण होऊ लागली. देवापासून स्थावरापर्यंत त्यांनी चार प्रकारची प्रजा तयार केली. ही त्यांची मानस प्रजा होती. यानंतर प्रजापतीने देव, असुर, पितर आणि मनुष्य हे चार प्राणी आणि जलसृष्टी निर्माण केली. प्रजापतीच्या जंघेपासून दुरात्मा,

असुरांची निर्मिती झाली. त्याने आपल्या वक्षापासून पक्षी निर्माण केले, भुजांपासून मेंढ्या, मुखापासून बकऱ्या तर पोटापासून गाई म्हशी निर्माण केल्या. पायापासून हत्ती, घोडे, गाढव, खेचर, नीलगाय, हरणे, उंट इत्यादी पशू निर्माण केले. स्वतःच्या पूर्ववर्ती मुखापासून गायत्री छंद, ऋग्वेद, त्रिवृत्रस्तोम, रथंतर आणि अग्निष्ठोम यज्ञ हे निर्मिले. सामवेद, जगतीछंद, सप्तदशस्तोम, वैरूप व अतिरात्र भाग यांची निर्मिती पश्चिम मुखापासून तर एकविन्शस्तोम, अथर्ववेद, आप्तोर्याम, अनुष्टुपछंद, वैराज यांना उत्तरावर्ती मुखापासून निर्माण केले.

नव्या कल्पाच्या आरंभी प्रजापती ब्रह्मदेवाने देव, असुर, पितर, मनुष्य यांची निर्मिती करून यक्ष, पिशाच, गंधर्व, अप्सरा, किन्नर, राक्षस, सिंह, पक्षी, मृग, सर्प यांना निर्माण केले. अशा रितीने नित्य आणि अनित्य असे चराचर विश्व त्याने निर्माण केले. कल्पाच्या सुरुवातीलाच त्याने देव, प्राण्यांची नावे, त्यांची रूपे, कर्तव्ये यांचा विस्तार केला. ऋषी व अन्य प्राणी यांची अनुकूल नावे ब्रह्मदेवानेच निश्चित केली.

यानंतर विधात्याने अधर्माला उत्पन्न केले. स्वतःच्या वाम पार्श्वभागापासून त्याने अधर्म आणि अलक्ष्मी यांना निर्माण केले. त्याच्या नाभीपासून विश्वकर्मा, अष्टवसू हे उत्पन्न झाले. विधात्याच्या मेदापासून चार देदिप्यमान अशा कुमारांची निर्मिती झाली. हेच सनत, सनंद, सनातन आणि सनत्कुमार होत. विधात्याच्या मुखापासून अत्यंत तेजस्वी असा स्वायंभुव मनु उत्पन्न झाला. एवढी सृष्टी निर्माण केल्यानंतर त्याने आपल्या पुत्रांना बाकीची सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा दिली; परंतु त्यांनी ही आज्ञा मानली नाही व ते तप करू लागले. ते पाहून ब्रह्मदेव अत्यंत रागावला व त्याचा क्रोधापासून ब्रह्मतेज उत्पन्न झाले. त्याच्या ललाटापासूनच्या तेजातून अकरा रुद्र बाहेर पडले. ह्यामध्ये संहार करणारा एकच रुद्र होता त्याचे नाव कालाग्नि. तर महान, महात्मा, मतिमान, भीषण, भयंकर, ऋतुध्वज, ऊर्ध्वकेश, पिंगलाक्ष, अरुची आणि शुची हे प्रमुख रुद्र वर्णिलेले आहेत. ब्रह्मदेवाच्या उजव्या कानापासून पुलस्त्य, डाव्या कानापासून पुलह ऋषी, उजव्या डोळ्यापासून अत्री तर डाव्या डोळ्यापासून क्रतु, नाकाच्या छिद्रांपासून अंगिरा आणि भृगु यांना उत्पन्न केले. पुढे नारद, मरिची, वसिष्ठ आणि यती यांना निर्माण केले. आता पुन्हा या पुत्रांना ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा केली. ही आज्ञा नारद सोडून

सर्वांनी पाळली. अशा रितीने सृष्टीचे सृजन होऊ लागले. (जोशी, १९८१ : १७–२१) (जोशी, खंड ६, १९९६ : ३१५)

मनुस्मृती अध्याय एक मधील वर्णन आता पाहू. प्रलयकाळी सर्व जग अंध:कारमय होते. कोणतीच हालचाल नसल्यामुळे ते निद्रिस्त असल्यासारखे होते. प्रलयकाल संपल्यानंतर आकाश, वायू, आप, तेज, पृथ्वी या पंचमहाभूतांना निर्माण करणारा सर्वशक्तिमान स्वयंभू निर्माण झाला. आपल्या शरीरापासून अनेक प्रकारची प्रजा निर्माण करण्याची इच्छा करणाऱ्या त्या परमात्म्याने जलाची निर्मिती करून त्यात बीजाची पेरणी केली. ते बीज अंकुरित होऊन त्याचे एक सुवर्णमय विशाल अंडे तयार झाले. ते हजारो सूर्यांप्रमाणे तेजस्वी होते. त्या अंड्याच्या गर्भात सर्व लोकांचा पितामह; जो ब्रह्मदेव त्याच्या रूपाने परमात्मा स्वत:च जन्माला आला. हा परमात्मा पाण्यातून जन्माला आल्याने तोच नारायण आहे. त्या सुवर्णमय अंड्यामध्ये ब्रह्मदेवाने एक वर्ष वास केला. मग त्याने त्या अंड्याचे दोन भाग केले. वरच्या भागापासून स्वर्लोक व खालच्या भागापासून भूलोक निर्माण केले. दोन्हीच्या मध्ये आकाश, अष्टदिशा व महासागर निर्माण केला. त्यानंतर ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये निर्माण केली. कर्माचरण करणे हा ज्यांचा स्वभाव आहे; असे प्राणी, देव, जडसृष्टी व सनातन यज्ञसंस्था यांना यथानुक्रमे निर्माण केले. त्याच प्रमाणे त्या हिरण्यगर्भाने काळ, त्याचे काष्ठ, पळ, घटिका, प्रहर, दिवस रात्र, पक्ष, मास, अयन, वर्ष तसेच नक्षत्रे, ग्रह, नद्या यांचीही निर्मिती केली. मग सर्व प्राणिमात्र, पक्षी, कीटक व वनस्पती अशी स्थावर व जंगम प्रजा निर्माण केली. अशा तऱ्हेने सर्व जगाची उत्पत्ती करून तो अचिंत्य प्रजापती सृष्टीविलास प्रलयकालाने नष्ट करीत म्हणजेच जीवमात्रांची त्यांच्या कर्माप्रमाणे पुन्हा पुन्हा उत्पत्ती व लय करीत अंतर्धान पावतो. ज्यावेळी तो ब्रह्मदेव जागा होतो आणि सृष्टी आणि स्थिती यांची इच्छा करतो; त्यावेळी हे सर्व जग श्वास, प्रश्वास, आहार इत्यादी कर्मात मग्न असते. जेव्हा तो शांत चित्ताने झोपी जातो तेव्हा हे सर्व जग लय पावते. अशा रीतीने त्या महात्मा प्रजापतीने जगताच्या उत्पत्ती, स्थिती व लयाचे हे चक्र निर्माण करून हे शास्त्र मला म्हणजे मनुला विधिपूर्वक शिकविले. नंतर मी हे शास्त्र मरिची आदि मुनींना सांगितले. (प्रभू, २००३ : २५–४५)

ब्रह्मांड पुराण येथेही नावाप्रमाणेच ब्रह्मांडाची उत्पत्ती व त्याच्या भूगोलासह विस्तार कथन केलेला आहे. येथेही हिरण्यमयी अंड्यापासूनच पंचमहाभूतांची निर्मिती झाली असल्याचे सांगितले आहे. त्यानंतर स्थावर जंगम वस्तूंची निर्मिती झाली आहे. (Chatterjee, 2001 : 12-17) तर ब्रह्मपुराणातही सृष्टीनिर्मितीचा असाच क्रम सांगितलेला आहे. फक्त या सर्व ठिकाणी ब्रह्मदेवाच्या जन्म विष्णूच्या नाभीकमळातून होऊन मग विष्णूच्या सांगण्यावरून ब्रह्मदेवाने सृष्टी निर्मिती केली असे सांगितले आहे. (Chatterjee, 2001 : 2-4)

चतुर्दश भुवनांचे संक्षिप्त वर्णन

१) भू लोक – म्हणजे पृथ्वी, मानव, पशु,पक्षी जलचर यांचे निवासस्थान

२) भुवर्लोक – सिद्ध पुरुष, ऋषीमुनी यांचे निवासस्थान

३) स्वर्लोक – देवदेवतांचे निवासस्थान

४) महर्लोक – हा ध्रुवाच्या बाजूला असून कल्पांतापर्यंत आयुष्य असणारे महात्मे येथे राहतात.

५) जनलोक – सनत्कुमारादी महात्म्यांचे निवासस्थान.

६) तपोलोक – देहरहित वैराजादि देवतांचे निवासस्थान.

७) सत्यलोक – सिद्धादी मुनींचे निवासस्थान.

८) अतल – येथे मयासुराचा पुत्र बळीचे राज्य आहे.

९) वितल – यात हाटकेश्वर शंकर भवानीसहीत राहतो.

१०) सुतल – यात बळी राजाचे स्थान आहे.

११) तलातल – मयासुराचे राज्य

१२) महातल – क्रोध्वाश नावाच्या सर्पाचे निवासस्थान.

१३) रसातल – दैत्य, दानवांचे निवासस्थान.

१४) पाताल – शेषादि नागांचे निवासस्थान.

अशा प्रकारे सात पाताल, सात स्वर्ग, सात द्वीपे, सात समुद्र मिळून एक ब्रह्मांड आहे. यावर एका ब्रह्मदेवाचा अधिकार आहे. अशी अनेक ब्रह्मांडे आहेत. प्रत्येकात ब्रह्मा,विष्णू आणि महेश यांचे अस्तित्व आहे. ब्रह्मांडे, विश्वे, आकाश आणि दिशा यांची गणना करण्यास शिव आणि विष्णू असमर्थ आहेत. संपूर्ण विश्व हे नाशवंत आहे; केवळ वैकुंठ लोक, शिव लोक आणि ब्रह्म लोक हेच सत्य आणि शाश्वत आहेत. (जोशी, खंड ६, १९९६ : ३१५)

## ३.१४ ब्रह्मदेव आणि वेद वाङ्मय

भारतीय धर्माचे व संस्कृतीचे मूलाधार ग्रंथ, जगातील पहिले वाङ्मय होय. वेद हे मानवसृष्टीच्या आधी परमेश्वराने मानवाच्या कल्याणासाठी निर्माण केले म्हणूनच ते अनादि आहेत अशी वैदिकांची धारणा आहे. प्राचीन काळी ऋषींना वेद दिसले म्हणून त्यांना वेद असे नाव मिळाले आहे. सत्, चित् आणि आनंद असे ब्रह्माचे स्वरूप असल्याचे वेदात म्हटले आहे. म्हणूनच वेदाला 'ब्रह्म' असाही पर्यायी शब्द वापरला जातो.

वेद वाङ्मय कसे निर्माण झाले या संबंधी अनेक मते आढळून येतात. यासंबंधात प्रत्यक्ष वैदिक वाङ्मयातही काही उल्लेख आढळतात. सृष्टीक्रमाच्या मुळाकडे जाऊ लागल्यास एखादे स्वत: प्रमाण असे तत्त्व मानावे लागते त्यालाच परमात्मा, ईश्वर किंवा महाभूत असे म्हटले आहे. या महाभूताचे नि:श्वास म्हणजे वेद होत असे बृहदारण्यकोपनिषदात (२/४/१०) म्हटले आहे.

वेदांची निर्मिती कशी झाली हे सांगताना ते परमेश्वराच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द आहेत असे म्हटलेले आहे. अनादि आणि नित्य अशी ही वाणी ब्रह्मदेवाच्या मुखातून बाहेर आली असल्याचे पुराणांमधून सांगितले आहे. वेदांच्या निर्मितीचे श्रेय कोणाकडे तरी दिलेच पाहिजे म्हणून पुराणांनी चार मुखे असलेल्या ब्रह्मदेवाकडे त्याचे कर्तृत्व दिले आहे. (जोशी, १९५३ : ६२) ब्रह्मदेवाच्या चार मुखांतून चार वेद निर्माण झाले, असे अनेक ठिकाणी म्हटले आहे.

पुराणांमध्ये ब्रह्मदेव म्हणून ज्याचा उल्लेख येतो त्यालाच वैदिक वाङ्मयात प्रजापती म्हटले आहे. प्रजापतीने सृष्टी उत्पन्न केली आणि तिच्या कल्याणासाठी वेद वाङ्मय निर्माण केले. प्रजापतीने आपल्या नि:श्वासाबरोबर वेद उत्पन्न केले असेही म्हटले आहे. प्रजापतीचा हा हुंकार सर्वप्रथम ऋषींनी ऐकला म्हणून त्या हुंकारांना म्हणजेच वेदांना श्रुती असेही म्हणतात. वेद ब्रह्मदेवापासून निर्माण झाले असे जरी म्हटले असले तरीही वेगवेगळ्या पुराणकारांनी आपापल्या

संप्रदायाप्रमाणे वेदांचे कर्तृत्व वेगवेगळ्या देवतांकडे दिले आहे. विष्णु पुराणात वेदांचे प्रवर्तन विष्णूने केल्याचे सांगितले आहे. शिवपुराणात ओंकारातून वेदांची निर्मिती झाली असल्याचे म्हटले आहे तर देवी माहात्म्य सांगणाऱ्या पुराणांनी वेदांचे कर्तृत्व देवीकडे दिले आहे. वेद हे गायत्रीपासून निर्माण झाले असे मत्स्य पुराणात म्हटले आहे. (१/७१/२४) गायत्रीला अनेक ठिकाणी वेदमाता म्हटले आहे. (ब्रह्मवैवर्त १/८/२)(शिवपुराण ७/६/२७) परंतु ब्रह्मदेवच वेदांचा जनक असल्याचा समज अधिक लोकप्रिय आहे असे दिसते.

ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि सामवेद असे वेदांचे चार भाग असून व्यासांनी आपल्या चार शिष्यांना हे चार वेद शिकवले असे म्हटले आहे. त्यांनी पैल नावाच्या शिष्याला ऋग्वेद, वैशंपायनाला यजुर्वेद, जैमिनीला सामवेद व सुमंताला अथर्ववेद शिकवला. या चार शिष्यांनी चार वेदांचे प्रवर्तन केले म्हणून प्रत्येक वेदसंहितेचा तो मूळ आचार्य समजला जातो. चार वेदांचे चार पुरुष आहेत अशी कल्पना करून त्यांच्या रूपासंबंधी, गोत्र तसेच देवतांची सुद्धा माहिती दिलेली आहे. ऋग्वेद हा सोनेरी वर्णाचा कमळाच्या पानाप्रमाणे रुंद डोळे असणारा, सुंदर मान असणारा, पांढऱ्या दाढी मिशा असणारा, दोन हात उंचीचा पुरुष असून त्याचे गोत्र अत्री, देवता ब्रह्म व छंद गायत्री आहे. यजुर्वेद हा किडकिडीत, तांबुस वर्णाचा, पाच हात उंच, सोनेरी डोळ्यांचा पुरुष असून त्याचे भारद्वाज, देवता रुद्र व छंद त्रिष्टुभ आहे. सामवेद हा नेहमी माळ धारण करणारा, स्वच्छ वस्त्र नेसणारा, चर्म व दण्ड धारण करणारा, सोनेरी डोळ्यांचा व सहा हात उंच पुरुष असून त्याचे गोत्र काश्यप, देवता विष्णू व छंद जगती आहे. अथर्ववेद हा काळ्या रंगाचा, क्रूर, क्षुद्र कर्म करणारा, सपत्निक, निळ्या रंगाचा, नऊ हात उंचीचा पुरुष असून त्याचे गोत्र वैजान, देवता इंद्र व छंद अनुष्टुभ आहे.

**नाट्यशास्त्र** – वेदांबरोबर नाट्यशास्त्राचा जनक देखील ब्रह्मदेवच असल्याचे मानले जाते. नाट्यशास्त्रामध्ये नाटक म्हणजे काय, त्याची अंगे कोणती, त्याचे प्रकार, नाटकाचे प्रयोजन इत्यादी विषयांची चर्चा केलेली आहे. तसेच नाट्यविषयक सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. विश्वकर्मा, शौनक, कोहल, वत्स, शांडिल्य, धूर्तिल, स्वाती, नारद, पुष्कर, शिलाली, कोहल, नंदी, धनंजय, शारदातनय, रामचंद्र–गुणचंद्र, विश्वनाथ, शिंगभूपाल, लोल्लट, शंकुल, उद्भट, भट्टनायक, अभिनवगुप्त इत्यादी भरतमुनीच्या आधीच्या व पुढच्या साहित्यशास्त्रज्ञांच्या

मेळाव्यात भरतमुनी हा अग्रगण्य ठरतो. त्याचे नाट्यशास्त्र हा ग्रंथ नाट्यशास्त्रावरील प्रमाणग्रंथ मानला जातो. शास्त्र ह्या दृष्टीने नाट्याच्या सर्व अंगांचा विचार भरतमुनीने केला आहे.

चार वेदांनंतर नाट्यवेद या पाचव्या वेदाची निर्मिती कशी झाली, नाट्यशास्त्राचा उगम कसा झाला व नाटकाचा पहिला प्रयोग केव्हा झाला या विषयी भरतमुनीने जी कथा सांगितली आहे ती अशी; त्रेतायुग सुरु झाले होते. लोकांचा रजोगुण बळावू लागला होता. लोकांच्या मनावर काम, क्रोध, लोभ इत्यादींचा पगडा बसू लागला होता. त्यामुळे त्यांना सारखे सुखदु:खाचे हेलकावे बसत होते. अशा स्थितीत एकदा इंद्रादी देव ब्रह्मदेवाकडे गेले व त्याला म्हणाले, 'भगवन्! सध्याच्या परिस्थितीत जे दृश्य व श्राव्य असेल असे एखादे करमणुकीचे साधन आम्हाला हवे आहे. वेद हे केवळ त्रैवर्णिकांसाठीच आहेत म्हणून ज्याचा शूद्रांनाही अधिकार प्राप्त होईल असा सर्ववर्णसमावेशक पाचवा वेद तुम्ही आम्हाला निर्माण करून द्यावा.' देवांची ही विनंती ब्रह्मदेवाने मान्य केली. त्याने ऋग्वेदातून पाठ्य (पात्रांनी बोलायचे संवाद) घेतले, यजुर्वेदातून अभिनय, सामवेदातून गीत तसेच अथर्ववेदातून रस घेतला आणि चारही वेदांतून नाट्यवेद नावाचा पाचवा वेद निर्माण केला. हा वेद सर्व लोकांच्या आचार–विचार–विकारांचा दर्शक, सर्वशास्त्रसंपन्न, सर्वशिल्पसमावेशक व इतिहास सांगून पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करणारा असा ठरला. (मिश्र, १९८८ : १८)

हा नाट्यवेद निर्माण झाल्यावर तदनुसार एका नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग करण्याचे काम ब्रह्मदेवाने भरतमुनीकडे सोपवले. भरतमुनीला शंभर पुत्र होते; त्या सर्वांचा त्याने नाट्यप्रयोगाच्या कामी उपयोग करून घेतला. त्यासाठी भरतमुनीने शंकराकडून तांडव नृत्य मिळवले, पार्वतीकडून लास्य मिळवले आणि विष्णूकडून चार नाट्यवृत्ती प्राप्त करून घेतल्या. भरताला त्या कामी गंधर्व, अप्सरांचेही सहकार्य मिळाले. विश्वकर्माने त्याला नाट्यगृह निर्माण करून दिले. या दिव्य सामग्रीने युक्त असा पहिला नाट्यप्रयोग भरतमुनीने इंद्रध्वज उत्सवाच्या वेळी केला. त्यात देव असुरांचे युद्ध दाखवून शेवटी असुरांचा पराजय दाखवला होता. सुर असुरांनी ते नाटक पाहिले. देवांना आनंद झाला पण दैत्यांना त्यांच्या पराजयामुळे दु:ख झाले. दैत्यांनी ब्रह्मदेवाकडे तक्रार केली. त्यावेळी ब्रह्मदेव ह्या असुरांना म्हणाला,'असुर हो! मला कोणत्या विशिष्ट पक्षाचा जय–पराजय दाखवायचा नाही. सृष्टीत शुभ असते तसे अशुभही असते. चांगले–वाईट दोन्ही असते. तेच

ह्या नाट्यात दाखवले आहे. त्रैलोक्यात आढळणाऱ्या सर्वसामान्य भावभावनांचे सर्वसामान्य दर्शन मला घडवायचे आहे. यात विशिष्ट किंवा वैयक्तिक काही नाही. आनंद–दुःख, हास्य–रुदन, मैत्री–शत्रू अशा तऱ्हेने ज्यात सर्व लोकप्रवृत्तींचे प्रतिबिंब पडले आहे व ज्यात सर्व अवस्था समाविष्ट आहेत असे नाट्य मी लोकांकरीता निर्माण केले आहे.' हे ऐकून दैत्यांचा राग शांत झाला. (जोशी, खंड ४. १९९४ : ७६६)

### ३.१५ ब्रह्मदेवाची कालगणना

आधीच्या उपप्रकरणात आपण पाहिले की ब्रह्मदेवानेच संपूर्ण सृष्टी निर्माण केली असल्याचे वर्णन सर्वत्र दिसते. त्यांचा क्रम सुद्धा थोड्याफार फरकाने तसाच आहे. ब्रह्मदेवाने काळ निर्माण करून त्याचे पळ, मात्रा, घटिका, दिवस असे भाग केले. परंतु ब्रह्मदेवाचा स्वतःचा काळ मात्र मनुष्यासारखा पुढे सरकत नाही. ब्रह्मलोकात सर्व आदिसृष्टीमध्ये ब्रह्माबरोबरच विष्णू आणि महेश हे देखील स्थित आहेत. सर्वप्रथम 'कल्प' कल्पिलेले आहेत. ब्राह्मकल्प, वाराहकल्प आणि पद्मकल्प असे तीन कल्प तर सत्य, त्रेता, द्वापार आणि कली अशी चार युगे सांगितलेली आहेत. एका ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षे असते. ब्रह्मदेवाचा दिवस सुरु झाला की कल्पाची सुरुवात होते व दिवस संपला की कल्पान्त होतो. ब्रह्मदेवाचे हे आयुष्य 'पर' या नावाने ओळखले जाते. त्याचा अर्धा भाग म्हणजे 'परार्ध'. १५ निमिषांची एक 'काष्ठा', ३० काष्ठांची १ 'कला' ३० कलांचा १ 'मुहूर्त', मुहूर्त म्हणजे मनुष्याचा 'दिवस', १५ दिवसांचा एक पक्ष, दोन पक्षांचा एक 'महिना', सहा महिन्यांचे एक 'अयन', दोन अयनांचे एक वर्ष, एक मानवी वर्ष म्हणजे एक 'दिव्यदिवस' असे तीस दिव्यदिवस म्हणजे एक 'दिव्यमहिना' तर ३६० दिव्यदिवसांचे एक 'दिव्यवर्ष' अशा ३०३० वर्षांचे एक सप्तर्षी वर्ष तर ९०९० वर्षांचे एक ध्रुव वर्ष, ९६००० दिव्य वर्षांचे १ दिव्य वर्ष सहस्र. १७ लाख २८,००० वर्षांचे सत्य युग, १२,९६,००० वर्षांचे त्रेता युग, ८,६४,००० वर्षांचे द्वापर युग, ४,३२,००० वर्षांचे कली युग, ४३,२०,००० वर्षांची १ चतुर्युगी, ३०,६७,२०,००० वर्षांचे १ मन्वंतर, ४ अब्ज २९ कोटी ४० लाख ८० हजार वर्षांची १४ मन्वंतरे, १४ मन्वन्तरांचा ब्रह्मदेवाचा १ दिवस पूर्ण होतो आणि त्यानंतर नैमित्तिक नावाचा प्रलय होतो. ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षांचे असते. ही शंभर वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या जागी दुसरा ब्रह्मा निर्माण होतो. सध्याच्या ब्रह्मदेवाची अशी पन्नास वर्षे पूर्ण झालेली आहेत. (जोशी, १९८१ : १८–१९)

ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मनू होतात. त्यांची नावे स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णी, दक्षसावर्णी, ब्रह्मसावर्णी, धर्मसावर्णी, रुद्रसावर्णी, देवसावर्णी, इंद्रसावर्णी अशी आहेत. या एकेका मनुच्या काळात ७१ महायुगे होतात. याप्रमाणे चाक्षुषपर्यंत होऊन गेले आहे. चालू असलेले वैवस्वत मन्वंतर हे सातवे आहे. वैवस्वत मन्वंतरातील २७ महायुगे होऊन २८ वे महायुग चालू आहे. (दाते, २०१८ : २).

### ३.१६ ब्रह्मदेवाचे मूर्त स्वरूप

उपनिषद काळात मूर्तिपूजा अस्तित्वात नव्हती. त्यामुळेच त्यावेळचा आचारधर्म हा आदित्य, अग्नी, चंद्र, पंचमहाभूते त्यांची प्रतीके, अग्नीची अनेक प्रकारची अनुष्ठाने, सामगानाचे वेगवेगळे प्रकार यांच्याशी संलग्न होता. याच्याशी संबंधित वेगवेगळ्या प्रतीकांच्या सामर्थ्याची कल्पना करून त्यांची उपासना उपनिषद साहित्यात केलेली आढळते. या प्रतीकोपासनेचाच विकास पौराणिक काळात मूर्तिपूजेच्या स्वरूपात झाला असावा. उपासकांनी स्वत:च्या आवडीनुसार भिन्न देवदेवतांच्या मूर्ती म्हणजेच प्रतीके निर्माण करून त्यांची पूजा उपासना सुरू झाली असावी. अव्यक्त, अमूर्त, आणि निर्गुण परमेश्वरी प्रतीकापेक्षा व्यक्त, मूर्त आणि सगुण परमेश्वरी मूर्तीची उपासना सर्व सामान्य साधकांसाठी सहज व सोपी असल्याने उपनिषदकालीन निर्गुण प्रतीकोपासना हळूहळू मागे पडली व त्याची जागा मूर्तिपूजेने घेतली असावी. निर्गुण निराकार ब्रह्म ही संकल्पना समजण्यास थोडीशी कठीण अशी आहे. म्हणूनच कदाचित ब्रह्मदेव हे त्याच संकल्पनेचे सगुण साकार रूप असावे असे वाटते. 'स्वयंभू' असल्या कारणाने त्याने स्वतःच स्वतःला निर्माण केले. तेव्हा त्याचे मूर्त स्वरूप कसे आहे; हे आता आपण पाहू.

प्रथमतः ब्रह्मदेवाला एकच मुख होते पण नंतर चार मुखे निर्माण झाली. या विषयीची मत्स्य पुराणातील कथा पुढील प्रमाणे – एकदा ब्रह्मदेवाने आपल्या अर्धांगापासून 'शतरूपा' नावाची स्त्री निर्माण केली. ती अतिशय सौंदर्यवती होती. जन्मानंतर ती ब्रह्मदेवाभोवती फिरू लागली. पण त्यावेळी त्याचे मानसपुत्र त्याच्या बाजूलाच बसलेले होते. त्यामुळे ब्रह्मदेवाला तिच्याकडे तोंड वळवून पाहण्याचा संकोच वाटू लागला. पण पाहायचे तर होते, त्यामुळे त्याने चारही दिशांना चार मुखे निर्माण केली. नंतर ती आकाशमार्गे चालली असता मध्यभागी वरच्या बाजूला एक जटाधारी पाचवे शीर निर्माण केले. मात्र या त्याच्या कृतीमुळे पुत्रप्राप्तीसाठी त्याने जे तप

केले होते त्याचा नाश झाला. पुढे हेच पाचवे मस्तक शंकराने तोडले आणि ब्रह्मा चतुर्मुख झाला. परंतु बऱ्याचदा ब्रह्मा तीन मुखे असलेला आढळतो; ह्यात चौथे शीर मागच्या बाजूला आहे असे अभिप्रेत असते. त्यामुळे ते दाखवले जात नाही. तसेच चतुर्मुखी मूर्तीदेखील असतात. इथे काही वेळेस मागील बाजूस सुद्धा मुख दाखवलेले असते तर काही वेळा एकाच ओळीत चार मुखे सुद्धा दाखविली जातात. ब्रह्मदेवाची चार मुखे चार वेद, चार दिशा तसेच चार वर्ण सूचित करतात. (जोशी, १९८६ : १६२–१६३)

विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे ब्रह्मा चतुर्मुखी असावा. तो कमळावर बसलेला असावा आणि त्याने मृगाजिन पांघरलेले असावे. जटामुकुट असावा, त्याला चार हात असावेत. सात हंसांच्या रथात बसलेला असावा, डोळे मिटलेले आणि ध्यानस्थ असावेत. कमळाच्या पाकळीप्रमाणे त्याचा वर्ण लालसर असावा असे वर्णिलेले आहे. (शहा, १९९० : १७१–१७३)

मत्स्य पुराणात (मत्स्य पुराण २५९/४१–४२) ब्रह्मदेवाची मूर्ती कशी असावी याबद्दल खूपच सविस्तर वर्णन आढळते. ते असे ब्रह्मा हा चतुर्मुख, चतुर्बाहू, हंसारूढ किंवा कमलारूढ असावा. त्याचा वर्ण कमळाच्या अंतर्भागाप्रमाणे लाल असावा व दृष्टी शुभ असावी. त्याच्या खालील डाव्या हातात कमंडलू व उजव्या हातात स्रुवा असावी तर वरील डाव्या हातात दंड आणि उजव्या हातात पण स्रुवा असाव्यात. त्याच्या चारही बाजूस देवता, गंधर्व तसेच मुनी त्याची स्तुती करताहेत असे असावे. सृष्टीरचनेत मग्न आहे असे दाखवावे तर श्वेत वस्त्र, यज्ञोपवीत तसेच मृगचर्म धारण केलेले असावे. बाजूला आज्यस्थळी तर समोर चार वेदांच्या मूर्ती असाव्यात. त्याच प्रमाणे त्याच्या डाव्या बाजूस सावित्री, उजवीकडे सरस्वती व पुढे चार वेदधारी व सभोवती ऋषी असावेत असेही पुढे म्हटले आहे. (त्रिपाठी, १९४६ : ६९६)

बृहद्संहिता (१२४/५८/४१) मध्ये ब्रह्मा चतुर्मुखी असून त्याच्या हातात कमंडलू असावा असे म्हटले आहे. इथे बाकीचे उल्लेख नाहीत जसे की चार हात, वर्ण, हंस इत्यादी उल्लेख आढळत नाहीत. ब्रह्मा हा पितामह असल्यामुळे त्याची कल्पना एका वृद्ध पुरुषाच्या रुपात केलेली दिसते. (Sastri, 1947 : 513) तसेच बृहद्संहिता येथे प्रतिमालक्षण अध्यायात ४१ व्या श्लोकात पुढील वर्णन आढळते.

**ब्रह्मा कमंडलूकरश्चतुर्मुख: पङ्कजासनास्थच ।।**

ब्रह्मदेवाच्या हातात कमंडलू असावा तो चतुर्मुख आणि कमलासनस्थ असावा असे म्हटले आहे. (Sasrti, 1946 : 513).

मयमतम् ह्या ग्रंथात (अध्याय ३६ श्लोक १–७) पुढील प्रमाणे वर्णन आढळते. ब्रह्मा आदींचे दागिने, रंग / वर्ण, आयुधे, अलंकरण, देवी, वाहने यांची क्रमवार माहिती. ब्रह्मा चतुर्मुख, चतुर्बाहू असतो. तापलेल्या सुवर्णाप्रमाणे (सोन्याप्रमाणे) लाल रंगाचा असतो. जटामुकुटधारी असून तो मुकुट रत्नांप्रमाणे चमकणारा असतो. गळ्यातील अलंकार विद्युल्लतेचे असून तो कर्णभूषणे व बाजुबंदही घालतो. त्याने मृगचर्माचे (हरणाच्या कातड्याचे) उपरणे पांघरलेले असते. त्याच्या मांड्यांवर मौंजीबंधन आहे तर तो श्वेत (पांढरी) वस्त्रे परिधान करतो. उजव्या दोन्ही हातात स्रुक आणि स्रुवा असतात तर डाव्या दोन्ही हातात कमंडलू आणि कुश (एक प्रकारचे गवत) असते. तर खालील दोन हात वरद किंवा अभय मुद्रेत असतात. डाव्या बाजूला सावित्री व उजव्या बाजूला भारती असून आजूबाजूला ऋषी परिवार देखील असतो. तो हंसारूढ असून जवळ कुशध्वज सुद्धा असतो. तो कधी बसलेला, कधी उभा असून कधी कधी कमलारूढ देखील असतो. (Dagens, 2007 : 821-822)

रूपमंडन (२/६) येथे पुढील प्रमाणे वर्णन दिलेले आहे. रूपमंडनाप्रमाणे ब्रह्मदेवाची चार मुखे म्हणजे चार वेद, चार दिशा तसेच चार वर्ण यांचे प्रतीक आहेत. ब्रह्मा चतुर्भुज असावा, तो बसलेला असेल तर कमळावर किंवा हंसावर बसलेला असावा. योगासनात बसलेला असावा, उभी मूर्ती असल्यास पद्मपीठावर उभी असावी. ब्रह्मदेवाचा रंग गडद पिवळा असावा तर डोळ्यांचा रंग केशरी असावा. त्यास जटामुकुट असून सर्व अलंकारांनी युक्त असावा. यज्ञोपवीत असावे, त्याच्या शरीरावर पांढऱ्या चंदनाने लेप दिलेला असावा. पांढऱ्या फुलांची माळ असावी, कटिसूत्र असावे, पांढरे वस्त्र परिधान केलेले असावे तर मृगाजिनाचे उत्तरीय असावे, कर्णभूषणे असावीत, ब्रह्मदेवाच्या हातात खालीलप्रमाणे आयुधे असावीत. उजव्या दोन्ही हातात अक्षमाला आणि कुश तर डाव्या दोन हातात कुश व कमंडलू असावा किंवा उजव्या हातात स्रुक आणि स्रुवा व डाव्या हातात आज्यस्थळी आणि कुश असावे किंवा पुढचे दोन्ही हात अभय आणि वरद मुद्रेत तर पाठीमागच्या दोन हातांत अक्षमाला आणि कमंडलू असावा किंवा पुढील दोन्ही हात एकावर एक

ठेवलेले आणि मागील दोन हातांत कमंडलू आणि अक्षमाला असावी किंवा पुढील उजवा हात वरद मुद्रेत, मागील उजव्या हातात स्रुवा, मागील डाव्या हातात स्रुक तर पुढील उजव्या हातात कमंडलू असावा किंवा पुढच्या उजव्या हातात अक्षमाला, मागील उजव्या हातात स्रुक, मागील डाव्या हातात पुस्तक आणि पुढील डाव्या हातात कमंडलू असावा. रूपमंडनाप्रमाणे त्याला दाढी असावी व सात हंसांच्या रथावर तो आरुढ असावा. (Mohan, 1936 : 60-61)

विष्णु पुराणाप्रमाणे ब्रह्मदेवाचे डोळे मिटलेले असावेत, तो ध्यान मुद्रेत असावा. उजवीकडे सरस्वती व डावीकडे सावित्री असाव्या व त्याही आभूषणं परिधान केलेल्या असाव्यात. डावीकडे एकटी सावित्री बसलेली असावी किंवा ब्रह्मदेवाच्या डाव्या मांडीवर बसलेली असावी. (Rao, 1916 : 499-506)

समरांगण सूत्रधार येथे ब्रह्मा स्थूल असावा असे म्हटलेले असून कमंडलू, अक्षमाला, दंडधर असावा असे म्हटले आहे. तसेच श्वेत फुलांच्या माळा व श्वेत वस्त्र परिधान केलेला सांगितला आहे. (Sastri, 1925 : 271)

अपराजितपृच्छामध्ये ब्रह्मदेवाचे आठ प्रतिहार सांगतिलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे: सत्य, धर्म, प्रियोद्भव, जय, विजय, यज्ञभद्रक, भव आणि विभव. हे सर्व मनुष्याकृती असून त्यांच्या डोक्यावर मुकुट आहे. (Bhattacharya, 1950 : 12-13)

ह्या प्रतिहारांच्या हातातील आयुधांचा क्रम खालीलप्रमाणे :

| प्रतिहार | खालचा उजवा हात | वरचा उजवा हात | वरचा डावा हात | खालचा डावा हात |
|---|---|---|---|---|
| १ सत्य | पद्म | स्रुक | पुस्तक | दंड |
| २ धर्म | दंड | पुस्तक | स्रुक | पद्म |
| ३ प्रियोद्भव | अक्ष | पद्म | आगम | दंड |
| ४ जय | दंड | आगम | स्रुक | फलक |
| ५ विजय | अक्षसूत्र | गदा | खेटक | दंड |

| प्रतिहार | खालचा उजवा हात | वरचा उजवा हात | वरचा डावा हात | खालचा डावा हात |
|---|---|---|---|---|
| ६ यज्ञभद्रक | दंड | खेटक | गदा | अक्षसूत्र |
| ७ भव | अक्ष | पाश | अंकुश | दंड |
| ८ विभव | दंड | अंकुश | पाश | पद्म |

ब्रह्मदेवाचे आयतन तसेच प्रतिहारांचे देवतांबरोबरचे स्थान

पूर्व

| | | |
|---|---|---|
| ईशान<br>कमला | धरणीधर<br>वा. सत्य<br>द. धर्म | अग्नी<br>गणेश |
| ग्रह<br>वा. भव<br>द. विभव | ब्रह्मा | मातृका<br>वा. प्रियोद्भव<br>द. यज्ञ |
| पर्वतोरुद्र | जलशायी<br>वा. विजय | सहस्राक्ष |

**मूर्तिविज्ञानाच्या दृष्टीतून ब्रह्मदेवाचे वाहन व आयुधे**

**वाहन :** हंस हे ब्रह्मदेवाचे वाहन असते, हंस हे विद्वत्तेचे प्रतीक आहे. हंसाकडे नीरक्षीर विवेकबुध्दी असते, म्हणजेच तो दूध व पाणी वेगळे करण्यास समर्थ असतो. त्यामुळे चांगले व वाईट ह्यातील फरक करता यावा यासाठीचे हे प्रतीक असावे असे वाटते. काही वेळा सात हंसांच्या रथात सुद्धा बसलेला दाखवला जातो. ही कल्पना सूर्याच्या सात अश्वांच्या रथासारखी वाटते.

**मस्तक :** ब्रह्मा चतुर्मुख असतो, पितामह असल्या कारणाने वृद्ध पुरुषाच्या रूपात दाखवलेला असतो. म्हणून दाढी व मिशा दाखवलेल्या असतात. कधीकधी एकाच मुखाला दाढी दाखवलेली असते तर क्वचित दाढी नसतेच. कधी कधी त्रिमुखी तर काही वेळेस मागील बाजूस चौथे मुख सुद्धा दाखवितात.

**स्रुक व स्रुवा :** ही यज्ञीय उपकरणे आहेत. ब्रह्मदेवाचा यज्ञाशी संबंध असल्यामुळे ही उपकरणे त्याच्या हातात दाखविली जातात.

**कमंडलू :** कमंडलू सुद्धा यज्ञाशी निगडीत अशीच वस्तू आहे. त्यामध्ये पवित्र जल असते व ब्रह्मदेवाची तपश्चर्या केल्यानंतर कमंडलूतील पाणी तो शिंपडत असल्याचे उल्लेख वाङ्मयात आढळतात.

**पुस्तक :** ह्याला वेद सुद्धा म्हणतात. ब्रह्मदेवाने वेदांची निर्मिती केली असल्याचे मानले जाते म्हणून त्याच्या हातात पुस्तक किंवा वेद दाखविलेले असतात.

**अक्षमाला किंवा अक्षसूत्र :** ब्रह्मदेवाच्या हातात अक्षमाला दाखविलेली असते. सहस्र अक्षांनी त्याचे संपूर्ण विश्वाकडे लक्ष असते असा त्याचा अर्थ असतो.

**वरदमुद्रा :** क्वचित ब्रह्मदेवाचा उजवा हात अभय मुद्रेत किंवा वरद मुद्रेत दाखवलेला असतो. त्याच हातात अक्षमाला सुद्धा दाखवितात.

**जटामुकुट :** ब्रह्मदेवाच्या मधल्या शीरावर हा जटामुकुट दाखवलेला असतो. बऱ्याचदा तो अलंकृत केलेला असतो.

त्याच्या उजवीकडे सरस्वती व डावीकडे सावित्री दाखवलेली असते. आजूबाजूला ऋषीमुनी सुद्धा दाखविलेले असतात. ब्रह्मदेवाची मूर्ती बसलेली किंवा उभी सुद्धा असते. ब्रह्मदेवाचा संबंध हा यज्ञाशी व विश्वनिर्मितीशी असल्या कारणाने त्याच्या हातात शस्त्रे नाहीत तर निर्मितीची साधने आहेत.

अशा प्रकारे ब्रह्मदेवाच्या निरनिराळ्या आकारातील पाषाणातील किंवा धातूमधील घडवलेल्या मूर्ती आपल्याला अनेक ठिकाणी बघायला मिळतात. वर उल्लेखलेल्या संकेतांप्रमाणेच

त्या घडवलेल्या असतात. वेगवेगळ्या काळांमध्ये तयार झालेल्या असतील तर त्यांची शैली, कोरीवकामातील स्वरूप यामध्ये फरक दिसून येतो. एकट्या ब्रह्मदेवाबरोबरच ब्रह्मा, विष्णू आणि शंकर असे त्रिमूर्ती स्वरूपात सुद्धा हे तिघेही बऱ्याचदा दिसून येतात. ह्या मूर्तींना त्रिमूर्तीच म्हणतात. त्यांचा पुढे सविस्तर अभ्यास होणारच आहे.

### ३.१७ ब्रह्मदेवाची उपासना

**ब्रह्मा कृतयुगे पूज्यस्त्रेतायां यज्ञ उच्यते ।**

**द्वापरे पूज्यते विष्णुरहं पूज्यश्चतुर्वपि ।।**

**(वायु पुराण ३२/२१)**

अर्थ : कृतयुगात ब्रह्मा हा पूज्य, त्रेता युगात यज्ञ पूज्य, द्वापर युगात विष्णू पूज्य तर मी–शिव चारही युगात पूज्य आहे. या श्लोकावरून आधी ब्रह्मदेवाची उपासना होत असावी असे वाटते. त्यानंतर वैदिक धर्मात यज्ञ याग आदि गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले असावे. आधी आपण पाहिलेच आहे की ब्रह्मा हा देव व दानव दोन्हीचा पिता असल्याचे म्हटले आहे. दोघांनीही वर मिळवण्यासाठी किंवा काही विशेष शक्ती मिळवण्यासाठी ब्रह्मदेवाची उपासना केल्याचे दिसते. मग पुढे वैदिक धर्माचा उगम आणि यज्ञ–याग इत्यादींचे महत्त्व वाढत जाऊन ब्रह्मदेवाचे महत्त्व कमी झाल्याचे दिसते. मग ब्रह्मदेव हा फक्त असुरांचा देव असेच त्याचे स्वरूप राहिले असावे. (जोशी, खंड ६, १९९६ : ३१५) अनेक असुरांनी किंवा दैत्यांनी वर मिळवण्यासाठी ब्रह्मदेवाची उपासना केल्याचे आपण आधी पाहिलेच आहे.

ब्रह्मदेवाची पूजा किंवा उपासना निश्चितपणे होत असणार ह्याबद्दल तारापद भट्टाचार्य असे म्हणतात की पूर्वी शैव व वैष्णव ह्यांच्या प्रमाणेच ब्रह्मदेवाचाही एक संप्रदाय होता. त्याचे दोन गट होते. काही लोक ब्रह्मदेवाची पंचमहाभूतांच्या स्वरुपात उपासना करत तर काही यज्ञाच्या. या पहिल्या प्रकारच्या लोकांना असुर असे नाव होते आणि त्यांच्या पंथाला पंचरात्र पंथ म्हणत असत. हा पंचरात्र पंथ मुळात ब्रह्मदेवाचा होता, विष्णूचा किंवा वासुदेवाचा नव्हता. यात फक्त पाचच तत्त्वांची पूजा होत होती असे नाही तर अनेक तत्त्वांची पूजा केली जात होती आणि ती

सर्व ब्रह्मदेवाचीच रुपे आहेत असे समजले जात असे. परंतु वैदिक धर्माचा प्रसार झाला आणि हा पंथ मागे पडला. (Bhattacharya, 1969 : 52-61)

असे असले तरीही तीन प्रमुख देवतांमधील त्याचे प्रथम स्थान अढळ राहिले. घर बांधताना ब्रह्मशिलान्यास हा पहिला विधि केला जातो. ह्या धार्मिक विधिंमध्ये ब्रह्मा हा प्रमुख पूज्य देव आहे तर वास्तुमंडळातही ब्रह्मदेवाचे स्थान मध्यवर्ती असते. ब्रह्मदेवाच्या लोकप्रियतेचे व प्राचीनत्वाचे उल्लेख महाभारतातील वनपर्वाच्या तीर्थाध्यायातही आहेत. तिथे जी शंभरपेक्षा जास्त तीर्थे वर्णन केलेली आहेत  त्यात काही विष्णुतीर्थे सोडल्यास बाकी सर्व ब्रह्मा, शिव, पितर आणि धर्म यांची आहेत. (राशिवडेकर, १९०४ : १६९–१९७)

ब्रह्मदेवाची उपासना होत होती म्हणूनच त्याची मंदिरेही आढळतात. अर्थात हे प्रमाण शिव किंवा विष्णू यांच्या तुलनेत अगदीच कमी असले तरी त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही अशी ती स्थाने आहेत. यामध्ये सर्वांत महत्त्वाचे आहे ते म्हणजे 'पुष्करतीर्थ'. भारतामधील हे एकमेव असे मंदिर आहे जे आज ब्रह्मदेवाचे म्हणून प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. इतरही ठिकाणी ब्रह्मदेवाची मंदिरे आहेत; पण तीर्थक्षेत्र म्हणावे असे हे एक प्रमुख स्थान आहे. बऱ्याच धार्मिक ग्रंथांमधून पुष्करक्षेत्राविषयी विस्तृत वर्णने केली आहेत. त्या बद्दल आता जाणून घेऊ या.

## पुष्करतीर्थ

हे राजस्थानातील अजमेर जिल्ह्यातील एक पुण्यक्षेत्र असून ह्या ठिकाणी मंदिर आणि पुष्कर सरोवर ह्या दोन्हीलाही खूप महत्त्व आहे.

**यथा सुराणां सर्वेषामादिस्तु पुरुषोत्तम: ।**

**तथैव पुष्करं राजंस्तीर्थानामाद्रिरुच्यते ।।**

**(पद्म पुराण सृष्टी खंड अध्याय ११ श्लोक ३१)**

अर्थ: ज्याप्रामाणे देवांचा आदि पुरुषोत्तम आहे त्याचप्रमाणे सर्व तीर्थांचा आदि पुष्कर आहे. ह्या अकराव्या अध्यायाचे नावच पुष्करतीर्थ माहात्म्य असे आहे. पुष्कराची गणना पंचतीर्थात केली जाते. पुष्कर, कुरुक्षेत्र, गया, गंगा व प्रभास ही ती पाच तीर्थे आहेत. (आपटे, १९८३ : १५–१६) नाशिक येथील पांडवलेण्यामध्ये एक शिलालेख आहे त्यानुसार उषवदात हा

दिनिकाचा मुलगा व नहापान राजाचा जावई पुष्करला येऊन स्नान करुन गेल्याचे आणि दान दिल्याचे उल्लेख आहेत. हा लेख इ स १२५ म्हणजे दुसऱ्या शतकातील आहे. ह्या लेखात ३००० गायींचे दान दिले असल्याचा सुद्धा उल्लेख आहे. (Salomon, 1998 : 86-87) नाशिक येथील हा लेख फारच महत्त्वपूर्ण आहे. नाशिक पुष्करपासून बरेच लांब असल्यामुळे पुष्करची महती दूरवर पसरली होती असे आपण म्हणू शकतो. तसेच पाच सरोवरात देखील पुष्कर महत्त्वाचे मानले गेले आहे. मानस, पुष्कर, बिन्दु, नारायण व पंपा ही ती पाच सरोवरे आहेत. पुष्कर तीर्थाचे वर्णन करताना पद्म पुराणामध्ये पुढील माहिती दिलेली आहे. जो चंद्राप्रमाणे उज्वल व स्वच्छ आहे, ज्याच्यात हत्तीच्या सोंडेच्या आकाराच्या मगरी इकडे तिकडे फिरल्यामुळे फेस निर्माण होतो, ब्रह्मदेवाच्या कथा वार्ता ऐकण्यात व व्रत नियमात रमलेले श्रेष्ठ ब्राह्मण ज्याचे सेवन नेहेमीच करतात. ओंकाराच्या जपाने विभूषित अशा त्रिभुवनगुरुने म्हणजेच ब्रह्मदेवाने आपल्या दृष्टीने ज्याला पवित्र केले आहे; जे पिण्यास स्वादिष्ट आहे; आपल्या विशालतेमुळे जे रमणीय झालेले आहे; ते पुष्कर तीर्थ आपल्या पापहारी जलाने आम्हास पवित्र करो.

ह्या विषयी पद्म पुराणात एक कथा आहे ती अशी; एकदा ब्रह्मदेव भुलोकी विहार करत असताना ह्या ठिकाणी त्याने एक निबीड अरण्य पाहिले. हे अरण्य पाहताच तो त्या अरण्यात शिरला. त्याच्या येण्याने सारे वृक्ष आनंदून गेले आणि त्यांनी ब्रह्मदेवाचे छान आदरातिथ्य केले. त्यामुळे ब्रह्मदेव प्रसन्न झाला. तुम्ही या वनातच निवास करा अशी इच्छा वृक्षांनी व्यक्त केली. त्याने तथास्तु म्हटले. ब्रह्मदेव त्या अरण्यात आला त्यावेळेस त्याच्या हातात तीन पुष्करे म्हणजेच कमळे होती. ही तीन कमळे तीन ठिकाणी पडली व तिथे तीन सरोवरे निर्माण झाली. ज्येष्ठ, मध्य व कनिष्ठ पुष्कर अशी त्यांची नावे आहेत.

तसेच पुढे तीर्थक्षेत्राचे वर्णन करताना असेही म्हटले आहे की चांद नदीच्या उत्तरेस प्राची नदीपर्यंत व नंदन नावाच्या स्थानापासून ते क्रम्य ह्या स्थानापर्यंत जी भूमी आहे ती पुष्कर नावाने प्रसिद्ध झाली. तेथेच ब्रह्मदेवाने यज्ञासाठी वेदी निर्माण केली. ज्येष्ठ पुष्कर ब्रह्मदेवाचे, मध्य पुष्कर विष्णूचे तर कनिष्ठ पुष्कर शिवाचे म्हणून प्रसिद्ध झाले. या ठिकाणी सदैव ब्रह्मदेवाचा निवास असतो. सर्व वर्णाश्रमांच्या पुरुष व स्त्रियांनी येथे निवास करावा. आपापल्या आचारधर्माचे पालन करावे. पुष्करला राहणाऱ्या लोकांना ममता, अहंकार, आसक्ती यांची ओळखही नसते.

पुष्करक्षेत्रात ज्यांना मृत्यू येतो त्या सर्वांना ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. ह्या क्षेत्रात राहणारे लोक सत्य युगात बारा वर्षे, त्रेता युगात एक वर्ष व द्वापारात एक महिना राहून जे फळ मिळवितात ते कलियुगात पुष्कर येथे केवळ एक दिवस राहिल्याने मिळते. पुष्करक्षेत्राची यात्रा केल्यानेच माणसास राजसूय व अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. ब्रह्मदेवाच्या विनंतीवरून ह्या सरोवरात सरस्वती नदीनेही प्रवेश केलेला आहे. चैत्र शुद्ध चतुर्दशीला येथील स्नानाला विशेष महत्त्व आहे. या ठिकाणी देव व पितरांना तर्पण दिल्याने मनुष्य विष्णुलोकात जातो. कार्तिक पौर्णिमेस जर कृत्तिका नक्षत्र असेल तर त्या दिवशीच्या स्नानाला महत्त्व आहे. कनका, नंदा, प्राची, सुप्रभा आणि सरस्वती असे पाच जलस्रोत येथे आहेत. या ठिकाणी उपासना केल्यास पौंडरीक यज्ञाचे फळ मिळते. ह्या ठिकाणी स्वत: ब्रह्मदेवाने यज्ञ केला होता. यज्ञासाठी सप्तर्षि, देव, गंधर्व, अप्सरा पुष्करला आले. ह्या यज्ञात देवर्षि नारद ब्रह्मा झाले, देवराज इंद्र होता झाला, अंगिरा उद्धाता झाला, पुलह प्रस्तोता झाले तर पुलस्त्य अध्वर्यू झाले. यज्ञ संपन्न झाला. ह्यानंतर अनेक दाने दिली गेली. यज्ञासाठी अनेक ऋषीमुनीही उपस्थित होते; त्यांनी पुष्करच्या जलात मुख पाहिल्याने अनेकांची रुपे सुंदर झाली. त्यांनी ह्या सरोवरास मुखदर्शन सरोवर असे नाव दिले. मग ब्रह्मदेवाने शिव आणि विष्णूची स्तुती केली. पृथ्वीवरील आपले स्थान कुठे असेल हे सांगताना ब्रह्मदेव सांगतो की पुष्करात मी देवश्रेष्ठ ब्रह्मदेव म्हणून प्रसिद्ध आहे, गयेत चतुर्मुख तर कान्यकुब्ज देशात मी वेदगर्भ या नावाने प्रसिद्ध आहे. भृगुकक्षात मी पितामह आहे तर कावेरी तटावर सृष्टीकर्ता आहे. नंदिपुरीत बृहस्पती, प्रभास क्षेत्री पद्मजन्मा, किष्किंधेत सुरप्रिय, द्वारकेत ऋग्वेद, विदिशेत भुवनाधिप, पौंड्रकमध्ये पौंडरीकाक्ष, हस्तिनापुरी पिङ्गाक्ष, जयंतीत विजय, उगर देशात पद्महस्त, श्यामलापुरीत भवोरूद्र तर पाटलीपुत्रात ब्रह्मा ह्यानावे ओळखला जातो. ह्या स्थानी येऊन जो कोणी माझे दर्शन घेईल तो ब्रह्मलोकास पात्र होईल. (जोशी,१९८० : २३५)

ह्याच संदर्भात आणखी एक कथा पुष्कर मध्ये सांगितली जाते ती अशी, ब्रह्मदेव ह्या भागावरून जात असताना वज्रनाभ नावाचा राक्षस स्वत:च्याच मुलांना ठार मारत असलेला त्याला दिसला. तेव्हा आपल्या हातातील कमळ त्या राक्षसावर फेकून ब्रह्मदेवाने त्याचा वध केला. त्यावेळी ह्या कमळाच्या तीन पाकळ्या खाली पडल्या. जिथे ह्या पाकळ्या पडल्या तिथे झरे फुटले व तीन तळी निर्माण झाली; ही तळी म्हणजेच ज्येष्ठ, मध्य आणि कनिष्ठ पुष्कर. ह्याच ठिकाणी कण्व मुनींचा आश्रम होता अशीही आख्यायिका प्रचलित आहे. कण्व मुनींनीच शकुंतलेचे

संगोपन केले होते. दुष्यंत आणि शकुंतला ह्याची भेट सुद्धा ह्याच ठिकाणी झाली होती. कण्व मुनींनीच त्यांचा विवाह लावून दिला तसेच शकुंतलेचा दुष्यंताने त्याग केल्यावर ती परत ह्याच आश्रमात राहत होती असे सांगितले जाते. (स्थानिक ग्रामस्थ) पुण्यक्षेत्र म्हणून ह्या सरोवराला खूप महत्त्व आहे.

पुष्कर क्षेत्रात ब्रह्मदेवाच्या मंदिराविषयी सांगितली जाणारी आणखी एक कथा पुढीलप्रमाणे, ब्रह्मदेवाने या ठिकाणी यज्ञ करायचे ठरविले. त्या यज्ञाचा मुहूर्त काढण्यात आला. तेव्हा ठरलेल्या वेळी यज्ञासाठी तयार होऊन येण्याचा निरोप घेऊन नारदाला पाठवले. नारदाने विचार केला की आपण भांडणे लावण्यात चतुर आहोत परंतु आपण आपले वडील ब्रह्मदेव व सावित्री यांच्यात अजून भांडण लावलेले नाही. मग नारदाने सावित्रीला मुहूर्ताची चुकीची वेळ सांगितली आणि यज्ञासाठी येण्याचा निरोप दिला. इकडे यज्ञाची तयारी पूर्ण होऊन मुहूर्ताची वेळ जवळ येऊ लागली तरीही सावित्री आली नाही. शेवटी मुहूर्ताची वेळ येऊ लागते तशी ब्रह्माने इंद्राला सांगितले की यज्ञ पत्नी म्हणून एखादी कन्या घेऊन ये तिच्याशी विवाह करून मग यज्ञ संपन्न करीन. मग इंद्र ब्रह्मदेवासाठी पत्नी शोधायला बाहेर पडला तेव्हा त्याला एक गुर्जर गवळ्याची कन्या दिसली. मग तिच्याशी ब्रह्मदेवाचा विवाह करून देण्याच्या विचाराने इंद्र त्या मुलीला घेऊन यज्ञस्थळी आला. परंतु एका गवळ्याच्या मुलीशी साक्षात ब्रह्मदेवाचा विवाह कसा काय होणार? म्हणून तिचे शुद्धीकरण करायचे ठरले. त्यासाठी एका गायीच्या समोर तिला नेऊन गायीच्या माध्यमातून तीन वेळा तिचे शुद्धीकरण केले गेले, म्हणून तिचे नाव 'गायत्री' असे झाले. ह्या गायत्री बरोबर ब्रह्माने विवाह केला आणि यज्ञासाठी तिला बरोबर बसविले व यज्ञ सुरू करतो. त्यानंतर नारदाने सांगितलेल्या वेळेला सावित्री तिथे पोहोचली परंतु आपल्या जागी दुसऱ्या स्त्रीला पाहून तिचा राग अनावर झाला. मग तिला सर्व समजले आणि तिने पाच जणांना शाप दिला. पहिला शाप तिने नारदाला दिलो की स्वतःच्या मातापित्यांमध्ये भांडण लावल्यामुळे तू कायम अविवाहित राहशील. मग दुसरा शाप तिने इंद्राला दिला की दुसरा विवाह करण्यासाठी तू ब्रह्मदेवाला मदत केली असल्याने तुला कायम तुझ्या पदाचे भय राहील. इंद्राला कायम त्याच्या पदाचे भय असते हे आपण जाणतोच. मग तिसरा शाप तिने गायीला दिला की तुला अतिशय पवित्र मानले जाईल परंतु तू तोंडाने अपवित्र राहशील. गाय घाण खाते किंवा विष्ठा खाते त्यामुळे ती तोंडाने अपवित्र झाली. त्यानंतर सावित्रीने अग्नीला शाप दिला व ती म्हणाली की तुझ्यासमोर अधर्म घडत आहे

हे माहीत असूनही तू तो घडू दिलास म्हणून कलियुगात तुझा सतत अपमान होईल. त्याप्रमाणे धूम्रपान इत्यादीसाठी वापरला जातो व बरेचदा अग्नी पायाखाली विझवला जातो म्हणजे एक प्रकारे त्याचा अपमानच होतो. मग तिने ब्रह्मदेवाला शाप दिलो की पुष्कर सोडल्यास कुठेही तुझे पूजन होणार नाही, तू अपूज्य होशील, तुझे कुठेही मंदिर होणार नाही आणि झाले तर मी ते उद्ध्वस्त करीन. एवढे बोलून सावित्री रागावून तिथून निघून गेली आणि पुष्करच्या बाजूच्याच एका टेकडीवर जाऊन बसली. म्हणून मग तेव्हापासून ब्रह्मा अपूज्य झाला आणि त्याचे कुठेही दुसरीकडे मंदिर नाही. (मंदिराचे महंत यांनी स्वतः ही कथा सांगितली. जानेवारी २०१५) त्या टेकडीवर सध्या सावित्रीचे मंदिर आहे. त्याच डोंगराच्या समोर अजून एक डोंगर आहे त्यावर



**चित्र क्र. १ जगद्पिता ब्रह्मा मंदिर, पुष्कर**

गायत्रीचे मंदिर आहे. हे गायत्रीचे मंदिर एक शक्तिपीठ आहे. सतीचा मणिबंध या ठिकाणी गळून पडला आणि हे शक्तिपीठ झाले. ब्रह्मदेवाचे दर्शन घेतल्यावर सावित्रीचे आणि गायत्रीचे दर्शन घेतल्यानेच यात्रा पूर्ण होते असे इथल्या लोकांचे मानणे आहे. या क्षेत्रात पुष्करतीर्थामध्ये स्नान व ब्रह्मदेवाचे दर्शन या दोन प्रमुख गोष्टी आहेत. पुष्कर सरोवराभोवती ब्रह्मघाट, गौघाट, बदरीघाट असे ५२ निरनिराळे घाट आहेत. या ठिकाणी पितरांचे श्राद्धविधि केल्यास त्यांना गती मिळते अशीही एक समजूत आहे. अशा प्रकारचे विधि येथे अतिशय माफक दरात कुठल्याही जबरदस्तीशिवाय अतिशय शांतपणे केले जातात. त्याचबरोबर या सरोवरात अस्थी विसर्जन करण्यासही अनेक लोक येतात. सरोवराचा परिसर अतिशय स्वच्छ आहे.

ब्रह्मदेवाच्या मंदिराचे नाव जगद्‌पिता ब्रह्मा मंदिर असे आहे. हे मंदिर एका उंच चौथऱ्यावर बांधलेले असून ह्याचे बांधकाम आठव्या शतकातील आहे आणि आदि शंकराचार्यांनी सर्वप्रथम इ.स. ७१८ मध्ये याचा जीर्णोद्धार केला असे इथे सांगितले जाते. विश्वामित्र ऋषींनी हे मंदिर बांधले अशीही आख्यायिका ह्या भागात प्रचलित आहे. मुघल आक्रमणात ह्या मंदिराची बरीच पडझड झाली होती. सध्याचे जे मंदिर आहे त्याचा जीर्णोद्धार इ.स.१४०१ मध्ये रतलामचे महाराजा जवंतराज यांनी केला आहे. (Rajputana Gazetteer Vol.1A, 1904 : 18-20)



**चित्र क्र. २ ब्रह्मदेव मूर्ती, पुष्कर**

नागरशैली मधील मंदिर तसे लहानच आहे. अर्धमंडप, सभामंडप आणि गर्भगृह असे तीनच भाग आहेत. मंदिराचे मुख्य शिखर सत्तर फूट उंच आहे. मंदिराचे आवार फार प्रशस्त नसले तरी मोठे आहे. सभामंडपात चांदीचे कासव आहे तर गर्भगृहाच्या दरवाजावर हंसाची प्रतिमा पाहायला मिळते. मंदिराचे बांधकाम संगमरवरी आहे परंतु खांब व शिखर रंगविलेले आहे. गर्भगृहात ब्रह्मदेवाची कमळात बसलेली मूर्ती आहे. ही मूर्ती देखील संगमरवरी असून मूर्तीला चार मुखे असून उजव्या बाजूला सावित्री आणि गायत्री दोन्ही असून सनकादिकांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. ह्या मूर्तीला तिथे 'चौमूर्ती' असे म्हणतात. मूर्तीच्या हातात प्रदक्षिणाक्रमाने अक्षमाला, पुस्तक, कुश आणि कमंडलू आहेत. मागच्या बाजूचे मस्तक दिसावे म्हणून पाठीमागे आरसा लावलेला आहे. बाजूच्या भिंतीवर मोर देखील आहे.

मंदिराची सर्व व्यवस्था गोसावी किंवा संन्यासी लोकांकडे आहे. मंदिराचे मुख्य पुजारी हे पराशर गोत्राचे असतात. संसारी लोकांना मंदिराच्या गर्भगृहात प्रवेश नाही. संन्यासीपंथाचे लोक असल्यामुळे असेल परंतु इथे ब्रह्मदेवाचा म्हणून गुरुवारच मानला जातो. उपवास इत्यादी गुरुवारी केले जातात. दररोज तीन वेळा आरती होते. सकाळी होते ती मंगल आरती, सांज आरती आणि रात्री शयन आरती किंवा शेजारती.

**ब्रह्मदेवाची आरती**

**पितु मातु सहायक स्वामी सखा, तुम ही एक नाथ हमारे हो ।**
**जिनके कुछ और आधार नही, तिनके तुम रखवारे हो ।**
**सब भाँति सदा सुखदायक हो, दुःख निर्गुण नाशन हारे हो ।**
**प्रतिपाल करो सिगरे जग को, अतिशय करूणा उर धारे हो ।**
**भुली है हम तो तुमको, तुम तो हमरी सुधि नाही बिसारे हो ।**
**उपकारण कछु अन्त नही, छिन ही छिन जो विस्तारे हो ।**
**महाराज महा महिमा तुम्हरी, मुझसे बिरले बुधवारे हो ।**
**शुभ शांति निकेतन प्रेमनिधि, मन मंदिर के उजियारे हो ।**
**इस जीवन के तुम जीवन हो, इन प्राणन के तुम प्यारे हो ।**
**तुम सों प्रभु पाय 'प्रताप' हरि, केही के अब और सहारे हो ।**

ह्या शिवाय एक संस्कृत आरती देखील म्हणतात. ती अशी

**जयदेव जयदेव वन्दे पौष्करंभज वन्दे पौष्करं ।**

**ब्रह्मा हरिश्वरतीर्थ प्रवणात्मक रुपं ।।**

**ॐ स्वच्छं चन्द्रप्रकाशितं शोभितं मवदातं मवदातं मुनिजन मानसहंस सेवितपद कमलं ।**

**द्विजवर वंदित नित्यं भवकृत पापहरं पापहरं शुद्ध स्फटिक स्वरूपं मनसित तापहरं ।।**

**यज्ञाचल नीलाचल रत्नाचल निलेह तेष्वपि निर्मल तोयंअगणित घृत रुपं ।**

**धर्मात वितृषातो प्रवशित तव कमलं पापरताय मनुजा प्राणी त्यमरपद्म।।**

**सावित्री जगदम्मा रत्नाचल निलेह तस्या वृष्ट्रा रुपं तीर्थ पापहरं ।**

**विजियाते घृत रुपं जाल्व शाम्ब शिवम्अटपट रुप नित्यं सेवित तव तोयं ।।**

**भूम्योद्धारण कारणघृत शूकर रुपं विष्णुयस्मिन तीर्थेरूपम् ।**

**श्वेतधरम्य नैऋत्यकोणे संस्था शिवदूती मुखदा कोमल विल्वैर पुष्पैराचति विमल जमम् ।।**

**पद्मक योगे मनुजा पौष्करं स्नान रता तेषाम्पाप हरतं नमामि सुरबन्धं ।**

**भक्तया ध्यायेति नित्यं अगणित दुःखहर तइदं पौष्करं वन्दे मुनिजन ज्ञानप्रदम् ।।**

**तीर्था रात्रिक समये ध्वयं तव रुपं देवांग नागांगन गीत तवचरितं ।**

**पौष्करं पंचश्लोक पठ्यत्ति तयो भक्तया स्वयाति परमस्थानं सुरनरं मुनिवंद्यं ।।**

मंदिर आणि परिसरात स्वच्छता आहे. श्राद्ध व तर्पण विधि करण्याकरिता विशेष गर्दी असते. त्याकरिता मंदिराच्या ट्रस्टचे पुजारी आहेत. इतर क्षेत्रात चालते तशी गिऱ्हाईक



**चित्र क्र. ३ पुष्कर तीर्थ, पुष्कर**

मिळविण्यासाठीची चढाओढ अजिबात नाही. पूजा देखील आपल्याला कोणती करायची आहे ती ठरवून त्याप्रमाणे देवस्थानाकडे पैसे देऊन, पूजेला लागणारी सामग्री घेऊन लगेच पूजा संपन्न होते.

ह्या क्षेत्रात ब्रह्मदेवाशिवाय आत्मेश्वर, बद्रीनारायण, वराह अशी अनेक मंदिरे आहेत. विष्णूचा वराह अवतार इथेच ब्रह्मदेवाच्या नाकपुडीतून झाला अशीही एक समजूत आहे. तसेच विनशन क्षेत्रात लुप्त झालेली सरस्वती नदी या ठिकाणी पुन्हा प्रकट झाली आहे असेही मानतात. मंदिरापासून जवळच असलेल्या यज्ञ पर्वतावर अगस्त्य ऋषींचा आश्रम होता असेही म्हणतात. विश्वामित्र ऋषींनी या ठिकाणी तपश्चर्या केल्याचा उल्लेख रामायण बाल कांड ६२ मध्येही आढळतो. (शर्मा, १९२७ : ४१५) कार्तिक शुक्ल एकादशीपासून ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत ब्रह्मदेवाने येथे यज्ञ केला होता म्हणून कार्तिक पौर्णिमेला पुष्कर सरोवरात स्नान करणे अतिशय पवित्र मानले जाते. त्यामुळे कार्तिक महिन्यात येथे मोठ्या प्रमाणावर यात्रेकरूंची ये जा असते. या बद्दल स्थानिक लोक एक कथा सांगतात ती पुढीलप्रमाणे; ह्या अतिशय पवित्र अशा सरोवरात स्नान केल्याने स्वर्गप्राप्ती होत असे. परंतु देवांनी यावर आक्षेप घेतला आणि असे करण्यामुळे स्वर्गात गर्दी होत असल्याची ब्रह्मदेवाकडे तक्रार केली. तेव्हापासून कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा ह्या पाच दिवसांत जे ह्या सरोवरात स्नान करतील त्यांनाच स्वर्गप्राप्ती होईल असे ब्रह्मदेवाने सांगितले; म्हणूनच कार्तिक महिन्यात येथे असंख्य भाविक स्नानासाठी येतात. राजपुताना दर्शनिकेमध्ये वरील कथा आणि बाकीचे उल्लेख नोंदवलेले आहेत. १९०४ सालच्या ह्या पुस्तकात कार्तिक महिन्यात एक लाख भक्तगण, यात्रेकरू इथे स्नान करण्यासाठी येत असल्याचे म्हटले आहे. त्यावरून सध्याच्या काळात येणाऱ्या यात्रेकरूंच्या संख्येचा अंदाज येईल. तसेच लुप्त झालेली सरस्वती नदी ह्या सरोवरात पाच वेगवेगळ्या प्रवाहातून पुन्हा प्रकट झाली आहे असाही एक समज आहे. कार्तिक महिन्यातच पुष्करचा प्रसिद्ध मेळा भरतो. यात उंट, गाढव असे प्राणी विक्रीसाठी येतात. आशिया खंडातील हा सर्वात मोठा उंटांचा बाजार असतो. हा मेळा बघण्याकरिता अनेक परदेशी पर्यटक गर्दी करतात. (Rajputana Gazetteer Vol.1A, 1904 : 18-20)

महाभारतातील वनपर्व येथे पुष्कर यात्रा केल्याने दहा अश्वमेध यज्ञ केल्याचे फळ मिळते असे वर्णन केलेले आहे. (राशिवडेकर, १९०४ : १७०) ब्रह्मदेवासाठी म्हणून असलेले हे एकच

मंदिर असल्याचेही इथे सांगितले आहे. बाकी काही ठिकाणी सुद्धा ब्रह्मदेवाची मंदिरे आहेत परंतु ह्या मंदिरासारखे महत्त्व किंवा तीर्थक्षेत्र म्हणता येईल असे खरेच हे एकच मंदिर आहे असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही.

## वसंतगड

राजस्थानातील सिरोही जिल्ह्यात पिंडवारा स्टेशनजवळ हे वसंतगड नावाचे छोटे गाव आहे. ह्या गावात सापडलेल्या शिलालेखांवरून ह्या गावाची प्राचीनता सहज लक्षात येते. ह्या गावात बऱ्याच मंदिरांचे भग्न अवशेष आढळतात. वसंतगड येथे एक किल्ला आहे, त्याची पडझड बरीच झाली आहे. त्याच्या पश्चिमेला एक टेकाड आहे; त्या टेकाडाच्या पायथ्याशी बऱ्याच मंदिरांचे अवशेष आहेत. यातील मध्यभागातील एक मंदिर शिवाचे असून ते तेवढे बरेचसे शाबूत आहे. बाकीची मात्र फारच भग्न आहेत. तेथूनच थोडी पुढे सरस्वतीबाव आहे. ह्या विहिरीजवळ एक छत्री असून तिच्याखाली नाभीकमलातून जन्मलेला ब्रह्मा असणारा शेषशायी विष्णू आहे. येथे एक शिलालेख असून १०४२ मध्ये परमार राजा पूर्णपालाची विधवा बहीण लाहिनी हिने त्या विहिरीची डागडुजी केली असल्याचे त्यात म्हटलेले आहे. इथेच थोडे पुढे ब्रह्मदेवाच्या मंदिराचे अवशेष आहेत. ह्या अवशेषांवरून हे मंदिर सातव्या शतकातील असावे असे वाटते. ह्या देवळामध्ये एक पूर्णाकृती उभी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. मूर्तीला तीन मुखे आहेत व मागे प्रभावळ आहे. हात मात्र दोनच असून एका हातात अक्षमाला तर दुसऱ्या हातात कमंडलू आहे. ह्या मंदिर समूहात एक मंदिर सूर्याचेही आहे व हेच मुख्य मंदिर असावे असे वाटते. ह्या भागातील हा मंदिर समूह सर्वांत प्राचीन असा आहे. यावरून वसंतगड हे प्राचीन गाव असावे असा अंदाज लावता येतो. ११ व्या शतकापर्यंत ह्याचे नाव वटपुरा असे होते. १५व्या शतकात हे वसंतपुरा असे झाले; ज्याचेच पुढे वसंतगड असे नाव रूढ झाले. (Gazetteer Sirohi, 1967 : 441- 443)

## छिंच



**चित्र क्र. ४ ब्रह्मदेव मूर्ती, छिंच**

राजस्थानात बांसवाडा जिल्ह्यात शहराच्या नैऋत्येला ११ कि.मी. वर हे छिंच नावाचे छोटे गाव आहे. या ठिकाणी १२व्या शतकातील एक दगडी बांधकाम असलेले एक ब्रह्मदेवाचे मंदिर आहे. ह्याचा सभामंडप प्रशस्त असून त्याच्या खांबांवर सुंदर कोरीवकाम केलेलं आहे. गर्भगृहात वेदीवर एक १.८२ मीटर उंचीची उभी, सुबक कोरीवकाम असलेली ब्रह्मदेवाची मूर्ती होती. ती भग्न झाल्यामुळे सध्या ह्या मंदिराच्या बाहेर ठेवण्यात आलेली आहे. ही मूळ मूर्ती भग्न झाल्यामुळे १५ व्या शतकात राजा महारावल जगमालच्या काळात तशीच पण छोटी ब्रह्मदेवाची मूर्ती त्या वेदीवर स्थापन करण्यात आली. ही नवी मूर्ती जुन्या मूर्ती एवढी सुंदर नाही. ह्या मंदिरात लक्ष्मी,

शेषशायी विष्णू, महादेव ह्यांच्याही मूर्ती आहेत आणि एका स्तंभावर १५व्या शतकातील एक लेख असून त्यावरून देवदत्त राजाने ह्या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे स्पष्ट होते. मंदिराजवळच एक तलाव असून त्यावर घाट बांधलेला आहे. ह्या तलावाचे नाव ब्रह्मा तलाव असेच आहे. (ओझा, १९९८ : २०–२२)

## खेडब्रह्म

पुष्कर येथील मंदिराच्या खालोखाल कोणत्या मंदिराला महत्त्व असेल तर ते हे खेडब्रह्म येथील मंदिर. गुजरातमधील सध्याच्या साबरकंठा जिल्ह्यात हे मंदिर असून हरणाई, कोसंबी आणि भीमाशंकरी ह्या नद्यांच्या संगमावर आहे. (Gazetteer of the Bombay Presidency, 1901 : 549) येथे ब्रह्मा, अंबिका आणि पंखनाथ महादेव अशी तीन महत्त्वाची मंदिरे आहेत. मंदिरांबरोबरच इथे पायऱ्या असलेल्या दोन विहिरी आहेत. ब्रह्मा बाव व अदिती बाव अशी त्यांची नावे आहेत. आदिती वाव येथील १३व्या शतकातील शिलालेखावरून हा प्रदेश पूर्वी खूपच समृद्ध होता. तसेच इथे अनेक मंदिरे व विहिरी होत्या असे दिसते. ह्या प्रदेशावर आधी भिल्ल राजा तारासंग ह्याची सत्ता होती; त्याचा पराभव परमार राजांनी केला आणि त्यानंतर ह्या भागावर



**चित्र क्र. ५ ब्रह्मदेव प्रतिमा, खेडब्रह्म**

पाटणच्या चौलुक्य राजवटीची सत्ता होती. मग परिहार राजपूत राजांच्या सत्तेत हा भूभाग आला आणि १३व्या शतकात  ईदर ह्या राज्यात हा प्रदेश आला. राणा मेघाजी ह्या राजाने १४७४ मध्ये ह्या ब्रह्मा मंदिराची डागडुजी केली. म्हणजेच १३व्या शतकाच्या आधी ह्या ठिकाणी परमार, चौलुक्य आणि परिहार राजवट होती. सध्याचे हे मंदिर चौलुक्य राजा कर्ण याने ११व्या शतकात बांधलेले आहे. १५'' लांब १०'' रुंद व ४'' उंच अशा विटांचा वापर करून चौथऱ्याचा भाग बांधलेला आहे. गर्भगृहाचा भाग आणि चौथरा मात्र टिकून राहिला आहे आणि त्यावर देवदेवता व अप्सरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यावर मंदिराचा कळस आणि सभामंडपाचा काही भाग नंतर नव्याने बांधलेला आहे. मंदिरातील कोनाड्यात ब्रह्मदेवाच्या मूर्ती देखील आहेत.  मंदिराच्या आतील भागात मात्र कोरीव काम नाही. गर्भगृहातील ब्रह्मदेवाची मूर्ती १.६७ मीटर उंचीची आहे. ही मूर्ती मूळची नसावी किंवा जुन्याच भग्न मूर्तीवर व्हाइट सिमेंटचा थर देऊन ती पुन्हा सांधली असावी. (Inamdar, 1936 : 12-14) या ठिकाणी आढळणाऱ्या इतरही शिव, शक्ती आणि सूर्य मंदिरांच्या भग्न अवशेषांवरून ह्या भागाच्या समृद्धतेची साक्ष पटते. दर्शनिकेत दिल्याप्रमाणे ब्रह्मदेवाला स्वतःलाच पवित्र व्हायचे होते. त्यासाठी त्याने विष्णूचा सल्ला घेतला. विष्णूने त्याला



**चित्र क्र. ६  ब्रह्मदेव मंदिर, खेडब्रह्म**

सांगितले की भारतखंडात जंबुद्वीपावर एक योग्य जागा शोधून तिथे यज्ञ कर, यज्ञासाठी चांगले ब्राह्मण मदतीला घे. मग ह्याच ठिकाणी ब्रह्मदेवाच्या सांगण्यानुसार विश्वकर्माने एक नगरी निर्माण केली; चार कोस एवढ्या मोठ्या नगरीला सोन्याची तटबंदी होती व २४ दरवाजे होते. ही नगरी ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून निर्माण झाल्यामुळे ह्याला 'ब्रह्मक्षेत्र' असेही म्हणतात. ह्या नगरीतून हिरण्याक्षी नावाची नदी वाहत होती; हीच आता हरणाई नावाने ओळखली जाते. याच ठिकाणी ब्रह्मदेवाने यज्ञ करायचे ठरविले होते. त्याने यज्ञासाठी मदतनीस म्हणून ९००० ब्राह्मण निर्माण केले. यज्ञ संपन्न झाल्यावर ब्रह्मा पवित्र झाला. मग त्याने १८००० वैश्य निर्माण केले आणि त्यांना कुलस्वामिनी म्हणून क्षीरजा देवीची उपासना करण्यास सांगितले आणि ब्राह्मणांसाठी स्वतःचेच एक मंदिर बांधून दिले; त्यात चतुर्मुखी मूर्ती स्थापन केली. हे मंदिर भृगु ऋषींनी बांधले आणि इथेच भृगु संहिता हा ग्रंथ त्यांनी लिहिला अशीही एक आख्यायिका आहे. सध्या तिथे जी मूर्ती आहे ती नंतर त्या गावातील ब्राह्मणांनी डागडुजी करून स्थापन केलेली आहे तसेच सध्याचे हे मंदिर ११ व्या शतकात चौलुक्य राजा कर्ण याने बांधले आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून ते पांढऱ्या वाळूवर एक प्रकारची प्रक्रिया करून बांधलेले आहे. ह्या पद्धतीला सांगोळ असे म्हणतात. त्या भागात ही अशी बांधकामे खूप ठिकाणी दिसतात.

गर्भगृह व सभामंडप असे दोनच भाग असून मंदिराच्या आतील बाजूस कोरीवकाम नाही. गर्भगृह छोटेसे आहे. एका उंच वेदीवर गर्भगृहात ब्रह्मदेवाची उभी चतुर्मुखी मूर्ती आहे. प्रदक्षिणामार्गाने अक्षमाला, कमळ, स्रुवा व कमंडलू आहे. मूर्तीच्या उजव्या बाजूला गायत्री व डावीकडे सावित्रीच्या मूर्ती आहेत. पायापाशी दोन हंस देखील आहेत. ब्रह्मक्षेत्र माहात्म्य ह्या पुस्तकात या ठिकाणच्या इतरही अनेक मंदिरांबद्दल माहिती मिळते. त्रिवेणीतीर्थ, कोटीतीर्थ, गोत्रतीर्थ, नीलकंठ किंवा शिवतीर्थ अशी महत्त्वाची तीर्थे त्या ठिकाणी असल्याचे म्हटले आहे. (शास्त्री, १९३८ : १९७) यातील कोटीतीर्थात गुप्त सरस्वती प्रकट होते अशीही एक धारणा आहे. भक्त दर पौर्णिमेला त्रिवेणीतीर्थावर स्नान करून नंतर ब्रह्मा आणि अंबाजीमाता यांचे दर्शन घेतात. परंतु मंदिराच्या पूजा तसेच उत्सव ह्या बद्दल काही माहिती समजू शकली नाही. मंदिर ५७ फूट लांब व ३० फूट रुंद तर ३६ फूट उंच आहे. इथे दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात जत्रा भरते. तिथे मारवाड, मेवाड, काठियावाड येथून निरनिराळे व्यापारी येतात. (Gazetteer of the Bombay Presidency, 1880 : 437-438)

## ब्रह्माकरमाळी गोवा



चित्र क्र. ७ ब्रह्मदेव मंदिर, ब्रह्माकरमाळी, गोवा.

गोव्यातील सत्तरी तालुक्यामध्ये ब्रह्माकरमाळी नावाचे एक गाव आहे. जुन्या गोव्यात करमाळी नावाच्या एका गावात एक ब्रह्मदेवाचे मंदिर होते. पोर्तुगीज गोव्यात आले. त्यांनी काही मंदिरांची तोडफोड करायला सुरुवात केली. त्यापासून हे मंदिरही वाचले नाही. परंतु येथील गावकऱ्यांनी ह्या मंदिरातील मूर्ती वेळीच हलवून चांदवडे ह्या गावात आणली. हे गाव जरा लांब आणि दुर्गम भागात असल्याने इथे ती मूर्ती सुरक्षित राहील असे त्यांना वाटले. हेच चांदवडे गाव करमाळीचा ब्रह्मदेव येथे आल्याने ब्रह्माकरमाळी या नावाने ओळखले जाऊ लागले. सुरूवातीला या ठिकाणी अगदी छोटेसे असेच देऊळ होते. नुकतेच म्हणजे २००८ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार होऊन हे सध्याचे नवे मंदिर बांधण्यात आले. मार्गशीर्ष वद्य तृतीयेला ब्रह्मा या गावात आला म्हणून तोच ब्रह्मोत्सवाचा दिवस असतो. या दिवशी मोठा उत्सव असतो. मंदिरातील गर्भगृहात ब्रह्मदेवाची काळ्या पाषाणातील उभी मूर्ती आहे. चतुर्मुखी ब्रह्मा असून त्याच्या मधल्या मुखालाच दाढी असून बाकीच्यांना दाढी नाही. उजव्या खालील हातात अक्षमाला असून तोच हात वरद मुद्रेत आहे. मागच्या उजव्या हातात स्रुक आहे तर मागील डाव्या हातात पुस्तक आहे व पुढील उजव्या हातात आज्यस्थळी म्हणजेच कमंडलू आहे. जटामुकुट आहे. पायापाशी दोन

हंस असून गायत्री व सावित्री यांच्या प्रतिमाही आहेत. या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे मूर्तीच्या मागच्या बाजूला चौथे मुख आणि बाकीचे तपशीलही कोरलेले आहेत. मूर्तीला प्रभावळ देखील आहे आणि ती अतिशय आकर्षक आहे. प्रभावळीवर दशावतारातील काही प्रतिमा कोरलेल्या आहेत. ही मूर्ती कदंबकालीन असून साधारणपणे १२ व्या शतकातील आहे. कदंबकालीन मूर्तिकलेचा उत्तम नमुना आहे.

काही लोकांच्या मते ही मूर्ती इथलीच आहे तर काही लोक सांगतात की ही १४ व्या शतकात येथे आणली गेली. प्रचलित कथेनुसार ही मूर्ती भक्तगण येथे आणत असता ज्या





**चित्र क्र. ८ व ९ ब्रह्मदेव मूर्ती, ब्रह्माकरमाळी.**

ठिकाणी ही मूर्ती जड होईल त्या ठिकाणी मंदिर बांधावे असे देवानेच संगितले होते. त्या प्रमाणे ह्या गावात येऊन मूर्ती जड झाली, जागची हलेनाशी झाली म्हणून या ठिकाणी मंदिर बांधण्यात आले. मंदिर ब्रह्मदेवाचे असले तरीही उपासनेचा दिवस सोमवार आहे. ब्रह्मोत्सवाच्या दिवशी महारुद्र केला जातो तसेच उदकशांत देखील असते, महाप्रसाद असतो व गावजेवण असते. या शिवाय वेगळे कुठलेही यज्ञ होत नाहीत. सध्या संदीप केळकर ह्यांच्याकडे मंदिराची व्यवस्था असून त्यांच्या मागील तीन पिढ्यांपासून त्यांच्याकडे हे परंपरेने आलेले आहे. ही माहिती त्यांनी प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान दिली.

## शिराढोण



चित्र क्र. १० परमेश्वर मंदिर, शिराढोण, नांदेड.

शिराढोण हे गाव कंधार तालुक्यात नांदेड पासून ३० कि.मी. वर आहे. तेथे एका गढीजवळ हे ब्रह्मदेवाचे मंदिर आहे. हे मंदिर परमेश्वर मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. एक छोटा सभामंडप आणि एक गर्भगृह असे छोटेसेच हे मंदिर आहे. गर्भगृहात एका उंच पिठावर ही ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. ही मूर्ती उभी असून १.०५ मीटर उंच आहे. प्रदक्षिणाक्रमाने मूर्तीचा उजवा हात अभयमुद्रेत व त्याच हातात अक्षमाला आहे. उजव्या वरच्या हातात स्रुक तर मागील डाव्या हातात दंड धरलेला आहे. मूर्तीचा डावा खालील हात मनगटापासून तुटलेला असून त्या हातात कमंडलू असावा. चतुर्मुखी मूर्ती असून एकाही मुखाला दाढी मिशा नाहीत. मूर्तीच्या मागील बाजूस सुद्धा चौथे मुख व शरीराचा मागील भाग दाखवलेला आहे. जटामुकुट, कुंडले आणि अनेक दागिन्यांनी मूर्ती नटवलेली आहे. उजव्या बाजूला खाली हंस आहे. खाली पादपीठावर यक्ष व भारवाहकांच्या प्रतिमा आहेत. मूर्तीला अतिशय सुंदर प्रभावळ असून त्यात अष्टदिक्पाल व विद्याधरांचा पट



**चित्र क्र. ११ ब्रह्मा मूर्ती, शिराढोण**

कोरलेला आहे. अष्टदिक्पालांमध्ये इंद्र, यम, अग्नी, निऋती, वरुण, वायु, कुबेर, आणि ईशान आहेत. हे सर्व दिक्पाल पत्नीसह आहेत. ही विशेष अशी गोष्ट आहे कारण विष्णू मूर्तीबरोबर अष्टदिक्पाल दाखविले जातात परंतु ब्रह्मदेवाबरोबर कुठेही आढळत नाहीत. ही मूर्ती राष्ट्रकूट काळातील असून ८व्या किंवा ९व्या शतकातील असावी. परंतु मंदिर मात्र १८व्या किंवा १९व्या शतकातील बांधलेले असावे. (पाठक, २००९ : १३९–१४४)

ब्रह्मदेवाच्या मूर्तीच्या पुढ्यात एक छोटेसे शिवलिंग आहे म्हणूनच याला परमेश्वर मंदिर म्हणत असावेत. मंदिराचे पुजारी म्हणून गणपती गुरव हे काम पाहतात. शिवाचे मंदिर म्हणून सोमवारच्या उपासनेला जास्त महत्त्व आहे. श्रावणी सोमवार, महाशिवरात्र या दिवशी विशेष पूजा असतात. महाशिवरात्रीच्या वेळेस तर २–३ दिवसांचा उत्सवच असतो. श्रावणात यात्रा भरते.

## ब्रह्मा मंदिर भुवनेश्वर

भुवनेश्वर येथील प्रसिद्ध लिंगराज मंदिराच्या बाजूला बिंदुसागर तलाव आहे; ह्या तलावाच्या मध्यभागी हे मंदिर आहे. ह्याची आख्यायिका अशी; लिंगराजाच्या राज्याभिषेक समारंभासाठी ब्रह्मदेव या ठिकाणी आलेला असताना येथील लोकांनी त्याला कायम येथेच राहण्याची विनंती केली. परंतु ब्रह्मदेवाने कायमचे थांबण्यासाठी नकार देतानाच चैत्र महिन्यातील अशोकाष्टमीच्या उत्सवासाठी दर वर्षी येईन आणि लिंगराजाच्या रथयात्रेत त्याच्या रथाचे सारथ्य करीन असे वचन दिले. त्यामुळे ब्रह्मदेवाप्रती असलेला आदर दर्शविण्यासाठी हे मंदिर बांधले गेले. हे मंदिर पंधराव्या शतकातील असावे आणि गजापती राजवटीच्या काळात बांधलेले असावे. मंदिराचे विमान आणि जगमोहन असे दोन भाग असून मंदिर उंच चौथऱ्यावर आहे. मंदिराचे बांधकाम राखाडी वालुकाष्मात केलेले आहे. हे चालू स्थितीतील मंदिर आहे. गर्भगृहात काळ्या क्लोराईट दगडाची कमळातील उभी मूर्ती आहे. मूर्ती चतुर्भुज असून हातामध्ये प्रदक्षिणा क्रमाने अभयमुद्रा, पुस्तक, कमंडलू व अक्षमाला आहेत. डावीकडे सावित्री व उजवीकडे गायत्री आहेत. कमळाखाली हंस असून दोन स्त्री भक्त देखील दाखविल्या आहेत. मंदिरामध्ये रोजची पूजा असते. पंडा घराण्याकडे त्याची व्यवस्था असून कार्तिक पौर्णिमा, अशोकाष्टमी, गुरुपौर्णिमा आणि दिवाळी ह्या दिवशी उत्सव असतात. (Gazetteer of India, Orissa, Cuttack, 1992 : 120)

आत्तापर्यंत केलेल्या संशोधनातून केवळ ब्रह्मदेवासाठी म्हणून असलेली ही महत्त्वाची मंदिरे आहेत.

## ब्रह्मलिंगेश्वर मंदिरे



**चित्र क्र. १२ ब्रह्मा मंदिर, खजुराहो**

ब्रह्मा मंदिर म्हणून अनेक मंदिरे सांगितली जातात जसे की खजुराहो येथील ब्रह्मा मंदिर. परंतु इथे एक मुख्य गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे ही ब्रह्मलिंगेश्वर मंदिरे असतात. मुख्यत्वे ते देऊळ हे शिवाचे असते आणि त्या शिवलिंगात चार बाजूंना चार मुखे कोरलेली असतात आणि म्हणून मग ते ब्रह्मदेवाचे देऊळ आहे असे समजले जाते. खजुराहो येथील हे मंदिर ब्रह्मा मंदिर म्हणूनच प्रसिद्ध आहे परंतु ह्या मंदिराच्या ललाटपट्टीवर विष्णू कोरलेला असल्याने ते विष्णूचे मंदिर असावे. तेथे गर्भगृहातील मुख्य देवता म्हणून शिवलिंग स्थापन केलेले आहे. हे शिवलिंग चार मुखांनी युक्त असल्याने चुकीने हे ब्रह्मा मंदिर असल्याचे रूढ झाले आहे.

याच प्रमाणे चतुर्मुख ब्रह्मा मंदिर म्हणून प्रसिद्ध असलेले चेबरोलू, आंध्र प्रदेश येथील मंदिर देखील ब्रह्मलिंगेश्वर मंदिर आहे. असेच तमिळनाडू येथील तिरूपत्तूर जवळचे ब्रह्मपुरीश्वर मंदिर आहे. इथेही बारा निरनिराळी शिवलिंगे असून मुख्य देवतेला ब्रह्मपुरीश्वर म्हटले जाते. या ठिकाणी ब्रह्मदेवाने शिवाची प्रार्थना केली होती अशी एक लोककथा सांगितली जाते आणि म्हणूनच हे ब्रह्मपुरीश्वर मंदिर आहे. त्यामुळे अशा मंदिरांचा प्रस्तुत प्रबंधात समावेश केलेला नाही.

त्याच प्रमाणे आपल्या महाराष्ट्रातील कोकणात तसेच गोव्यात ब्रह्मा मंदिर असे लिहिलेल्या अनेक पाट्या दिसतात. देवगड रस्त्यावर वैभववाडी स्टेशनजवळ  ब्रह्मदेवाचे मंदिर अशी एक

पाटी वाचून मंदिर बघायला म्हणून गेले असता नुसतेच तीन दगड शेंदूर लावून ठेवलेले दिसले. चौकशी केली असता जर लहान मुलगा वारला असेल तर त्यासाठी हे ब्रह्म मंदिर बांधतात असे कळले; म्हणजे आपल्याकडे मुंजा असतो तसेच ह्याला ब्रह्मा म्हणत असावे असे वाटते.

ह्या शिवाय उत्तर कोकणातील ठाणे जिल्ह्यात असलेल्या एका ब्रह्मदेवाच्या मंदिराबद्दलचा एक उल्लेख एका प्लेटमध्ये आढळतो. राष्ट्रकुट राजा दंतीदुर्गा शालिवाहन शके ६७१ (७४९–७५० इ.स.) त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की श्रीपुरा, सध्याचा जिल्हा ठाणे येथे एक ब्रह्मदेवाचे मंदिर होते. (The Indian Historical Quarterly vol xxxv no 3, 1959 : 186)

## ब्रह्मदेव मूर्ती

आत्तापर्यंत आपण ब्रह्मदेवाची मंदिरे, उपासना आणि महत्त्व पाहिले परंतु ब्रह्मदेवाच्या मूर्ती इतर देवतांच्या मंदिरांमध्ये तसेच उपगर्भगृह, देवळाच्या बाह्यभागात, इतर देवांबरोबर किंवा स्वतंत्र स्वरूपात उपलब्ध होतात. काही वेळा तो अनेक मुखी व भुजी, स्थानक वा आसनस्थ, केवल किंवा परिवारी तसेच त्रिपुरांतक शिल्पात सारथी, कल्याणसुंदर मूर्तीमध्ये पुरोहित, लिङ्गोद्भव प्रतिमेत शोधकर्ता तर शेषशायी अनंताच्या मूर्तीत कमलासनस्थ, वादक अशा अनेक रूपांत दिसतो. त्यातील काही महत्त्वाच्या मूर्ती आपण पाहूया. अशा ठिकाणी ब्रह्मदेव एकटाच किंवा सरस्वती, सावित्रीसह असून त्याची 'पुरोहित' किंवा 'शोधकर्ता' अशी रूपेही आढळतात. तसेच शिव आणि विष्णूबरोबरही त्याचे अस्तित्व असतेच. केवलब्रह्मा या प्रकारात ब्रह्मदेवाच्या मूर्ती स्थानक आणि आसनस्थ दोन्ही प्रकारात आढळतात.

## नालासोपारा येथील ब्रह्मा



चित्र क्र. १३ ब्रह्मदेव, नालासोपारा, पालघर..

ही मूर्ती पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथील चक्रेश्वर मंदिराच्या बाहेरच्या भागात ठेवलेली आहे. तिला एक संरक्षक जाळीही बसविलेली आहे. ह्या मंदिराच्या बाहेर काही भग्न तर काही सुस्थितीतील मूर्ती आढळतात. ह्या सर्व मूर्ती देवळासमोरील चक्रेश्वर तलावात सापडल्या असल्याचे तेथील स्थानिक लोक सांगतात. तसेच ही जी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे हिला स्थानिक लोक चाबूकराया म्हणतात व ग्रामदैवतासारखे महत्त्व ह्या देवाला आहे, असे तेथील रहिवासी केतन राऊत ह्यांनी सांगितले. ह्या मूर्तीची नोंद कझीन्स याने त्याच्या अहवालामध्ये केली आहे. (Cousens, 1998 : 26) ही मूर्ती १.९८ मीटर उंचीची असून १०वे शतक ते १२वे शतक ह्या काळातील असावी. ही मूर्ती एकाच बाजूने कोरलेली आहे. त्यामुळे ती एखाद्या भिंतीवर स्थापित असावी, मूर्तीवर दागिन्यांच्या खुणा आहेत पण बारकावे कोरायचे राहिले आहेत. मूर्ती अपूर्ण वाटते. मूर्तीचा खालील उजवा हात अक्षमालेसह वरद मुद्रेत आहे, मागील उजवा हातात स्रुक, मागील डाव्या हातात पुस्तक किंवा वेद धरले असून खालच्या उजव्या हातात आज्यस्थळी आहे. फक्त मधल्या मुखालाच दाढी आहे आणि डाव्या खांद्यावरून हरणाचे कातडे पांघरलेले आहे. मूर्तीच्या उजव्या बाजूला एक शिष्य उभा आहे तर डाव्या व उजव्या बाजूस त्याच्या दोन शक्ती आहेत. देवाच्या उजव्या बाजूला जी शक्ती आहे तिने आज्यस्थळी आणि स्रुक धारण केले आहे तर डाव्या बाजूच्या शक्तीने पुस्तक धरले आहे.



चित्र क्र १४ ब्रह्मा, नालासोपारा

## रामेश्वर मंदिर, ठाणे





**चित्र क्र. १५ व १६ ब्रह्मदेव, रामेश्वर मंदिर, ठाणे.**

सिद्धेश्वर तलावात ही मूर्ती १९९५ मध्ये सापडली असून तलावाच्या बाजूलाच असलेल्या रामेश्वर मंदिराच्या बाहेरील भागात ठेवलेली आहे. ही मूर्ती देखील १० वे शतक ते १२ वे शतक ह्या काळातील असून शैली मात्र गुर्जर आणि कर्नाटक अशी मिश्र आहे. ही मूर्ती चारही बाजूंनी कोरलेली आहे. मूर्तीला प्रभावळ असल्याने ही मंदिरातील मुख्य मूर्ती असावी असे वाटते. प्रभावळीसकट मूर्तीची उंची १.९३ मीटर आहे. चतुर्मुखी ब्रह्मा असून चारही मुखांना दाढी दाखविलेली आहे. मागचे चौथे मुखही कोरलेले आहे. परंतु दुर्दैवाने मूर्तीचे चारही हात कोपरापासून भग्न आहेत. देवाच्या दोन्ही बाजूंना शक्ती आहेत. उजव्या बाजूच्या शक्तीने आज्यस्थळी धारण केली असून डाव्या बाजूच्या शक्तीचा हात भग्न असल्याने तिने काय धारण केलेलं आहे ते समजत नाही परंतु बहुधा तिने पुस्तकच धरलेलं असावे. मूर्तीवर हरणाचे कातडे नाही. देवाच्या दोन्ही बाजूला शक्तींच्या जवळ दोन हंसही दाखविलेले आहेत. नालासोपारा येथील मूर्तीपेक्षा या मूर्तीमध्ये दाखवलेल्या शक्तींचा आकार मोठा आहे. (Kanitkar, 2011 : 10)

## मंगळवेढा



**चित्र क्र. १७ ब्रह्मा मूर्ती, मंगळवेढा**

मंगळवेढा हे एक तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूरपासून ५४ कि.मी. तर पंढरपूरपासून अवघ्या २३ किमी अंतरावर आहे. येथे एक भुईकोट किल्ला असून किल्ल्याच्या मागे असलेले काशीविश्वेश्वराचे मंदिर ही येथील सर्वात पुरातन वास्तु आहे. मूळ मंदिर हे १० व्या अथवा ११व्या शतकातील असावे. त्याचा जीर्णोद्धार १५ व्या शतकात झाला असल्याचा येथील शिलालेख सांगतो. ह्या मंदिराच्या बाजूलाच एक पुरातन विहीर असून तिच्या एका कमानीत ही ब्रह्मदेवाची मूर्ती पूर्वाभिमुख स्थापित केलेली आहे. ही मूर्ती इथे कशी आली ह्या विषयी माहिती उपलब्ध नाही परंतु ह्या मूर्तीच्या बाजूने एक भुयार असून ते मंगळवेढ्याच्या पश्चिमेला एक कृष्ण तलाव

नावाचा तलाव आहे त्यात मध्यभागी असणाऱ्या गोपाळकृष्ण मंदिरापर्यंत आहे असे सांगतात. ही ब्रह्मदेवाची मूर्ती पूर्णाकृती आहे. एका विहिरीत असल्याने अगदी जवळून पाहणे शक्य होत नाही. तसेच पावसाळ्याच्या दिवसात विहिरीचे पाणी वाढते त्यामुळे ती बरेचदा पूर्णपणे पाण्याखालीही जाते. नालासोपारा येथील मूर्तीशी ह्या मूर्तीचे साधर्म्य वाटते. अंदाजे १.५० मीटर उंचीची असावी. फक्त मधल्या मुखालाच दाढी आहे. प्रदक्षिणाक्रमाने खालील उजव्या हात वरद मुद्रेत असून अक्षमालाही आहे. मागच्या हातात स्रुक आहे मग पुस्तक आणि डाव्या खालच्या हातात कमंडलू आहे. मूर्ती अलंकारांनी युक्त आहे. देवाच्या दोन्ही बाजूस त्याच्या शक्ती आणि हंसही आहे. पाण्याखाली जात असल्याने त्यावर खूप क्षार साचलेले आहेत त्यामुळे बारकावे नीट दिसत नाहीत. संशोधकाने प्रत्यक्ष या ठिकाणी भेट दिली तेव्हा मूर्तीचा अर्धा भाग पाण्याखाली गेल्याने पूर्ण मूर्ती दिसू शकली नाही.

## चेन्नकेशव मंदिर, बेलुर



**चित्र क्र. १८ ब्रह्मा मूर्ती, बेलुर**

हे मंदिर विजय नारायण मंदिर म्हणूनही प्रसिद्ध आहे. कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील बेलुर तालुक्यात हे मंदिर आहे. होयसाळ राजा विष्णूवर्धन याने हे १११७ मध्ये बांधले. १०३ वर्षे याचे बांधकाम सुरू होते. ह्या मंदिरात एक अतिशय सुबक कलाकृती असलेली ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. प्रदक्षिणाक्रमाने अक्षमाला, स्रुक, पाश आणि कमंडलू असून अलंकारांनी युक्त आहे. देवाच्या डाव्या बाजूला हंस आहे. (Bailey, 1983 : 258-260)

## चेन्नकेशव मंदिर, सोमनाथपुरा

हे मंदिर सोमनाथपुरा, कर्नाटक येथे आहे. १३व्या शतकातील हे मंदिर होयसाळ राजा नरसिंह ३ याचा मंत्री सोमनाथ दंडनायक याने बांधले. ह्या मंदिराच्या बाहेरील भिंतींवर ब्रह्मदेवाच्या दोन मूर्ती आहेत. सर्व मूर्ती साधारणपणे ०.६० मीटर असून पाया ते तोरण अशी उंची अंदाजे ०.९१४ मीटर आसपास आहे. सर्व देवदेवतांच्या मिळून एकूण १९४ मूर्ती असून त्यांपैकी फक्त दोन मूर्ती ब्रह्मदेवाच्या आहेत. एका मूर्तीला दाढी आहे तर दुसरी मूर्ती दाढी नसलेली आहे. दोन्ही मूर्तींपैकी एका मूर्तीच्या हातात प्रदक्षिणामार्गाने अक्षमाला, स्रुक, स्रुवा तर खालचा डावा हात भग्न आहे. तर दुसऱ्या मूर्तीच्या हातात प्रदक्षिणाक्रमाने अक्षमाला, स्रुक, पाश, कमंडलू दिसतात. एक हात अभयमुद्रेत आहे. परंतु लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ह्या १९४ मूर्तींमध्ये रामायण, महाभारत, दशावतार, इंद्र इत्यादी देवांच्या मूर्ती आहेत.



**चित्र क्र. १९ ब्रह्मा मूर्ती, सोमनाथपुरा**

## मराठवाड्यातील ब्रह्मदेवाच्या मूर्ती

## वेरूळ गुंफा १६ ; कैलास मंदिर



चित्र क्र. २० ब्रह्मा मूर्ती, वेरूळ गुंफा १६

औरंगाबाद शहरापासून ३० कि.मी.अंतरावर वेरूळची जगप्रसिद्ध लेणी आहेत. सह्याद्रीच्या सातमाळा डोंगररांगांच्या कड्यात इसवी सनाच्या ५ व्या ते १० व्या शतकात कोरून काढलेली ही लेणी आहेत. ह्यामध्ये गुंफा १६ म्हणजेच कैलास मंदिर आहे. हे द्राविड शैलीचे मंदिर असून शिवाचे आहे. ह्या ठिकाणी बाहेरील भिंतीवर बह्मदेवाच्या प्रतिमा आढळतात. काही स्थानक प्रतिमा आहेत. त्याच बरोबर कल्याणसुंदर मूर्ती देखील आहेत. रमणशिल्पपटाच्या बाजूलाच एक ब्रह्मदेवाची पद्मासनावर बसलेली मूर्ती आहे. मूर्तीला तीन मुखे दाखविलेली असून मुखांना दाढी नाही. हातात प्रदक्षिणाक्रमाने वरदमुद्रा, अक्षमाला, कमंडलू व खालील डावा हात भग्न आहे. आणखी एक ब्रह्मदेवाची मूर्ती थोडी पुढे कोरलेली असून ह्या मूर्तीच्या मधल्या मुखाला दाढी दाखवलेली आहे. ही दाढी इजिप्शियन फेरॉप्रमाणे निमुळती आहे. ही मूर्ती देखील पद्मासनस्थ आहे. लिंङ्गोद्भव शिव ह्या प्रतिमेत सुद्धा ब्रह्मदेव असतोच. अशी एक एक प्रतिमा या ठिकाणी सुद्धा आहे.



चित्र क्र. २१ लिंङ्गोद्भव मूर्ती, वेरुळ गुंफा

मराठवाड्यामधील देवळे ही मूर्तीकलेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. केसापुरी, जि.बीड येथील विष्णूच्या मंदिरातील ब्रह्मदेवाची प्रतिमा त्रिमुखी, चतुर्भुज, समभंगातील असून उजवे दोन्ही हात भग्न आहेत. डाव्या खालील हाती कमंडलू तर वरच्या हातात पुस्तक आहे.

देवाच्या उजव्या बाजूला सरस्वती तर डावीकडे सावित्री आहे. सरस्वतीच्या बाजूलाच हंस असून देवाच्या मधल्या मुखालाच दाढी आणि मिशा आहेत. ब्रह्मा सालंकृत असून डोक्यावर कीर्तिमुख आहे. बीड येथीलच कंकालेश्वर मंदिरावर पूर्व, पश्चिम व उत्तराभिमुख अशा ब्रह्मदेवाच्या तीन मूर्ती असून उत्तराभिमुख असलेला ब्रह्मा एकमुखी आहे तर इतर दोन त्रिमुखी आहेत. ह्या मूर्तीचे चारही हात भग्न असून उजवीकडे हंस आहे व शेजारीच सरस्वती आणि सावित्री देखील आहेत. पूर्वाभिमुख असलेल्या मूर्तीच्या वरील उजव्या हाती स्रुक तर डाव्या हाती वेद असून खालचे दोन हात भग्न झालेले आहेत. देवाच्या डावीकडे हंस आहेत. पश्चिमेकडील ब्रह्मदेवाची मूर्ती त्रिमुखी, चतुर्भुज असून चारही हात भग्न आहेत. देवाच्या बाजूला हंस आहेच. ह्या तीनही मूर्ती अलंकारांनी युक्त आहेत.



चित्र क्र. २२ एकमुखी बह्मदेव, बीड,

उमरग्याला एक त्रिदलीय शिवमंदिर आहे; ह्या मंदिराच्या उजव्या बाजूच्या गर्भगृहात त्रिमुखी, चतुर्भुज ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. वरील उजव्या हातात स्रुक आणि डाव्या हातात वेद असून उर्वरित दोन हात भग्न झालेले आहेत. देवाच्या डाव्या बाजूला खाली हंस आहे. अंबाजोगाई येथील खोलेश्वराच्या सभामंडपात एक ब्रह्मदेवाची मूर्ती असून तिच्या हातात प्रदक्षिणाक्रमाने वरदमुद्रेत अक्षमाला, स्रुक, पुस्तक आणि कमंडलू आहे. ही मूर्ती सालंकृत असून खांद्यावर उपरणे व उजव्या बाजूला हंस आहे. तेर येथील प्रसिद्ध त्रिविक्रमाच्या देवळात दुर्लक्षित अवस्थेत एक ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. प्रदक्षिणाक्रमाने कमंडलू, स्रुक, दंड आणि कुश धारण केलेली ही प्रतिमा अलंकारांनी युक्त अशी आहे. देवाच्या शक्ती सरस्वती व सावित्री आहेत. धर्मापुरी येथील केदारेश्वराच्या देवालयात गर्भगृहात अक्षमाला, स्रुक, पुस्तक आणि कमंडलू घेतलेली चतुर्भुज, त्रिमुखी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. ह्याच देवळावर पूर्वाभिमुख आणखी एक ब्रह्मदेवाची मूर्ती असून

खालील दोन्ही हात भग्नावस्थेत आहेत, उजव्या वरच्या हातात स्रुक तर डाव्या हातात कुश धरलेले आहे. दोन्ही प्रतिमेतील ब्रह्मा त्रिमुख व दाढी मिशा असलेला आहे. (देशमुख, २०१७ : ११७–११८)



**चित्र क्र. २३ ब्रह्मा मूर्ती, धर्मापुरी**

## ब्रह्मा मूर्ती अलाहाबाद

अलाहाबाद वस्तुसंग्रहालयात ही मूर्ती असून ही उत्तर प्रदेशातील जामसोट  या गावात सापडली आहे. ही मूर्ती १२ व्या शतकातील असून साधारण १ मीटर उंचीची आहे. एखाद्या मंदिराच्या भिंतीचा हा तुकडा असावा असे वाटते. मूर्ती खूपच भंगलेल्या अवस्थेत असल्याने चारही हातातील आयुधे समजत नाहीत. ही मूर्ती त्रिमुखी असून दर्शनी मुखालाच दाढी आहे. खाली दोन्ही बाजूस ब्रह्माच्या शक्ती सावित्री व गायत्री आहेत. (Mishra, 1989 : 44)



**चित्र क्र. २४ ब्रह्मदेव, जामसोट, अलाहाबाद**

## ब्रह्मा मूर्ती, रत्नागिरी

रत्नागिरी येथील थिबा पॅलेसमध्ये एक संग्रहालय आहे. त्यामध्ये एक ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. ही मूर्ती ०.९१४ मीटर उंचीची आहे. मूर्ती त्रिमुखी असून चारही हात भग्न आहेत. मूर्तीला प्रभावळ आहे पण ती वरच्या बाजूने भग्न आहे. उजव्या बाजूला सावित्री व डाव्या बाजूला गायत्री आहे. उजव्या बाजूलाच हंस असून मूर्ती सालंकृत आहे.



**चित्र क्र. २५ ब्रह्मा मूर्ती, थिबा पॅलेस**

## आसनस्थ प्रतिमा

ह्या प्रतिमांमध्ये ब्रह्मा बऱ्याचदा कमलासनावर बसलेला दाखविला जातो. क्वचित हंसावर किंवा सात हंसांच्या रथावरही बसलेला दाखविला जातो.

**सातारा येथील रामेश्वर मंदिरातील ब्रह्मा मूर्ती :** संगम माहुली ह्या तीर्थक्षेत्री रामेश्वराचे मंदिर आहे. ह्या मंदिराच्या कोनाड्यात एक ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. ह्या मूर्तीजवळ ब्रह्मदेवाच्या शक्ती नाहीत, हंसही नाही. खालच्या उजव्या हाती अक्षमाला तर डाव्या हातात कमंडलू आहे. मागील डाव्या हातात स्रुक सदृश काही तरी आहे तर मागच्या उजव्या हातात दंड आहे. ब्रह्मदेवाच्या मूर्तीची चारही मुखे एका शेजारी एक अशी दाखविली असून मुखांना दाढी नाही पण मिशा आहेत. रामेश्वर मंदिराच्या बाह्य भिंतीवरील एका कोनाड्यात ही मूर्ती आहे. स्थानिक लोक ह्या देवाला बर्म्या म्हणतात; जो बरमदेव म्हणजेच ब्रह्मदेव ह्या शब्दाचा अपभ्रंश असू शकतो. ही माहिती तिथे उपस्थित असलेल्या एका स्थानिकानेच संशोधकाला दिली.



**चित्र क्र. २६ ब्रह्मदेव, संगम माहुली, सातारा**

## पाटेश्वर

वर पाहिलेल्या संगम माहुली येथील मूर्तीशी साधर्म्य असलेली आणखी एक मूर्ती पाटेश्वर येथे आहे. ह्या मंदिरासमूहामध्ये अष्टादशभुजा महिषासुरमर्दिनी मंदिरासमोर दोन लहान मंदिरे आहेत. त्यातील उजव्या बाजूच्या लहान मंदिरात एक चतुर्मुख, चतुर्भुज मूर्ती आहे. ती नक्की कोणाची आहे यामध्ये मतांतरे आहेत. काही जण याला चतुर्मुख शिव, ब्रह्मा तर काही जण याला लकुलीश म्हणतात. विष्णुधर्मोत्तर या ग्रंथामध्ये ब्रह्मदेवाच्या विश्वकर्मा रूपाचे शुभ्र, पद्मासनबद्ध, त्याला सात हंसांचा रथ, चार हात, त्यात योगमुद्रा, अक्षमाला, कमंडलू व योगमुद्रा ही आयुधे सांगितलेली आहेत. जटा, चार तोंडे व ध्यानामुळे डोळे मिटलेले सांगितलेले आहेत. शिवाय त्याच्या डोक्यावर चंद्रकोर आणि तीन डोळेही दाखविण्यास सांगितलेले आहे. पाटेश्वरमधील मूर्ती ही दक्षिणाभिमुख असून त्याच दिशेला त्याची सगळी तोंडे आहेत.त्यांच्या डोक्यावर साध्या पद्धतीचा मुकुट असून त्याच्या मध्यभागी कमळ आहे. प्रत्येक चेहऱ्याच्या कपाळावर मध्यभागी एक आडवा डोळा आहे. ब्रह्मदेवाच्या विश्वरूपामध्ये त्याला तीन नेत्र आहेत. शिवाय अशी एका बाजूस चारही तोंडे व इतर आयुधे यांच्याशी सांगड घातल्यास ही ब्रह्मदेवाची मूर्ती असल्याचे समजते. त्यामुळे त्याचा उल्लेख ब्रह्मदेव म्हणून केलेला अधिक संयुक्तिक ठरेल. पाटेश्वर येथील हे शिल्प १३ व्या शतकाच्या उत्तरार्धातील असावे असे वाटते.



**चित्र क्र. २७ ब्रह्मा मूर्ती, पाटेश्वर, सातारा**

या शिल्पाशिवाय पाटेश्वर येथील तिसऱ्या लेणीसमूहामध्ये उत्तराभिमुख लेण्यामध्ये एका कोनाड्यात ब्रह्मदेवाचे आणखी एक शिल्प आहे. ही मूर्ती द्विभुज असून अत्यंत सामान्यपणे घडविलेली आहे. ब्रह्मदेव हा सामान्यपणे कमळावर बसलेला; दाढी असलेला; चतुर्मुख; वरदहस्त,कमंडलू, पोथी, स्रुक अशी आयुधे घेतलेला दिसतो. क्वचित प्रसंगी त्याच्या आयुधांमध्ये

बदल असतो; पण त्यामुळे त्याच्या मूळ रूपात काहीच फरक पडत नाही. परंतु ब्रह्मदेवाची आणखी अशी काही शिल्पे आहेत की ज्यांमध्ये त्याला वरती नमूद केल्याप्रमाणे दोन हात आहेत. शिवाय तो उभा आहे. त्यामुळे हे शिल्प ब्रह्मदेवाचेच असावे. (फडके, २०१५ : ४२)

**खिद्रापूर**



**चित्र क्र. २८ गजारूढ ब्रह्मदेव, खिद्रापूर**

महाराष्ट्रात सांगलीजवळील खिद्रापूरचे कोपेश्वर महादेव मंदिर उत्कृष्ट शिल्पकलेसाठी प्रसिद्ध असून हे मंदिर सातव्या शतकात बांधायला सुरुवात झाली आणि ११ व्या ते १२ व्या शतकात बांधून पूर्ण झाले असावे. ह्या मंदिराच्या बाह्य भिंतीवर पाच ठिकाणी ब्रह्मदेवाच्या मूर्ती आढळतात. ह्यातील चार मूर्ती आसनस्थ आहेत. एक मूर्ती मंदिराच्या पश्चिमेकडच्या दरवाजावर असून हातात अक्षमाला, दंड, स्रुक आणि कमंडलू आहे. हंस किंवा शक्ती नाहीत. उरलेल्या तीन मूर्ती थोड्या वेगळ्या आणि विशेष आहेत. हे पूर्ण मंदिर हत्तींनी तोलून धरले आहे अशी कल्पना केलेली आहे. त्यामुळे ह्या तीन मूर्ती तीन दिशांच्या भिंतींवर गजारूढ आहेत. ह्यातील एक मूर्ती

व्यवस्थित असून बाकीच्या दोन्ही भग्न आहेत. ह्या मूर्तीतील हत्ती भग्नच आहे. अक्षमाला, दंड, स्रुक आणि कमंडलू असाच क्रम सर्व मूर्तींचा असावा. मूर्तीच्या मधल्या मुखालाच दाढी दाखविलेली आहे. बाकीच्या गजारूढ मूर्तींचे हात भग्न आहेत. या बरोबरच शेषशायी विष्णूच्या नाभीतून उगवलेल्या, कमळावर विराजमान झालेला ब्रह्मा ह्या प्रकारातील आसनस्थ ब्रह्मदेवाच्या मूर्ती भारतात अनेक ठिकाणी दिसतात.

## परिवारी ब्रह्मा

ब्रह्मदेवाच्या एकल प्रतिमा आपण पाहिल्याच आहेत. त्याच प्रमाणे त्रिमूर्ती आणि आणखी काही इतर देवांबरोबरही  अशा मूर्ती असतात त्या पाहू. ह्या प्रकारातील मूर्तीत ब्रह्मदेवाबरोबर सरस्वती किंवा सावित्री असतात ज्या त्याच्या मांडीवर विराजमान झालेल्या असतात. पुष्कर येथील ब्रह्मदेवाची मूर्ती ह्याच प्रकारातील आहे. आलिंगन स्थितीमधील दोन मूर्ती औंढ्या नागनाथ मंदिरावर असून सरस्वती द्विभुज दाखविलेली आहे व ती आसनस्थ चतुर्भुज ब्रह्मदेवाच्या डाव्या मांडीवर बसलेली आहे. ब्रह्मदेवाचा उजवा खालील हात भग्न झालेला असून उजव्या वरील हातात स्रुक व डाव्या वरील हातात पुस्तक धरून डावा खालील हात सरस्वतीच्या डाव्या वक्षस्थळावर ठेऊन तिला आलिंगन दिलेले आहे. दोघेही सालंकृत असून मूर्तीत डावीकडे खालच्या बाजूस मोर हे सरस्वतीचे वाहन आहे. तर तेथीलच दुसऱ्या मूर्तीत सरस्वती देवाच्या डाव्या मांडीवर बसलेली आहे. तिने उजव्या हाताने देवाला आलिंगन दिलेले आहे व डाव्या हातात पुस्तक धरले आहे. ब्रह्मदेवाने सरस्वतीला डाव्या खालील हाताने आलिंगनात घेतले असून उजव्या वरच्या हातात स्रुक धरले आहे. ब्रह्मदेवाचे बाकीचे हात भग्न झाले आहेत तसेच डाव्या मांडीखाली हंस दाखवलेला आहे. पुणे येथील राजा केळकर



**चित्र क्र. २९ आलिंगन मूर्ती ,राजा केळकर संग्रहालय**

वस्तुसंग्रहालयात देखील अशी आलिंगन स्वरुपातील ब्रह्मदेवाची  एक मूर्ती आहे. ह्या प्रतिमेचे हात भग्न झालेले असून डाव्या मांडीवरच सरस्वती बसलेली आहे.

### स्थानक आलिंगन ब्रह्मा

अशा प्रकारची एक मूर्ती औरंगाबाद येथील शासकीय वस्तुसंग्रहालयात आहे. हा ब्रह्मा एक मुखी असून त्याला दाढी आहे. ब्रह्मदेवाने खालील डाव्या हाताने देवीला आलिंगन दिलेले असून बाकीच्या हातात कमंडलू, स्रुक व पुस्तक धरले आहे. देवीच्या उजव्या हातात चवरी आणि डाव्या हातात घट असून दोघेही अलंकारांनी युक्त आहेत. ब्रह्मदेवाच्या शेजारी खालच्या बाजूस हंसही आहे.

### शोधकर्ता ब्रह्मा

ह्या प्रकारातील मूर्ती मंदिरांच्या बाहेरच्या भागातील भिंतींवर आढळतात. ह्यात लिङ्गोद्भवाची कथा दर्शवलेली असते. ज्योतिर्लिंग स्वरूपात शिव असतो. त्याच्या आदिचा शोध घेणारा ब्रह्मदेव वरच्या भागात दर्शविलेला असतो तर अंताचा शोध घेणारा विष्णू खालील भागात दाखविलेला असतो. काही ठिकाणी ज्योतिर्लिंग स्वरूपातील शिवासमोर हात जोडून असलेले ब्रह्मा व विष्णू



**चित्र क्र. ३० शोधकर्ता ब्रहमा, त्रिशुंड गणपती, पुणे**

देखील असतात. क्वचित प्रसंगी त्यांची वाहनेही दाखविलेली असतात. हे शिल्प भारतभर शंकराच्या देवळामध्ये आढळते. पुण्यातही त्रिशुंड गणपतीच्या देवळाच्या बाहेरील भिंतीवर हे शिल्प पाहायला मिळते. ह्या प्रकारातील आणखी एक मूर्ती वाराणसी येथे असून मधोमध ज्वालालिंग आहे. दोन्ही बाजूंना विष्णू व ब्रह्मा हात जोडून उभे आहेत. त्याचबरोबर शोध घेण्याकरिता वरच्या व खालच्या दिशेने गेलेले हंस आणि वराह सुद्धा दाखविले आहेत.

### कल्याण सुंदर मूर्ती

शंकर व पार्वतीच्या विवाहप्रसंगाचे अंकन बऱ्याच मंदिरांवर केलेले आढळते ह्यालाच कल्याण सुंदर मूर्ती असे म्हणतात. हा एक शिल्प समूह असून ह्यात ब्रह्मदेव पौरोहित्य करत असल्याचे दाखविलेले असते.

## ३.१८ त्रिमूर्ती

ब्रह्मा, विष्णू आणि महेश ह्या तीन देवांच्या एकत्र मूर्तीला त्रिमूर्ती असे म्हणतात. त्रिमूर्ती ही संकल्पना फार प्राचीन आहे. एकट्या ब्रह्मदेवाची मंदिरे जरी अगदी थोडी असली तरी किंवा ब्रह्मा अगदी अपूज्य झाला असला तरीही त्रिमूर्ती स्वरूपात आजही त्याची पूजा होताना दिसते. भारतात बऱ्याच ठिकाणी अशी त्रिमूर्ती मंदिरेही आहेत. दत्त संप्रदायात ही ब्रह्मा,विष्णू आणि महेश ह्या त्रिमूर्ती स्वरूपात त्याची पूजा केली जाते. त्रिमूर्ती कल्पना ही फार पुरातन आहे. तिची बीजे वेदांमध्येही सापडतात. सूर्य, वायू व अग्नी या तीन देवता मिळून एक त्रिक असल्याचे उल्लेख ऋग्वेदात सापडतात.

**सूर्यो नो दिवस्पातु वातो अन्तरिक्षात।**

**अग्निर्न: पार्थिवेभ्य: ।।**

**(ऋग्वेद १/१५८/१)**

अर्थ– सूर्य आकाशातून, वायू अंतरिक्षातून व अग्नी भूप्रदेशातून आमचे रक्षण करो.

गुणांच्या अनुषंगाने त्रिमूर्तीचा विचार मैत्रायिणी उपनिषदात पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

**प्रजापतिस्तस्य प्रोक्ता अग्न्यास्तवनो ब्रह्मा रुद्रो विष्णुरिति।**

**अथ यो ह खलु वावास्य राजसोंऽशोऽसौ स योऽयं ब्रह्मा।**

**अथ यो ह खलु वावास्य तामसोंऽशोऽसौ स योऽ यं रुद्रः।**

**अथ यो ह खलु वावास्य सात्विकोंशोऽसौ स एव विष्णुः।**

**स वा एष एकस्त्रिधा भूतः।**

**(मैत्रायणी उपनिषद ४/५)**

अर्थ– ब्रह्मा, रुद्र व विष्णू या प्रजापतीच्या श्रेष्ठ तनु (मूर्ती) होत. त्याचा रजोगुणी अंश तो ब्रह्मा, तामस अंश रुद्र व सात्त्विक अंश विष्णू होय. तो प्रजापतीच अशाप्रकारे विष्णू बनला आहे. महाभारतात एके ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, रुद्र ही प्रजापतीची उत्पादक, संरक्षक व संहारक रूपे असल्याचे म्हटले आहे.

त्रिमूर्तीची ही कल्पना पुढे बहुतेक सर्व पुराणांनी स्वीकारली. फरक असलाच तर तो एवढाच की भिन्न संप्रदायांनी भिन्न देवतेला श्रेष्ठत्व दिले. त्रिमूर्ती कल्पना पुराणातून मूर्तीकलेत सुद्धा प्रविष्ट झाली. त्रिमूर्तीची शिल्पे अनेक प्रकारे उपलब्ध आहेत. भारतीय संस्कृतीला त्रिकाचे विशेष कौतुक आहे. पुराणात, दर्शनात, नीतिशास्त्रात सर्वत्र त्रिकाची महत्ता मानलेली आहे. तीन लोक, तीन मार्ग, तीन गुण, तीन ऋण, त्रिस्थळी यात्रा तसेच विश्वाचे स्वरूप त्रिगुणात्मकच आहे. (जोशी, १९९४:२२९)

प्रणवापासून त्रैगुण्यापर्यंतच्या विराट भावांच्या अभिव्यक्तीसाठी भारतीय कलावंतांनी त्रिमूर्ती हे एक प्रतीक निर्माण केले त्यामुळे त्रिमूर्ती ही भारतीय दर्शनाची प्रतिमाच बनले. त्रिमूर्ती संकल्पना विविध प्रकारांची आहे. बरेच वेगवेगळे अर्थ लावून त्यातून सूचित होताना दिसतात. त्रिदेवांप्रमाणेच पृथ्वी, जल व अग्नी असेही त्रिकूट आहे. ह्याचाही संबंध ब्रह्मा, विष्णू आणि महेशाशी जोडलाच आहे. पृथ्वी तत्त्व निर्मितीचे प्रतीक आहे तर जल तत्त्व राखण करणारे आणि अग्नी तत्त्व विनाश करणारे असा एक अर्थ आहे. त्याचबरोबर त्रिमूर्तीमधील तीन देव म्हणजे चेतनांची तीन प्रतले सुद्धा आहेत. आध्यात्मिक भाव हा ब्रह्माचा, मानसिक विष्णूचा तर भौतिक भाव शिवाचा असा सुद्धा एक विचार आहे. माणसाच्या आयुष्याच्या पहिल्या तीन वर्णाश्रम अवस्था देखील ह्या त्रिमूर्तीमधून दर्शविल्या जातात. पहिला ब्रह्मचर्याश्रम किंवा विद्यार्थी अवस्था हिचा

संबंध ब्रह्मदेवाबरोबर विद्येच्या रूपात सरस्वतीशी दाखविलेला आहे. दुसरा गृहस्थाश्रम – तारुण्यावस्था ह्यामध्ये गृहस्थी सांभाळताना संपत्तीचा उपयोग करायचा म्हणून इथे विष्णूबरोबर लक्ष्मीचाही संबंध आहे तर तिसरा वानप्रस्थाश्रम; इथे पुरुष शंकराप्रमाणे सर्व ऐहिक–भौतिक सुखांचा त्याग करून वनात जाऊन तपाचरण करावे असे सुचविले आहे. त्याकरिता पुन्हा पार्वतीशी सुद्धा संबंध दाखविलेला आहे. (जोशी, १९८० : ९४)

एकपाद त्रिमूर्ती हा एक प्रकार मूर्तिकलेत आहे. हे शैवमूर्तिकरण आहे. ह्यात शिव एका पायावर उभा असून त्याच्या उजव्या कुशीतून ब्रह्मा व डाव्या कुशीतून विष्णू हे दोन देव हात जोडून बाहेर आले आहेत. त्रिमूर्तीचा हाच प्रथम आविष्कार समजला जातो. पुढे ही कल्पना वैष्णव पंथात शिरली असावी. वैष्णव शिल्पात विष्णूच्या मुखाला मधले स्थान मिळाले. हीच कल्पना पुराणांनी उचलून धरली. त्रिमूर्तीची शिल्पे भारतीय मूर्तिकलेत अनेक आहेत. भारतीय कलेने आपल्या अभिव्यक्तीसाठी अनेक मनोहर सूत्रे निर्माण केली आहेत. त्रिमूर्ती हे त्यापैकीच एक सूत्र होय. त्रिमूर्ती कल्पनेच्या मागे दार्शनिक चिंतनाचा रहस्यमय संकेत आहे. प्रणवापासून त्रैगुण्यापर्यंतच्या मागे विराट भावनांच्या अभिव्यक्तीसाठी भारतीय कलावंतांनी त्रिमूर्ती हे एक प्रतीक निर्माण केले. एकपाद त्रिमूर्तीचे हे रूप ऋग्वेदातील अज एकपाद ह्या संकल्पनेतून निर्माण झाले असावे असे तर्क अनेक विद्वानांनी मांडले आहेत. (Panda, 2004 : 937-49)

विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे त्रिमूर्ती हा आठ विद्येश्वरांमधील एक असल्याचे म्हटले जाते. त्रिमूर्तीची मूर्ती अनेक प्रकारात आढळते. पहिला प्रकार म्हणजे मधोमध शिव कल्पून त्याच्या दोन बाजूंनी ब्रह्मा व विष्णू त्याच्यामधून प्रकट झाले आहेत असा आहे. आणखी एका प्रकारात मधोमध मोठे शिवलिंग दाखवले जाते व त्यातून ब्रह्मा आणि विष्णू प्रकट होत आहेत असे दर्शविलेले असते. त्रिमूर्तीचा अजून एक प्रकार म्हणजे हे तीनही देव एकाच ठिकाणी पण तीन वेगवेगळ्या पद्मपीठावर त्यांच्या आयुधे व वाहनांबरोबर दाखविले जातात. तर आणखी एका प्रकारात ते एकाच मंदिरात परंतु तीन वेगवेगळ्या गर्भगृहात दाखविले जातात किंवा तिघांची तीन वेगवेगळी मंदिरे देखील एका बाजूला एक असे आढळते. इंडोनेशियातील प्रंबनन मंदिर ह्याच प्रकारातील आहे. त्याची माहिती पुढे येणारच आहे. (Shukla, 1958 : 174)

## ३.१९ काही त्रिमूर्ती मंदिरे

### दुदाही ब्रह्मा मंदिर

उत्तर प्रदेशात ललितपूर जिल्ह्यात दुदाही नावाचे एक छोटे गाव आहे. आत्ता जरी हे छोटे खेडे असले तरी चंदेल राजवटीत हे राजधानीचे ठिकाण होते. या ठिकाणी अनेक मंदिरांचे भग्न अवशेष आढळतात. या विषयी अलेक्झाँडर कनिंगहॅमने त्याच्या रिपोर्टमध्ये माहिती लिहून ठेवली आहे. येथे जी मंदिरे व अवशेष सापडतात त्यांची तीन भागांत विभागणी केलेली आहे. पहिला भाग बडी सराही व छोटी सराही हा दुसरा भाग आहे, त्या ठिकाणी वराहमूर्तीचा भाग असून तिसरा भाग बनिया की बारात आहे. यातील पहिल्या भागात छोटी सराही येथे एक ब्रह्मदेव मंदिर आहे. हे त्रिकुट मंदिर आहे म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांची तीन वेगवेगळी गर्भगृहे आहेत पण त्या पुढील मंडप एकच आहे. यातील विष्णू मंदिराचा मंडप पूर्णपणे भग्न झालेला आहे तर शिव आणि ब्रह्मा मंदिराचा भाग बऱ्यापैकी सुस्थितीत आहे. गर्भगृहाच्या दरवाजाच्या ललाटपट्टीवर नवग्रह, सप्तमातृका यांसारख्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. शिवाच्या गर्भगृहाच्या ललाटपट्टीवर शिव कोरलेला आहे व आतमध्ये शिवलिंग आहे. तसेच ब्रह्माच्या गर्भगृहाच्या ललाटपट्टीवर ब्रह्मा आणि सावित्री, गायत्री असे कोरलेले आहे; परंतु गर्भगृहात ब्रह्मदेवाची प्रतिमा मात्र नाही. ती भग्न झाली असावी.



**चित्र क्र. ३१ ब्रह्मदेव मंदिराची ललाटपट्टी, दुदाही**



**चित्र क्र.३२ ललाटपट्टी वरील ब्रह्मदेव, दुदाही**

प्रत्येक गर्भगृहावर वेगवेगळी शिखरे आहेत, मात्र त्यातील ब्रह्मदेवाच्या देवळावरचे शिखर सध्या अस्तित्वात असून बाकीची दोन्ही भग्न झालेली आहेत. ह्या ठिकाणी एकूण सहा शिलालेख सापडलेले असून त्यातील पाच लेख कनिंगहॅमने आपल्या रिपोर्टमध्ये प्रसिद्ध केले आहेत. (Cunningham, 1880 : 93)

हे लेख संस्कृत भाषेत असून देवनागरी लिपीत कोरलेले आहेत. ह्या पाचही लेखांवरून असा निष्कर्ष काढता येतो की ही मंदिरे चंदेल राजा देवलब्धी; कृष्णपा आणि असर्व यांचा पुत्र आणि यशोवर्मन याचा नातू याने बांधली आहेत. त्यामुळे हे बांधकाम १२व्या शतकातील असावे असा साधारण अंदाज बांधता येतो. (Gazetteer of India for United Province of Agra and Oudh, 1908 : 103-104)

## हरीहरपितामह मूर्ती

ह्या प्रकारातील मूर्ती म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश ह्या तीन देवांचा मिलाप आहे. ह्या मूर्तीमध्ये हे तीनही देव त्यांच्या आयुधांसह, वाहनांसह आणि शक्तींसह दाखविलेले असतात. ह्या सारख्या हरीहरपितामहअर्क अशा देखील मूर्ती आढळून येतात. ह्यात त्रिदेवांबरोबरच सूर्य देखील असतो.



**चित्र क्र. ३३ हरीहरपितामह, गोळप, रत्नागिरी**

अशा प्रकारची एक मूर्ती महाराष्ट्रातील गोळप, जिल्हा रत्नागिरी येथे आहे. येथील हरिहरेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात ही मूर्ती आहे. डावीकडे विष्णू, मध्यभागी ब्रह्मदेव आणि उजवीकडे महेश आहे. ही मूर्ती अतिशय सुबक आहे. मूर्ती चतुर्मुखी असून चौथे मुख मागील बाजूला दाखविलेले आहे. तीनही मुखांना दाढी मिशा आहेत. चतुर्भुज मूर्तीच्या खालच्या उजव्या हातात अक्षमाला; वरच्या उजव्या हातात स्रुक, वरच्या डाव्या हातात स्रुवा तर खालच्या डाव्या हातात कमंडलू आहे. किरीट मुकुट असून मूर्तीला प्रभावळ आहे.

## वेरूळ गुंफा क्र २७

या गुंफेमधूनच पुढे तीन छोटी गर्भगृहे  आहेत; ह्या तीन गर्भगृहांत डावीकडून शिव, विष्णू आणि ब्रह्मा आहेत. ह्या तीनही मूर्ती स्थानक आहेत. चतुर्मुखी व चतुर्भुज ब्रह्मदेवाची मूर्ती येथे आहे. खालील उजव्या हातात अक्षमाला असून तो हात वरद मुद्रेत आहे. बाकीच्या हातात काय आहे ते स्पष्टपणे दिसत नाही. कमरेवर मेखला धारण केली असून यज्ञोपवीत आहे.



**चित्र क्र. ३४ त्रिमूर्ती, वेरूळ**

## तारापूर

पंढरपूर तालुक्यात  एक तारापूर गाव आहे. ह्या गावात एक त्रिकुट मंदिर आहे. मंदिरात गर्भगृहात एक ब्रह्मदेवाची उभी मूर्ती आहे. तसेच एक मूर्ती कोनाड्यात सुद्धा आहे. गर्भगृहातील मूर्ती प्रभावळीसकट असून तिचा खालचा डावा हात भग्न आहे, मागील डाव्या हातात स्रुक असून मागील उजव्या हातात पुस्तक आहे. खालील डाव्या हातात कमंडलू दिसत आहे. मूर्तीच्या पायाशी उजव्या बाजूला एक हंस आहे तर डाव्या बाजूला सेविका असून तिच्या हातात चवरी आहे. ही मूर्ती शिलाहार कालीन म्हणजे अंदाजे आठव्या ते दहाव्या शतकातील  असावी.



**चित्र क्र. ३५ ब्रह्मदेव, तारापूर**

## महाबलीपुरम

महाबलीपुरम हे तमिळनाडूच्या चेंगलपट्टी जिल्ह्यातील एक नगर आहे. चेन्नईच्या दक्षिणेला ३६ मैल अंतरावर हे नगर आहे. येथील ७ व्या शतकातील प्रसिद्ध रथमंदिरांमुळे हे एक जागतिक वारसा स्थळ आहे. पल्लव राजवटीत हे अतिशय महत्त्वाचे शहर होते. रथमंदिरांबरोबरच तेथे एकपाषाणी मंदिरे सुद्धा आहेत. एका अखंड पाषाणातून ही खोदून काढलेली आहेत. यातच एक त्रिमूर्ती गुंफा आहे. हे एक त्रिदल पद्धतीचे मंदिर आहे. ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्या त्रिमूर्तीचे हे मंदिर आहे. अतिशय सुंदर गोपुर देखील खोदून काढले आहे. ह्यातील प्रत्येक गर्भगृह ब्रह्मा,

विष्णू व शिव यांच्यासाठी आहे. या तिन्हीच्या स्वतंत्र मूर्ती प्रत्येक कक्षात असून त्यांच्या पायाशी भक्तगण तसेच वरच्या बाजूला उडते गण दर्शविलेले आहेत. येथील ब्रह्मदेवाची मूर्ती मात्र



**चित्र क्र. ३६ ब्रह्मा मूर्ती, महाबलीपुरम**

नेहमीपेक्षा वेगळी म्हणजे एकमुखी आहे. त्याने रुद्राक्षांची माळ खांद्यावरून तिरकी घेतलेली आहे. वरच्या उजव्या हातात अक्षमाला असून वरच्या डाव्या हातात कमंडलू आहे. तर खालील उजवा हात अभय मुद्रेत असून खालील डावा हात कट्यावलंबित म्हणजेच कमरेवर ठेवलेला आहे. प्रत्येक कक्षाच्या दरवाजात द्वारपाल आहेत.  ब्रह्मदेवाच्या कक्षाबाहेर दोन द्वारपाल असून त्यांना दाढी दाखवलेली आहे. तसेच उजव्या बाजूच्या द्वारपालाच्या हातात स्रुक हे ब्रह्मदेवाचे आयुध दाखविलेले आहे. ब्रह्मदेवाची मूर्ती जरी वेगळी असली तरी द्वारपालांचे ब्रह्मदेवाशी असलेले साधर्म्य लक्षात घेता ही मूर्ती ब्रह्मदेवाचीच असावी असेच दिसते. (ASI Report, 1910-1911 : 58)

## थानुमालयम मंदिर

हे मंदिर तमिळनाडू राज्याच्या कन्याकुमारी जिल्ह्यातील शुचिंद्रम  येथे आहे.  ह्या मंदिराचा १७ व्या शतकात जीर्णोद्धार झालेला आहे. ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्या मुख्य देवता असून ४० मीटर उंचीचे गोपुर आहे आहे. कोरीव कामाचा उत्कृष्ट नमूना आहे. थनु म्हणजे शिव, माल म्हणजे विष्णू तर आयन म्हणजे ब्रह्मा. शैव आणि वैष्णव अशा दोन्ही पंथांचे लोक इथे येतात. गर्भगृहात शिवलिंग असून त्यालाच त्रिमूर्ती लिंगम असे म्हटले जाते. महर्षि अत्री येथे राहात असत, त्यांची पत्नी अनसूयाची परीक्षा घेण्यासाठी ब्रह्मा, विष्णू  आणि महेश येथे आले आणि एका बहाव्याच्या झाडाखाली स्वयंभू लिंगात येथेच राहिले अशी एक कथा प्रचलित आहे. हे बहाव्याचे झाड खूपच पुरातन असून ते आता आतमधून पोकळ झालेले आहे. ते पडू नये म्हणून त्यावर धातूचे पत्रे ठोकलेले आहेत. ह्या पोकळीत तीन लिंगे असून ते ब्रह्मा, विष्णू आणि महेश आहेत अशी येथील भक्तांची धारणा आहे. (Gazetteer of Trivendram, 1962 : 89-90)

## मित्रअनंतपुरम त्रिमूर्ती मंदिर

तिरुवनंतपुरम येथील प्रसिद्ध पद्मनाभस्वामी मंदिराच्या बाजूलाच हे त्रिमूर्ती मंदिर आहे. ह्या मंदिरात तीन छोटी छोटी गर्भगृहे असून त्यात मध्यभागी विष्णू, डावीकडे ब्रह्मा आणि उजवीकडे शिवलिंग आहे. विष्णूची मूर्ती उभी आहे तर ब्रह्मदेवाची बसलेली आहे. ब्रह्मदेवाच्या मूर्तीला एकच मुख आहे. ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्या तिघांनी मिळून इथे सूर्याला प्रसन्न करून घेण्यासाठी एक यज्ञ केला होता अशी कथा सांगितली जाते. म्हणूनच मित्र म्हणजेच सूर्य ह्या अर्थी मंदिराचे नाव असे आहे.

### ३.२० ब्रह्मावर्त घाट – बिठूर :

हे उत्तर प्रदेशातील छोटेसे शहर कानपूरपासून २४ किलोमीटर अंतरावर आहे. गंगा नदीच्या उजव्या किनाऱ्यावर हे गाव असून हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. इथल्या एका आख्यायिकेनुसार ब्रह्मदेवाने सृष्टीनिर्मिती पूर्वी या ठिकाणी घोर तपश्चर्या केली होती. ह्या ठिकाणी एक ब्रह्मावर्त घाट असून हा परिसर म्हणजेच ब्रह्मावर्त असल्याचा येथील स्थानिकांचा विश्वास आहे. ह्या ठिकाणी ब्रह्मदेवाने सृष्टीनिर्मितीचे कार्य पूर्ण झाल्याबद्दल अश्वमेध यज्ञ केला होता. त्याची आठवण म्हणून ब्रह्मदेवाने येथे एक खुंटी गाडून ठेवली आहे; जी आजही तिथे अस्तित्वात आहे. त्याला ब्रह्माजी की खुंटी असे म्हणतात. तसेच यज्ञात बळी दिलेल्या घोड्याची नाल ह्या ठिकाणी एका पायरीमध्ये घातली आहे असेही सांगितले जाते. ह्या ठिकाणी येणारे यात्रेकरू गंगा नदीत स्नान केल्यानंतर पायात लाकडी खडावा घालून ह्या ब्रह्माजी की खुंटीचे दर्शन घेतात. (Gazetteer of Kanpur, 1989 : 326)

### ३.२१ ब्रह्मकपाल – एक तीर्थस्थान

हे एक प्रसिद्ध तीर्थस्थान हिमालयातील अलकनंदा नदीमध्ये आहे. ही एक उंचा शिला असून तिचा काही भाग गंगेत आहे. तिच्यावर बसून श्राद्धविधि केल्याने माणसाच्या सर्व पूर्वजांना मुक्ती मिळते व पुन्हा कधीही श्राद्ध करावे लागत नाही असा येथे समज आहे. ब्रह्मकपालाविषयी भारतीय संस्कृति कोशातसुद्धा ही कथा दिलेली आहे. एकदा शिवाने ब्रह्मदेवाच्या पाच मस्तकांपैकी एक मस्तक छेदले. त्यामुळे शिवाला ब्रह्महत्येचे पाप लागले. ते तुटलेले मस्तक शिवाच्या मस्तकावर जाऊन बसले. ते मस्तक फार जड असल्याने शिवाला त्याचा भार सहन होईना, त्यामुळे ब्रह्महत्येचे हे पातक नष्ट होण्यासाठी व ते मस्तक आपल्या मस्तकावरून जाण्यासाठी शिव पृथ्वीवरील सर्व तीर्थांत स्नान करून आला. पण काहीच उपयोग झाला नाही. शेवटी शिव बद्रिकेदारला गेला आणि तिथे गंगेचे दर्शन घेतल्याबरोबर ब्रह्मदेवाचे ते शीर त्या स्थानी गळून पडले आणि शिव ब्रह्महत्येच्या पापातून मुक्त झाला. त्यावेळी ब्रह्मा, विष्णूसहित सर्व देवांनी त्या ठिकाणी येऊन शिवाची स्तुती केली. ते म्हणाले की ज्या अर्थी शिव हया ठिकाणी येऊन पापमुक्त झाला त्या अर्थी ह्या शिलेवर बसून ज्याच्या नावाने पिंडदान केले जाईल तो निरंतर ब्रह्मसदनी वास करेल. (जोशी, खंड ६,१९९६ : २९६)

### ३.२२ दत्त संप्रदाय



चित्र क्र. ३७ दत्तमूर्ती

एकट्या ब्रह्मदेवाची पूजा आता होत नसली तरीही त्रिमूर्ती किंवा दत्तरूपात तो आजही पूजला जात आहे. भारतभर जरी दत्त संप्रदायाचा प्रसार झाला नसला तरी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि गुजरात ह्या राज्यांमध्ये दत्ताची मोठ्या प्रमाणावर उपासना केली जाते. दत्तजन्माची ही कथा पाहू.

एकदा श्री ब्रह्मा, श्री विष्णू आणि श्री महेश (शिव) यांनी अत्रि ऋषी यांची पत्नी अनसूया हिची परीक्षा घेण्याचे ठरविले. हे तिघेही त्यांच्या आश्रमात ऋषींचा वेष धारण करून भिक्षा मागण्यासाठी जातात आणि भिक्षा म्हणून स्तनपान करण्याची मागणी करतात. परंतु माता अनसूया पतिव्रता असल्यामुळे त्यांना निराश न करण्याचे वचन देऊन त्यांचे लहान बालकांत रूपांतर करते व स्तनपान करून त्यांना जेवू घालून झोपवते. तेव्हा ब्रह्मा, विष्णू आणि महेश तिच्यावर प्रसन्न होऊन त्यांचे खरे रूप दाखवत वर मागण्यास सांगतात. अनसूया त्यांच्याकडे तुम्ही माझी बालके व्हावीत म्हणून वर मागते. तेव्हापासून ह्या तिघांचा एकत्रित संगम म्हणजे श्री दत्तात्रेय होय. दत्तात्रेयास उपास्यदैवत मानणाऱ्यांचा पंथ होय. पंधराव्या शतकात नरसिंह सरस्वती

नावाच्या विभूतीमुळे दत्तोपासनेचा संप्रदाय तयार झाला. पुराणे व अर्वाचीन पाच उपनिषदांतून दत्तास वर्णाश्रमधर्माची प्रतिष्ठा राखणारा, गुरुतत्त्वाचा आदर्श आणि योगाचा उपदेशक म्हटले आहे. दत्तात्रेय हा अवधूत योगी आहे म्हणून नाथ संप्रदायातही त्याची उपासना होते.

दत्तात्रेय हा महायोगी असल्याने योगमार्गास ह्या पंथात प्राधान्य मिळाले. महाराष्ट्रातील बहुतेक योगमार्गी दत्तोपासकच होते. या संप्रदायात शैव आणि वैष्णव तसेच हिंदू व मुसलमान यांच्यात समन्वय साधला आहे. माणिक प्रभूं सारख्यांनी समन्वयवादी विचार मांडले असले तरी या संप्रदायातील अवतारी पुरुषांनी वर्णाश्रमधर्मावरच जोर दिला आहे. दत्तमाहात्म्य व दत्तप्रबोध ह्या ग्रंथांत ह्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान आले आहे. गुरुचरित्रात संप्रदायाचा आचारधर्म सांगितला आहे. अवधूतगीता, गुरुगीता व जीवन्मुक्तगीता ह्या ग्रंथांतून संप्रदायाच्या सिद्धांतांचे विवरण आढळते. पूजोपचारांसाठी मूर्तीऐवजी पादुका प्रशस्त मानल्या आहेत. औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर ह्या क्षेत्री दत्तात्रेयाच्या पादुकांची स्थापना केलेली आहे. पांचाळेश्वर, नरसोबाची वाडी, माहूर, गाणगापूर, लाड कारंजे, कुरुगड्डी, गिरनार ही या संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे होत. पंथाचा प्रसार महाराष्ट्राइतका अन्यत्र आढळत नाही. नरसिंह सरस्वतींचा निवास गाणगापूरला झाल्यामुळे कर्नाटकात दत्त संप्रदायाचा विपुल प्रसार झाला. मराठी गुरुचरित्र लिहिणारा गृहस्थ हा कानडी होता. (मराठी विश्वकोश)

दत्ताची काही प्रमुख क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. श्री क्षेत्र माहुर :** हे महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यामधील एक दत्ताचे प्रसिद्ध स्थान आहे. येथील माता अनसूया, भगवान दत्तात्रेय आणि रेणुका मातेचे मंदिर प्रसिद्ध आहे.

**२. श्री क्षेत्र गिरनार :** गुजरात मधील जुनागढ जिल्ह्यातील रेवतक पर्वतरांगांमध्ये हे स्थान आहे. अहमदाबाद पासून ३२५ कि.मी. वर हे स्थान आहे. या ठिकाणी सुद्धा अंबाजी माता आणि दत्तात्रेय यांची मंदिरे आहेत तसेच काही जैन मंदिरे देखील आहेत. दत्ताच्या मुख्य मंदिरात जाण्यासाठी दहा हजार पायऱ्या चढून जावे लागते. गिरनारची ही दत्त यात्रा फारच प्रसिद्ध आहे. संपूर्ण भारतभरातून ह्या ठिकाणी लोक येत असतात.

**३. श्री क्षेत्र करंजी :** हे माता अनसूयेचे माहेर व दत्त गुरूंचे आजोळ. ह्या ठिकाणी पद्मासनातील दत्तमूर्ती आहे. नाशिक–वणी मार्गावर हे गाव असून इथेच कर्दम मुनींचाही आश्रम आहे.

**४. गुरुशिखर :** हे राजस्थान येथील अबूपासून जवळच आहे. हे अरवली पर्वताचे शिखर असून १७२२ मीटर उंचीवर आहे. येथे हिंदू व जैन मंदिरे आहेत. या ठिकाणी डाट गुरूंनी तपश्चर्या केली होती म्हणून येथे दत्त पादुकांचे मंदिर आहे.

## ३.२३ भारताबाहेरील ब्रह्मदेव





**चित्र क्र. ३८ व ३९ प्रंबनन मंदिर समूह व ब्रह्मदेव मूर्ती, इंडोनेशिया,**

भारताच्या शेजारील आणि जवळच्या देशांमध्येही ब्रह्मदेवाच्या मूर्ती किंवा देवळे सापडतात. ह्यामध्ये सगळ्यांत मोठे आणि महत्त्वाचे असे मंदिर म्हणजे प्रंबनन देवालय होय. प्रंबनन हे इंडोनेशियाच्या योग्यकर्ता ह्या शहरापासून अंदाजे १७ किलोमीटर वर योग्यकर्ता व जावा ह्यांच्या सीमेजवळ आहे. हे युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीमधील एक मंदिर असून इंडोनेशियातील सर्वांत मोठे तर आग्नेय आशियामधील दुसरे मोठे मंदिर आहे. हे मंदिर ९ व्या शतकाच्या मध्यात बांधले गेले असून कोरीव कामाचा अद्‌भूत आविष्कार येथे पाहावयास मिळतो. प्रथम हे देवालय इ.स. ८५० मध्ये रकाई पिकतन याने बांधले आणि नंतर त्याचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला तो लोकपाल व बालितुंग ह्या संजय राजांच्या काळात. विस्तार होत होत आता एकूण २४० मंदिरांचे असे हे अतिभव्य आवार आहे. ह्यामध्ये त्रिमूर्ती मंदिरे मोठी आहेत. मुख्य मंदिर हे शंकराचे असून त्याच्या उत्तरेला विष्णूचे तर दक्षिणेला ब्रह्माचे मंदिर आहे. गर्भगृहात त्या प्रमाणे प्रतिमा स्थापन केलेल्या आहेत. गर्भगृहात प्रवेश करताच समोर चतुर्मुखी ब्रह्मदेवाची मूर्ती आहे. प्रत्येक मुख्य मंदिरासमोर त्या देवाच्या वाहनाचे मंदिर आहे. वाहनांच्या मंदिरामध्ये वाहन मूर्ती सध्या तरी अस्तित्वात नाहीत परंतु तशा त्या तिथे स्थापित असाव्यात असे वाटते.



**चित्र क्र. ४० मृगस्थळी, नेपाळ**

इंडोनेशियाप्रमाणेच नेपाळमध्येही ब्रह्मदेवाच्या मूर्ती आढळतात. नेपाळ येथील प्रसिद्ध पशुपतिनाथ मंदिराच्या आवारात बऱ्याच देवदेवतांच्या मूर्ती आढळतात त्यात ब्रह्मदेवाच्याही मूर्ती आहेत परंतु त्या भग्नावस्थेत आहेत. देवपाटण, चपागाव येथेही ब्रह्मदेवाच्या मूर्ती आहेत परंतु मृगस्थळी नावाच्या गावातील मूर्ती छान सुबक आहे. ही मूर्ती चतुर्भुज, चतुर्मुखी आहे. खालचा डावा हात भग्न झालेला आहे वरील डाव्या हातात अक्षमाला, वरील उजव्या हातात वेद तर खालील दोन हात भग्न आहेत. ब्रह्मा कमलारूढ असून बाजूला दोन ऋषी देखील आहेत; ब्रह्माची शक्ती आणि हंस मात्र नाही. देवपाटण येथील मूर्ती द्विभुज असून चारही बाजूंनी मुख आहे आणि कमलारूढ आहे. इथेही हंस, शक्ती नाही.

## मिरपूर खास

मिरपूर खास हे शहर पाकिस्तानातील सिंध प्रांतात आहे. तेथील ही मूर्ती असून ही ब्राँझ धातूची आहे. ही ५व्या किंवा ६व्या शतकातील असून धातूच्या मूर्तींमधील सर्वांत जुनी मूर्ती आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात एका शेतात ही मूर्ती सापडली. चतुर्मुखी ब्रह्मदेवाची ही मूर्ती ०.९१४ मीटर उंचीची असून तिला दोनच हात आहेत. धोतर आणि यज्ञोपवीत धारण केलेलं असून अलंकार मात्र अजिबात नाहीत. गुप्तकाळातील मूर्तिकलेचा हा उत्तम आविष्कार आहे. (Sind Quarterly Vol. 8, Shah Abdul Latif Cultural Society, 1980)



**चित्र क्र. ४१ ब्रह्मदेव ब्राँझ मूर्ती, मिरपूर, पाकिस्तान.**

### ३.२४ बर्मर : एक क्षेत्रपाल देवता

कर्नाटकात तुलू नावाची एक आदिम जमात आहे. फिरक हे त्यांचे मूळ स्थान. हे आदिवासी ब्रह्मदेवाचे उपासक होते. त्यांच्या भाषेत त्याला बर्मर असे म्हणतात. अर हा बहुवचनी प्रत्यय असून तो आदरार्थी वापरला आहे. हे आदिवासी विकसित झाले व स्थलांतरित सुद्धा झाले. त्यांच्या वस्तीला तुलूनाद असे म्हणत असत. ह्या तुलूनादमध्ये एक तरी ब्रह्मदेवाचे मंदिर असे. हे मंदिर त्यांच्या वस्तीच्या मध्यभागी असे आणि त्या जागेला बर्मरगुंडा म्हणजेच ब्रह्मस्थान असे म्हणतात. ही मंदिरे १७ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. त्यांचे एक लोकगीत आहे; त्यात नायक कोटी व नायिका चेन्नया बर्मरदेवाची उपासना करतात असा उल्लेख आहे. त्यांच्या ह्या लोकगीताला पदधान म्हणतात. तुलूनाद मध्ये सुद्धा शिव आणि विष्णूची उपासना वाढत गेली आणि बर्मर मागे पडत गेला. बर्मरच्या आधी नाग हा शब्द लावून नागबर्मर अशी एक नवीन देवता निर्माण झाली. ही बर्मरची मूर्ती मात्र आपल्याकडच्या खंडोबासारखी अश्वारूढ असते. (भट, १९७५ : ५–१८)

आत्तापर्यंत झालेल्या प्राचीन साहित्य, मंदिरे, मूर्ती यांच्या अभ्यासावरून ब्रह्मदेव हा निश्चितपणे एक महत्त्वाचा देव होता असे आपण म्हणू शकतो. कालांतराने त्याची उपासना मागे पडली त्याच्या कारणांचा वेध आपण पुढील प्रकरणामध्ये घेणारच आहोत पण तत्पूर्वी मूर्तिपूजेशिवाय आणखी काही स्वरूपातील उपासना आपण पाहू या.

### ३.२५ ब्रह्मदेवाची स्तोत्रे

ब्रह्मदेवाची १०८ नावे, ब्रह्मा चालीसा अशी स्तोत्रे आहेत. ब्रह्मदेवाच्या क्षेत्रात पुष्कर मध्ये ती म्हटली जातात पण इतर स्थानांवर ती म्हटली जाण्याबद्दल उल्लेख आढळत नाहीत. ब्रह्मा चालीसा हे स्तोत्र म्हणजे हनुमान चालीसा असते तसेच असून ब्रह्मदेवाच्या मंदिरात पुष्कर येथे हे लिहिलेले आहे. रोज सकाळची पूजा होते त्यावेळी हे कवच म्हटलेही जाते.

**ब्रह्मा चालीसा :**

**जय जय कमलासन जगमूला,रहहू सदा जनपै अनुकूला ।**

**रुप चतुर्भुज परम सुहावन,तुम्हें अहैं चतुर्दिक आनन ।**

**रक्तवर्ण तव सुभग शरीरा,मस्तक जटाजुट गंभीरा ।**

**ताके ऊपर मुकुट विराजै,दाढ़ी श्वेत महाछवि छाजै ।**

**श्वेतवस्त्र धारे तुम सुन्दर, है यज्ञोपवीत अति मनहर ।**

**कानन कुण्डल सुभग विराजहिं, गल मोतिन की माला राजहिं ।**

**चारिहु वेद तुम्हीं प्रगटाये,दिव्य ज्ञान त्रिभुवनहिं सिखाये ।**

**ब्रह्मलोक शुभ धाम तुम्हारा, अखिल भुवन महँ यश विस्तारा ।**

**अर्धांगिनी तव है सावित्री, अपर नाम हिये गायत्री ।**

**सरस्वती तब सुता मनोहर, वीणा वादिनि सब विधि सुंदर ।**

**कमलासन पर रहे विराजे, तुम हरिभक्ति साज सब साजे ।**

**क्षीर सिन्धु सोवत सुरभूपा, नाभि कमल भो प्रगट अनूपा ।**

**तेहि पर तुम आसीन कृपाला, सदा करहु सन्तन प्रतिपाला ।**

**एक बार की कथा प्रचारी, तुम कहा मोह भयेउ मन भारी ।**

**कमलासन लखि कीन्ह बिचारा, और न कोउ अहै संसारा ।**

**तब तुम कमलनाल गहि लीन्हा, अन्त विलोकन कर प्रण कीन्हा ।**

**कोटिक वर्ष गये यहि भांती, भ्रमत भ्रमत बीते दिन राती ।**

**पै तुम ताकर अन्त न पाये, ह्वै निराश अतिशय दुःखियाये ।**

**पुनि बिचार मन महँ यह कीन्हा महापघ यह अति प्राचीन ।**

याको जन्म भयो को कारन, तबहीं मोहि करयो यह धारन ।

अखिल भुवन में कहीं कोई नाहीं, सब कुछ अहै निहित मो माहीं ।

यह निश्चय करि गरब बढ़ायो, निज कहें ब्रह्म मानि सुखपाये ।

गगन गिरा तब भई गंभीरा, ब्रह्मा वचन सुनहु धरि धीरा ।

सकल सृष्टि कर स्वामी जोई, ब्रह्म अनादि अलख है सोई ।

निज इच्छा इन सब निरमाये, ब्रह्मा विष्णु महेश बनाये ।

सृष्टि लागि प्रगटे त्रयदेवा, सब जग इनकी करिहै सेवा ।

महापघ जो तुम्हरो आसन, ता पै अहै विष्णु को शासन ।

विष्णु नाभितें प्रगट्यो आई, तुम कहें सत्य दीन्ह समुझाई ।

भैतहू जाई विष्णु हितमानी,यह कहि बन्द भई नभवानी ।

ताहि श्रवण कहि अचरज माना,पुनिचतुरानन कीन्ह पयाना ।

कमल नाल धरि नीचे आवा, तहां विष्णु के दर्शन पावा ।

शयन करत देखे सुरभूपा, श्यामलवर्ण तनु परम अनूपा ।

सोहत चतुर्भुजा अतिसुन्दर, किरीटमुकट राजत मस्तक पर ।

गल बैजन्ती माल विराजै, कोटि सूर्य की शोभा लाजै ।

शंख चक्र अरु गदा मनोहर, पघ नाग शय्या अति मनहर ।

दिव्यरुप लखि कीन्हे प्रणामू, हर्षित भे श्रीपति सुख धामू ।

बहु विधि विनय कीं हें चतुरानन, तब लक्ष्मी पति कहेउ मुदित मन ।

ब्रह्मा दूरि करहु अभिमाना, ब्रह्मारुप हम दोउ समाना ।

तीजे श्री शिवशंकर आहीं, ब्रह्मरुप सब त्रिभुवन मांही ।

तुम सों होई सृष्टि विस्तारा, हम पालन करिहैं संसारा ।

शिव संहार करहिं सब केरा, हम तीनहुं कहें काज घनेरा ।

अगुणरुप श्री ब्रह्मा बखानहु, निराकार तिनकहें तुम जानहु ।

हम साकार रुप त्रयदेवा, करिहैं सदा ब्रह्म की सेवा ।

यह सुनि ब्रह्मा परम सिहाये, परब्रह्म के यश अति गाये ।

सो सब विदित वेद के नामा, मुक्ति रूप सो परम ललामा ।

यहि विधि प्रभु भो जनम तुम्हारा, पुनि तुम प्रगट कीहें संसारा ।

नाम पितामह सुन्दर पायेउ, जड़ चेतन सब कहें निरमायेउ ।

लीन्ह अनेक बार अवतारा, सुन्दर सुयश जगत विस्तारा ।

देवदनुज सब तुम कहें ध्यावहिं, मनवांछित तुम सन सब पावहिं ।

जो कोउ ध्यान धरै नर नारी, ताकी आस पुजावहु सारी ।

पुष्कर तीर्थ परम सुखदाई, तहें तुम बसहु सदा सुरराई ।

कुण्ड नहाइ करहि जो पूजन, ता कर दूर होई सब दूषण ।

।। इति श्री ब्रह्मा चालीसा ।।

ब्रह्मदेवाच्या १०८ नावांचे स्तोत्र :

श्रीब्रह्माष्टोत्तरशतनामावलिः

ॐ ब्रह्मणे नमः । गायत्रीपतये । सावित्रीपतये । सरस्वतिपतये ।

प्रजापतये । हिरण्यगर्भाय । कमण्डलुधराय । रक्तवर्णाय ।

ऊर्ध्वलोकपालाय । वरदाय । वनमालिने । सुरश्रेष्ठाय । पितामहाय ।

वेदगर्भाय । चतुर्मुखाय । सृष्टिकर्त्रे । बृहस्पतये । बालरूपिणे ।

सुरप्रियाय । चक्रदेवाय नमः ।। २० ।।

ॐ भुवनाधिपाय नमः । पुण्डरीकाक्षाय । पीताक्षाय । विजयाय ।

पुरुषोत्तमाय । पद्महस्ताय । तमोनुदे । जनानन्दाय । जनप्रियाय ।

ब्रह्मणे । मुनये । श्रीनिवासाय । शुभङ्कराय । देवकर्त्रे ।

स्रष्ट्रे । विष्णवे । भार्गवाय । गोनर्दाय । पितामहाय ।

महादेवाय नमः ।। ४० ।।

ॐ राघवाय नमः । विरिञ्चये । वाराहाय । शङ्कराय । स्रुकहस्ताय ।

पद्मनेत्राय । कुशहस्ताय । गोविन्दाय । सुरेन्द्राय । पद्मतनवे ।

मध्वक्षाय । कनकप्रभाय । अन्नदात्रे । शम्भवे । पौलस्त्याय ।

हंसवाहनाय । वसिष्ठाय । नारदाय । श्रुतिदात्रे ।

यजुषां पतये नमः ।। ६० ।।

ॐ मधुप्रियाय नमः । नारायणाय । द्विजप्रियाय । ब्रह्मगर्भाय ।

सुतप्रियाय । महारूपाय । सुरूपाय । विश्वकर्मणे । जनाध्यक्षाय ।

देवाध्यक्षाय । गङ्गाधराय । जलदाय । त्रिपुरारये । त्रिलोचनाय ।

वधनाशनाय । शौरये । चक्रधारकाय । विरूपाक्षाय । गौतमाय ।

माल्यवते नमः ।। ८० ।।

ॐ द्विजेन्द्राय नमः । दिवानाथाय । पुरन्दराय । हंसबाहवे ।

गरुडप्रियाय । महायक्षाय । सुयज्ञाय । शुक्लवर्णाय ।

पद्मबोधकाय । लिङ्गिने । उमापतये । विनायकाय । धनाधिपाय ।

वासुकये । युगाध्यक्षाय । स्त्रीराज्याय । सुभोगाय । तक्षकाय ।

पापहर्त्रे । सुदर्शनाय नमः ।। १०० ।।

ॐ महावीराय । दुर्गनाशनाय । पद्मगृहाय । मृगलाञ्छनाय ।

वेदरूपिणे । अक्षमालाधराय । ब्राह्मणप्रियाय । विधये नमः ।। १०८ ।।

इति ब्रह्माष्टोत्तरशतनामावलिः समाप्तः ।

ब्रह्मदेवाची गायत्री :

ॐ तत्पुरुषाय विद्महे चतुर्मुखाय धीमहि । तन्नो ब्रह्मा प्रचोदयात ।।

ॐ चतुर्मुखाय विद्महे हंसारूढाय धीमहि । तन्नो ब्रह्मा प्रचोदयात ।।

ॐ वेदात्मनाय विद्महे हिरण्यगर्भाय धीमहि । तन्नो ब्रह्मा प्रचोदयात ।।

ॐ परमेश्वराय विद्महे परतत्त्वाय धीमहि । तन्नो ब्रह्मा प्रचोदयात ।।

**ब्रह्मार्पण मंत्र :**

नित्य पूजाविधि समाप्त करताना नृत्य, गीत, ध्वज इत्यादी उपचार झाल्यानंतर बुद्धी, वासना, अहंकार, मन, इंद्रिये यांसह परमेश्वराला आत्मार्पण करावे असे सांगितले आहे. ह्यालाच ब्रह्मार्पण म्हणतात. प्राण, बुद्धी, देहधर्म यांच्या साहाय्याने जागेपाणी, झोपेत व स्वप्नात मनाने,

वाचेने, हातांनी, पायांनी, उदराने व शिश्नाने ज्याचे स्मरण केले; जे वाचेने व्यक्त केले व ज्याचे आचरण केले; ते सारे ब्रह्मार्पण असो! असा तो मंत्र आहे.

**ॐ इत: पूर्वं प्राणबुद्धिदेहधर्माधिकारतो जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यवस्थासु मनसा वाचा हस्ताभ्यां पद्भ्यामुदरेण शिश्नेन यत् स्मृतं यदुक्तं यत् कृतं तत्सर्वं ब्रह्मार्पणं भवतु स्वाहा । मां मदीय च सकलं हरये ते समर्पये ॐ तत्सत् ।**

### ३.२६ ब्रह्मदेवाशी संबंधित काही व्रते

ब्रह्मदेव किंवा ब्रह्मांड ह्याविषयी उल्लेख असलेली काही व्रते देखील आहेत. परंतु ही व्रते सध्याच्या काळात कोणी पाळतात का ह्याविषयी काही माहिती उपलब्ध नाही.

**१. ब्रह्मांडदान :** हे एक महादान आहे. यासाठी सोन्याचे दोन अर्धगोलाकार कलश करतात. त्यांनाच ब्रह्मांड म्हणतात. त्यावर मध्यभागी अष्ट दिग्गज, वेद, वेदांगे, अष्ट लोकपाल व ब्रह्मा यांच्या आकृती काढतात त्यावर शिव, विष्णू व सूर्य यांच्या तर आतील बाजूस उमा, लक्ष्मी, वसु, आदित्य व मरुत यांच्या आकृती काढतात. हे दोन्ही कलश जुळवून रेशमी वस्त्रात गुंडाळून तिळांच्या ढिगावर ठेवतात. त्या भोवती अठरा प्रकारची धान्ये पसरतात. नंतर पूर्वेकडून सुरुवात करून आठ दिशांना अनंतशयन, प्रद्युम्न, प्रकृती, संकर्षण, वेद, अनिरुद्ध, अग्नी आणि वासुदेव यांच्या सुवर्णप्रतिमा स्थापतात व त्यांची पूजा करतात. मग होमापाशी दहा वस्त्राच्छादित कलश, शिंगांना सोने लावलेल्या गाई, त्यांचे दूध काढण्यासाठी तांब्याची भांडी, आसने, छत्रचामर, पादत्राणे, आरसे इत्यादी वस्तू मांडतात. मग ह्या वस्तूंची पूजा करून सर्व गोष्टी दान करतात. व्रताचे फळ : पापनाश व स्वर्गात अप्सरांबरोबर निवास.

**२. ब्रह्मकूर्च :** हे एक काम्य व्रत आहे. कार्तिक वद्य चतुर्दशी ही याची तिथी आहे. एक दिवस उपास करून दुसऱ्या दिवशी पंचगव्य प्राशन करतात. पंचगव्याची द्रव्ये शक्यतो निरनिराळ्या रंगांच्या गायींची घेतात. दुसऱ्या दिवशी देव पूजा व ब्राह्मण पूजा करून अन्नग्रहण करतात. व्रताचे फळ : पाप नाश

**३. ब्रह्मव्रत :** हे एक काम्य व्रत असून ह्या व्रताचा प्रारंभ कोणत्याही शुभ दिवशी करतात. याच्या विधिमध्ये ब्रह्मांडाची एक सुवर्णप्रतिमा तयार करतात, नंतर तीळदान व अग्नीपूजा करतात

आणि ही प्रतिमा एका दांपत्याला दान करतात. व्रताचे फळ : ब्रह्मलोक प्राप्ती व पुनर्जन्मातून मुक्ती.

**४. ब्रह्मसावित्रीव्रत :** हे एक स्त्री व्रत आहे. भाद्रपद शुद्ध त्रयोदशीपासून या व्रताचा प्रारंभ करतात. यात तीन दिवस उपास करायचा असतो. ते शक्य नसेल तर त्रयोदशीला नक्त, चतुर्दशीला अयाचित आणि पौर्णिमेला उपवास करावा असे सांगितले आहे. ब्रह्मा आणि सावित्री यांच्या मूर्ती करून त्यांची पूजा करून पौर्णिमेला रात्री जागरण करणे व प्रतिपदेला त्या मूर्तींचे दान करणे असा या व्रताचा विधि असतो. या व्रताची कथा म्हणजे सावित्री सत्यवानाची कथा होय. व्रताचे फळ : अष्टपुत्रांची प्राप्ती व पतीला दीर्घायुष्याचा लाभ.

**५. ब्राह्मीपतिपद्लाभव्रत :** हे एक काम्य व्रत आहे. कालावधी एक वर्ष किंवा बारा वर्षे, चैत्र शुद्ध प्रतिपदेला या व्रताचा प्रारंभ करून त्या दिवशी उपास करायचा, रंगीत रांगोळीच्या अष्टदलावर ब्रह्ममूर्तीची स्थापना व पूजा करतात. त्याच्या चार मुख्य दिशांना चार वेदांची स्थापना करतात. देवतांची पूजा करतात. उद्यापनाच्यावेळी गाय दान देतात. व्रताचे फळ : वेद पारंगतता व ब्रह्मलोक प्राप्ती.

**६. ब्रह्मविधि :** हा एक प्रकारचा कुलाचार आहे. दक्षिणेतील काही ब्राह्मण, लिंगायत तसेच कोष्टी लोकात हा कुलाचार आढळतो. याचा विधि पुढीलप्रमाणे– आश्विन वद्य त्रयोदशीला म्हणजेच धनत्रयोदशीला घरातील कर्ता माणूस दिवसभर उपवास करतो. संध्याकाळी स्नान करून स्वयंपाकघरात जातो. इतरांना बाहेर घालवून दाराला आतून कडी लावून घेतो. मग नग्नावस्थेत खांबाची पूजा करतो; त्याला पुरणावरणाचा नैवेद्य दाखवतो. मग तो नैवेद्य स्वत: नग्नावस्थेतच खाऊन तिथेच हात धुवून बाहेर येतो. नंतर ब्राह्मण सवाष्णींची पूजा करून त्यांना जेवायला वाढतो.

**७. ब्रह्मध्वज पूजन :** म्हणजेच गुढीपाडवा हा एक लोकप्रिय सण आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला जी गुढी उभारतात त्यालाच ब्रह्मध्वज असेही म्हणतात. ब्रह्मदेवाने ह्याच दिवशी सृष्टीरचना केली असे मानले जाते. (जोशी, खंड ६, १९९२: २९६–३१९)

ही काही व्रते यात ब्रह्मा हाच मुख्य देवता मानलेला आहे. आणखीही काही देवता पुढे पाहू ज्यांचे ब्रह्मदेवाशी साधर्म्य  आहे.

### ३.२७ ब्रह्मदेवाशी साधर्म्य असलेल्या इतर देवता

**ब्रह्मणदेव :** ही कोकणातली एक ग्रामदेवता आहे. याला ब्राह्मणदेव किंवा ब्रह्मदेव अशीही नावे आहेत. या देवाची पूजा प्रामुख्याने महाराष्ट्र व गुजरात या दोन प्रदेशात होते. काही ठिकाणी याची मूर्ती असते तर काही ठिकाणी नुसताच तांदळा असतो. जिथे या देवाची मूर्ती असते तिथे त्याच्या डोक्यावर मुकुट, गळ्यात अलंकार, कानात कुंडले, एका हातात रुद्राक्षाची माळा, दुसऱ्या हातात कमंडलू आणि पायात खडावा असतात. त्याच बरोबर जानवेही असते. काही मूर्तीच्या एका हातात झारी व दुसऱ्या हातात कमळ असते. या देवाचा उत्सव ज्येष्ठ व श्रावण महिन्यात करतात. हा गुजरातमधील कोकण्यांचाही देव आहे.

**ब्रह्मभूत :** ही एक ग्रामदेवता आहे. याला देखील काही ठिकाणी ब्रह्मदेव असेही म्हणतात. तुळू भाषिक लोकात हा देव म्हणून नव्हे तर एक विशिष्ट भूत म्हणून शेताशेतातून पूजला जातो. वर्ष कृत्यांपैकीच ते एक कृत्य असते. पुराणकारांनी ब्रह्मदेवाची पूजा निषिद्ध ठरविल्यावर काही जाती जमातीत तो अर्धा देव व अर्धा भूत अशा स्वरूपात राहिला. त्यांनी ब्रह्मभूत म्हणून त्याची पूजा चालू ठेवली. या ब्रह्मभुताच्या मस्तका संबंधी एक कथा सांगितली जाते ती अशी; पूर्वी ब्रह्मदेवाला पाच मस्तके होती. त्यातील एक मस्तक शिवाने तोडले, त्या तुटलेल्या मस्तकाने शिवाला विचारले की माझी पुढे गती काय? तेव्हा शिवाने त्याला सांगितले की तू पृथ्वीवर जाऊन भूत योनीत राहा. त्याप्रमाणे ते मस्तक भूत बनले. तुळू लोकांची या संबंधीची लोककथा अधिक तपशीलवार आहे. ब्रह्मदेवाला चार मस्तके आणि आठ हात पाहून शिवाला मत्सर वाटला कारण शिवाला तीनच मस्तके होती. या मत्सरातून त्याने ब्रह्मदेवाचे एक मस्तक तोडले. ते मस्तक शिवाला शरण गेले. मग शिव त्याला म्हणाला की पृथ्वीवर जाऊन नागांशी संबंध जोड आणि मानव जातीला उपद्रव दे म्हणजे लोक तुझी पूजा करतील. त्यामुळे हा ब्रह्मभूत एकमुखी झाला आहे.  तो हाती खड्ग घेऊन घोड्यावर बसतो अशी समजूत आहे. बऱ्याच ठिकाणी क्षेत्रपाल म्हणून ब्रह्मभूताच्या स्वरूपात ब्रह्मदेवाची पूजा होताना दिसते. (जोशी, खंड ६, १९९२: ३०४)

ह्या सर्व विवेचनावरून ब्रह्मदेव ही त्रिमूर्तीमधील एक प्रसिद्ध देवता होती असे लक्षात येते. हे तीनही देव सृष्टीनिर्मितीच्या कार्यातील महत्त्वाचे घटक आहेत. ब्रह्माने हे विश्व निर्माण व्हावे अशी इच्छा व्यक्त केली, परंतु तिचा कर्ता हा ब्रह्मदेव आहे; ह्या कल्पनेच्या आधारावरच हे तत्त्वज्ञान उभे राहिलेले आपण पाहिले. प्राचीन काळात स्वयंभू, हिरण्यगर्भ, पितामह, विधाता असलेला ब्रह्मदेव मग विष्णूच्या नाभीकमळातून जन्मलेला दिसला. त्याचे विश्वकर्मा, प्रजापती, त्वष्टा असे झालेले रूपांतर आणि पुराणांमध्ये वर्णन केलेले सृष्टीनिर्मितीचे कार्य जरी तसेच राहिले असले तरी निरनिराळ्या कथांमधून तो शापित झाला. परिणामतः देव्हाऱ्यातून, रोजच्या पूजेमधून हळूहळू बाहेर पडला. प्राचीन काळापासून ते सुमारे १५ व्या शतकापर्यंतचा ब्रह्मदेवाचा प्रवास आपण पाहिला. प्राचीन ग्रंथांमधून असलेले उल्लेख, ब्रह्मदेवाची काही मंदिरे, इतर देवतांच्या मंदिरांमधून असलेल्या त्याच्या मूर्ती ह्या सगळ्याचा विस्तृत अभ्यास आपण पाहिला. त्याच बरोबर निरनिराळी व्रते, स्तोत्रेही अभ्यासली. असे असतानाही आज आपल्याला त्याचा कोणताही संप्रदाय आढळत नाही हेही तितकेच खरे आहे. अतिशय महत्त्वाचा देव असा दुर्लक्षित का झाला असावा ह्याचा अभ्यास, कारणे आता पुढच्या प्रकरणात येणार आहे. त्यासाठी पुन्हा धार्मिक ग्रंथ, लोककथा, वैचारिक बदल या अंगाने विचार केला आहे.



## प्रकरण ४

## माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिवर्चन

मागच्या प्रकरणामधून आपण पाहिले की ब्रह्मदेव हा हिंदू विचारधारेतील अतिशय महत्त्वाचा असा सृष्टीनिर्मितीचा भाग व्यापून आहे; त्रिदेव किंवा त्रिमूर्ती ह्या मूळ संकल्पनेमधील तो प्रमुख देव आहे. परंतु त्रिदेवांमधील विष्णू व शंकराच्या तुलनेत त्याला तसे पाहता कोणतेही महत्त्व नाही असे दिसते. इतर दोघांप्रमाणे केवळ ब्रह्मदेवाचीच भक्ती करणारे अनुयायी, पंथ अस्तित्वात असल्याचे दिसत नाहीत. आधीच्या प्रकरणात ब्रह्मदेवाची प्रतिमा, मंदिरे आपण अभ्यासली त्यावरून पूर्वीच्या काळात ब्रह्मदेवाचा असा पंथ किंवा बाकी देवदेवतांच्या यादीत त्याला महत्त्वाचे स्थान असावे असे दिसते. सर्व प्रमुख धार्मिक ग्रंथांमधील तसे उल्लेख आपण पाहिले, अभ्यासले. वैदिक ग्रंथ, ब्राह्मणग्रंथ ह्यांमध्ये मुख्य देव म्हणून प्रस्थापित असलेला ब्रह्मदेव पुराणात सृष्टीकर्ता एवढाच मर्यादित आहे. ब्रह्मदेव अपूज्य होण्याच्या कथा अगदी विस्ताराने पुराणांमध्ये दिलेल्या आहेत. त्यामुळेच  हळूहळू त्याचे महत्त्व कमी होत गेले आणि आज अशी परिस्थिती आहे की ब्रह्मदेवाचा केवळ सृष्टीचा निर्माता म्हणूनच उल्लेख होताना दिसतो. शैव, वैष्णव, सौर, शाक्त आणि गाणपत्य असे पंथ निर्माण झाले. त्यात एकमेकांबरोबर श्रेष्ठत्वासाठी स्पर्धा, चढाओढ सुरू झाली. आपला पंथ वरचढ ठरावा त्यासाठी अनेक कथा पुराणकर्त्यांनी गुंफल्या. ह्या सगळ्या चढाओढीत ब्रह्मदेव कुठेतरी लुप्तच होऊन गेलेला आढळून येतो. ब्रह्मदेवाची उपासना कमी होण्यामागची कारणे ह्या प्रकरणात अभ्यासली जाणार आहेत. त्याचबरोबर त्याच्या अपूज्य होण्याविषयीच्या निरनिराळ्या कथा व कल्पना ह्यांचा सुद्धा शोध आणि अभ्यास ह्या प्रकरणातून दिसणार आहे.

### ४.१ ब्रह्मदेवाची आपल्याच मुली प्रति आसक्ती

ब्रह्मदेव अपूज्य ठरला ह्या मागचे कारण म्हणून सर्वात पहिली ही कन्यासक्तीची कथा सांगितली जाते. एकतर ही कथा जवळ जवळ सगळ्याच धार्मिक ग्रंथांमध्ये म्हणजे वेदांपासून पुराणांपर्यंत सगळीकडे कमी अधिक फरकाने आलेली आहे आणि सर्व ग्रंथांमधून ह्या अधर्मामुळेच ब्रह्मदेव आपले स्थान गमावून बसला आहे असेच वर्णन दिसते.

ह्या कथेचा उल्लेख सर्व प्रथम ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळात आढळतो.

**महे यत्पित्र ईं रसं दिवे करव त्सरपृश्न्यश्चिकित्वान् ।**

**सृजदत्ता धृषता दिद्युमस्मै स्वायां देवो दुहितरि त्विषिं धात् ।। ५ ।।**

**(ऋग्वेद १/७१/५)**

अर्थ : ज्यावेळी यजमानाने अग्नीत आहुती टाकली त्यावेळी ती त्याने आकाशरूपी मोठ्या 'पित्याला' उद्देशून टाकली. त्याचबरोबर तिचे मर्म जाणून 'पिता' सुंदर आकर्षक अशा त्या 'पृश्नीं'कडे ( चित्रविचित्र ठिपके असलेल्या गायींकडे) धावला. त्याबरोबर धनुष्यावर बाण चढवून त्याने (पारध्याने) त्याच्यावर म्हणजेच पित्यावर बाण सोडला आणि त्या देवाने किंवा पित्याने आपले बीज (रेतस्) आपल्याच मुलीच्या ठिकाणी (स्वायां दुहितरि) प्रविष्ट केले. (ऋग्वेद १/७१/५)

जरी या ठिकाणी स्पष्टपणे 'कोण्या एके काळी' हे शब्द नसले तरी ही एक प्राचीन घटना आहे, हे सहज कळण्याजोगे आहे. येथे आपल्याच मुलीच्या ठिकाणी बीजारोपण करणारा पिता कोणी वृषभ असावा असे अनुमान करणे इष्ट होईल. पण हे केवळ अनुमानच होय. कारण पिता हा आकाश आहे असाही उल्लेख आधी आला आहे; आणि तोच देव आहे असेही म्हटलेले आहे. तसेच 'पृश्नि' अनेक असूनही; त्यांच्याशी हा पिता समागम न करता स्वतःच्या मुलीशीच लगट करतो. (डांगे, १९९३ : १४०)

या नंतर या कथेचा उल्लेख ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळात आढळतो. (सातवळेकर, १९५७ : ६७५–६७६) अगदी अस्पष्ट असा उल्लेख आहे तो पुढील प्रमाणे

**पुनस्तदा वहति यत्कनाया दुहितुः आ अनुमृतम् अनर्वा ५।**

**मध्या यत्कर्वम् अभवद् अभीके कामं कृण्वाने पितरि युवत्याम् ।६।**

**पिता यत्स्वां दुहितरम् अधिष्कन् क्ष्म्या रेतः संजग्मानो न्यषिञ्चत् ।७।**

**(ऋग्वेद १०/ ६१/ ५–७)**

अर्थः– च्यवन ऋषींनी यज्ञाची वेदी नीटपणे आखून तयार केली आणि विविध साहित्याने नटविली. त्यानंतर त्यांनी पृथ्वीवरील समृद्धीसाठी आहुती दिली. ( या आहुतीला 'रेतस' असे

म्हटलेले आहे.) त्याचबरोबर पित्याने आपल्या मुलीकडे धाव घेतली आणि दोघांनीही उच्च पातळीवर थोडेसे रेत सर्जन केले. पित्याने आपल्या मुलीच्या ठिकाणी रेत सिंचन केले.

ह्या दोन्ही संदर्भात स.अं.डांगे म्हणतात, ह्या दोन्ही पुराकथेत जीवप्रतिके वापरलेली आहेत ती सारखीच आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे 'रेतस्'. यज्ञीय वेदीतील अग्नीत हविर्द्रव्य म्हणून वापरलेले जे तूप, दूध, सोम किंवा असाच कुठला पदार्थ ; त्याला रेतस् हे प्रतीकात्मक नाव दिलेले आहे. असे द्रव्य पृथ्वीवरील यज्ञीय स्तरावर वेदीत टाकले असता 'पिता' जागृत होऊन आपल्या मुलीच्या ठिकाणी रेत सिंचन करतो. दुसऱ्या आवृत्तीत पिता कोण हे स्पष्ट नसले तरी कन्या कोण आहे याची सूचना आहे आणि ती पृथ्वी होय, असे स्पष्ट सूचित केले आहे. पण दोन्ही ठिकाणी पुराकथा संपूर्णपणे येत नसून तिचा केवळ,'कोणे एके काळी पित्याने आपल्याच मुलीच्या ठिकाणी रेत:सिंचन केले.' एवढाच अंश दिसत असून तो यज्ञीय परिसरात गोवला आहे असे स्पष्ट दिसते. आधीच्या उदाहरणात यज्ञ कोणी केला याची सूचना नाही, पण नंतरच्या उदाहरणात च्यवन ऋषींचे नाव येते. त्यामुळे ही पुराकथा जशी मुळात असेल तशी किंवा खंडांशाने आणि शाब्दिक रूपाने वापरल्याचे कळते. ऋग्वेदातील ह्या दोन कथा एकत्र घेतल्यास असे दिसते की जेव्हा केव्हा ही पुराकथा सुचली असेल तेव्हा; ज्याला ती सुचली असेल त्याने आकाशावर पित्याचे आरोपण केले आणि पृथ्वीवर कन्येचे. म्हणजे कथा निर्माण करताना रूपकाचा आधार घ्यावा लागला. अर्थात हे मुद्दाम केले काय, या प्रश्नाचे उत्तर देणे अशक्य आहे. (डांगे, १९९३ : १४१)

ह्याच कथेचा उल्लेख शतपथ ब्राह्मणग्रंथात पुढील प्रमाणे आला आहे.

**प्रजापतिर्ह वै स्वां दुहितरम् अभिदध्यौ दिवं वा उषसं वा ।**

**मिथुनी एनया स्यामिति । तां संबभूव तद्वै देवानामाग आस ।**

**य इत्थं स्वां दुहितरम् अस्माकं स्वसारं करोति इति ।**

**ते ह देवा ऊचु: यो अयं देव: पशूनामीष्टे अतिसन्धं व अयं चरति ।**

**य इत्थं स्वां दुहितरम् अस्माकं स्वसारं करोति । विध्य एनम् ।**

**तं रुद्रो अभ्यायत्य विव्याध । तथेन्नुनं तदास ।**

**(शतपथ ब्राह्मण २/३/१/ ७-१०)**

येथे म्हटले आहे की प्रजापती आपल्या कन्ये प्रति आसक्त झाले; जिला द्यौ: किंवा उषा असे म्हणतात आणि तिच्याबरोबर समागम करण्याची इच्छा निर्माण झाली तेव्हा सर्व देवता अतिशय रागावल्या आणि पशूंचा स्वामी असलेल्या रुद्राकडे जाऊन त्यांनी रुद्राला विनंती केली की प्रजापतीस बाणांनी विद्ध करा आणि त्या विनंतीवरुन मग रुद्राने प्रजापतीला म्हणजेच ब्रह्मदेवाला बाणांनी विद्ध केले. (Eggeling, Part 2, 1882 : 328-329) आणखी एके ठिकाणी शतपथ ब्राह्मणात (६/१/३/८) पुढीलप्रमाणे वर्णन दिसते, इथे प्रजापती आणि उषा यांच्या संयोगातून रुद्राची उत्पत्ती झाली असल्याचे वर्णन केलेले आहे. प्रजापतीला वर्ष म्हणजेच संवत्सराचे प्रतीक मानलेले असून उषेबरोबरच्या संबंधातून ऋतूरूपी भूत अथवा रुद्राची निर्मिती होते असे म्हटले आहे. वरील सर्व विवेचनावरून असे दिसते की प्रजापती आणि त्याची कन्या यांची ऋग्वेदातील जी अस्पष्ट अशी कथा आहे तिचा मूळ गाभा तोच ठेवून त्यात आणखी काही उपकथानके जोडून तीच कथा वेगवेगळ्या प्रकारे सांगितली गेली आहे. (Eggeling, Part 3, 1894 : 158-159)

हीच कथा ऐतरेय ब्राह्मण येथे मात्र थोडीशी क्रमबद्ध तसेच विकसित आहे. ह्या कथेचा उगम तोच म्हणजेच कन्यासक्तीचा आहे पण इथे तिचे वर्णन एका खगोलीय तारकासमूहाशी केले आहे. या ठिकाणी असे म्हटले आहे की

**प्रजापतिर्वै स्वां दुहितरम् अभ्यध्यायद् ।**

**दिवमित्यन्ये आहु: उषसमित्यन्ये ।**

**ताम् ऋष्यो भूत्वा रोहितं भूताम् अभ्यैत ।**

**तं देवा अपश्यन् । अकृतं वै प्रजापति: करोतीति ।**

**ते तमैच्छन् य एनम् आरीष्यति। एतम् अन्योन्यस्मिन् नाविन्दन्**

**तेषाम् या एव घोरतमा: तन्व: आसन् ता एकधा समभरन्**

**ता: संभृता एष देव: अभवत् तदस्य एतद् भूतवन्नाम भवति ।**

**तं देवा अब्रुवन् अयं वै प्रजापति: अकृतम् अक: ।**

**इमं विध्य इति । स तथेत्यब्रवीत् स वै वो वरं वृणा इति ।**

**वृणीष्वेति । स एतमेव वरम् अवृणीत पशुनाम् आधिपत्यम् ।**

**तदस्यैतत् पशुमन्नाम भवति । तम् अभ्यायत्य अविध्यत् ।**

**स विद्धः ऊर्ध्वं उदप्रपतत् । तमेतं इत्याचक्षते ।**

**य उ एव मृगव्याधः स उ एव । स या रोहित् सा रोहिणी ।**

**य एव इषूः त्रिकान्डा स एव इषूस्त्रिकांडा ।**


**(ऐतरेय ब्राह्मण ३/३/९)**

याचा अर्थ पुढील प्रमाणे:

एकदा प्रजापती आपल्या कन्येचे अवलोकन करीत असता आपल्या कन्येशी रममाण होऊन तिचा उपभोग घ्यावा असा पापी विचार त्याच्या मनात आला. प्रजापतीची ही कन्या म्हणजेच उषा किंवा द्यौः प्रजापतीपासून स्वतःला वाचविण्यासाठी मग उषेने हरिणीचे रूप धारण केले आणि ती पळू लागली; तेव्हा तिचा पाठलाग करण्यासाठी प्रजापतीने 'ऋष्य' जातीच्या हरणाचे रूप घेतले. आकाशस्थ देवतांनी हे बघितले व प्रजापती अधर्म करू पाहत आहे तेव्हा त्याला दंड दिला पाहिजे असा विचार त्यांनी केला. परंतु साक्षात प्रजापतीला दंड करण्याची त्यांच्यापैकी कोणाचीच योग्यता नसल्याने काय करता येईल असा विचार ते करू लागले. मग देवांनी उंच आणि धिप्पाड अशा देवतांची घोर रूपे एकत्र केली आणि त्यातून रुद्र नावाचा अतिशय भेसूर आणि प्रचंड अशा शरीराचा सामर्थ्यशाली देव उत्पन्न झाला. त्यानंतर देवांनी रुद्राला संगितले की, ''हे रुद्रा! हा प्रजापती कधी कोणीही करू नये असे कन्यागमनाचे अधर्म कृत्य करू पाहत आहे तेव्हा तू याला आपल्या बाणाने मारून टाक.'' यावर रुद्र म्हणाला, ''तुमच्या इच्छेप्रमाणे मी याला मारून टाकतो पण त्या बदल्यात तुम्ही मला वर किंवा देणगी म्हणून काय देणार?'' देवांनी त्यास सांगितले की, ''पशूंच्या ठिकाणी तुझे आधिपत्य राहील आणि यापुढे तुला पशुपती या नावाने ओळखतील.'' मग रुद्राने प्रजापतीवर बाण सोडला आणि बाण लागल्यामुळे ऋष्य जातीचे ते हरीण आकाशात खूप उंच उडाले. बाणाच्या तडाख्याने उडालेले त्याचे शरीर आकाशात रोहिणी आणि आर्द्रा नक्षत्रांच्यामध्ये अजूनही दिसत आहे. प्रजापतीच्या या मृगस्वरूपालाच लोक 'मृगनक्षत्र' असे म्हणतात. कन्यागमन करण्याच्या इच्छेने मृगाचे रूप धारण केलेला 'प्रजापती' शेवटी 'मृग' नामक नक्षत्र झाला आणि या मृगरूपी प्रजापतीचा वध करणारा जो रुद्र तो म्हणजेच आकाशात चमकणारा 'मृगव्याध' नावाचा तारा

होय. तर रोहित जातीच्या हरिणीचे रूप घेतलेली प्रजापतीची कन्या म्हणजेच आज आकाशात तांबड्या रंगात चमकत असलेले 'रोहिणी' नक्षत्र आहे. रुद्राने प्रजापतीवर जो बाण सोडला होता तो बाण म्हणजेच आजच्या मृगनक्षत्राच्या मृगाच्या चार पायांमध्ये एका सरळ रेषेत दिसणारा त्रिकांड बाण होय. (बापट, १९३०: ९६) ह्या कथेचे दोन भाग आहेत. पहिल्या भागामध्ये प्रजापतीचे आपल्याच कन्येकडे आसक्त होण्याचे आणि प्रजापतीच्या दंडित होण्याचे वर्णन आहे जे सगळीकडे आढळते तर दुसऱ्या भागात प्रजापती एका नक्षत्रसमूहाशी संबंधित आहे. ह्या नक्षत्रसमूहात एकूण पाच नक्षत्र आहेत. रोहिणी, मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसु व व्याध. शिशिर ऋतूमधल्या माघ व पौष महिन्यात रात्रीच्या वेळी आपल्या डोक्यावर हे नक्षत्रमंडल अगदी स्पष्ट दिसते पण जसे हळूहळू हे पश्चिमेकडे झुकू लागते तसे अगदी कथेत वर्णन केल्याप्रमाणे ते दिसू लागते.

सोबतच्या आकृतीत सगळ्यात उजवीकडे दिसणारा तेजस्वी तारा म्हणजे रोहिणी नक्षत्राचा तारा असून तिच्या मागे धावणारा मृगरूपी प्रजापती म्हणजे ते चार तारे जे हरणाचे पाय समजले जातात; ह्या चार ताऱ्यांच्या पुढे आणखी एक तीन ताऱ्यांचा एक समूह दिसतो तो म्हणजेच ह्या मृगाचे डोके आहे तर मृगाच्या पोटात सोडलेला बाण म्हणजेच आर्द्रा नक्षत्र होय. (आधुनिक




खगोलशास्त्रात ह्या तीन ताऱ्यांचा समूहाला आर्द्रा नक्षत्र न म्हणता मृगाचे पाय म्हणून जे चार तारे असतात त्याच्या डावीकडे असणारा एक तेजस्वी तारा म्हणजे आर्द्रा नक्षत्र असे मानतात.) आणि

मृगाचा पाठलाग करणारा व्याधरूपी रुद्र असा सगळा हा तारकासमूह दिसतो. मृगीरूपी हरिणी, तिच्या मागे तिचा पाठलाग करणारा मृगरूपी प्रजापती आणि प्रजापतीचा पाठलाग करणारा रुद्ररूपी व्याध ज्याने आपल्या धनुष्यातून बाण सोडला आहे, जो बरोबर मृगाचे पाय म्हणून असलेल्या चार ताऱ्यांच्या मधोमध त्याच्या पोटात शिरला आहे. हा बाण तीन टोके असलेला त्रिकांड बाण आहे. ज्योतिषशास्त्रात सुद्धा रोहिणी नक्षत्राची प्रजापती ही देवता आहे तर आर्द्रा नक्षत्राची रुद्र देवता आहे असे म्हटले जाते.

या कथेसंदर्भात स.अ.डांगे म्हणतात,'' मुळातील पिता आता प्रजापती झालेला आहे. मूळ प्रतीकांचा विसर पडलेला आहे. ही पुराकथा नक्षत्रकथा बनण्याकडे कलली आहे. कन्येवर तांबूस मृगीचे रूपक बसवले आहे. तर पित्यावर प्रथम प्रजापतीचे नंतर मृगाचे! मूळ कथेचा आकाश, पृथ्वी व पर्जन्य हा आशय जाऊन येथे ती नक्षत्रकथा बनली आहे. पण तरीही जुना एक संकेत येथे दिसतो; तो वीर्य हा होय. ही एक वाढवलेली आवृत्ती आहे. (डांगे, १९९३ : १४३)

ह्याच कथेचा आणखी एक उल्लेख शिवाची स्तुती करणाऱ्या व पुष्पदंत याने रचलेल्या शिवमहिम्न स्तोत्रात श्लोक २२ येथे सुद्धा सापडतो. फक्त ह्या ठिकाणी प्रजापतीची कन्या उषा नसून संध्या असल्याचे दिसते. (दीक्षित, १९८५ : १२) तो पुढील प्रमाणे,

**प्रजानाथं नाथ प्रसभमभिकं स्वां दुहितरम् ।**

**गतं रोहिद्भूतां रिरमयिषुमृश्यस्य वपुषा ।।**

**धनुष्बाणेर् यातं दिवमपि सपत्राकृतममुं ।**

**त्रसन्तं तेऽद्यापि त्यजति न मृग–व्याध–रभसः ।।**

अर्थः हे जगन् नियामका ! हा प्रजानाथ ब्रह्मदेव आपली कन्या जी सुंदर आहे तिला पाहून कामुक झाला व तिच्या जवळ जाऊ लागला, तेव्हा ती लज्जेने मृगरूपी झाली. तेव्हा तोही मृगाचे रूप धारण करून अतिशय कामुकपणे तिच्याशी रममाण होण्याकरिता गेलेला पाहून सर्व जगताचा नियामक असलेल्या तू हातात पिनाक धनुष्य घेऊन त्याच्यावर बाण सोडलास; तो बाण त्याच्या शरीरात पिसाऱ्यासम शिरून तो ब्रह्मदेव भयाने स्वर्गात गेला. तथापि तुझा तो मृगव्याधाचा वेग आणि उत्साह तुला सोडीत नाही. तो शर अजूनही त्या मृगाच्या मागे आहेच.

शाकुंतल ह्या आपल्या नाटकात सहाव्या श्लोकात देखील कवी कालिदासाने ह्या कथेचे वर्णन केलेले आहे. शिकारीसाठी हरणाचा पाठलाग करणाऱ्या दुष्यन्त राजाचे वर्णन करताना कालिदास म्हणतो की, ''काळ्या हरिणावर प्रत्यंचा ताणलेले धनुष्य घेऊन उभा असलेला दुष्यन्त अगदी मृगाचा पाठलाग करणाऱ्या शिवाप्रमाणे दिसत आहे.'' ह्याचा संकेत एका पौराणिक कथेकडे आहे. शंकराचे सासरे; दक्ष प्रजापतीने एकदा अश्वमेध यज्ञ केला. ह्या यज्ञासाठी त्याने सर्व देवी–देवता, प्रजापती अशा सर्वांना निमंत्रित केले. फक्त पार्वती व शिव यांना निमंत्रण दिले नाही. निमंत्रण नसतानाही पार्वती यज्ञासाठी गेली. परंतु तिथे दक्ष शिवाबद्दल अपमानास्पद उद्गार काढले. त्यामुळे क्रोधीत पार्वतीने यज्ञकुंडातच आत्मसमर्पण केले व शरीराचा त्याग केला. हे समजताच अतिशय क्रोधीत झालेल्या शिवाने दक्ष यज्ञाचा विध्वंस केला व दक्षाचा वध केला. यज्ञ मात्र मृगाचे रूप घेऊन धावू लागला आणि त्याचा वध करण्यासाठी शिव पिनाक धनुष्य घेऊन त्याच्या मागे गेला आणि त्याचा वध केला. (मिश्र, २००० : १९) परंतु या कथेचा कन्यासक्तीच्या कथेशी संबंध दिसत नाही.

ज्योतिषशास्त्राच्या ग्रंथांमध्ये ह्या नक्षत्र समूहाला रोहिणी शकट असेसुद्धा म्हटले जाते. तैत्तिरीय संहिता (४/४/१०) येथे दिलेल्या नक्षत्र व त्यांच्या देवता यांच्या यादीत सुद्धा 'रोहिणी नक्षत्रं प्रजापतिर्देवता' तर 'आर्द्रा नक्षत्रं रुद्रो देवता' असे जे म्हटले आहे. त्याचा सुद्धा इथे संबंध असावा असे वाटते. (सातवळेकर, १९४५:२०५)

वरवर पाहता जरी ही कथा अनैतिक भाव दाखवणारी असली तरी पण शब्द्शः अर्थ न बघता प्रतीक रूपाने ती जाणून घेतली पाहिजे. भारतीय संस्कृति कोशात या कथेचा पुढील प्रमाणे अर्थ दिलेला आहे. प्रजेचे पालन करत असल्याने म्हणून सूर्य हाच प्रजापती आहे. पूर्व क्षितिजावर रोज सकाळी सूर्याच्या आधी उषेचे (पहाट) आगमन होते व नंतर सूर्याचे. सूर्यामुळेच उषेचा जन्म होतो म्हणून उषा ही सूर्याची मुलगी झाली. तिच्या ठिकाणी सूर्य आपल्या अरुण किरणरूपी वीर्याचा निक्षेप करतो आणि त्यातून दिवसरूपी पुत्र उत्पन्न होतो. अशा प्रकारे सूर्य व उषा यांचा दैनंदिन व्यवहार हा ब्रह्मा व त्याची दुहिता यांच्या संबंधातून होतो. याच कथेचे आध्यात्मिक रूपातील वर्णन पुढील प्रमाणे केले आहे. वेदांमध्ये मनाला प्रजापती व वाणीला सरस्वती अशी नावे आहेत. मनुष्य प्रथम मनात संकल्प करतो, विचार करतो आणि तोच

वाणीच्या माध्यमातून प्रकट करतो. अशा रीतीने मनाची सत्ता पहिली आणि वाणीची नंतर म्हणूनच मन पिता आणि वाणी दुहिता त्यामुळेच जेव्हा मनरूपी पिता आपल्या वाणीरूपी कन्येच्या ठिकाणी प्रेरणारूपी वीर्याचे आधान करतो तेव्हा शब्दरूपी पुत्र जन्माला येतो. (जोशी, १९९२ : ३१२)

कन्यासक्तीची कथा समाजाच्या अगदीच जवळची असल्याने ही कथा दशकुमारचरितम् ह्या कवी दण्डीच्या संस्कृत काव्यात सुद्धा दिसते. (Kale, 1926 : 70)

**प्रजापते: स्वदुहितर्यपि प्रणय प्रवृत्ति:।**

दशकुमारचरिताच्या उत्तर पिठिका द्वितीय उच्छ्वासात वरील उल्लेख आढळतो. धर्म, अर्थ, काम ह्यांचे महत्त्व सांगताना अनेक देवदेवतांकडून झालेल्या कुकृत्यांच्या यादीत ब्रह्मदेवाचाही समावेश आहे.

### ४.२ सावित्रीकडून ब्रह्मदेवाला अपूज्य होण्याचा शाप :

ही कथा मागच्या प्रकरणात आपण पाहिलेलीच आहे. अशीच कथा राजपुताना दर्शनिकेत देखील दिली आहे पण थोडी वेगळी आहे. पुष्करमध्ये ब्रह्मदेवाने केलेल्या यज्ञामुळे हे सरोवर तिबेटातील मानस सरोवराइतके पवित्र असल्याचे या ठिकाणी म्हटले आहे. तसेच पाच वेगळ्या वेगळ्या झऱ्यांच्या रूपात सरस्वती नदी इथे ह्या सरोवरात प्रकट झाली आहे अशीही एक मान्यता येथील लोकांमध्ये आहे. ब्रह्मदेवाला या ठिकाणी यज्ञ करायचा होता, इतर देवदेवतांच्या प्रमाणे त्याचे पृथ्वीवर एकही मंदिर नसल्याने वेदांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याला यज्ञ करायचा होता. त्यासाठी स्थळ शोधत असताना त्याच्या हातातून कमळ खाली पडले. कमळ खाली पडताना त्याच्या तीन पाकळ्या निरनिराळ्या जागी पडल्या आणि तीनही ठिकाणी सरोवरे निर्माण झाली. हे कमळ ज्या ठिकाणी पडले तेथेच यज्ञ करण्याचे ब्रह्मदेव ठरवतो. कमळ पडल्यामुळे निर्माण झालेल्या त्या सरोवराचे नाव ब्रह्मदेव पुष्कर असे ठेवतो. ब्रह्मा मग सर्व देवदेवता, ऋषीमुनी यांना यज्ञासाठी बोलावतो; प्रत्येकाला त्यांची त्यांची कामे ठरवून दिली जातात. ब्रह्मा देखील अमृताने भरलेला कुंभ डोक्यावर घेऊन यज्ञासाठी तयार असतो. कार्तिक शुद्ध एकादशी हा दिवस यज्ञासाठी ठरविलेला असतो. सावित्रीशिवाय यज्ञास सुरुवात होऊ शकत नाही म्हणून

तिला बोलावण्यासाठी पवन म्हणजेच वारा निरोप घेऊन जातो. पण लक्ष्मी, पार्वती व इंद्राणी यांच्याशिवाय यज्ञस्थळी यायला सावित्री नकार देते. तिचा नकार येताच ब्रह्मा रागावतो आणि इंद्रास आज्ञा करतो की लग्नासाठी एखादी मुलगी बघ जिच्याशी मी विवाह करीन आणि मग यज्ञ पूर्ण करीन कारण ह्या अमृतकुंभाचे वजन मला सहन होत नाही. इंद्र मुलगी शोधण्यास बाहेर पडतो परंतु त्याला गवळ्याच्या मुलीशिवाय दुसरी कोणतीच मुलगी दिसत नाही. परंतु तिच्याशी ब्रह्मदेवाचा विवाह कसा होणार असा विचार करून इंद्र तिला गायीच्या मार्फत तीन वेळा शुद्ध करून घेतो. हे पाहून विष्णू सांगतो की गाय आणि ब्राह्मण हे दोघेही शुद्ध असल्याने ही कन्या आता शुद्ध झालेली आहे. तर शंकर म्हणतो की ही कन्या गायीच्या पोटातून शुद्ध होऊन आली आहे त्यामुळे हा तिचा पुनर्जन्म झालेला आहे तेव्हा हिचे नाव गायत्री असे आहे. गायत्रीच्या शुद्धीकरणामुळे सर्व ब्राह्मण म्हणतात की आता हा विवाह आणि यज्ञ दोन्हीही संपन्न होऊ शकतात. ब्रह्मदेव गायत्रीशी लग्न करून तिच्या डोक्यावर अमृताचा कलश ठेवतो आणि यज्ञ देखील सुरू होतो; परंतु मध्येच त्यात विघ्न येते. एक नग्न मनुष्य त्या ठिकाणी येऊन आत्मत आत्मत असे म्हणत एक कवटी यज्ञस्थळी फेकतो. ती कवटी बाजूला करण्याचा प्रयत्न करू लागताच एका कवटीच्या दोन कवट्या होऊ लागतात. त्यामुळे सर्व यज्ञस्थळ कवट्यांनी भरून जाते. मग ब्रह्मदेव शंकराला त्या कवट्या बाजूला करण्याची विनंती करतो. ब्रह्मदेवाच्या विनंतीवरून शंकर त्या कवट्या बाजूला करण्यास तयार होतो. पण तो एक अट ठेवतो की ह्या ठिकाणी माझेही एक मंदिर बांधून त्याचे नाव आत्मतेश्वर असे असेल. त्यानंतर तो यज्ञ संपन्न होतो. तेवढ्यात अचानक कुठून तरी काही कुरूप ब्राह्मण तिथे येतात व ते सरोवरात स्नान करतात आणि त्यांच्या लक्षात येते की सरोवराच्या पवित्र पाण्यामुळे ते एकदम रूपवान झालेले आहेत. सरोवरात घाट बांधले जातात, कुरूप ब्राह्मण सरूप झाल्यामुळे त्यांना सरूप घाट असे नाव पडले. हा यज्ञ कार्तिक एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत सुरू असतो. सावित्री तिच्यावर झालेला अन्याय सहन न झाल्यामुळे रागावून तिथून निघून जाते आणि समोरील एका पर्वतावर जाऊन बसते.  यज्ञ संपन्न झाल्यामुळे पुष्कर अतिशय पवित्र होते. कितीही घोर पापी मनुष्य देखील त्या सरोवरात नुसत्या स्नानाने स्वर्गप्राप्ती करू शकेल अशी त्याची ख्याती होते. स्वर्गप्राप्तीसाठी अनेक लोक ह्या ठिकाणी स्नान करू लागतात. परंतु त्यामुळे स्वर्गलोकात फारच गर्दी होऊ लागली म्हणून मग सर्व देव तक्रार घेऊन ब्रह्मदेवाकडे येतात आणि ह्यावर उपाय करा असे

सांगतात. मग ब्रह्मदेव सांगतो की फक्त कार्तिक महिन्याच्या एकादशी ते पौर्णिमा ह्या दिवसांत स्नान केल्यासच स्वर्गप्राप्ती होऊ शकेल. (Rajputana Gazetteer, 1904 : 18-20)

### ४.३ ब्रह्मदेवाचे पाचवे मस्तक शिवाकडून तोडले जाणे :

ब्रह्मदेवाच्या चतुर्मुखी होण्याविषयी मत्स्य पुराणात तिसऱ्या अध्यायात श्लोक ३० ते ४१ येथे वर्णन केलेली आणखी एक कथा आढळते. ती अशी; एकदा ब्रह्मदेवाने आपल्या अर्ध्या अंगापासून शतरूपा नामक एक स्त्री निर्माण केली. ती अतिशय रूपवती होती. जन्मल्या बरोबर ती ब्रह्मदेवाभोवती फेऱ्या मारू लागली परंतु त्यावेळी त्याचे मानसपुत्र त्याच्या जवळच बसलेले होते. त्यामुळे ब्रह्मदेवाला तिच्याकडे तोंड वळवून पाहण्याचा संकोच वाटू लागला पण तिच्याकडे पाहण्याची इच्छा तर होती; म्हणून त्याने चारही बाजूंना चार मुखे उत्पन्न केली नंतर ती आकाशमार्गाने चालली असता त्याने डोक्याच्या मध्यभागी वरच्या बाजूस आणखी एक पाचवे मस्तक निर्माण केले. मात्र त्याच्या शतरूपेकडे अशा पाहण्याने त्याने पुत्रप्राप्तीसाठी जे तप केले होते ते नष्ट झाले. त्याचे स्वतःच्या मनावर नियंत्रण नसल्याने तो अपूज्य ठरला असे या कथेत म्हटले आहे. त्यानंतर मेरू पर्वतावर बसलेल्या ब्रह्मदेवाला आपण लोककर्ता असल्याचा गर्व झाला. वेदांनी त्याला शंकराचा महिमा वर्णन करून सांगितला पण ब्रह्मदेवाला ते काही पटेना. त्यावेळी तेथे एक दिव्य तेजयुक्त महाज्योती प्रकट झाली. त्या ज्योतीमंडळामधून एक नील लोहित पुरुष प्रकट झाला. त्यावर ब्रह्मदेव त्याला म्हणाला की 'माझ्या ललाटापासून तू निर्माण झाला आहेस तेव्हा तू मला शरण ये.' ब्रह्मदेवाच्या ह्या गर्वयुक्त बोलण्याने तो पुरुष म्हणजेच शंकर चिडला व त्याने ब्रह्मदेवाला योग्य धडा शिकविण्याकरिता भैरवाला पाठविले. भैरवाने ब्रह्मदेवाचे पाचवे मस्तक तोडले. त्यानंतर ब्रह्मदेवाने शंकराची स्तुती केली व शंकर प्रसन्न झाला. भैरव ते तोडलेले कपाल घेऊन ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त म्हणून भिक्षा मागण्याकरिता निघून गेला. (जोशी, १९८१ : १६२) (त्रिपाठी १९४६ : ८)

हीच कथा स्कंद पुराणात सुद्धा दिलेली आहे पण ह्या कथेचा कन्यासक्तीच्या कथेशी देखील संबंध जोडलेला आहे. विष्णूच्या नाभीकमळातून ब्रह्मदेवाचा जन्म झाल्यानंतर त्याने इंद्राच्या आज्ञेप्रमाणे सृष्टीनिर्मिती केली. ऋषींचा तपोभंग करण्याकरिता त्याने एक सुंदर स्त्री निर्माण केली, परंतु तिच्याकडे पाहताच ब्रह्मदेवच तिच्यावर भाळला. ब्रह्मदेव एकटक तिच्याच

कडे बघत होता म्हणून ती लाजून त्याच्या बाजूला झाली. ती ज्या बाजूला जाईल त्या बाजूला ब्रह्मदेवाने एक नवीन मुख निर्माण केले. त्यामुळे संकोच वाटून तिने पक्षिणीचे रूप घेतले आणि आकाशमार्गे ती उडू लागली. मग ब्रह्मदेवानेही पक्ष्याचे रूप घेऊन तिचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. उडत उडत ती सोन पर्वतावर पोचली व तिने शंकराकडे मदत मागितली. मग शंकराने शिकाऱ्याचे रूप घेतले व तो धनुष्य बाण घेऊन ब्रह्मदेवासमोर आला. शिवाला त्या रूपात पाहून ब्रह्मदेव भानावर आला, त्याला स्वतःची चूक समजली आणि तो शंकराकडे प्रार्थना करू लागला की हे पापयुक्त शरीर तुझ्या बाणांनी नष्ट करून टाक. मग शिवाने त्याचे पाचवे मस्तक तोडले आणि ब्रह्मदेवास लिंग पूजा करायला सांगून त्याची पापातून मुक्तता केली. ह्या कथेचा आधी वर्णिलेल्या मृग नक्षत्राच्या कथेशीसुद्धा साम्य दिसत आहे फक्त ह्या ठिकाणी मृगाच्या ऐवजी पक्षी आहे. (जोगळेकर, १९२१ : ६१२)

### ४.४ लिङ्गोद्भवाची कथा

ह्या शिवाय लिङ्गोद्भव कथा ही देखील ब्रह्मदेवाच्या अपूज्य होण्याचे आणखी एक कारण म्हणून सांगितली जाते. तिसऱ्या प्रकरणात ह्या लिङ्गोद्भव मूर्तीचा उल्लेख आपण पाहिलाच आहे. लिंग पुराणातील १७ व्या अध्यायात ही कथा पुढीलप्रमाणे दिलेली आहे. ब्रह्मा विष्णूकडे गेला असता विष्णनू त्याचे स्वागत 'प्रिय' असे म्हणून केले. त्यावर ब्रह्मा रागावला आणि म्हणाला की, ''मी ह्या सृष्टीचा निर्माता आहे व तुझ्याहून श्रेष्ठ आहे तरीही तू मला प्रिय असे संबोधलेस, जसे काही मी तुझ्याहून लहान, तुझा शिष्य किंवा मित्र आहे.'' त्यावर विष्णू म्हणाला की, ''तू तर माझ्यातूनच जन्माला आला आहेस, ह्या सृष्टीमध्ये जे काही चल वा अचल, सजीव किंवा निर्जीव आहे; जे जे दृष्यमान तसेच ऐकण्या योग्य आहे, असे सर्व मीच निर्माण केले आहे. मी स्वतःच परमात्मा आहे आणि तुझ्याकडून मात्र मी विस्मृतीत गेलो आहे; परंतु त्यामध्ये तुझा काहीच दोष नाही कारण हा सर्व माझ्याच मायेचा परिणाम आहे.'' ह्या संवादानंतर त्या दोघांमध्ये एकमेकांच्या श्रेष्ठत्वावरून वाद निर्माण झाले आणि अचानक त्या दोघांमध्ये एक अद्भुत, दिव्य असे ज्योर्तिर्लिंग निर्माण झाले. ब्रह्मा आणि विष्णू दोघेही त्यामुळे भ्रमित झाले. ते लिंग अतिप्रचंड होते, त्याची सुरुवात आणि शेवट कुठे आहे तेही समजत नव्हते. त्यावर विष्णू म्हणाला की, ''मी ह्याच्या मुळापर्यंत जातो तर तू वरच्या बाजूनी ह्याची सुरुवात बघ.'' असे म्हणून त्याचा आदि शोधण्यासाठी विष्णूने वराहाचे रूप घेऊन तो जमिनीच्या आत गेला व ब्रह्मदेवाने हंसाचे रूप घेऊन तो आकाशातील त्या लिंगाचा अंत शोधण्यासाठी वरच्या दिशेने गेला. ते शोध घेऊ लागले पण दोघांनाही आदि आणि अंत सापडला नाही. परंतु ब्रह्मदेवाने गाय व केतकीचे फूल ह्यांना खोटी साक्ष द्यायला लावून आपण हा शोध लावल्याचे खोटेच सांगितले. त्यामुळे शिवाने संतापून ब्रह्मदेवाला शाप दिला की, ''तू नारायणापेक्षा कनिष्ठ होशील आणि अपूज्य होशील.'' (Sastri, 1970 : 58) ह्याच कथेचे थोडे वेगळे रूप शिव पुराणात सहाव्या अध्यायात दिसून येते. ह्या कथेत ब्रह्मदेव आणि विष्णू यांच्यात श्रेष्ठत्वावरुन घनघोर युद्ध झाल्याचे म्हटले आहे. ह्या ठिकाणी मात्र शिव ज्योतिर्लिंग स्वरुपात प्रकट न होता ओंकाराच्या रूपात प्रकट झाला असल्याचे म्हटले आहे. (Sastri, 1970 : 190-204)

### ४.५ सती आणि शिव ह्यांच्या विवाहप्रसंगी ब्रह्मदेवाचे गैरवर्तन

ब्रह्मदेवाच्या अपूज्य होण्याविषयी ज्या अनेक कथा पुराणांमध्ये वर्णन केलेल्या आहेत त्या पैकी आणखी एक कथा शिव पुराण अध्याय १९ व २० रुद्रसंहितेमध्ये सांगितली आहे. त्या कथेप्रमाणे सती आणि शिव यांच्या विवाहसोहळ्यात ब्रह्मदेव पुरोहिताचे काम करीत असतो, त्यावेळी ब्रह्मदेवाचे लक्ष सतीच्या पायांकडे गेले. सतीचे पाय खूप छान असतात त्यामुळे ब्रह्मदेवाच्या मनात विचार आला की हिचे पाय इतके सुंदर आहेत तिचा चेहराही सुंदरच असणार. असा विचार मनात येताच ब्रह्मा सतीचे मुख कसे पाहता येईल याचा विचार करू लागला. मग त्याने विवाहप्रसंगी करण्यात येणाऱ्या होमात ओल्या समिधा टाकून त्यावर थोडे तूप सोडले, असे केल्यामुळे तिथे एकदम खूप धूर निर्माण झाला. धुरामुळे सगळे जण डोळे चोळू लागले त्यामुळे ब्रह्मदेवाला सतीच्या चेहऱ्याकडे बघण्याची संधी मिळाली. तो सतीकडे नजर रोखून बघू लागला, तिच्या सौंदर्याने घायाळ झाल्यामुळे ब्रह्मदेवाचा स्वतःवरील संयम सुटून ब्रह्मदेवाचे वीर्यस्खलन झाले. त्याच्या वीर्याचे चार थेंब तिथेच यज्ञवेदी जवळ पडले. शिवाला दूरदृष्टीमुळे हे सगळे दिसले आणि शिव प्रचंड क्रोधित झाला आणि त्रिशूळ घेऊन ब्रह्मदेवाला मारण्याकरिता त्याच्या अंगावर धावून गेला. तेव्हा तिथे उपस्थित देवदेवतांनी तसे न करण्याकरिता शिवास विनंती केली. ब्रह्मदेवानेही आपली चूक समजून घेऊन तात्काळ शिवाची माफी मागितली. मग या अपराधामुळे संतापलेल्या शिवाने ब्रह्मदेवास ''तू अपूज्य होशील'' असा शाप दिला. त्यावर ब्रह्मदेवाने शापमुक्त होण्यासाठी प्रायश्चित्त भोगण्याची तयारी दाखवली असता शिवाने ब्रह्मदेवास सांगितले की, ''तुझ्या डोक्याला हात लावून बघ आणि संकोच न करता माझी आज्ञा पाळ.'' हे ऐकताच ब्रह्मदेवाने लगेच आपल्या डोक्याला हात लावला असता त्याला त्याच्या जटांवर बैलासारखा आकार असल्याचे जाणवले. ब्रह्मदेवाला स्वतःची खूपच लाज वाटली आणि त्याने खाली मान घातली. ''माझे वाहन असलेल्या बैलाला डोक्यावर घेऊनच तू आता प्रायश्चित्त घे. रुद्रशीर्ष म्हणून तू पूजला जाशील, त्याच बरोबर वीर्यस्खलन होणे मानवाचे लक्षण असल्याने तू मानवरूपात पृथ्वीवर जन्म घेशील. मग लोक तुला विचारतील की तुझ्या डोक्यावर हे काय आहे; तेव्हा तू सांग की हा शिव आहे. असे जेव्हा अनेक वेळा होईल तेव्हा तुझे पाप कमी कमी होत जाऊन एक दिवस तू पापमुक्त होशील. तुझ्या वीर्याचे जे चार थेंब इथे पडलेले आहेत त्या

थेंबांपासून संवर्तन, आवर्तन, पुष्कर आणि द्रोण अशा चार प्रकारचे ढग निर्माण होतील आणि हे ढगच प्रलयाचे कारण होतील.'' (Sastri, 1970 : 356-366)

### ४.६ ब्रह्मदेवाचा जन्म विष्णूच्या नाभीकमळातून

पुराणांमध्ये ब्रह्मदेवाला अपूज्य झालेला दाखविण्यासाठी अनेक कथा सांगितलेल्या आहेत. त्यापैकी कूर्म पुराणातील नवव्या अध्यायातील ही कथा आता पाहू. एकार्णवस्थितीत विष्णू शयन करीत असताना ब्रह्मदेव तेथे आला आणि एकमेकांना पाहून त्यांनी ''तू कोण?'' असा प्रश्न विचारला. त्यांचे बोलणे वाढत गेले आणि विष्णूने ब्रह्मदेवाच्या पोटात प्रवेश केला. तेथे त्याला देव लोक, असुर लोक आणि मनुष्य लोक असे त्रिलोक पाहून आश्चर्य वाटले आणि तो ब्रह्मदेवाच्या तोंडातून बाहेर आला. त्यानंतर ब्रह्मदेवाने विष्णूच्या उदरात प्रवेश केला. त्यालाही तेथे अनेक प्रकारचे लोक दिसले. पण त्याबरोबरच तिथून बाहेर पडण्याचा मार्ग काही त्याला सापडला नाही. शेवटी तो विष्णूच्या नाभीद्वारातून बाहेर आला आणि तेथे असलेल्या कमळातून प्रकट झाला. (कूर्म पुराण, २०१८ : ४३–४५)

कूर्म पुराणातच पुढे आणखी एक कथा दिलेली आहे. भगवान विष्णूच्या नाभीतून निर्माण झालेल्या कमळावर ब्रह्मदेव आरुढ झाला असताना मधु व कैटभ हे दानव त्याच्या जवळचे वेद चोरून नेतात, त्यावेळी ब्रह्मदेवाने बदरीतीर्थात जाऊन विष्णूची स्तुती केली तेव्हा विष्णू हयग्रीवाचा अवतार घेऊन कुंडातून प्रकट झाला व त्याने दोन्ही दैत्यांना बांधून ठार केले आणि चोरलेले वेद परत ब्रह्मदेवाकडे आणून दिले. तेव्हापासून त्या कुंडाला ब्रह्मकुंड किंवा ब्रह्मतीर्थ असे म्हणतात. त्याच्या नुसत्या दर्शनाने सर्व पापे नाहीशी होतात व तत्काळ ब्रह्मलोकास पात्र ठरतात व जे लोक ह्या तीर्थात स्नान करतात ते ब्रह्मलोकातून विष्णुलोकात जातात. (कूर्म पुराण, २०१८ : ४९–५२) येथे सुद्धा ब्रह्मदेव विष्णूपेक्षा कनिष्ठ असल्याचे दाखवून दिलेले आहे.

### ४.७ शिव हा विष्णू आणि ब्रह्मदेवापेक्षा श्रेष्ठ

श्रीहरी व ब्रह्मदेव यांना शिवाचे दर्शन होते अशी एक कथा स्कंद पुराणात आहे. नारायण जेव्हा ब्रह्मरूप जलात शयन करीत होते तेव्हा त्यांच्या नाभीतून शिवशंकराच्या इच्छेमुळे एक कमळ उत्पन्न झाले. हे कमळ अतिशय मोठे होते व त्यात असंख्य नालदंड होते. हे कमळ कोटी सूर्यांप्रमाणे तेजस्वी होते. सर्व तत्त्व युक्त असून अद्भुत व दर्शनीय होते. शंकराने आपल्या उजव्या अंगातून भगवान विष्णूला निर्माण केले आणि मायेने ब्रह्मदेवाला नारायणाच्या नाभीतून उत्पन्न झालेल्या त्या कमळामध्ये स्थापित केले असल्याचे म्हटले आहे. (जोशी, १९८० : १२३)

### ४.८ मोहिनी अप्सरेचा ब्रह्मदेवाला शाप

ब्रह्मवैवर्त पुराणात एक कथा दिलेली आहे. एकदा इंद्राच्या दरबारातील मोहिनी ह्या अप्सरेचे ब्रह्मदेवाकडे लक्ष गेले आणि ब्रह्मदेवाला पाहताच ती त्याच्या प्रेमात पडली. मोहिनीला ब्रह्मदेवाशी विवाह करायची इच्छा होती परंतु ती काही पूर्ण झाली नाही म्हणून तिने तिचे आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी रंभा ही इंद्राच्या दरबारातील अजून एक अप्सरा तिथे गेली आणि मोहिनीला प्राणत्याग करण्यापासून परावृत्त केले. तसेच पुष्कर क्षेत्राला जाऊन कामदेवाची उपासना करण्याचा सल्लाही दिला. रंभेने सांगितल्याप्रमाणे मोहिनीने पुष्करक्षेत्री जाऊन कामदेवाला प्रसन्न करून घेण्यासाठी तप केले. तिची तपश्चर्या बघून कामदेव प्रसन्न झाला आणि तिची इच्छा पूर्ण होईल असा वर तिला दिला. कामदेव आणि मोहिनी दोघेही लग्नाचा प्रस्ताव घेऊन ब्रह्मलोकी गेले; परंतु कामदेव काही केल्या ब्रह्मदेवाचे मन वळवू शकला नाही. ह्या सगळ्यामुळे निराश होऊन मोहिनीने ब्रह्मदेवाला अपूज्य होण्याचा शाप दिला. (Nagar, 2016 : 284-288)

### ४.९ गणपतीकडून ब्रह्मदेवाचा अपमान

ही कथा शिव पुराणात वर्णन केलेली आहे. पार्वती गणपतीला कोणालाही आत सोडू नकोस अशी आज्ञा करून स्नानासाठी गेली. कोणालाही आत न सोडण्याची आज्ञा केली असल्याने गणपतीने शिवाला देखील प्रवेश नाकारला. शंकराने त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण गणेशाने काही केल्या ऐकले नाही. मग शंकराने ब्रह्मदेवाला गणपतीस समजावण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ब्रह्मदेव गणपतीला समजावून सांगायला गेला परंतु गणपतीने त्याच्याशी

युद्ध सुरू केले. ब्रह्मदेवही मग युद्धात उतरला. गणपतीच्या हातून ब्रह्मदेवाची दाढी उपटली गेली त्यामुळे अपमानित झालेला ब्रह्मदेव तिथून निघून गेला. (Nagar, 2006 : 85)

### ४.१० निरनिराळ्या असुरांना वर देणे

आधीच्या प्रकरणात आपण पाहिलेच की देव आणि दानव ही दोन्ही ब्रह्मदेवाचीच मुले आहेत आणि ह्या दोघांमध्ये सुद्धा एकमेकांच्या पुढे जाण्याची ईर्षा असतेच. देवांपेक्षा वरचढ होण्यासाठी, तसेच ब्रह्मदेवाकडून निरनिराळे वर मिळविण्यासाठी, ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेण्यासाठी अनेक असुर ब्रह्मदेवाची तपश्चर्या करीत असल्याची वर्णने अनेक ग्रंथांमधून आढळतात.

जवळपास सर्वच ग्रंथांमधून असुर ब्रह्मदेवाचा सन्मान करतात आणि कामनापूर्तीसाठी त्यांना प्रसन्न करून घेतात असा उल्लेख येतो. रामायणामध्ये बाल कांड (११८/३२) येथे देव व दानव ही दोन्ही  ब्रह्मदेवाचीच मुले असून देवांमुळे ते अधिक प्रसन्न असतात असे म्हटलेले आहे. (शर्मा, १९२७:१४६) रामायणामधील रावणाला देखील ब्रह्मदेवाने वर दिलेला होता. तसेच कुंभकर्ण आणि बिभीषणाला सुद्धा वर दिल्याचे उत्तरकांडात सर्ग १० येथे म्हटले आहे. (शर्मा, १९२७ : ९१–१०१) रामायणाप्रमाणे रावण, कुंभकर्ण आणि बिभीषण ह्या तीनही भावंडांना वर दिल्याचा उल्लेख महाभारतात वनपर्व (२७५/१६–२५) येथे सुद्धा आढळतो. (राशिवडेकर,१९०४: ५५३)

हिरण्यकशिपू या असुरानेही ब्रह्मदेवाला संतुष्ट करण्यासाठी केलेल्या तपश्चर्येचे भागवतात स्कन्ध ७, अध्याय ३ येथे वर्णन आहे. या ठिकाणी असे म्हटलेले आहे की त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न करण्यासाठी इतकी घोर, उग्र तपश्चर्या केली की मुंग्यांनी त्याचे रक्त, मांस, त्वचा सर्व काही पोखरून टाकले होते आणि फक्त हाडेच तेवढी शिल्लक राहिली होती. हिरण्यकशिपूच्या तपामुळे प्रसन्न होऊन ब्रह्माने आपल्या कमंडलूतील पाणी त्याच्यावर शिंपडले, त्यामुळे हिरण्यकशिपू बरा झाला आणि मग ब्रह्मदेवाने त्याला वर दिला. (Prabhupada, 1976: 132-137)

महाभारताच्या आदि पर्व (२०९/१७–२५) येथे सुंद व उपसुंद या दैत्यांना ब्रह्मदेवाने वरदान दिले असा उल्लेख आहे. (राशिवडेकर, १९०४ : ४१२) तर पद्म पुराण सृष्टी खंड अध्याय

२५ येथे वाष्कली नावाचा दैत्यही ब्रह्मदेवाच्या वरदानामुळे अत्यंत पराक्रमी होतो असे म्हटले आहे. (Deshpande 1988 : 325)

पद्म पुराण सृष्टी खंड (१६/४१–४३) मध्ये उल्लेख आहे की ब्रह्मदेवाने एका विशाल यज्ञाचा आरंभ केला आणि देव, ऋषी यांबरोबरच राहू, वृत्र, शम्बर, वातापि, केशी, नमुची आणि बली इत्यादी असुरांना सुद्धा निमंत्रण दिले. या यज्ञाच्या ठिकाणी येऊन सर्व दानव ब्रह्मदेवाचे अभिनंदन करताना म्हणाले की, ''भगवान आपणच आमची सृष्टी आहात. हे त्रिलोकाचे राज्य तुम्हीच आम्हाला दिलेले आहे. तुमच्यामुळेच आम्ही देवांपेक्षा अधिक बलवान आहोत. आमचे निर्णय घेण्यास आणि कर्तव्य करण्यास आम्ही स्वतः समर्थ आहोत. अदितीच्या गर्भातून उत्पन्न झालेल्या या बिचाऱ्या देवांच्या हातून तुमच्यासाठी काय होणार? आपण आज्ञा करावी आम्ही आपल्यासाठी काय करू?'' (Deshpande 1988 : 188-189)

देवी भागवतामध्ये एक कथा दिलेली आहे ती अशी, अरुण नावाच्या एका दैत्याने देवांपेक्षा वरचढ होण्याच्या इच्छेने हिमालयात गंगाकिनारी जाऊन ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेण्यासाठी उग्र तपश्चर्या केली. त्याच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन ब्रह्मदेव गायत्रीसह हंसावर बसून त्याच्या समोर प्रकट झाला. ब्रह्मदेवाने त्याला वर माग अशी आज्ञा केली. त्यावर अरुण म्हणाला की, ''मला मृत्यूपासून मुक्त करा.'' ह्यावर ब्रह्मदेवाने त्याला सांगितले की ब्रह्मा, शिव किंवा विष्णू हे सर्व त्याला अमर करण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे ब्रह्मदेवाने त्याला दुसरा वर मागण्यास सागितले. त्यावर बराच विचार करून अरुणने असा वर मागितला की, ''त्याला कोणत्याही युद्धात मरण येऊ नये, कोणत्याही शस्त्राने किंवा अस्त्राने त्याचबरोबर कोणत्याही मनुष्य अथवा स्त्रीच्या हातून त्याला मृत्यू येऊ नये. कोणत्याही द्विपद अथवा चतुष्पद प्राण्यामुळे किंवा कोणत्याही दोन प्राण्यांच्या एकत्रित रूपामुळे त्याचा मृत्यू होऊ नये. तसेच युद्धात कायम अजेय राहण्यासाठी त्याच्याजवळ अतिविशाल सेना असावी जी कोणत्याही शत्रूचा पराभव करण्यास समर्थ असेल. '' हा वर मागताच ब्रह्मदेवाने तो पूर्ण केला. नेहमीप्रमाणेच इतर दैत्य होतात तसाच अरुण दैत्यही मिळालेल्या वरामुळे उन्मत्त होऊन देवांना, ऋषींना त्रास देऊ लागला. सर्व देव मग आपली व्यथा घेऊन ब्रह्मदेवाकडे गेले आणि ह्यावर काहीतरी उपाय करा अशी विनंती केली. त्यानंतर ब्रह्मदेव विष्णूकडे गेला आणि मग ते दोघेही ह्यावरचा उपाय

शोधायला शंकराकडे गेले. त्याच वेळी आकाशवाणी झाली आणि विश्वाची जननी, आदिमाता ह्यातून तुम्हाला मार्ग दाखवेल असा संदेश मिळाला. त्यानंतर मग सर्व देवांनी मिळून सृष्टीची प्रार्थना केली. त्या प्रार्थनेमुळे देवी प्रसन्न झाली आणि तिने मधमाशीच्या रूपात येऊन त्या असुराचा संहार करायचे ठरविले. मग असंख्य मधमाशा आकाशात घोंघावत त्या अरुण असुरावर धावून गेल्या आणि त्याचा वध केला अशी ही कथा आहे. (Nagar, 2006 : 85)

अरुण असुराप्रमाणेच महिषासुराला देखील ब्रह्मदेवानेच वर दिलेला होता. कोणत्याही देवाच्या हातून मरण येऊ नये असा त्याचा वर होतो. मग महिषासुराचा वध करण्यासाठी देवीने अवतार घेतला असे वर्णन देवी भागवतात आढळते. (देवी भागवत, २०१० : ६२७)

वैदिक धर्माचा उत्कर्ष होण्याच्या काळात वैदिक काळाच्या आधी अस्तित्वात असणाऱ्या देवदेवतांना गौणत्व प्राप्त होऊ लागले. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांपैकी ब्रह्मदेवाचे महत्त्वही याच प्रमाणे कमी होऊ लागले आणि इंद्रादी देवतांना महत्त्व निर्माण झाले. ब्रह्मदेवाचे गौणत्त्व सप्रमाण सिद्ध करण्यासाठी त्याचा जन्म विष्णूच्या नाभीकमळातून झाल्याचे दाखविले गेले असावे तसेच वरील सर्व कथाही ब्रह्मदेवाचे महत्त्व कमी करण्यासाठी आणि विष्णूचे व शिवाचे महत्त्व वाढविण्यासाठी मदतच करतात. ब्रह्मदेव हे रजोगुणांचे प्रतीक आहे. निर्मिती करणे हे मुख्य कार्य असल्यामुळे ब्रह्मदेवाने युध्द केल्याच्या, कोणाचा संहार केल्याच्या कथा ऐकायला, वाचायला मिळत नाहीत. देव आणि असुर या दोघांनाही ब्रह्मा वंदनीय होता. असुरांनी ब्रह्मदेवाची खडतर तपश्चर्या करून उत्तमोत्तम वर मिळवल्याच्या कथा आपण वर पाहिल्याच आहेत आणि यामुळेच ब्रह्मदेवाने असुरांना वर द्यायचे, वरामुळे हे असुर उन्मत्त होऊन सर्वत्र हाहाकार माजवायचे व नंतर मग त्या असुरांचा नाश करण्यासाठी वरातून काहीतरी पळवाट काढून विष्णू, शंकर अथवा देवी असुराचा नाश करणार असा क्रम असलेल्या अनेक पुराणकथा वाचायला मिळतात. ह्याचाच परिणाम म्हणून मग ब्रह्मदेवाची उपासना केवळ असुरांपुरतीच मर्यादित झाली असावी. ह्या कारणामुळे सुद्धा ब्रह्मदेवाची लोकप्रियता कमी झालेली असू शकते. त्याच बरोबर ब्रह्मदेव हा यज्ञाचा देव होता असेही आपण मागील प्रकरणात बघितले त्यामुळे ब्रह्मदेवाची उपासना करणे म्हणजे यज्ञ याग इत्यादी कर्मकांडे करावी लागत असत. त्यासाठी लागणारा वेळ आणि खर्च पाहता ही उपासना सुद्धा धनिक लोकांपुरतीच मर्यादित राहिली असावी. त्यानंतर पुढे

भक्तिसंप्रदाय उदयास आला आणि यज्ञ यागादी पूजा अर्चना मागे पडल्या आणि साध्या, सोप्या पद्धतीने उपासना सुरू झाली. ह्या सगळ्याचा एकत्रित परिणाम झाल्यामुळे ब्रह्मदेवाची लोकप्रियता मागे पडली असावी असे वाटते. असुरांचा देव, कन्यासक्ती, असत्यवचन ह्या सगळ्यामुळे ब्रह्मदेवाचे देवत्वच नष्ट झाले असावे. साहजिकच पुढे त्याची मंदिरे निर्माण होण्याचीही थांबली असावीत. त्याचबरोबर लोकांच्या देव्हाऱ्यातूनही तो बाहेर पडला असावा.



## प्रकरण ५

## संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी

वास्तविक भारतीय देवदेवतांच्या यादीत त्रिमूर्तींना विशेष महत्त्व प्राप्त असल्याचे आपण बघितलेच आहे. ह्या त्रिमूर्तींमध्ये सुद्धा ब्रह्मदेवाचा प्रथम उल्लेख असतो हे ही आपण पाहिले. सृष्टीचा निर्माता, विधाता अशा अनेक नावांनी प्रसिद्ध असलेला असा हा देव; परंतु त्याचे महत्त्व आणि लोकप्रियता या दोन्ही मध्ये तो मागे पडलेला दिसतो. पूर्वीपासूनच अनेक संशोधकांनी निरनिराळ्या भारतीय देवतांवर संशोधन केलेले दिसते पण ब्रह्मदेवावरील संशोधन मात्र त्याच्या अस्तित्वाप्रमाणेच नाममात्र आहे. त्यामध्ये संशोधनयुक्त अभ्यासाची कमतरता दिसून येते. त्रिमूर्तींमधील एक प्रमुख देव असून सुद्धा ब्रह्मा लोकप्रिय का नाही याचीही अनेक कारणे आपण मागच्या प्रकरणात पहिली. म्हणूनच मोठ्या प्रमाणावर त्याची पूजा होताना दिसत नाही. केवळ ब्रह्मदेवाची म्हणता येतील अशी मंदिरेही फारच कमी आहेत. म्हणूनच ब्रह्मदेव इतर देवतांच्या मानाने थोडा उपेक्षित आहे असे म्हणू शकतो. प्राचीन ग्रंथांमधूनही ब्रह्मदेवाविषयी कमी उल्लेख आढळतात आणि म्हणूनच कदाचित संशोधकांनी सुद्धा तितकेसे महत्त्व त्याला दिलेले दिसत नाही.

**प्रकरण १ :**

ह्यामध्ये संशोधनाच्या विषयाचा परिचय करून देण्यात आलेला आहे. हा विषय संशोधनासाठी घ्यावा असे का वाटले ह्या मागील विचार स्पष्ट केलेला आहे. पूर्वी झालेले संशोधन, संशोधनाची पद्धती, संशोधनाचा उपयोग व महत्त्व इत्यादी बाबी त्यात विस्ताराने सांगितलेल्या आहेत. संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करीत असतानाच ह्या विषयातील पुढील अभ्यासाला असलेला वाव देखील सांगण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन हे फक्त हिंदू विचारधारेवर अवलंबून करण्यात आलेले असल्याने बौद्ध व जैन तत्त्वज्ञानातून ह्या विषयी आणखीही अभ्यास करता येऊ शकतो हे सांगितले आहे.

**प्रकरण २ :**

विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेला महत्त्वाचा भाग म्हणजे उपलब्ध साहित्याचा आढावा. ह्यामध्ये पूर्वीच्या संशोधकांनी केलेले संशोधन अभ्यासून त्या त्या ग्रंथांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामुळे कोणत्या अनुषंगाने अभ्यास करायचा आहे त्याची दिशा ठरविताना मदत झाली आणि त्याच पद्धतीने संशोधन केले गेले आहे.

**प्रकरण ३ :**

संशोधनाचा मुख्य पाया असलेले असे हे प्रकरण आहे. ब्रह्मदेव त्याची संकल्पना, महत्त्व आणि उपासना असेच शीर्षक ह्या प्रकरणाचे आहे. ब्रह्मदेव, ब्रह्मा या शब्दांच्या अर्थापासून ते त्याचे महत्त्व, उपासना अशा क्रमाने अभ्यास केलेला आहे. त्यासाठी निरनिराळ्या ग्रंथांत असणारे ब्रह्मा ह्या शब्दाचे अर्थ येथे दिलेले आहेत. ब्रह्मदेव ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही संकल्पना स्पष्ट करताना अनेक प्राचीन धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. देवता म्हणून असलेले ब्रह्मदेवाचे महत्त्व देखील त्यायोगे विशद केलेले आहे. त्या साठी वेळोवेळी महत्त्वाच्या धार्मिक ग्रंथांचा, त्यातील कथांचा आधार घेतलेला आहे. ब्रह्मदेवाच्या उपासनेविषयी माहिती घेताना सर्व प्रमुख ब्रह्म मंदिरांचाही अभ्यास केलेला आहे. ह्यासाठी जिल्हा दर्शनिका अभ्यासून त्या मंदिरांविषयी संपूर्ण माहिती संकलित केलेली आहे. उपलब्ध माहितीची सत्यासत्यता पडताळून पाहिलेली आहे. ब्रह्मदेवाची सध्या होत असलेली उपासना अभ्यासण्यासाठी ज्या ठिकाणी ब्रह्मदेवाची मंदिरे आहेत तिथे सर्वेक्षण करून, जरूर पडल्यास स्थानिक नागरिकांच्या व पुजाऱ्यांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलन केलेली आहे.

**प्रकरण ४ :**

प्राचीन साहित्यांतून महत्त्वाचा असलेला हा देव कमी महत्त्वाचा कसा काय झाला? पूजा, उपासना, व्रतवैकल्ये ह्यांचा अभाव असण्यामागची कारणे ह्या प्रकरणात अभ्यासली आहेत. इथेही ही कारणे शोधण्यासाठी अनेक धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केलेला आहे. ब्रह्मदेवाच्या अपकर्षाची कारणे आणि त्याच्याशी संबधित कथा, आख्यायिका, मूर्तिविज्ञानात आढळणारे पुरावे असा सर्वंकष अभ्यास केलेला आहे.

**प्रकरण ५ :**

ह्यामध्ये संपूर्ण संशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. संशोधनाचे महत्त्व, उपयोग आणि पुढील संशोधनास असलेला वाव अशाप्रकारे विचार करण्यात आलेला आहे. ह्यामध्ये ब्रह्मा ह्या देवतेचा सर्वांगीण अभ्यास केलेला असल्याने त्याविषयीची सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे. प्रस्तुत प्रबंधाचा उपयोग पुढील संशोधनासाठी तर होईलच परंतु भारतीय विद्यांच्या अभ्यासकांनाही त्याच बरोबर पर्यटकांनाही

ह्या माहितीचा आधार घेऊन ब्रह्मा मंदिरे असलेल्या स्थळांना भेट द्यायची असल्यास उपयोग होईल.

## ५.१ संशोधनातील महत्त्वाचे मुद्दे

त्रिदेवांमधील एक मुख्य देवता असून सुद्धा ब्रह्मदेवाच्या पदरी ही उपेक्षा का? त्याची उपासना, मंदिरे का अस्तित्वात नाहीत? हे शोधण्याचा संशोधनाचा मुख्य हेतु ह्यात पूर्ण झालेला आहे.

पूर्वीच्या संशोधकांनी व अभ्यासकांनी केलेले काम महत्त्वाचे आहेच; परंतु ते त्या अभ्यासकांनी त्यांच्या विषयाच्या दृष्टिकोनातून केलेले असल्याने त्या सर्व उपलब्ध संशोधनाचे एकत्रित संकलन आणि त्यायोगे मिळालेली आणखीही नवीन माहिती प्रस्तुत संशोधनात दिलेली आहे. येथे संकल्पना, महत्त्व, मूर्तिविज्ञान, सध्याचे उपासनेचे स्वरूप, देवता म्हणून झालेला अपकर्ष आणि त्याची कारणे अशा सर्व बाजूंनी विचार करण्यात आलेला आहे. ब्रह्मा ह्या देवतेचा सर्वांगीण अभ्यास मांडलेला आहे.

ब्रह्मदेवाच्या मंदिरांचा अभ्यास करत असताना दुदाही आणि वसंतगड येथील मंदिरांचे उल्लेख आढळले. ही मंदिरे फार प्रसिद्ध नाहीत. सध्या ती पूर्णपणे भग्न अवस्थेत आहेत परंतु त्यांचे पुरातत्त्वीय महत्त्व लक्षात घेऊन त्या मंदिरांची माहिती इथे दिलेली आहे. त्यासाठी जिल्हा दर्शनिकांचा आधार घेतलेला आहे.

ब्रह्मदेवाच्या मूर्तीचा अभ्यास करताना पाकिस्तानात मीरपूर खास येथे असलेली अतिशय सुंदर आणि एकमेव ब्राँझ प्रतिमाही प्रसिद्ध नाही. ही प्रतिमा ६व्या शतकातील असून गुप्तकालीन मूर्तिकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. तिची प्राचीनता लक्षात घेता तिचा समावेश सुद्धा संशोधनात केलेला आहे.

भारताबरोबरच भारताबाहेर असणाऱ्या ब्रह्मदेवाच्या मंदिरांचाही विचार ह्या संशोधनात झालेला आहे. ही मंदिरे कुठे आहेत, त्यांचे स्थापत्य, निर्मितीचा काळ, त्यांच्याशी जोडलेल्या गेलेल्या काही पारंपरिक लोककथा, स्थानिक कथा ह्यांच्या अभ्यासाचा समावेश ह्या संशोधनात केलेला आहे. इंडोनेशिया येथील प्रंबनन ह्या ठिकाणचे ब्रह्मदेवाचे मंदिर हे जागतिक वारसा स्थळ

असल्याने माहिती असते परंतु नेपाळमध्ये असलेल्या ब्रह्मदेवाच्या मूर्तीवर संशोधकाने प्रकाश टाकलेला आहे.

ब्रह्मदेव ह्या देवतेचा अभ्यास करत असताना जे प्राचीन ग्रंथ संदर्भासाठी वापरले त्यातून समोर आलेला एक महत्त्वाचा संशोधनाचा भाग म्हणजे मत्स्य, कूर्म आणि वराह हे विष्णूच्या दशावतारांपैकी असलेले पहिले तीन अवतार हे विष्णूचे नसून ब्रह्मदेवाचे आहेत. हा एक वेगळा दृष्टिकोन असून ब्रह्मदेवाचे महत्त्व किंवा लोकप्रियता कमी होत असतानाच्या काळात ह्या अवतारकथा विष्णूशी जोडल्या गेल्या असाव्यात असा एक पैलू प्रस्तुत संशोधनात लक्षात आणून देण्याचे काम संशोधकाने केलेले आहे.

ब्रह्मदेवाचा देवता म्हणून होत असलेला अपकर्ष आणि त्याची कारणे अभ्यासत असताना देवता म्हणून झालेल्या ऱ्हासाचे प्रमुख कारण असलेली कन्यासक्तीची कथा एका खगोलीय तारका समूहाशी जोडलेली आढळली. ही संपूर्ण कथा मृगशीर्ष नक्षत्र समूहाशी जोडण्यात आलेली आहे. त्यासाठी धार्मिक ग्रंथांमधील ह्या कथेचे उल्लेख अभ्यासून हाही एक वेगळा पैलू संशोधनात नजरेस आणून दिलेला आहे.

तसेच ब्रह्मदेव म्हणजेच पितामह. घरातील एखादा वयस्कर असल्याप्रमाणे सर्व देव व दानव त्याच्याशी सल्लामसलत करायला, त्याचा विचार ऐकून घ्यायला येत असल्याचे अनेक उल्लेख आढळले, त्यांचेही संकलन करून घरातील ज्येष्ठ अशी असलेली त्याची प्रतिमा प्रस्तुत संशोधनात मांडलेली आहे. अनेक कथांचा आधार घेऊन हे दाखवून दिलेले आहे.

## ५.२ निष्कर्ष

ब्रह्मदेवाचा सर्वांगीण अभ्यास करीत असताना अनेक प्राचीन ग्रंथ अभ्यासले गेले आहेत. देवता या संकल्पनेचा विकास होत असताना वेदपूर्व काळात जल, अग्नी, वायू, पृथ्वी व आकाश अशा पंचमहाभूतांच्या स्वरूपात; त्यांनाच देव मानून त्यांची पूजा होत असे. हळूहळू पुढील काळात परमेश्वर ही कल्पना निर्माण होत गेली असावी. ब्रह्मा, विष्णू आणि शिव हे तीन प्रमुख देव असल्याचे कल्पिले गेले. संपूर्ण विश्वाच्या निर्मितीची इच्छा त्या परमतत्त्वाने केली आणि ब्रह्मदेवाने हे कार्य सिद्धीस नेले. कुठलीही निर्मिती ही चिरकाळपर्यंत टिकून राहावी म्हणून विष्णू व योग्य वेळ येताच तिचा नाश व्हावा म्हणून शिव, अशाप्रकारे उत्पत्ती, स्थिती आणि लय हे

कार्य तिघांनाही नेमून दिले आहे. ह्याच पायावर हिंदूंची धारणा तयार झाली आणि वाढली. त्यातून पुढे हे तिघे मुख्य देव त्रिमूर्ती किंवा त्रिदेव म्हणून प्रसिद्ध झाले.

ब्रह्मदेवाची देवता म्हणून वैशिष्ट्ये सांगत असताना ही रजोगुणाची देवता आहे. सृष्टीची निर्मिती, सृजन हे त्याचे प्रमुख कार्य असल्याने त्याच्या हातात शस्त्र नाहीत. कोणाशी युद्ध करणे, संहार करणे अशी वर्णनेही आढळत नाहीत. त्याच्या हातात निर्मितीची साधने किंवा यज्ञीय उपकरणे आढळतात. वेदांची निर्मिती सुद्धा ब्रह्मदेवानेच केली असल्याचे उल्लेख वेळोवेळी प्राचीन साहित्यांतून आढळतात. ब्रह्मदेव आणि त्याची पत्नी असणारी सरस्वती एकत्रितपणे नवनिर्मिती आणि बुद्धी दर्शवितात. ब्रह्मा सृष्टी निर्माण करतो तर सरस्वती बुद्धीच्या साहाय्याने तिला सुसंस्कृत करते.

ह्या देवदेवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी निरनिराळे यज्ञयाग केले जाऊ लागले. ब्रह्मदेवाच्या अपकर्षाचा प्रवास इथूनच सुरू झाल्याचे आढळून येते. प्रमुख देव किंवा प्रजेचा स्वामी असणारा, वेदवाङ्मयात प्रजापती म्हणून गौरवला गेलेला ब्रह्मदेव पुढे ब्राह्मणग्रंथांमध्ये मात्र यज्ञाची देवता म्हणून स्थिर झालेला दिसतो. यज्ञ म्हणजेच प्रजापती असल्याचे ब्राह्मणग्रंथांमधून येते. स्वत: ब्रह्मदेव सुद्धा सृष्टीनिर्मितीसाठी यज्ञ करतो असेही वर्णन आहे. ब्रह्मदेवनिर्मित सृष्टीच्या रचनेसंबंधी सुद्धा अनेक कथा ब्राह्मणग्रंथांमधून दिसतात. सृष्टीचा जनक असल्याने तो देव– दानव–मानव यांच्यात श्रेष्ठत्वावरून स्पर्धा सुरू झाली. त्यात देवांपेक्षा वरचढ होण्यासाठी असुर ब्रह्मदेवाची तपश्चर्या करू लागले. अशा अनेक कथा पुराण ग्रंथांमधून गुंफल्या गेल्या.

पुराण ग्रंथांमधूनच शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त, सौर अशा पंथांची निर्मिती झाल्याचे दिसते. वैदिक देवतांचे अस्तित्वच हळूहळू कमी झालेले पाहायला मिळते. त्यात ब्रह्मदेव सुद्धा आहे. आता ह्या पंथीयवादामध्ये कोणता पंथ श्रेष्ठ, वरचढ ह्यासाठी चढाओढ सुरू झालेली दिसते. मग आपापल्या पंथाला श्रेष्ठ ठरविण्यासाठी त्या त्या पंथाचे अनुयायी त्या त्या देवतांचा गौरव, स्तुती करू लागले. असे करत असताना पूर्वीच्या प्रस्थापित देवतांना कमी लेखू लागले. ब्रह्मदेवाच्या बाबतीतही असेच काहीसे घडले असल्याचे आढळते. ब्रह्मदेवापेक्षा विष्णू व शिव महान असल्याचे ठसविण्यात आले. त्यासाठी अनेक कथा निर्माण झाल्या. त्या आपण मागच्या

प्रकरणात पाहिल्याच आहेत. त्यामध्येही कन्यासक्तीच्या कथेवर विशेष भर दिलेला आहे असे दिसते. निरनिराळी रूपके वापरून ही कथा पुन्हा पुन्हा सांगितली आहे. ह्या सर्व कथांमधून पिता आपल्याच कन्येशी समागम करण्याची इच्छा करतो हा भाग समान आहे. हाच कथाभाग घेऊन त्यावर आधारित अनेक कथा दिसतात. त्यातील मूळ भाग जरी सारखाच असला तरी वाढवलेला भाग वेगवेगळा आहे. पुराणग्रंथांमधून तर ब्रह्मदेव अगदीच स्त्रीलंपट असल्यासारखी वर्णने काही कथांमधून आढळतात. ह्या काळात प्रजापती मागे पडून त्याची जागा ब्रह्मदेवाने घेतल्याचे दिसून येते. वैदिक कल्पनेतील 'ब्रह्म' म्हणजे यज्ञीय कर्मकांडे हा अर्थ असल्याने आणि प्रजापती हा यज्ञ स्वरूपच मानला गेल्याने पुढच्या परंपरेत तेच समीकरण रूढ झालेले दिसते. परंतु पुराणग्रंथांमध्ये मात्र प्रजापती हाच ब्रह्मदेव झाल्यामुळे प्रजापतीच्या कथा व प्रतीके ब्रह्मदेवाशी जोडल्या गेल्या. ह्या कथांमधून ब्रह्मदेवाच्या अपूज्य होण्याचे समर्थन केलेले दिसून येते. मागच्या प्रकरणात ह्या कथांचा अभ्यास आलाच आहे.

समाजरचनेच्या किंवा समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था ह्यांचे नियम तयार होत असताना ही कन्यासक्तीची कथा लोकांच्या विशेष स्मरणात राहिली. हा अधर्म आहे आणि साक्षात ब्रह्मदेवाच्या हातून घडलेला आहे; त्यासाठी तो दंडित झालेला आहे. त्यामुळे इतर कथांपेक्षा ह्या कथेचा पगडा जनमानसावर जास्त प्रमाणात बसला असावा. सहाजिकच मंदिरे निर्माण होत असताना ब्रह्मदेवाला मूर्तीकलेतदेखील गौणत्व प्राप्त झालेले दिसते. मुख्य देवता म्हणून ब्रह्मदेवाच्या मंदिरांचा अभाव तर जाणवतोच, परंतु शिल्पकलेमध्ये देखील शेषशायी विष्णुच्या नाभीकमळातून तसेच शोधकर्ता ब्रह्मा व कल्याणसुंदर मूर्तींमध्येही पुरोहिताच्या रूपात असे गौणत्व प्राप्त झालेले बघायला मिळते.

निरनिराळ्या कथांमधून ब्रह्मदेवाचे अपूज्य होणे, पंथीयवादामुळे ब्रह्मदेव मागे पडणे, यज्ञयागादि खर्चिक विधि आणि त्याचवेळी नव्याने उदयाला येत असलेल्या भक्तिमार्गासारखा सोपा व तुलनेने कमी खर्चिक पर्याय; ह्या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणूनच ब्रह्मदेवाची पूजा किंवा ब्रह्मदेव ही पूज्य देवता मागे पडली असावी, असे संशोधकाला वाटते. परंतु तरी देखील त्याचे सृष्टीनिर्मितीचे श्रेय आणि त्रिमूर्तींमधील त्याचे स्थान तसेच अबाधित राहिलेले दिसते.

## परिशिष्ट १

## संदर्भ सूची

### भेट दिलेली ठिकाणे

१. औंढा नागनाथ मंदिर, हिंगोली, महाराष्ट्र

२. काशी विश्वेश्वर मंदिर, मंगळवेढा, महाराष्ट्र

३. कैलास मंदिर, वेरूळ, औरंगाबाद, महाराष्ट्र

४. कोपेश्वर मंदिर, खिद्रापुर, कोल्हापूर, महाराष्ट्र

५. थिबा पॅलेस, वस्तुसंग्रहालय, रत्नागिरी, महाराष्ट्र

६. त्रिमूर्ती मंदिर, गोळप, रत्नागिरी महाराष्ट्र

७. त्रिशुंड गणपती मंदिर, पुणे, महाराष्ट्र

८. नालासोपारा, पालघर, महाराष्ट्र

९. परमेश्वर मंदिर, हिमायत नगर, नांदेड, महाराष्ट्र

१०. पाटेश्वर मंदिर, सातारा, महाराष्ट्र

११. ब्रह्मदेव मंदिर, ब्रह्माकरमाळी, सत्तरी, गोवा,

१२. ब्रह्मा मंदिर, खजुराहो, छत्तरपूर, मध्यप्रदेश

१३. राजा केळकर वस्तुसंग्रहालय, पुणे, महाराष्ट्र

१४. रामेश्वर मदिर, संगम माहुली, सातारा, महाराष्ट्र

१५. शासकीय वस्तुसंग्रहालय, औरंगाबाद, महाराष्ट्र

१६. सिद्धेश्वर मंदिर, ठाणे, महाराष्ट्र

१७. श्री जगद्पिता ब्रह्मा मंदिर, पुष्कर, अजमेर, राजस्थान

## परिशिष्ट २

## संदर्भ ग्रंथ सूची

**English books**


1. Acharya, Prasanna Kumara. 1980. *The Architecture of Manasara. Vol IV.* Oriental Books Reprint Corporation. New Delhi.

2. Achari, Ram Ramanuja. *Namavali Sangaraha.*

3. Aufrecht, Theodor.1877. *The Rig Veda Die Hymnen.* Adolph Marcus Bonn,

4. Baily, Greg. 1979. *Trifunctional Elements In The Mythology of The Hindu Trimurty.* NVMEN International Review for the History of Religion Vol. 26 .

5. Baily, Greg. 1983. *The Mythology of Brahma.* Oxford University.

6. Banerji, Jitendra Nath.1985. *The Development Of Hindu Iconography.* Munshiram Manoharlal Publisher. Calcutta.

7. Basu, B.D. 1916. *The Matsya Puranam.* Panini Aashram. Allahabad.

8. Bhandarkar, R.G. 1965. *Vaishnavism, Shaivism and Minor Religious Systemes.* Indological Book House. Varanasi.

9. Bhatt, P.Gururaj. 1975. *Studies in Tuluva History and Culture.* South Kanara. Karnataka.

10. Bhattacharji, Sukumariji. 1983. *Rise of Prajapati.* Vol 64, No1/4. Anals of Bhandarkar Oriental Research Institute. Pune.

11. Bhattacharya, B. (Ed), 1950. *Aparajitaprichhaprichha.* Gaikwad Oriental Institute. Baroda.

12. Bhattacharya, Tarapada. 1969. *The Cult of Brahma*, Chowkhamba Sanskrit Series. Vranasi.

13. Bhide, V.V. 2002 (Re Print). *English to Marathi Dictionary*. New Delhi.

14. Bloomfield, Maurice. 1906. *A Vedic Concordance. Vol X.* Harvard University.

15. Burgess, James. 1880. *A guide to Elura Cave Temples.* The Archaeological Department The Nizam's Government.

16. Chatterjee, Gautam. 2001. *The Sacred Hindu Symbols.* Abhinava Publication. New Deihi.

17. Coomarswamy, Anandkumar. 1927. *History of Indian and Indonesian Art.* Edward Goldstone. London.

18. Cousens, Henry. 1898. *Archaeology Progress Report,* June. Archaeological Survey of India.

19. Cowell, E. B. 1861. *The Kaushitaki Brahmana Upanishad.* Baptist Mission Press. Calcutta.

20. Cunningham, Alexander. 1874-1876. *Reports of Tours in Bundelkhand and Malva. Vol X,* Archaeological Survey of India.

21. Dagens, Bruno. 2007. *Mayamatam,* Motilal Banarasidass Publishers. New Delhi.

22. Dalal, Roshen. 2010. *Hinduism An Alphabetical Guide.* Penguin book.

23. Deo, Prabhakar. 1993. *Temples of Marathwada.* Jaipur Publication Scheme.

24. Deshmukh, B. S. 1986. *Murtishilp Vaibhav- Exploration in Local History and Literature.* Nanded.

25. Deshmukh, B.S. 1987. *Iconography of Hindu Temples in Marathwada.* Jaipur Publication Scheme.

26. Deshpande, N.A. 1988. *Padma Purana.* Motilal Banarasidass. Delhi.

27. Deva, Krishna.1969. *Temples of North India.* National Book Trust. Delhi.

28. Dutt, M.N. 1896. *Vishnupuranam.* C.Dass. Calcutta.

29. Eggeling, Julius. 1882. *Satapatha Brahmana. Part 1, Books I, II. Madhyandina School.* Clarendon Press Oxford.

30. Eggeling, Julius. 1885. *Satapatha Brahmana. Part 2, Books III and IV Madhyandina School.* Clarendon Press Oxford.

31. Eggeling, Julius. 1894. *Satapatha Brahmana. Part 3, Books V,VI and VII, Madhyandina School.* Clarendon Press Oxford.

32. Eggeling, Julius. 1897. *Satapatha Brahmana. Part 4, Books VIII, IX and X, Madhyandina School.* Clarendon Press Oxford.

33. Eggeling, Julius. 1900. *Satapatha Brahmana. Part 5, Books XI, XII, XIII, XIV, Madhyandina School.* Clarendon Press Oxford.

34. Fowler, J. D. 1997. *Hinduism Beliefs and Practices.* Sussex Academic Press. Chicago.

35. Fuhrer, A. (Ed). 1891. *The Monumental Antiquities and Inscriptions in the North Western Province and Oudh.* Suprintendent Government Press.

36. Ganguly, K. M. 1883-1896. *The Mahabharata of Krishna - Dwaipayana Vyasa.* Scanned at Sacred Texts.com. Calcutta.

37. Gonda, J. 1968. *The Hindu Trinity*. Anthropos.

38. Gonda, J. 1982. *The Popular Prajapati, History of Religion. Vol XXII, Part 2.* Chicago University Press.

39. Gonda, J. 1989. *Prajapti's Relations with Brahman, Brhaspati and Brahma.* North Holland. New York.

40. Gopinathrao, T.A. 1916. *The Elememnts of Hindu Icinography. Vol 2.* Law Printing House. Madras.

41. Griffith, R. T. 1889. *Hymns of Rigveda.* E. J. Lazarus and Co. Benares.

42. Hastings, James. (Ed). 1953. *Encyclopedia of Religion and Ethics.* T T Clark. Edinburgh.

43. Hultzsch, E. 1906-6. *EPIGRAHIA INDICA AND RECORD OF THE ARCHAEOLOGICAL SURVEY OF INDIA Vol. VIII.* Calcutta.

44. Jan, Pannalal. 1959. *Padma Purana. Vol II.* Bharatiya Jnanapitha. Kashi.

45. Jha, Ganganatha. 1942. *The Chhandogya Upnishad.* Oriental Book Agency. Poona.

46. Joshi, Hariprasad Shivaprasad. 1965. *Origin and Development of Dattatreya Worship in India.* The Maharaja Sayajirao University of Baroda. Baroda.

47. Kale, M.R. 1926. *Dasakumaracharita of Dandin With A Commentary*. Gopal Narayam & Co.

48. Kanitkar, Kumud. 2011. *Brahma*. Journal of Indian Society of Indian Arts. New Series Vol XXVII.

49. Kashyap, R. L. and Sadagopan S. 1998. *Rigveda Samhita*. Shri Arobindo Kapali Sastry Institute of Vedic Culture. Bangalore.

50. Keith, Arthur B. 1914. *The Veda of The Black Yajus School entitled Taittiriya Samhita. Part 2.* The Harvard University Press. Cambridge.

51. MacDonnell, A. A. 1904. *The Brihaddevata Attributed to Shaunaka. Part 1.* Harvard University.

52. Madhavananda, Swami. 1950. *The Brhdaranyaka Upnisd.* Advaita Ashrama. Almora.

53. Madras District Gazetteers. *The Nilgiris Vol I*, 1908

54. Martin, Haug. 1922. *The Aitareya Brahmana of Rigveda First Book.* Sudhindranath Vasu. Allahabad.

55. Mishra, Rajani. 1989. *Brahma Worship, Tradition and Iconography*. Kanishka Publishing House.

56. Mishra, Rajani. 1999. *Holy Pushakara A Pilgrim's Journey In Quest Of Lord Brahma*. Kanishka Publishing House.

57. Mitra, Rajendralala and Vidyabhushana, Harachandra. 1872. *The Gopatha Brahmana.* Asiatic Society of Bengal. Calcutta.

58. Mitragotri, V. R. 1992. (Unpublished) PhD Thesis. *The Socio Cultural History of Goa From The Bhojas to the Vijaynagara.* Department of History. University of Goa.

59. Mohan, Upendra. 1936. *Devatamurtiprakaranam and Rupamandanam.* Metropolitan Printing and Publishing House. Calcutta.

60. Mor, Mansukh Rai. (Ed). 1962. *Kurma Purana.* All India Kashiraj Trust. Varanasi.

61. Mor, Mansukh Rai. (Ed). 1960. *Devi Bhagvatam.* All India Kashiraj Trust. Varanasi.

62. Mor, Mansukh Rai. (Ed). 1962. *Linga Purana.* All India Kashiraj Trust. Varanasi.

63. Mor, Masukh Rai. (Ed). 1960. *Markadeya Purana.* All India Kashiraj Trust. Varanasi.

64. Muller, Max F. 1884 *The Upanishads. Part 1.* The Clarendon Press. Oxford.

65. Nagar, Shantilal. 2006. *Brahma The Creator.* B. R. Publishing Corporation.

66. Nagar, Shantilal. 2006. *Brahma Vaivarta Purana.* Parimal Publications.

67. Panda, S. 2004. *Bhairava Worship in Upper Mahanadi Valley.* Orissa Review.

68. Paramananda, Swami. 1919. *The Upnishads.* The Vedanta Centre. Boston. USA.

69. Prabhupada, Swami. 1976. *Srimad Bhagwatam.* The Bhakti Vedanta Book Trust. California

70. Rao Ramachandra, S. K. 1988. *Pratima Kosha Encyclopedia of Indian Iconography. Vol 4.* IBH Prakashna. Bangalore.

71 Saloman Richard, *Indian Epigraphy : A Guide to the Study of Inscriptions in Sanskrit, Prakrit and the Other Indo-Aryan Languages.* Oxford University Press. USA

72. Sastri, A.Mahadeva and K, Rangacharya. 1895. *The Taittiriya Samhita of Krishna Yajurveda. Vol III.* Motilal Banarasidass. Mysore.

73. Sastri, J. L. 1951. *The Linga Purana Part 1.* Motilal Banarasidass.

74. Sastri, J. L. 1951. *The Linga Purana Part 2.* Motilal Banarasidass.

75. Sastri, J. L. 2002. *The Siva Purana Part 1.* Motilal Banarasidass.

76. Sastri, J. L. 2002. *The Siva Purana Part 2.* Motilal Banarasidass.

77. Sastri, K. Sambasiva. 1929. *The Shilparatna of Srikumara. Part II.* Her Highness Tha Maharani of Travancore. Trivendrum.

78. Sastri, T. Ganapati. 1925. *Samarangana Sutradhara. Part 2.* Gaikwad Oriental Series. Baroda.

79. Sastri, V.Subrahmanya and Bhat, M. Ramkrishna. 1947. *Brhatsamhita.* V.B.Sibbiyah and Sons. Bangalore.

80. Saxena, Saurabh. 2016. *Dudahi- An Obscure Chandela Site.* Indian History and Architecture.

81. Shah, Priyabala. 1990. *Vishnudharmottar Purana.* The New Order Book Co. Ahmedabad.

82. Sharvananda, Swami. 1920. *Mundaka and Mandukya Upnishads.* Shri Ramkrishna Math. Madras.

83. Shivaramamurti, C. 1995. *Some Aspects of Indian Culture.* Publications Division Government Of India.

84. shukla, D.N. 1958. *Hindu Canons of Iconography & Painting.* Vastu Vanmaya Prakasana Sala. Lucknow.

85. *Sind Quarterly. Vol 8,* Shah Abdul Latif Cultural Society,1980

86. Srinivasan, K.R. 1971. *Temples of South India.* National Book Trust India. Delhi.

87. Srinivasan, K.R. 1972. *Temples of North India.* National Book Trust. Delhi.

88. Srivastava, V.C. 1972. *Sun Worship in Ancient India.* Indological Publications. Allahabad.

89. Sullivan, M.Bruce. 1994. *The Religious Authority of Mahabharata, Journal of The American Academy of Religion LXII/2*

90. Tagare, G.V. 1987. *Vayupurana. part 1.* Motilal Banarasidass. Delhi.

91. *The Indian Historical Quarterly Vol XXXV, No 3,* September 1959

92. Tripathi, R.S. 1967. *History of Ancient India.* Motilal Banarasidas. Delhi.

93. Weber, Albrecht. 1972. *The Vajasaneyi Samhita.* The Chowkhamba Sanskrit Series. Varanasi.

94. Wilkins, W. J. 1900. *Hindu Mythology Vedic and Puranic.* London Missinary Society. Calcutta.

95. Williams, Monier. 2011. *Sanskrit English Dictionary. (16th Ed).* Motilal Banarasidass Publishers. Delhi.

**Annual Reports ASI**

1. *Archaeological Survey Report,* 1910-1911. *Mahabalipuram,*

2. *Annual Report of The Mysore Archaeological Department,* 1932

3. Inamdar, P. A. 1936. *Some Archaeological Finds from Idar State.* Department of Archaeology Idar State. Himatnagar.

4. *Khajuraho.* 2002. The Director General. Arcaeological Survey of India. New Delhi.

5. *Archaeological Survey of India Report,* 2004. *Mahabalipuram,* New Delhi,

6. Shivaramamurti, C. 2004. *Mahabalipuram.* Arcaeological Survey of India. New Delhi.

7. Kielhorn, F. 1889. *Dudahi Stone Inscriptions of Devalabdhi a grandson of Yasovarman. Indian Antiquary Vol VII.* Archaeological Survey of India. New Delhi.

**Gazetteer**

1. *Gazetteer of Bombay Presidency,* 1880. *Vol IV, Cutch, Palanpur and Mahi Kantha,* Government Central Press. Bombay.

2. *Gazetteer of Aurangabad.* 1884. Bombay.

3. *District Gazetteer Kanpur.* 1889.

4. *Gazetteer of The Kangra District.* 1897. *Parts II To IV. Kulu, Lahul and Spiti.*

5. *Gazetteer of the Bombay Presidency* 1901. *vol IX.* Government Central Press. Bombay.

6. *Rajputana District Gazett.* 1904. *Vol I-A. Ajmer - Merwara.*

7. *Rajputana district gazetteer* 1904. *vol 1A.* C. C. Watson Scottish Mission Industries co. ltd.

8. *Imperial Gazetteer of India for United Province of Agra and Oudh.* 1908. *Vol II.* Government Printing Press. Calcutta.

9. *District Gazetteer Trivendrum.* 1962

10. *Rajasthan District Gazetteer.* 1967. Sirohi. Government Central Press. Jaipur.

## मराठी पुस्तके


१. अनमोल. १९९८. *संस्कृत मराठी शब्दकोश,* अनमोल प्रकाशन. पुणे.

२. खरे, ग. ह.१९३०. (संपा) *दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने. खंड १.* भारत इतिहास संशोधन मंडळ. पुणे.

३. खरे, ग. ह.१९३४. (संपा) *दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने. खंड २.* भारत इतिहास संशोधन मंडळ. पुणे.

४. जोग, द. वा. १९५१. *मराठी पंचदशी.* मु.द.जोग. डोंबिवली.

५. जोगळेकर, नरहर रावजी. १९२१. *मत्स्यपुराण.* दामोदर सावळाराम आणि मंडळी.

६. जोगळेकर, नरहर रावजी. १९२१. *स्कंद पुराण.* दामोदर सावळाराम आणि कंपनी.

७. जोशी, नी. पु. १९७९. *भारतीय मूर्तिशास्त्र.* महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. नागपूर.

८. जोशी, प्र. न. १९८२. *शिवपुराण.* प्रसाद प्रकाशन. पुणे.

९. जोशी, प्र. न. १९८२. *मत्स्यपुराण.* प्रसाद प्रकाशन. पुणे.

१०. जोशी, प्र. न. १९८२. *पद्मपुराण. पूर्वार्ध.* प्रसाद प्रकाशन. पुणे.

११. जोशी, प्र. न. १९८२. *पद्मपुराण. उत्तरार्ध.* प्रसाद प्रकाशन. पुणे.

१२. जोशी, प्र. न. १९८२. *ब्रह्मपुराण.* प्रसाद प्रकाशन. पुणे.

१३. जोशी, महादेवशास्त्री. १९८५. *भारतीय संस्कृति कोश. खंड २.* भारतीय संस्कृति कोश मंडळ. पुणे.

१४. जोशी, महादेवशास्त्री. १९९६. *भारतीय संस्कृति कोश. खंड ५.* भारतीय संस्कृति कोश मंडळ. पुणे.

१५. जोशी, महादेवशास्त्री.१९९२. *भारतीय संस्कृति कोश. खंड ६.* भारतीय संस्कृति कोश मंडळ. पुणे.

१६. दाते, अनंत. दाते, विनय. दाते, ओंकार. *२०१८–२०१९. दाते पंचांग.*

१७. देव, प्रभाकर. २०१७. *मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार.* अपरांत प्रकाशन. पुणे.

१८. देशमुख, किरण. २०१७. *मराठवाड्यातील देवतांची रुपे.* निर्मल प्रकाशन. नांदेड.

१९. पाठक, अं.श. २००९. *मराठवाडा: एक शोध.* सुमेरू प्रकाशन. कल्याण.

२०. पाठक, अं. श. १९९९. *ब्रह्मदेवाची मूर्ती (शिराढोण जि. नांदेड).* राजवाडे संशोधन मंडळ. धुळे.

२१. प्रभू, अ.ज. (संपा).२००३. *मनुस्मृती.* विदर्भ मराठवाडा बुक कंपनी.

२२. फडके, आदित्य. २०१२. *पाटेश्वर: एक शोध निबंध.* वरदा प्रकाशन.

२३. बापट, धुंडिराज गणेश. १९३०. *ऐतरेय ब्राह्मण.* बापट धुंडिराज. मिरज.

२४. बापट, विष्णु वामन. १९०४. *पंचदशी.* दामोदर सावळाराम आणि कंपनी. मुंबई.

२५. भिडे, सदाशिवशास्त्री. १९३०. *कठोपनिषद्.* गीता धर्म मंडळ. पुणे.

२६. भिडे, सदाशिवशास्त्री. १९३०. *मांडुक्योपनिषद्.* गीता धर्म मंडळ. पुणे.

२७. राशिवडेकर, भानू, दातार, १९०४. *महाभारताचे सुरस मराठी भाषांतर.* चिपळूणकर आणि मंडळी.

२८. विंझे, ल. गो.१९९६. *संस्कृत मराठी सुभाषित कोश.* शुभदा सारस्वत प्रकाशन.

**संस्कृत पुस्तके**

१. आपटे, महादेव चिमणाजी. १८९३. *पद्मपुराण.* आनंदाश्रम मुद्रणालय.

२. गोडबोले, नारायण. १८९८. *तैत्तिरीय ब्राह्मणम्.* आनंदाश्रम मुद्रणालय. पुणे.

३. फडके, बाबाशास्त्री. १९२७. *तैत्तिरीय आरण्यकम्.* आनंदाश्रम मुद्रणालय. पुणे.

४. भट्टाचार्य, जीवानंद विद्यासागर. १९०८. *वाजसनेयी संहिता.* संस्कृता प्रकाशन, कलकत्ता.

५. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९४५. *तैत्तिरिय संहिता.* वसंत श्रीपाद सातवळेकर. सातारा

६. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९५७. *ऋग्वेद संहिता.* स्वाध्याय मंडळ. पारडी.

**हिंदी पुस्तके**


१. उपाध्याय, वासुदेव. १९७०. *प्राचीन भारतीय मूर्तीविज्ञान.* चौखंबा संस्कृत सिरिज. वाराणसी.

२. *ऐतरेय उपनिषद.* १९३९. गीता प्रेस. गोरखपुर.

३. ओझा, गौरीशंकर. १९९८. *राजपुताने का इतिहास. खंड ३. भाग २.* राजस्थानी ग्रंथागार.

४. *कूर्म पुराण.* २०१८. गीता प्रेस. गोरखपुर.

५. खेमका, राधेश्याम. (संपा). २०१०. *देवी भागवत.* गीता प्रेस. गोरखपुर.

६. गुप्त, मुनिलाल. १९६०. *श्री श्री विष्णूपुराण.* गीता प्रेस. गोरखपुर.

७. गोयंदका, हरी कृष्णदास. १९५२. *वेदांतदर्शन.* गीता प्रेस. गोरखपुर.

८. गोयंदका, हरि कृष्णदास. १९३३. *वेदांतदर्शन.* गीता प्रेस. गोरखपुर.

९. चतुर्वेदी, वासुदेव कृष्ण. (संपा.) १९८१. *अभिज्ञान शाकुंतलम्* महालक्ष्मी प्रकाशन. आगरा.

१०. त्रिपाठी, गयाचरण. १९८१. *वैदिक देवता उद्भव और विकास.* भारतीय विद्या प्रकाशन.

११. त्रिपाठी, रामप्रताप. १९४६. *मत्स्य महापुराण.* हिन्दी साहित्य संमेलन. प्रयाग.

१२. दयानंद, सरस्वती. १९९३. *ऋग्वेदादिभाष्यभूमिका.* आर्य प्रचार स्ट. दिल्ली.

१३. दीक्षित, राजेश. (संपा). १९८५. *श्री शिवमहिम्न स्तोत्र.* कमल पुस्तकालय.

१४. पवन, वीणा. १९९१. *भारतीय मूर्तीकला का इतिहास.* ईस्टर्न बुक लिंकर्स. दिल्ली.

१५. मालवीय, सुधाकर. १९९७. *श्रीमाहेश्वरतंत्रम्.* कृष्णदास अकादमी. वाराणसी.

१६. मिश्र, ब्रजवल्लभ. १९८८. *भरत और उनका नाट्यशास्त्र.* उत्तरमध्य सांस्कृतिक केंद्र. इलाहाबाद.

१७. मिश्र, राजदेव. २०००. *अभिज्ञान शाकुंतलम्* घनश्यामदास एण्ड सन्स. फैजाबाद.

१८. शर्मा, द्वारकाप्रसाद. १९२७. *श्री वाल्मिकी रामायण.* रामनारायण लाल पब्लिशर्स. इलाहाबाद.

१९. शर्मा, श्रीराम. २००५. *अथर्ववेद सरल हिन्दी भावार्थ सहित.* युग निर्माण योजना. उत्तर प्रदेश.

२०. शर्मा, श्रीराम. २०००. *मत्स्य पुराण. खंड १.* संस्कृती संस्थान. बरेली.

२१. शुक्ल, द्विजेंद्रनाथ. १९५६. *प्रतिमा विज्ञान.* वास्तुवाङ्मय प्रकाशन शाला. लखनऊ.

२२. शुक्ल, बाबूलाल. १९८४. *नाट्यशास्त्रम्.* चौखम्बा संस्कृत संस्थान. वाराणसी

२३. श्रीवास्तव, ब्रिजभूषण. १९९०. *प्राचीन भारतीय प्रतिमा विद्यान एवं मूर्तीकला.* *(द्वि. आ.)* विश्वविद्यालय प्रकाशन. वाराणसी.

२४. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९८५. *अथर्ववेद का सुबोध भाष्य.* स्वाध्याय मंडळ. पारडी

२५. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९८५. *ऋग्वेद का सुबोध भाष्य.* स्वाध्याय मंडळ. पारडी.

२६. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. (संपा). १९४२. *मैत्रायणी संहिता.* स्वाध्याय मंडळ.

२७. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९४२. *यजुर्वेद का सुबोध भाष्य. भाग १.* स्वाध्याय मंडल. पारडी.

२८. सातवळेकर, श्रीपाद दामोदर. १९८५. *सामवेद का सुबोध भाष्य.* स्वाध्याय मंडळ. पारडी.

२९. सिंह, जालिम. १९१७. *छांदोग्य उपनिषद.* आर्य ग्रंथावली. लाहोर.

३०. विद्याभास्कर, रामावतार. *पंचदशी.* हिन्दी भवन प्रेस. लाहोर.

## गुजराती पुस्तक

१. शास्त्री, गणपतीशंकर जयशंकर. १९३८. *पुरातन ब्रह्मक्षेत्र.* गीर्वाणवर्धिनी सभा. बनारस.

**संकेतस्थळे**


१) http://asibhopal.nic.in/monument/chhatarpur_khajuraho_brahmatemple.html हे आर्किओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे अधिकृत संकेतस्थळ आहे.

२) https://vishwakosh.marathi.gov.in/18347/ हे मराठी विश्वकोश मंडळाचे अधिकृत संकेतस्थळ आहे.

३) https://borobudurpark.com/en/temple/prambanan-2/ हे प्रंबनन मंदिर समूहाचे अधिकृत संकेतस्थळ आहे.

४) https://allhindugodgoddess.blogspot.com/2010/08/lord-dattatreya- wallpaper.html

५) www.epustakalay.com

६) https://en.wikipedia.org/wiki/Brahma विकिपिडियाचे संकेतस्थळ

७) https://archive.org/details/internetarchivebooks/ Internet Archive चे अधिकृत संकेतस्थळ

८) https://ndl.iitkgp.ac.in/ National digital library of India चे अधिकृत संकेतस्थळ

९) https://shodhganga.inflibnet.ac.in/ शोध गंगा चे अधिकृत संकेतस्थळ

१०) www.jstore.com चे अधिकृत संकेतस्थळ